
दैनिक
सिंहवाणी वृत्त
दीपरंग
दिवाळी विशेषांक 2026


आपणास व आपल्या
परिवारास
दिपावलीच्यो
हार्दिक शुभेच्छा
दिव्यांच्या उजेडाने उजळो
आपल्या जीवनाचा प्रत्येक क्षण,
आनंद, आरोग्य, समृद्धी आणि
सुसंवादाची नवी पहाट घेऊन
येतो ही दिवाळी...
आपल्या घरात सदैव
सुख, शांती आणि यशाची
लक्ष्मी नांदो !
डॉ. आशिष्कुमार देशमुख
आमदार. सावनेर -
कळमेश्वर विधानसभा क्षेत्र

दैनिक
सिंहवाणी वृत्त



दीपरंग 2026

दिवाळी विशेषांक

दैनिक सिंहवाणी वृत्त

दीपरंग 2026 | दिवाळी विशेषांक

श्रे य ना मा व ली



श्री. श्याम पेठकर (संपादक) विकास
श्री. अजय बिवडे (संस्थापक-मुख्य संपादक)
श्री. सुनील कुहीकर (संपादकीय मंडळ सदस्य)
श्री. शंकर सालोडकर (सहसंपादक)
श्री. अॅड़ अव्दैत चव्हाण (विधी मार्गदर्शक)
श्री. रवी गिते (संपादकीय मंडळ सदस्य)
श्री. धनराज हरडे (संपादकीय मंडळ सदस्य)
श्री. मनोज तायडे (संपादकीय मंडळ सदस्य)
श्री. तुषार घोरमाडे (संपादकीय मंडळ सदस्य)
श्री. राजेंद्र शेगोकार (जिल्हा संपादक- बुलढाणा)
श्री. प्रविण गुंड (वितरण व्यवस्थापक)
श्री. जीवक गजभिये (छायाचित्रकार)
श्री. कौस्तुभ पवार ('दीपरंग-२०२६' साहित्य समन्वयक)
श्री. राजेंद्र क्षीरसागर ('दीपरंग-२०२६' मांडणी-सजावट)
श्री. अभिषेक धोटे (मांडणी-सजावट सहाय्य)
श्री. अजय नेमाडे (मुद्रण व्यवस्थापक)
श्री. महादेव सिरसाट (जाहिरात व्यवस्था)
श्री. देवनाथ गंडाटे (डिजीटल आवृत्ती व्यवस्थापन)

- जिल्हा/तालुका सदस्य

श्री. किशोर साहू (कोंदामेढी, मौदा)
श्री. धनंजय पांढरे (चंद्रपूर)
श्री. मनिष शिंगणे (उमरेड)
श्री. श्रीकांत जालंधर (खापरखेडा)
श्री. राजीव फुंडे (सालेकसा)
श्री. प्रकाश टेंभरे (सालेकसा)
श्री. अतुल दंढारे (नरखेड)
श्री. अखिल रोडे (सिर्सी)
श्री. अमर मोकाशी (भिवापूर)
श्री. अविनाश शेंडे (रामटेक)
श्री. धर्मेंद्र भुते (तुमसर, भंडारा)
श्री. धर्मेंद्र शेरकुरे (वरोरा, चंद्रपूर)
श्री. किशोर ढुंडेले (सावनेर)
श्री. शुभम कामळे (काचुरवाही)
श्री. सचिन सोमकुंवर (पारशिवनी)
श्री. गजानन तलमले (वाडी)
श्री. उदय धकाते (गडचिरोली)
श्री. दिलीप इंगळे (मौदा)
श्री. हर्ष कनोजे (रामटेक)

विशेष सहकार्य

श्री. भाग्यश्री पेठकर (संचालक) वर्ड्स अँन्ड व्हूज
श्री. विनोद देशमुख (ज्येष्ठ पत्रकार)
श्री. अंशुल जिचकार
श्री. रमेश राऊत
श्री. भुषण ठाकरे

अंक मूल्य: २५० रूपये

सिंहवाणी वृत्त दैनिकातर्फे 'दीपरंग-२०२६' हा दिवाळी अंक रामा ऑफसेट, गणेशपेठ, नागपूर येथून मुद्रित करण्यात आला व ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर येथून प्रकाशित करण्यात आला आहे या दिवाळी अंकातील साहित्यात मांडण्यात आलेले मत हे लेखकांचे आहे. प्रकाशित साहित्याच्या मतांशी दैनिक सिंहवाणी वृत्त 'दीपरंग-२०२६' संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही

दैनिक सिंहवाणी वृत्त
दीपरंग 2026 | दिवाळी विशेषांक

संपादकीय

अत्त दीप भव!

राम हमारा हमे जप, हम पाये विश्राम॥

असे कबिरदास म्हणाले होते. 'राम निरंजन प्यारा रे । अंजन सकल पसारा रे॥' असे सांगत असताना म्हणजे सगळीकडे अंध:काराची काजळी दाटली असताना 'राम' हेच एक स्वत:सकट सगळेच उजळून टाकण्याचे एकमेव साधन आहे, असे सांगणारे कबीरदास रामनाम घेता घेताच या तेजस्वी अनुभूमीपर्यंत आले की, 'मीच राम आहे!' वेदांमधल्या, 'अहम् ब्रह्मास्मी!'च्या तत्वापर्यंत ते आले होते. म्हणून 'मी' रामाचा जप करतो, हा अभिनिवेश गळून पडला. मीच राम आहे आणि मीच माझा जप करतो... मग 'मला' आराम मिळतो!

आताच्या घडीला अंधार दाटला आहे, इतकेच गंभीर नाही तर अंधारच व्यवस्था आहे, इथवर ते अतिगंभीर झालेले आहे. त्यामुळे वेगळा दिवा लावून हा अंधार दूर होणार नाही. आपणच दीप झाले पाहिजे... आतून उजळून निघाले पाहिजे. माणूस केंद्री व्यवस्था निर्माण झाली पाहिजे...

आजच्या समाजात सममार्गी, मध्यममार्गी कबीराला स्थान नाही. तुम्ही एकतर उजवीकडे वाकलेले किंवा डाव्या वळणाने जाणारे हवेत. धर्माचा गीतेत सांगितलेला अर्थ गळून पडला आहे. प्रत्येकाला या जगण्यात एक भूमिका मिळालेली आहे. त्या भूमिकेचा एक धर्म आहे. सैनिकाचा धर्म लढणे आहे, शिक्षकाचा शिकविणे आहे... राजसत्तेचा आपला एक धर्म असायला हवा, तो समानता, न्याय हा आहे. तो पाळला जात नाही, असे वाटत असेल तर जनता जनार्दनाने प्रश्न विचारले पाहिजे, तो त्यांना धर्म आहे. ते आपल्या धर्माचे पालक करत असतील तर सत्ताधाऱ्यांना ते धर्मविरोधी आहेत, असे वाटू नये. वाटत असेल तर कुठेतरी चुकते आहे.

हिंदू ही माणसांना माणसांसम जगण्याची शैली देणारी अन् तशी हमी देणारी जीवनपद्धती आहे. निसर्गाला देवत्व देणारी, त्याच्यातल्या अलौकिकत्वाला मान्यतेचे तेज देणारी ही पद्धती आहे. आम्ही वृक्षांना, नद्यांना, आभाळाला, हवेला, मातीला देव मानतो. त्यांची पूजा करतो. अगदी प्रत्येक माणसाला या साऱ्याच घटकांना आपल्या पद्धतीने पूजण्याची मूभा आहे. स्वातंत्र्य आहे. सकल समाज म्हणून या सगळ्या मान्यता एक होतात तेव्हा त्याचा एक सामुहिक धर्म होतो... मात्र, हाच धर्म अपौरुषेय आहे. म्हणजे, पुरुषांनीच तो निर्माण केला आहे मात्र, तो सामुहिक पुरुषार्थ आहे. अशा पुरुषार्थाचे चार भाग करून ते एकत्रित पुरुषार्थ म्हणून त्याला मान्यता देण्यात आली आहे. या धर्माची आपली अशी एक कडेकोट संहिता नाही, कारण आमचा कुणी प्रेषित नाही. धर्मनियम ठरविणारा अन् ते पाळत नसतील त्यांना धर्मबाह्य ठरविण्याचे अधिकार असलेला असा कुणीच नाही... म्हणून आपण कालानुरूप हे नियम बदलू शकतो. ते पुन्हा सामुहिक संमतीने, जाणीवेने बदलतो. बदलत आलो आहोत. निसर्ग हाच आमचा धर्म असल्याने आमचे सण आणि उत्सवही निसर्ग, शेती, मातीशी जोडले गेले आहेत. आम्ही आमच्या या पर्यावरण धर्माचे पालन केले नाही, कारण आम्ही आमच्या प्रगतीचे मापदंड भौतिक केले. त्यामुळे यंदा दुष्काळ पडला आहे. पाऊस आला नाही, कोरड आली अन् दुष्काळ पडला, इतकेच हे मर्यादित नाही. हा दुष्काळ आमच्या जाणीवांचा आहे, जागृतीचा आहे, लबाडी, मोह, फसवणूक यांचा आहे. आम्ही भ्रष्ट झालो, प्रदुषित झालो, अगदी काया, वाचा, मनाने प्रदुषित झालो म्हणून हा दुष्काळ मोठा आहे. विस्तारलेला आहे. त्याचा परिघ खूपच मोठा आहे.

पुढच्या पावसाळ्यात पाऊस आला की, सगळे संपेल, असे नाही. मनात ओल निर्माण होणार नाही. माणसांनी माणसांना माणूस म्हणून अस्विकार करण्याचा दुष्काळ कधी संपेल? प्रश्न गंभीर, सखोल आहे. कबीरांच्या मार्गाचेच काहीतरी कवी ग्रेस यांनी सांगितले होते-

उघा दयाघना, लावा निरंजने
देहातील सोने काळे झाले...

देहातील सोने काळे झाले, हे आपल्याला कळले पाहिजे. कळले तर आपले आहे म्हणून ती काजळीही पवित्र ठरविण्याचा अट्टहासही असू नये. देहातील सोने काळे झाले, याचा स्वीकार केल्यावर आपल्याला काय करायचे, हे सूचेल. 'लावा निरंजने' हे ग्रेसांना सूचले. आपल्याला ते सुचायला हवे... वेगळी निरंजने लावण्यात अर्थ नाही. मग त्यातील पणती कुणाची तरी असेल, माती कुठलीतरी असेल, वात आपली नसेल अन् तेलही परकेच असेल... ते नश्वर असेल, संपेल... मग अक्षुण्ण, अक्षय असा दिवा लावायचा असेल तर आपणच दिवा व्हायला हवे... महात्मा गौतम बुद्धाने सांगितले होते कधीचेच, 'अत्त दीप भव!'

आपला दिवा उजळण्याचा पर्याय नाही!

संपादक
दै. सिंहवाणी वृत्त



मुख्य कार्यालय : दैनिक सिंहवाणी वृत्त, खानखोजे नगर, कल्पना ज्वेलर्स बिल्डींग, मानेवाडा रोड, नागपूर
ईमेल : sinhvanivrutta@gmail.com, ईपेपर : epaper.sinhvani.com, न्युज पोर्टल : www.sinhvani.com
युट्यूब : sinhvani vrutta, फेसबुक : दैनिक सिंहवाणी वृत्त, इन्स्टाग्राम : दैनिक सिंहवाणी वृत्त, संपर्क क्रमांक : ८६९८७८८६६६-९६५७२३२०२६

अ नु क्र म णि का



- उरकुडा / भाग्यश्री पेठकर — पृष्ठ क्र.6
- जगा आणि जगू द्या।/एकनाथ गायकवाड — पृष्ठ 10
- नक्की तेच/प्रा. भरत खैरकार — पृष्ठ 14
- नाना/उत्तम सदाकाळ — पृष्ठ 16
- शोधाच्या दोन धारा/डॉ. जयश्री हजारे — पृष्ठ 18
- वाटुळ/प्रभाकर शेळके — पृष्ठ 20
- पालकत्व/अर्चना पाटील — पृष्ठ 24
- एक वैज्ञानिकाची शोधयात्रा/अनिमिष मिरासे — पृष्ठ 28
- पहिला पाऊस/श्रीपाद टेंबे — पृष्ठ 30
- गुळाची भेली/सुधाकर रा. जाधव — पृष्ठ 32
- काय चूक झाली बुवा! / राजश्री शिरभाते — पृष्ठ 34
- जिद्द /प्रकाश पांडे — पृष्ठ 38
- अनुभवाचे शहाणपण/दुर्गाप्रसाद खांडाळेकर — पृष्ठ 40
- हिंदुंचे सण व संस्कृती/महेश वैजारपूरकर — पृष्ठ 42
- गुरुदक्षिणा/सौ. भारती दिलीप सावंत — पृष्ठ 44
- मैत्रीयी / संजय कठाळे — पृष्ठ 46
- आतिथ्य / सौ. मनिषा आवेकर — पृष्ठ 50
- दिवाळीच्या दिव्यापेक्षा 'मोठा प्रकाश माणुसकीचा'/सौ. माधुरी धनोकार — पृष्ठ 52
- अविस्मीणीय आसाम-मेघालय/गणेश पांडे — पृष्ठ 54
- एक कॉफीचा कप/संगीता कुलकर्णी — पृष्ठ 58
- कोमेजलेली फुलं / अमेय अ. जाधव — पृष्ठ 60
- महाभारतीतील सूड आणि क्षमाशास्त्र/ प्रशांत पुंडलिक शिरुडे — पृष्ठ 64
- एका अबोल्याचे महाभारत / नंदकुमार पंडित वडेर — पृष्ठ 68
- जात्यावरुन विश्वाकडे / रविराज सोनार — पृष्ठ 72
- आत्ममुग्धता / अनुराधा दिनेश वाडेकर — पृष्ठ 76
- फिल्डिंग, फटाके आणि फटकेबाजी/ डॉ. दत्ता विघावे — पृष्ठ 78
- घर विकताना न विकलेली खोली / दिनेश भदाणे — पृष्ठ 82
- वृद्धाश्रमातील आईवडिलांची आर्त हाक / सौ. मनिषा सोन्नेकर/सोनकांबळे — पृष्ठ 88
- गृहिणी / मुग्धा सुधीर टेंगशे — पृष्ठ 91

दैनिक सिंहवाणी वृत्त

दीपरंग 2026

दिवाळी विशेषांक

- हिस्सा/ सौ. विद्या निनावे — पृष्ठ 92
- ताळेबंदचा बळी / लिलाधर दवंडे — पृष्ठ 96
- एक धागा दु:खाचा / प्रा. धनाजी बुटेरे — पृष्ठ 100
- चारघौघी / डॉ. सचिन चव्हाण — पृष्ठ 102
- बोलक्या स्क्रीन, अबोल बालपण / शशिकांत मधुकर तोटे — पृष्ठ 105
- डोळस वाट / सौ. हेमांगी बोंडे — पृष्ठ 106
- कौतुकाची फुले / प्रा. अर्चना अंबासकर — पृष्ठ 108
- आधार / सुजित कदम — पृष्ठ 110
- वारस / सौ. रेखा नामदेव दहातोंडे — पृष्ठ 112
- विघ्नहर्ता / सौ. अनघा कुळकर्णी — पृष्ठ 114
- न दिसणारी कामं / छाया उंब्रजकर — पृष्ठ 116
- उत्थान / दीपावली राऊत — पृष्ठ 118



काव्यरंग : सहभागी कवी 120 ते 129

सतीश देशमुख वेणीकोठेकर | प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त' | वैशाली वर्तक | सौ. मंगल सुधीर आपटे | कविता अजय दाते | विकास गजापुरे | धनाग्रज (मंदार आपटे) | सौ. आसावरी अभिजीत ऐनापुरे | विष्णू सोळंके | सौ. सुधा सुधीर बेटगेरी | एकनाथ गायकवाड | अरुण धर्माळे | श्रीमती नीला पाटणकर | बाबू फिलीप डिसोजा कुमठेकर | कमलेश तुकाराम सोनकुसळे | प्रा. राहुल दहिवले | प्रशांत भास्कर वावगे | प्रतिक्षा अविनाश ठाकरे | अर्जुन मेश्राम | सौ. मंगला मधुकर रोकडे | मानसी जामसंडेक | डॉ. रोहित तळवलकर | मंगेश शिवलाल बरई | शेषराव जाधव (शेष) | चैतन्य टाकळकर | मृणाल प्रभुणे | मिनाक्षी शिलवंत

वार्षिक राशी भविष्य

विजय मदनकर, ज्योतिषशास्त्र तज्ज्ञ नागपूर

पृष्ठ १३० ते १३६





एन.के.पी. साळवे मेडिकल कॉलेज ॲण्ड रिसर्च सेंटर

लता मंगेशकर हॉस्पीटल

डिगडोह हिल्स, हिंगणा रोड, नागपूर

Ph.: 07104-665000 Mob. 7888006620

LMU
LATA MANGESHKAR UNIVERSITY
Legacy. Learning. Leading.



रणजीत देशमुख सुपरस्पेशॅलिटी ॲनेक्स

सुपरस्पेशॅलिटी उपचार सेवा-


हृदयरोग, कॅथलॅब व हृदयशस्त्रक्रिया


मेंदुरोग उपचार


नेफ्रोलॉजी/ डायलिसीस


कॅन्सर सर्जरी


किडनी प्रत्यारोपण


न्युरो सर्जरी


इंटरव्हेन्शनल रेडीयॉलॉजी


आयव्हीएफ (टेस्ट ट्यूब बेबी)


पेडीयाट्रिक सर्जरी


संधिवात उपचार


जॉईंट रिप्लेसमेंट


मूत्ररोग


प्लास्टिक सर्जरी


कॅन्सर उपचार


गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी


लिव्हर ट्रान्सप्लांट


कॉक्लिअर इम्प्लांट

लता मंगेशकर हॉस्पीटल
36 वर्षांपासून कमी दरात उत्कृष्ट आरोग्य सेवा १९९०-२०२४
डिगडोह हिल्स, हिंगणा रोड, नागपूर ०७१०४-६६५०००

प्रधानमंत्री जन आरोग्य योजना
आयुष्मान भारत
PM-JAY

गरजू रुग्णांकरिता
PMJAY योजना

निःशुल्क नॉर्मल डिलिव्हरी व सिझेरियन डिलिव्हरी:- ओपीडीमध्ये गर्भवती महिलांच्या सर्व तपासण्या, औषध व सल्ला मोफत तसेच डिलिव्हरी होईपर्यंत सर्व उपचार व औषध मोफत.



अधिक माहितीसाठी संपर्क:
फोन: 07104-665000,
मोबा.: 7888006623 / 9923041907

आमदार, डॉ. आशिषराव देशमुख
उपाध्यक्ष



ओपीडीची वेळ: सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.३० ते ४.००, शनिवार सकाळी ९.०० ते २.००

कथा

उरकुडा



गंगाचं कुटुंब ढासळू लागलं. हळूहळू गंगा अन् उरकुडाही नाउमेद होऊ लागले. मला माझ्या अजाणत्या वयातसुद्धा गंगा अन् उरकुडाच्या म्हातारपणाची चिंता भेडसवायची. वाटायचं, इतके दिवस इमाने इतबारे नोकरी केलेल्या, आपल्या घराचाच एक हिस्सा बनलेल्या गंगाला आपल्या आई-वडिलांनी एक-दोन एकर जमीन देऊन द्यायला हवी. त्यांच्या म्हातारपणाची काही तजवीज तरी होईल. पण या भावना व्यक्त करण्याइतकंही भान मला आलेलं नव्हतं. अर्धा गंज गुळाचा चहा पिणं हे गंगाचं टॉनिक होतं. त्याच्या झपाटल्यासारख्या काम करण्याचं रहस्य कदाचित त्या गुळाच्या चहात दडलेलं असावं...

-भाग्यश्री पेठकर

गावाकडली आठवण अनावर झाली की इथे, या शहराच्या अजगरी विळख्यात जीव गुदमरायला होतो. खुराड्यातल्या कबुतरासारखी केविलवाणी अवस्था होते. मन संवेदनशील असलं की मनावर कोरलेल्या गावाच्या आठवणी मिटत नाहीत अन् शहरातला भपकेबाजपणा मनावर ठसत नाही. इथली संध्याकाळही मोठा कॅन्व्हास लावल्यासारखी नकली वाटते. कृत्रिम वाटते. ती जिवंत नसते म्हणून अभद्र वाटते. मनात खोल खोल अस्वस्थता पाझरवणारी असते. इथं बेभान होऊन धावणारी गद आहे, पण आपले असे जवळचे म्हणावे तर बोटावर मोजण्याइतकेच. इथं गोंगाट आहे, आवाजाचा कल्लोळ आहे, पण हवा तसा संवाद नाही. मग अशा वेळी गावाकडल्या आठवणींचा सुकाळ असतो. तिथली क्षुल्लकशी व्यक्तीही आठवणींवर स्वार होऊन भोवती घिरट्या घालू लागते...

परवा बाहेरून गाडीवर येताना रस्त्यात एक कृश वृद्धा आडवी आली. अन् मला माझ्या छोट्याशा खेड्यातली उरकुडा आठवत राहिली. माझ्या माहेरी अख्खा जन्म घालवून खऱ्या अर्थाने मिठाला जागलेल्या गंगा भोयाची ती बायको! आता ती आंधळी झाली आहे. तिला आंधळेपण देऊन देवानं अन् दैवानं तिच्यावर सूड उगवून घेतला...

गंगा वाड्यावर नोकर असताना उरकुडाची शान होती. तिला गावात मानही होता. मुरमुरे, लाह्यांचे लाडू करण्यात तिचा हातखंडा होता. घराघरातील लेकरं तिच्या लाडूंची वाट पाहत असत. एका तासात ती हाराभर लाडू विकून संध्याकाळच्या स्वयंपाकासाठी घरी पोहोचलेली असायची. गंगाला वाड्यावर सात कुडव ज्वारी अन् वर काही पगार मिळायचा. त्यात त्याचं कुटुंब गुण्यागोविंदाने नांदत होतं. भाजी-पाला, लोणची, ताक-दही हेही गंगाच्या घरी रीतसर पोहोचत असे. एखाद्या बाईला लाजवेल असं गंगाचं काम. अतिशय स्वच्छ आणि नीटनेटकं. ते हसतं खेळतं कुटुंब पाहून समाधान वाटायचं. गंगा दर महिन्याला आपल्या हिश्श्याची ज्वारी कुडवानं मोजायचा. हंगामात बैलगाड्यांमधून गोण्यातली ज्वारी शिवारात उतरवली जायची अन् ती कुडवानं मोजून वाड्यातील भिंतीतल्या बखारीत भरली जायची. एक माप बखारीत ओतून दुसरा गडी परत येईपर्यंत गंगा आधीच्या क्रमांकाची उजळमी करत राहायचा. (तो तर निरक्षर होता, मग हे व्यवहारज्ञान तो कुठून शिकला असेल?) ते ऐकून ऐकूनच पाढे पाठ होण्याची संस्कार सुरू झाले. आबाजींच्या काळात गांग कोठीवान होता म्हणे. तो वाड्यावरची संपूर्ण कोठी सांभाळायचा. पण आबाजी गेले. आबाजींची दोन मुलं- दोघं भाऊ वेगळे झाले अन् गंगाच्या पदाची अवनती झाली. मोठ्या मालकाकडे काही दिवस तो राबला. एकदा वाड्यावरचं कुत्र सुटून बाहेर पळालं. मोठ्या मालकिणी बाईची गंगावर सरबत्ती झाली. त्याला तो अपमान सहन झाला नाही. कारण त्यानं त्याच्या कामात वाड्यावर नुसतं शरीरच नाही, तर मनही ओतून दिलं होतं... तो मोठ्या मालकाची चाकरी सोडून निघाला पण आबाजींच्या मिठाला तर जागायचं. त्यानं लहान मालकाचं घर गाठलं अन् शेवटची हाडंही तिथेच टाकली. गंगाचा लहान मुलगा सुधाकर गावातल्या हॉटेलवर कामाला लागला. मोठा भुमा शिकत होता. मालकाचीच शाळा. शिकल्यानं त्याला अंगमेहनतीची सवय उरली नाही. गंगाची मुलगी कावेरीचं घर गंगाच्या झोपडीच्या दोन झोपड्या पलीकडे. तिचा नवरा दारूडा. दारू पिऊन कावेरीला रात्री मारहाण करणे हा तिचा त्याचा नित्यनेम. कावेरीचं मार खातानाचं ओरडणं गंगाला असह्य व्हायचं म्हणून मग तो कधी कधी वाड्यावरच झोपून जायचा. लहानी चंद्री दिसायला अतिशय देखणी. पण, लग्न लागलं अन् तिसऱ्याच दिवशी तिला नवऱ्यानं टाकून दिलं अन् माहेरी आणून सोडलं ते कायमचंच. चंद्री कधी गंगावर अन् घरावर बोझ बनली नाही. वास्तव स्वीकारून अंगावरची हळद पुसायच्या आधी की कामाला लागली. बांधकामाच्या ठिकाणी मजुरी करू लागली. नंतर तिचं भाग्य फळफळलं. छोट्या मालकिणीच्या मोठ्या ऑफिसर असलेल्या भावाकडे दिल्लीला तिला घरकामाला नेण्यात आलं. भुमा लग्नाचा झाला. त्याला चांगल्या खात्यापित्या घरची मुलगी चालून आली. लग्न लागलं तसं त्याच्या बायकोनं भुमाला आपल्या माहेरी हसकावून नेलं. माहेरी तिच्या बापानं त्याचं हॉटेल भुमाच्या स्वाधीन केलं. हॉटेलात काम करून करून लहान्या सुध्याला दारूचं व्यसन लागलं. त्यानंही लग्न केलं. आठवड्यातच कटकटी सुरू झाल्या. गंगाच्या झोपडीवजा घराच्या लांब ओसरीत आता दोन चुली पेटू लागल्या. एक गंगाच्या उरकुडाची अन् दुसरी सुध्याच्या बायकोची.

गंगाचं कुटुंब ढासळू लागलं. हळूहळू गंगा अन् उरकुडाही नाउमेद होऊ लागले. मला माज्या अजाणत्या वयातसुद्धा गंगा अन् उरकुडाच्या म्हातारपणाची चिंता भेडसवायची. वाटायचं, इतके दिवस इमाने इतबारे नोकरी केलेल्या, आपल्या घराचाच एक हिस्सा बनलेल्या गंगाला आपल्या आई-वडिलांनी एक-दोन एकर जमीन देऊन द्यायला हवी. त्यांच्या म्हातारपणाची काही तजवीज तरी होईल. पण या



भावना व्यक्त करण्याइतकंही भान मला आलेलं नव्हतं. अर्धा गंज गुळाचा चहा पिणं हे गंगाचं टॉनिक होतं. त्याच्या झपाटल्यासारख्या काम करण्याचं रहस्य कदाचित त्या गुळाच्या चहात दडलेलं असावं...

छोटे मालक गेले अन् वाड्यावर अवकळा पसरली. छोटी मालकीण आपला संसार कसाबसा रेटू लागली. गंगाही आता थकला होता. त्याच्याच्याने आता वाड्यावरची कामं होईनाशी झाली होती. छोट्या मालकिणीनं त्याला आश्वासन दिलं, तुझ्याच्यानं वाड्यावरची चाकरी झाली नाही तरी तुझं दाणापाणी संपणार नाही. त्याच्या दोन वेळच्या जेवणाची सोय छोट्या मालकिणीनं लावली होती. शेवटी शेवटी दोन्ही सांजेला गंगा वाड्यावर कसाबसा ठेचकाळत यायचा अन् पोटभर जेवून जायचा. सोबत उरकुडासाठी बांधून न्यायचा. गंगाचा उरकुडावर भारी जीव होता. गंगा ऐंशी वर्षे जगला. एक दिवस खाटेला खिळला. डोळ्यात प्राण आले तरी ते त्याने आघोटून ठेवले होते. वाड्यावर निरोप गेला. छोटी मालकीण आली, तिनं गंगाच्या तोंडात पाणी घातलं अन् गंगा गेला...

उरकुडा केविलवाणी झाली. दोन्ही मुलं तुटली. आई-बापाचे पाश तोडून ती निघून गेली. कावेरीचा मायसाठी जीव तुटूनही ती असहाय होती. तिने तर नवऱ्याच्या संशयी स्वभावापायी कित्येक वर्षे केससुद्धा विंचरले नव्हते. कारण थोडंसंही तयार झालं, डोक्याला तेल लावून चापून चुपून वेणी घातली की तिला होणाऱ्या मारहाणीत आणखीनच भर पडे. बापाचं पाहून कधीमधी कावेरीचा मुलगी शंकरही पैशासाठी कावेरीवर हात उगारू लागला.

मी खूप वर्षांनी एकदा गावाला गेले. स्टँडवर उतरले. रस्त्याच्या बाजूला एक कृश म्हातारी नजरेला पडली. अंधार झाल्यानं आधी ओळखता आली नाही, पण नंतर लक्षात आलं की ती उरकुडा होती. मी तिच्याजवळ गेले. कलदार रुपयाएवढं कुंकू लावणारं तिचं कपाळ भकास दिसत होतं. माझ्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. कोणासाठी तरी का होईना मनात आंदोलनं उभी राहिली. बरं वाटलं. शहरात मन निबर होऊन जातं. कधी ते हेलकावलंच तर अशी अवस्था व्यक्त करायलाही माणसं मिळत नाही आणि दुसरं म्हणजे इथे जितके मुखवटे चढवून जगता येईल तितके तुम्ही यशस्वी होता. मी उरकुडाला माझी ओळख दिली. तसं तिनं माज्या पायावर मस्तक ठेवलं. मी तिला उभं करीत पक्क धरलं. पर्समधले हातात आले तेवढे पैसे मी तिच्या हातात कोंबले... त्या खेपेला वाडाभर पसरलेलं गंगाचं अस्तित्व मला सतत अस्वस्थ करीत राहिलं...

दुसऱ्या खेपेला मी गावाला गेले तेव्हा माज्या पुढ्यात कावेरी उभी. माझी बॅग घेऊन ती पुढेही निघालेली. ती एवढी निर्भयपणे वागताना पाहून मलाच भीती वाटू लागली. न जाणो हिच्या नवऱ्याने हिला असं हिंडताना पाहिलं तर तो इथूनच हिला मारत घरी नेईल. कावेरी जरा नीटनेटकी दिसत होती. रस्त्यात काही विचारू म्हणावं तर माझं सामान घेऊन कावेरी झपाझपा पावले टेकत वाड्याच्या दिशेनेही निघालेली. मी वाड्यावर पोहोचले. कावेरीके एक कटाक्ष टाकला. कावेरीचा नवरा गेल्याचं जाणवलं. कारण गळा रिकामा दिसला. अन् कपाळावर कुंकवाच्या जागी नुसता एक डाग.

कावेरी हे केव्हा झालं?

मेला बाई मसन्या. लय नरकयातना देल्या त्यानं मले. भोगत असीन आता नरकात. म्या सुटलो बाई. आता मायला (उरकुडाला) एका सांजंचं अन् ते देऊ शकतो. कावेरीचा नवरा मेला होता तरी तिच्या हातावरच्या त्याच्या माराच्या, चटक्यांच्या खोल रुतलेल्या खुणा व्रणांच्या रूपात जिवंत होत्या. त्याच्या मरणानं तिनं सुखावून जावं एवढं एखाद्या माणसानं नराधम असावं?

... धूसर नजरेत उरकुडा अजूनही कधी बसस्टँडवर तर कधी भाजीबाजारात वेड्यागत बसलेली असते. मला उगाचंच वाटून गेलं, उरकुडाला वेड तर नसेल लागलं. पण गावात कुणाला त्याच्या अपरिहार्य परिस्थितीमुळे वेड लागल्याचं ऐकिवात नाही. तो ठेका शहरानं घेतलेला. इथं निकामी, अनाथ, असहाय लोकांचं नशीब जनावरांपेक्षाही केविलवाणं नि लाजिरवाणं असतं. मग अशी व्यक्ती इथं एक तर वेडी होते, नाहीतर एका बेवारस मृत्यूची नोंद हे तिचं प्राक्तन असतं. उरकुडा उपाशीही राहात नाही. गाव तिला उपाशी राहू देत नाही. गावाजवळ अजूनही तेवढी दानत शिल्लक आहे. आणि ती तशीच शिल्लक राहणार आहे. कारण आमच्या संस्कृतीची पाळंमुळं तिथंच रुजली आहेत. म्हणूनच एखाद्यानं आम्ही खेडं पाहिलं नाही असं म्हटलं की मला ती व्यक्ती खूप केविलवाणी, अनाथ वाटू लागते... तिला कधी फॉरेस्ट ऑफिसातल्या गार्डची बायको हाका मारून जेवायला देते, कधी ग्रामसेवकाची बायको उरकुडा दिसली की तिच्या हातात दोन-चार पोळ्या अन् भाजी कोंबते...

इतक्यात येता-जाताना रस्त्याच्या फूटपाथवर बसलेली ती कृश वृद्धा दिसेनाशी झाली आहे. एक स्वेटर तिच्यासाठी काढून ठेवलं होतं, ते तिला द्यायचं होतं. जवळपासच्या परिसरात मी भिरभिरत तिला शोधत राहिले. तिचा मृत्यू झाला असेल का? तिला तर कुणीच नव्हतं, मग तिचा शेवट कसा झाला असेल? महानगरपालिकेची शववाहिका येऊन तिला घेऊन गेली असेल... अन्... पोलिस ठाण्यात एका बेवारस मृत्यूची नोंद झाली असेल...

परवाच गावाकडून मायताईचा फोन आला, उरकुडा गेल्याचा. शेवटी ती खाटेला खिळली होती... तिला कुणी फळं नेऊन देत होतं, कुणी सोजी नेऊन देत होतं... तिचं मरण साऱ्या गावानं मिळून केलं असंही कळलं...

-मुंबई

Haldiram's
NAGPUR
TASTE OF TRADITION

रिश्तों की मिठास हल्दीराम के साथ

शुभ दीपावली



कथा

जगा आणि जगू द्या!



सदाशिव नोकरीत टिकलाच पण काळ जसा पुढे सरकत होता, कोकणातही हळूहळू सुधारणांचे वारे वाहू लागलं होतं. त्या बदलत्या काळाप्रमाणे सदाशिव नेही काळाच्या पुढे दोन पावले धावायला सुरुवात केली. नोकरी करता करता गावाची गरज ओळखून राहत्या भाडोत्री घरात त्यांनी किराणा दुकान सुरू केले. त्याचे लग्न झाले. घर बसल्या त्याची बायकोही किराणा दुकान सांभाळू लागली. सदाशिवने कराराने आंब्याच्या बागा घेतल्या. आंब्याची शहरात निर्यात सुरु केली. पैशाचा ओघ वाढला, पण नोकरीही टिकवून ठेवली. मिळालेल्या पैशातून त्या लहानशा खेड्यातच जमीन खरेदी केली. आंब्याची बाग घातली. जागा खरेदी करून टोलेजंग घर बांधले. दुकानासाठी स्वतंत्र इमारत बांधली. गावातल्या चार-पाच जणांना शेती व दुकानाच्या निमित्ताने रोजगार मिळवून दिला.

-एकनाथ गायकवाड

राजभवनाच्या विशाल दालनात राज्यपाल महोदयांचे आगमन झाले. राजशिष्टाचार याप्रमाणे सर्वांनी उठून उभे राहून त्यांना मानवंदना दिली. तो पाच सप्टेंबर दोन हजार सहा चा दिवस. राज्यातील राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक तिथे उपस्थित होते. राज्यपालांच्या हस्ते पुरस्कार देऊन त्यांचा थोड्याच वेळात सन्मान केला जाणार होता. एक जात सारे शिक्षक चष्मेवाले, टक्कल पडलेले आणि जगाच्या काळजीचे ओझे वागवणारे दिसत होते. पण त्यामध्ये एक व्यक्तिमत्त्व मात्र वेगळं आणि उठावदार दिसत होतं. ते म्हणजे सदाशिव भोसले. कोल्हापुरी फेटा, सफारी, परिधान केलेले पैलवानी बांध्याचे भोसले सर सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. राज्यपाल सा०या पुरस्कारार्थींची ओळख करून घेत होते. हस्तांदोलन करत करत एक दौन मिनिटात पुढे जात होते. पण भोसले सरांच्या बरोबर मात्र त्यांनी दोन तीन मिनिटांचा छोटा संवाद साधला. व ते पुढच्या सत्कारमूर्ती कडे गेले. पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम अर्ध्या तासात आटोपला गेला. राज्याचे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त गुरुजन किंचित बावरलेल्या स्थितीत राजभवनात वावरत होते. वृत्तपत्रांचे व टी.व्ही. वाहिन्यांचे प्रतिनिधी त्यांच्या प्रतिक्रिया घेत होते. त्यावेळी हे लोक शिक्षण व त्यांच्या कार्याबद्दल अभ्यास पूर्ण आपली मते मांडत होते. पत्रकारांना प्रतिक्रिया देताना सदाशिवरावांनी मात्र सांगून टाकले, ते वेगळ्या शब्दात. म्हणजे एखाद्या अभिनेत्रीने साबणाच्या कंपनीची जशी जाहिरात करावी, उदाहरणार्थ- माझ्या सौंदर्याचे रहस्य अमुक-अमुक साबण.

तसे त्यांनी आपल्या यशस्वी जीवनाचे रहस्य सांगितले.'जगा आणि जगू द्या,या सूत्राचा वापर.' अर्थात छोटेखानी कार्यक्रम. मर्यादित वेळेत संपवला गेला. पण काही काळासाठी का होईना वृत्तपत्रात व टी.व्ही. वाहिन्यांवर झळकण्याची संधी गुरुजनांना या कार्यक्रमाच्या निमित्ताने मिळाली आणि बिचाऱ्यांच्या कष्टमय, निष्ठापूर्ण जीवनाचे ख०ा अर्थाने सार्थक झाले.

भोसले सरांचा आपल्या पुतण्यावर भारी जीव होता . आपल्या स्वत:च्या मुलांपेक्षाही ते पुतण्याशी, दिलीपशी मनमोकळ्या गप्पा मारायचे. मुंबईतून पुरस्कार घेऊन ते गावाकडे आले. गावकऱ्यांनीही गावातून त्यांची जंगी मिरवणूक काढली. खास कोल्हापूर पद्धतीने पारंपरिक सत्कार केला. आणि दुसरे दिवशी निवांत वेळेत चुलते- पुतण्याच्या गप्पा रंगात आल्या .

"तात्या, मुंबईचा कार्यक्रम कसा काय झाला?"

"अगदी अगदी झकास झाला ."

"कोण कोण लोक आले होते कार्यक्रमाला?"

"तसे बाकी महत्त्वाचे कोणी नव्हते. पण राज्यपाल, शिक्षण मंत्री, त्यांचे पी.ए .,सचिव आणि माझ्यासह इतर पुरस्कार प्राप्त

शिक्षक मंडळी ."

"तिथे भाषण कोणा कोणाची झाली?"

"अरे बाबा भाषण करण्याइतका वेळ त्यांना असतोय का?"

"अर्ध्या पाऊण तासात सगळा कार्यक्रम आटपायचा असतो."

" एवढ्या कमी वेळात?"

"हो तर मुख्य पुरस्कार वितरण कार्यक्रम अर्ध्या तासात आटोपला. वृत्तपत्र आणि टी.व्ही.च्या वार्ताहराने अर्धा तास घेतला असेल. जेमतेम तासभरच आम्हाला राजभवनात थांबता आलं."

"तात्या, बाकीच्या शिक्षकांनी टी.व्ही. वाल्यासमोर खूप मोठी भाषणे केली, पण तुम्ही फक्त दोन तीनच वाक्यात आवरतं घेतलं. असं का?

"हे बघ दिलीप ,त्यांनी केलेली भाषणे किती लोकांच्या लक्षात राहिली? आणि किती जणांनी मनापासून ऐकली असतील?"

"म्हणजे? का ऐकली नसतील ?"

"अरे बैलांना फक्त बेंदराला सजवतात, मिरवणूक काढण्यात येते, पुन्हा वर्षभर त्यांच्या मानेवरचं जू काय हटत



नाही. तसंच हे असतं. पाच सप्टेंबरला फक्त मास्तरांची आठवण सगळे करतात.पुन्हा वर्षभर मास्तरांना लोक विसरून जातात. पुन्हा त्यांची आठवण आणि उदोउदो पुढच्या वर्षीच होत असतो."

"खरं आहे तात्या, पण तुम्ही ते टी.व्ही.वाल्यांना काहीतरी सांगत होता,' जगा आणि जगू द्या 'ते काही आम्हाला फारसं समजलं

नाही. तुम्हाला त्यातून नेमकं काय म्हणायचं होतं?"

"तू काय माझी मुलाखत घ्यायला लागलास काय?"

"तसं नाही सहज विचारतोय ."आपल्या हसणाऱ्या चुलत्याकडे पहात दिलीप ने सांगितले. आणि मग हसऱ्या मुडमध्ये असणारे

भोसले सर अचानक गंभीर झाले. आणि त्यांच्या डोळ्यासमोरून त्यांच्या नोकरीचा संपूर्ण पट उलगडत गेला

साधारणपणे ऐंशी-एक्याऐंशी सालातली गोष्ट. पोरसवदा वयाच्या सदाशिव भोसलेनी बी.एड. पूर्ण केलेलं. नोकरीसाठी पेपरातल्या जाहिरातीवाचून अर्ज केले आणि त्यानुसार कोल्हापुरातील एस.टी. स्टँड जवळील सम्राट हॉटेलमध्ये त्यांना मुलाखतीसाठी बोलावल्याचे पत्र आले. त्यानुसार ते मुलाखतीला गेले होते. त्या ठिकाणी त्यांच्याप्रमाणेच मुलाखतीसाठी आणखी तीस चाळीस उमेदवार उपस्थित होते. खेडवळ दिसणाऱ्या सदाशिव पेक्षाही शहरी भागातले बरेच उमेदवार चुणचुणीत दिसत होते. आता या सगळ्यांसमोर आपला कसा काय निभाव लागणार?असा प्रश्न सदाशिवाच्या मनात येत होता. त्याला वाटू लागलं मुलाखत न देता, सहज आलोय तर कोल्हापूर फिरून घ्यावे आणि माघारी जावं. पण दुसरे मन म्हणत होतं. मुलाखत तर देऊया. मग पुढच्या पुढे काय होईल ते होईल.

मुलाखत देऊन एकेक उमेदवार बाहेर पडत होता. बाहेर येणारा प्रत्येक जण जग जिंकल्याच्या अविर्भावात बाहेर येत होता. बाहेर उभ्या असणाºया इतर उमेदवारांकडे तुच्छतेने पाहत होता. आणि बाहेरचे उमेदवार अधिकच निराश होतं होते. सदाशिवचा सदतीसावा नंबर होता. त्याचा नंबर यायला दोन वाजले .आणखी चार-पाच जण त्याच्या पाठीमागे होते. मुलाखत घेणाऱ्यानी सर्व मुलाखती संपविण्याचा चंगच बांधला होता. सदाशिवला पहिलाच प्रश्न विचारला गेला, तुम्हाला स्वयंपाक करता येतो का? सदाशिव पुरता गोंधळून गेला होता. प्रश्नकर्त्याने पुन्हा प्रश्न विचारला, "तुम्हाला जेवण बनवता येते का?"

सदाशिव थोडा सावरला होता. त्याने होय म्हणुन सांगुन टाकले. त्याच्या दृष्टीने हा अनपेक्षित प्रश्न असला, तरी त्याने खरे उत्तर दिले होते. कारण नदितले मासे, खेकडे पकडून मित्रमंडळी सह काठावर जेवण बनवून खाण्यात त्याचा हातखंडा होता. नंतर काही जुजबी प्रश्न विचारले गेले. कागदपत्र पहिली गेली आणि 'नंतर कळवतो' असे त्याला सांगितले गेले. नंतर कळवतो याचा

अर्थ आपण मुलाखतीत फेल झालो. हे सदाशिवला कळून चुकले. पण चेहऱ्यावर तसे न दाखवता निर्विकारपणे तो तेथून बाहेर

पडला. दुसऱ्या दिवसापासून त्याने शेतीकामात घरच्या माणसांना मदत करायला सुरुवात केली.

आपला ना कुठे वशिला, ना काय आपणाला कशाला नोकरी मिळते, असा विचार मनात येऊन तो पुन्हा शेती कामात व्यग्र झाला होता चार-पाच दिवसांनी त्याच्या पत्त्यावर एक बंद लखोटा आला. त्याने तो खोलून पाहिला त्याचा त्याच्या डोळ्यावर विश्वासच बसेना. त्यांनं स्वत:लाच चिमटा काढून पाहिला. आश्चर्याची गोष्ट घडली होती. त्याला चार दिवसांनी नोकरीवर रुजू व्हायला सांगितलं होतं. त्याला शिक्षकाची नोकरी मिळाली होती. तळकोकणातील मुमके गावातील हायस्कूलमध्ये त्याची निवड केली होती. त्याच्या घरी आणि दारी म्हणजे गल्लीत गावात सगळीकडे आनंदाचे वातावरण पसरलं होतं.

पावसाळ्याची सुरुवात झालेली आणि चार दिवसात हजर व्हायचं असल्याने सदाशिवाची खूपच तारांबळ उडाली. अगदी पीठा मीठा पासून अंथरून, पांघरूनापर्यंत सगळ्या साहित्याची जमवाजमव करण्यात दोन-तीन दिवस भुर्रकन उडून गेले. त्याला नोकरीवर हजर राहायला जाताना, निरोप द्यायला संपूर्ण गल्ली रस्त्याजवळ गोळा झाली होती. तो सर्व साहित्यासह दोन-तीन ठिकाणी गाड्या बदलत खेड या रत्नागिरी जिल्ह्यातील तालुक्याच्या गावात पोहोचला, तर तिथे त्याला घ्यायला दोघे तिघे जण हजर होते. पण कोणीच कोणाला ओळखत नव्हते. अशातच सगळे साहित्य बस मधून खाली उतरवून सदाशिवने बाजूला ठेवले. व तो बाजूच्या उभ्या असणाºया माणसांना मुमकेला जाणारी गाडी कोणत्या फलाटाला व कधी लागते हे विचारू लागला. तो ज्यांना विचारत होता त्या माणसाने सदाशिवला उलट विचारले, तुम्ही नवीन गुरुजी काय म्हणून विचारले. सदाशिवने होय म्हणून

सांगितले. त्यावर त्या माणसाने ते सदाशिवला घ्यायला आल्याचे सांगितले. त्यांनी सदाशिवचे सगळे साहित्य घेतले, बाहेर बैलगाडी उभी होती त्यात ते ठेवले व त्यांचा बैलगाडीतून प्रवास सुरू झाला. मुमके गावात पोहोचेपर्यंत पूर्ण अंधार पडला होता. एसटी, बैलगाडीचा प्रवास यांचा शिणवटा आल्यामुळे सदाशिवला डाराडूर झोप लागली.

दुसऱ्या दिवशी जागे झाल्यावर त्याने आपली कामे उरकली. हायस्कूलचा शिपाई त्याच वाडीतील होता. त्याच्या सोबतच दीड किलोमीटर अंतरावर असणाऱ्या हायस्कूलमध्ये तो हजर झाला. अशा तऱ्हेने त्याच्या नोकरीची सुरवात झाली. घनदाट झाडी, बेसुमार पडणारा पाऊस, सरपटणाऱ्या प्राण्यांचा मुक्त वावर, असा हा भाग. त्यामुळे या भागात घाटमाथ्यावरून आलेले बरेच शिक्षक थोड्याच दिवसात नोकरी सोडून जात. तसेच शिक्षण विभागाची ही अनास्था, अधिकार यांचे दुर्लक्ष, या सगळ्या गोष्टी तळकोकणातील शिक्षण प्रसाराला अडथळे आणणाºया होत्या. त्यामुळे या क्षेत्रात काम करणारे धडपडणारे शैक्षणिक संस्थांचे चालक हैराण व्हायचे. त्यामुळेच शिक्षकांची मुलाखत कोल्हापुरात घेतली जायची. निवड झाल्याशिवाय शिक्षकाला नोकरीचे ठिकाण दाखवत नसत. हे सगळे रहस्य सदाशिवला जाणवलं. शिक्षकाला स्वयंपाक बनवता येणे हीच इथल्या नोकरीसाठी आवश्यक असणारी प्राथमिक गुणवत्ता का आहे? हे कोडेही त्याला उलगडलं.

सदाशिव नोकरीत टिकलाच पण काळ जसा पुढे सरकत होता, कोकणातही हळूहळू सुधारणांचे वारे वाहू लागलं होतं. त्या बदलत्या काळाप्रमाणे सदाशिव नेही काळाच्या पुढे दोन पावले धावायला सुरुवात केली. नोकरी करता करता गावाची गरज ओळखून राहत्या भाडोत्री घरात त्यांनी किराणा दुकान सुरू केले. त्याचे लग्न झाले. घर बसल्या त्याची बायकोही किराणा दुकान सांभाळू लागली. सदाशिवने कराराने आंब्याच्या बागा घेतल्या. आंब्याची शहरात निर्यात सुरू केली. पैशाचा ओघ वाढला ,पण नोकरीही टिकवून ठेवली. मिळालेल्या पैशातून त्या लहानशा खेड्यातच जमीन खरेदी केली. आंब्याची बाग घातली. जागा खरेदी करून टोलेजंग घर बांधले. दुकानासाठी स्वतंत्र इमारत बांधली. गावातल्या चार-पाच जणांना शेती व दुकानाच्या निमित्ताने रोजगार मिळवून दिला. दरम्यानच्या काळात हायस्कूलचे मुख्याध्यापक पद त्याला मिळाले. हे सगळं करताना सदाशिवनं काही पथ्ये पाळली. गावातील अडल्यानडल्या माणसांना मदत करताना कधीही हात आखडता घेतला नाही. गावच्या राजकारणात प्रत्यक्ष भाग घेतला नाही. गावाच्या धार्मिक, सामाजिक, कामात वेळोवेळी भरघोस आर्थिक मदत केली. त्यामुळे त्याला कोणी हीतशत्रूही निर्माण झाले नाहीत .

शिक्षण खात्यातील नोकरी म्हणजे सुळावरची पोळी. अधिकाऱ्यांची मर्जी सांभाळण्याची कला सदाशिवला अवगत होती. अधिकाऱ्यांचा पट्टणचार, त्यांना न चुकता दरवर्षी दिल्या जाणाºया आंब्याच्या पेट्या. जपला जाणारा सलोखा. यामुळे सदाशिवच्या प्रशालेला आणि त्याच्या कामालाही चांगले शैरे मिळत होते. सहकारी शिक्षकांच्यावर बराचसा विश्वास सदाशिव दाखवत होता. त्यांना सगळ्या प्रकारची मदत देत होता. त्यामुळे तेही कल्पकतेने विविध शैक्षणिक प्रयोग, प्रकल्प राबवत होते. शाळेचा बोलबाला होत होता. सदाशिवरावांना प्रत्यक्ष शाळेत काहीही न करताही या सगळ्या गोष्टींचे श्रेय आपोआप मिळत होते विभागातील, तालुकास्तरावरील पत्रकारांचा योग्य पाहुणचार होत असल्याने, सदाशिवराव यांच्या शाळेतील साध्यासुध्या कार्यक्रमांनाही आकर्षक बातमीचे वलय प्राप्त करून देत होते याच 'जगा आणि जगू द्या!' या सूत्राच्या आधारे सदाशिव भोसलेंनी राज्य पुरस्कारापर्यंत धडक मारलेली होती. एकंदरीतच त्यांच्या यशस्वी जीवनाचे रहस्य होते,'जगा आणि जगू द्या!

त्रिंबक (मालवण)
मो.नं. ९४२११८२३३७



कथा

नक्की तेच



उरलेल्या भिंती तशाच ठेवून त्यावर लोखंडी अँगल बसवले. पुढे पत्र्याचं छप्पर घातलं. एवढ्या वर्षांनंतर पहिल्यांदा पावसाळ्यात शिवलिंगावर पाणी पडलं नाही, तेव्हा मनात एक वेगळाच आनंद झाला. जणू घरातील एखादा वृद्ध माणूस अनेक वर्षांनी पुन्हा घराच्या छताखाली आला होता. मंदिराच्या जुन्या रचनेतला वऱ्हांडा शक्य तितका जपला. जुन्या दरवाज्याची कलाकुसरही सांभाळली. मंदिराच्या परिसराची साफसफाई करताना माझ्या बालपणीच्या आठवणी पुन्हा जाग्या झाल्या. सात दिवसांचा सप्ताह. .रात्रभर चालणारं भजन..

- प्रा. भरत खैरकार

त्या रात्री पुन्हा तिला सापाचं स्वप्न पडलं. यावेळी एक साप नव्हता. काळोखातून असंख्य सापांची पिल्लं तिच्या दिशेने सरकत होती. त्यांच्या अंगावर चंद्रप्रकाश पडत होता आणि त्या सगळ्या पिल्लांच्या मागे एक जुनं, काळवंडलेलं मंदिर उभं होतं. मंदिराच्या दारात कुणीतरी तिला हाक मारत होतं. ती दचकून जागी झाली.शेजारी मी गाढ झोपलो होतो. 'ऐका ना', तिने मला हलकेच उठवलं.

'काय झालं?'

'पुन्हा सापांचं स्वप्न पडलं.'

अशा स्वप्नांची तिला आता सवय झाल्यासारखी झाली होती. पण त्या रात्री तिच्या आवाजात नेहमीपेक्षा जास्त भीती होती. माझं नुकतंच लग्न झालं होतं. गाव मागे पडलं होतं आणि आम्ही पुण्यात संसाराची नवी सुरुवात केली होती. शहरातल्या धावपळीत गावच्या आठवणींना फारसा वेळ मिळत नव्हता. तरीही तिच्या त्या स्वप्नामुळे मला अचानक माझ्या गावच्या अंगणातलं ते जुनं मंदिर आठवलं. शिवलिंग बाबाचं मंदिर. आमच्या घराच्या अंगणातच ते मंदिर होतं. कधी, कुणी आणि का बांधलं- याचं निश्चित उत्तर गावातल्या कुणाकडे नव्हतं. प्रत्येकाकडे त्याची एक वेगळी कथा होती. कुणी म्हणायचं, एखाद्या राजाच्या काळात ते बांधलं गेलं. कुणी म्हणायचं, एका गोसाव्याने तिथे तपश्चर्या केली आणि त्याची समाधीच पुढे शिवस्थान झाली. तर काही वृद्धांच्या मते, मंदिरापेक्षाही जुनी होती तिथली पिंड.. तिथलं लिंग..म्हणूनच त्याचं नाव पडलं होतं-शिवलिंग बाबा.

बालपणी मात्र मला त्या इतिहासाशी काही देणंघेणं नव्हतं. आमच्यासाठी ते मंदिर म्हणजे लपाछपीचं उत्तम ठिकाण होतं. मंदिराच्या गर्भगृहाभोवती चारही बाजूंनी अरुंद वऱ्हांडा होता. त्याच्या बाहेर जाडजूड दगडी भिंती. भिंती इतक्या जाड की त्यांच्यात बसण्याइतकी जागा तयार झालेली होती. जुन्या काळच्या त्या बांधकामात चुन्याचा, दगडांचा आणि मानवी हातांच्या कष्टाचा एक विलक्षण संगम दिसायचा. दार मात्र अजूनही अप्रतिम होतं.उंची कमी, पण लाकडावर कोरलेल्या महिरपी आणि नक्षीकाम इतकं सुंदर की त्याकडे पाहताना माझ्या बालमनालाही कुतूहल वाटायचं. मंदिर वर्षभर अंधारातच असायचं. पण महाशिवरात्री आली की अचानक त्याचा जीव परत यायचा. दिवे लागायचे, धूपाचा वास पसरायचा, बेलपत्रांनी पिंड सजायचा आणि आमचं अंगण माणसांनी भरून जायचं. नागपंचमीला मंदिरासमोरचा छोटासा दगड विशेष महत्त्वाचा व्हायचा. तोच आमचा नागोबा.शेजारच्या घरात निघालेला साप मारून त्याला तिथे गाडण्यात आलं होतं, अशी एक आख्यायिका होती. त्या जागेवर दगड ठेवून लोक पूजा करू लागले होते. वर्षभरात साप चावल्याची एखादी घटना घडली की त्या व्यक्तीला तिथे आणलं जाई. बायका डोक्यावर कडुनिंबाच्या पानांचा पाला घेऊन येत आणि नागोबाला अभिषेक करत. त्या सगळ्याचा अर्थ मला तेव्हा कळत नव्हता. पण सापांची पिल्लं मला नक्की दिसायची. गावच्या भाषेत त्यांना 'सापांचं लळ' म्हणायचे.

मंदिराच्या आजूबाजूला ती लहान लहान पिल्लं दिसली की आम्ही मुलं दुरूनच दगड फेकून पळायचो. काळ पुढे गेला. मी मोठा झालो. शिक्षणासाठी गाव सोडलं. नोकरी लागली. लग्न झालं. पुण्यात संसार सुरू झाला.आणि मग आमच्या आयुष्यात नचिकेत आला. मुलगा झाल्याचा आनंद वेगळाच होता. त्या आनंदाच्या दिवसांत आईशी फोनवर बोलताना मी सहज माझ्या पत्नीच्या सापांच्या स्वप्नांचा विषय काढला.आई काही क्षण शांत राहिली.

'तुम्ही दोघांनी गावच्या शिवलिंग बाबाची पूजा केली पाहिजे,' ती म्हणाली.

मी हसलो.

'आई, पुण्यात डॉक्टरांना दाखवू की शिवलिंग बाबाला?'

'दोन्ही कर. पण गावच्या देवाला विसरू नकोस. नचिकेत झालाय ना? त्याच्या निमित्ताने पूजा कर. आपल्या कुवतीप्रमाणे लोकांना बोलाव. देवासमोर बस.'

आईचा आवाज श्रद्धेचा होता, अंधश्रद्धेचा नव्हता. तिच्यासाठी तो देवापेक्षा स्मृतींचा प्रश्न होता.माज्या मनातही एक विचार आला-आपण ज्याच्या सावलीत वाढलो, त्याच्याकडे आपण इतकी वर्षं वळून पाहिलंच नाही.

आम्ही गावाला गेलो.मंदिर पाहिलं आणि मन सुन्न झालं. बालपणीचं ते मंदिर आता भग्न झालं होतं. आजूबाजूच्या घरांनी आपापल्या जागा वाढवताना मंदिराची जागा हळूहळू गिळंकृत केली होती. कुठे भिंती मोडल्या होत्या, कुठे दगड उपटले होते.

छप्पर नव्हतं. पावसात शिवलिंग भिजत होतं. माझ्या बालपणीच्या आठवणींच्या जागी आता अवशेष उभे होते.पण विचित्र गोष्ट अशी की देवाची जागा कमी होत गेली आणि माणसांच्या घरांची जागा वाढत गेली. त्या दिवशी आम्ही जीर्णोद्धाराचा संकल्प केला. पंधरा-वीस दिवस सुट्टी काढून आम्ही गावात राहिलो. मंदिराच्या भिंती पाडायला सुरुवात केली आणि आमच्या लक्षात आलं की त्या भिंती फक्त दगडांच्या नव्हत्या..त्यात प्राचीन काळाच्या खुणा होत्या.

जाडजूड दगडी भिंती तोडताना घाम फुटत होता. काही भाग तर मधून कापावा लागला. उरलेल्या भिंती तशाच ठेवून त्यावर लोखंडी अँगल बसवले. पुढे पत्र्याचं छप्पर घातलं.एवढ्या वर्षांनंतर पहिल्यांदा पावसाळ्यात शिवलिंगावर पाणी पडलं नाही, तेव्हा मनात एक वेगळाच आनंद झाला.जणू घरातील एखादा वृद्ध माणूस अनेक वर्षांनी पुन्हा घराच्या छताखाली आला होता. मंदिराच्या जुन्या रचनेतला व०हांडा शक्य तितका जपला. जुन्या दरवाज्याची कलाकुसरही सांभाळली. मंदिराच्या परिसराची साफसफाई करताना माज्या बालपणीच्या आठवणी पुन्हा जाग्या झाल्या. सात दिवसांचा सप्ताह..रात्रभर चालणारं भजन..

शेवटच्या दिवशीचा महाप्रसाद..आमचं अंगण म्हणजे जणू जत्राच. गावातल्या प्रत्येक घरातून माणसं यायची. मोठी माणसं अभंग म्हणायची. आम्ही मुलं धावत फिरायचो. आषाढी एकादशीला तर सगळ्या दिंड्या गावाची प्रदक्षिणा करून मंदिरात यायच्या. टाळ-मृदंगाचा आवाज, भगवी पताका, विठ्ठलनामाचा गजर आणि धुळीने भरलेलं अंगणङ्घत्या क्षणी आमचं घर फक्त आमचं राहत नसे. ते संपूर्ण गावाचं व्हायचं. जीर्णोद्धाराच्या वेळी मला जाणवलं-मंदिर मोडलं होतं ते फक्त दगडांनी नाही.आपल्या नात्यांमध्येही कुठेतरी तडे गेले होते. देवावरची श्रद्धा कमी झाली होती आणि स्वत:च्या मालकीची भावना वाढली होती. मंदिराची जमीन कोणाची, हा प्रश्न मोठा झाला होता. मंदिर कुणाचं, हा प्रश्न मात्र कुणी विचारत नव्हतं.

एके दिवशी आम्ही मंदिरात पूजा केली. स्वयंपाक घातला. सत्यनारायणाची पूजा केली. शिवलिंगासमोर बसून मी फार मोठं काही मागितलं नाही.'माझ्या बायकोला सुख दे. माझ्या नचिकेतला चांगलं आयुष्य दे. आणि या जागेला पुन्हा माणसांनी भरून टाक.'

इतकीच प्रार्थना केली.

त्या दिवशी गावातला प्रसिद्ध सोनार ब्राह्मणही आला होता-'बम बम भोले' म्हणून ओळखला जाणारा. त्याने पूजा केली आणि आम्हाला भरभरून आशीर्वाद दिले.पण एक गंमत झाली. त्याला 'नचिकेत' हे नाव उच्चारता येत नव्हतं.तो पुन्हा पुन्हा म्हणत होता,

'नक्की तेच सुखी राहो, नक्की तेच मोठा होवो'!

आम्ही सगळे हसू लागलो. त्या दिवसापासून नचिकेत आमच्यासाठी कधी कधी 'नक्की तेच' झाला.

काही वर्षांनी मंदिरासमोर उभा राहिलो तेव्हा मला त्या नावाचा अर्थ अचानक वेगळा वाटला. नक्की तेच! माणूस कितीही दूर गेला तरी शेवटी त्याला परत यावं लागतं, त्याच्या मुळांकडे. मंदिराच्या खाली एका गोसाव्याची समाधी असल्याचं गावात सांगितलं जायचं. कदाचित म्हणूनच पिंडाला शिवलिंग बाबा म्हणत असतील. आम्ही मात्र त्या समाधीचा मान ठेवत मंदिराचा पुढचा टप्पा पूर्ण केला.जबलपूरहून संगमरवराची शिवमूर्ती आणली. मूर्तीची प्रतिष्ठापना झाली.ज्या जागी कधी फक्त चबुतरा आणि पिंड होती, तिथे आता शांत, प्रसन्न शिवमूर्ती उभी राहिली. आणि मग हळूहळू एक चमत्कार घडला.

शेजारची मुलं मंदिरात येऊ लागली. कोणी पिंडीवर पाणी घालू लागलं. कोणी नारळ फोडू लागलं. कोणी धूप लावू लागलं.संध्याकाळी मंदिरातून अगरबत्तीचा वास यायला लागला.वर्षानुवर्षं बंद असलेली जागा पुन्हा श्वास घेऊ लागली.

एकदा सकाळी मी मंदिरासमोर उभा होतो. माझा मुलगा नचिकेत शिवलिंगावर पाणी घालत होता. तेवढ्यात मला माझ्या बालपणातली ती सापांची पिल्लं आठवली. आणि पत्नीची स्वप्नंही. मला उमगलं-कदाचित त्या सापांच्या स्वप्नांचा अर्थ देवाचा राग नव्हता. तो कदाचित माझ्या.. आपल्या ..विस्मृतीचा इशारा होता. आपण ज्या गोष्टींना मागे सोडतो, त्या नेहमी मरत नाहीत. काही गोष्टी शांतपणे वाट पाहत राहतात. एखाद्या जुन्या मंदिरासारख्या.एखाद्या आईच्या आठवणींसारख्या. एखाद्या वडिलोपार्जित नात्यासारख्या किंवा आपल्या स्वत:च्या बालपणासारख्या.

नचिकेतने माझा हात धरला. 'बाबा, आपण उद्या पण इथे येणार ना?' मी त्याच्याकडे पाहिलं.

मंदिराच्या दारातून सकाळचा प्रकाश आत येत होता. जुन्या दगडांवर त्याची सोनेरी रेघ पडली होती. कुठेतरी जवळच्या घरातून घंटा वाजली. मी हसलो.

'हो. नक्की तेच', तो हसला.

'काय?'

मी त्याच्या डोक्यावरून हात फिरवला.

'काही नाही. तुझं नावच आहे ते.'

आणि त्या क्षणी मला जाणवलं-मंदिराचा जीर्णोद्धार आम्ही केला नव्हता. मंदिरानेच आमच्या घराचा, आमच्या आठवणींचा आणि आमच्या माणूसपणाचा जीर्णोद्धार केला होता. देव पुन्हा मूर्तीत आला की नाही, हे कोणाला माहीत? पण माणसं मात्र पुन्हा एकदा एकमेकांच्या जवळ आली होती.आणि कदाचित, तोच खरा देवाचा पुनर्जन्म होता.

चिंचवड, पुणे
मो. ९८८१६१५३२९

कथा

नाना

- उत्तम सदाकाळ



गेले दोन दिवस तात्यांचे बैल वैरणीला तोंड लावत नव्हते. डोळ्यातून आसवे गाळत ते खळ्यासमोरील विहिरीकडे भकास नजरेने बघत बसायचे. तात्या बैलांची अवस्था पाहत होता. त्यांचे दु:ख समजू शकत होता. खरेतर तात्यावरच दु:खाचा डोंगर कोसळला होता. त्या दु:खातून सावरता सावरता तो आपल्या बैलांना कसेबसे समजावण्याचा प्रयत्न करत होता. मान खाली घालून गप्प बसलेल्या बैलांकडे बघत तात्या गदगदलेल्या स्वरात त्यांना म्हणाला, ''आरशा, बारशा, अरे बाबांनो वैरण खा रे माझ्या राजांनो! मला माहीत आहे तुम्हाला दु:खाची बोचणी लागलीय ते. अरे पण झालेल्या घटनेत तुमचा काहीच दोष नाही रे. तुम्ही उगाच मनाला लावून घेऊ नका. झालेली घटना तुमच्यामुळे झाली नाही. ते सारे अनावधानाने घडले. जे व्हायचे होते ते होऊन गेले. विधिलिखित आपण टाळू शकत नाही.''

'अरे माझ्या दोस्तांनो, तुम्हाला तुमचा मालक गेल्याचे जसे दु:ख झालेय तसेच मलाही माझे वडील गेल्याचे दु:ख झालेय ना? पण मी स्वत:ला सावरलेय. मग तुम्ही का असे धीर सोडून बसलात ? तुमच्यामुळे नाना नाही गेले. तो एक अपघात होता. आता तरी माझा ऐका आणि चारा खा रे माझ्या राजांनो.' तात्या आरशाला आणि बारशाला डोळ्यात पाणी आणून समजावत होता. पण आरशा बारशाला लागलेली बोचणी काही कमी होत नव्हती. त्यांच्या डोळ्यासमोर तो प्रसंग जसाच्या तसा उभा राहत होता. त्या दिवशी नाना बैलांना पाणी पाजण्यासाठी खळ्यावर आले होते. नाना म्हणजे मायाळू स्वभावाचा माणूस. आपल्या बैलांवर त्यांचे जीवापाड प्रेम. बैलानंही आपल्या मालकाचा कमालीचा लळा. घरापासून जरा अंतरावर असलेल्या खळ्यावर बैल बांधलेले असायचे.नाना त्यांच्या वैरण काडीची व्यवस्था पहायचे. खळ्याजवळच्या विहिरीवर सकाळ-संध्याकाळ बैलांना पाणी पाजायचे. त्या दिवशी नाना बैलांना पाणी पाजण्यासाठी विहिरीवर घेऊन आले होते. उन्हाचा तडाखा वाढल्याने बैल चांगलेच तहानलेले होते. कधी एकदा पाणी प्यायला मिळते असे त्यांना झाले होते.

नानांनी बादलीने विहिरीतले पाणी काढायला सुरुवात केली. तहानलेले बैल पुढे सरकले. नानांनी एका घमेल्यात पाणी ओतले. आणि घमेले आरशापुढे ठेवले. आरशा उतावीळपणे पाणी पीत तहान भागवू लागला. मग बारशाला राहवले नाही. त्यानेही पाण्याच्या घमेल्यात तोंड घातले. आणि तो पाणी पिण्याचा प्रयत्न करू लागला. आरशाची तहान भागली नसल्याने आरशा बारशाला ढकलू लागला. पण बारशाही आरशाला न जुमानता बळेच घमेल्यात तोंड घुसवून पाणी पिण्याचा प्रयत्न करू लागला.

आरशा आणि बारशा तहानलेले आहेत हे नानांना माहीत असल्याने ते भरभर पाण्याच्या बादल्या विहिरीतून वर ओढत होते. घाईघाईने बादल्या वर काढताना त्यांना दम लागत होता. नानांचे वय झाल्याने त्यांना अतिश्रम सहन होत नव्हते. पण बैलांसाठी ते अंगातील होत्या नव्हत्या ताकतीने पाणी ओढत होते.

पलीकडच्या बाजूला पांडुरंग आपल्या बैलांना पाणी पाजत होता. भर उन्हात घामाने न्हाऊन निघालेल्या नानांची बैलांसाठी पाणी ओढण्याची लगबग तो कौतुकाने बघत होता. नाना पाणी ओढत होते आणि तहानलेले बैल लगबगीने पाणी संपवत होते. बैलांच्या उतावीळपणाला हसत नानांनी विहिरीत बादली फेकली. बादली पाण्याने भरताच नानांनी खाली वाकून बादली ओढण्यास सुरुवात केली. एवढ्यात आरशा बारशा पाणी पिण्यासाठी एकमेकांना बाजूला ढकलू लागले. त्या गडबडीत समोरच्या घमेल्याचा आवाज झाला.

पाणी ओढणारे नाना त्या आवाजाने दचकले. आणि अचानक त्यांचा तोल गेला. हातात पाण्याने भरलेली बादली असल्याने नाना थेट विहिरीत कोसळले. आणि घात झाला.....नाना विहिरीत पडताच विहिरीतल्या एका दगडावर आदळले. आणि मग खोल पाण्यात पडले. क्षणार्धात विहिरीचे पाणी लाल झाले. पांडुरंगाने ते दृश्य पाहिले आणि त्याने घाबरून आरोळी ठोकली. दचकलेले नाना तोल जाऊन विहिरीत पडलेले बघून आरशा बारशा हादरले. ते पुढे होत विहिरीत डोकावून हंबरून लागले. पण...पण सगळे संपले होते..... पांडुरंगच्या आवाजाने लोक भराभर गोळा झाले. त्यांनी नानांना बाहेर काढले. पण नाना केव्हाच हे जग सोडून निघून गेले होते.

नातेवाईकांच्या रडण्याने वातावरण दु:खाने भरून गेले होते. बाजूला उभे असलेले आरशा बारशा एक सारखे हंबरत होते. नानांना

हाका मारत होते. त्यांच्या डोळ्यातून अश्रुंच्या धारा सुरु होत्या. माणसांच्या रडण्यात त्यांच्या हंबरण्याचा आवाज कोणाला ऐकू येत नव्हता. आरशा आणि बारशा दु:खाने भरलेल्या आवाजात जणू काही म्हणत होते,

''नाना, हे काय झाले हो? आमच्यामुळे तुम्ही दचकलात ना नाना? आमच्यामुळे तुमचा तोल गेला ना नाना? तुम्ही आम्हाला पोटच्या मुलाप्रमाणे जपले पण आता आमच्यामुळेच हे काय होऊन बसले नाना? नाना आम्हाला सोडून नका ना जाऊ.'' माणसांच्या रडण्याच्या कोलाहलात आरशा बारशाचे दु:खी हंबरणे कुणाच्या लक्षात येत नव्हते. पण नानांचा आत्मा मात्र त्यांना

समजावत म्हणत असावा, ''आरशा बारशा, अरे रडू नका रे बाळांनो. तुमच्यामुळे नाही रे मी पडलो. माझे वय झाले होते. मला श्रमाचे काम जमत नव्हते. भरलेल्या बादल्या ओढताना मी थकलो होतो. त्यात उन्हाचा तडाखा असल्याने मला भोवळ आली आणि मी कोसळलो. पण माझ्या राजांनो, यात तुमचा काहीही दोष नाही. तुम्ही उगाच मनाला लावून घेऊ नका. माझ्या तात्याला साथ द्या.तोही माज्यासारखाच तुम्हाला जीव लावेल. माझ्या बाळांनो, आपला सहवास आता संपला. तुम्ही स्वत:ला सावरा आणि तात्यापाठी भक्कमपणे उभे राहा.''

नानांचा आवाज आरशा बारशाला समजला की नाही कुणास ठाऊक. पण त्या दिवसापासून ते वैरणीला तोंड न लावता आपल्या

मालकाची आठवण काढत सारखे अश्रू ढाळत बसलेले असतात.

जुन्नर
मो. ९०११०१६६५५


CONCEPT
CONSTRUCTIONS & REALTORS
WE BUILD YOUR DREAMS..
Diwali
Special Offer
On Finishing Work
Package Offer – Finishing Work
Basic Package ₹1699 / sq.ft.
Classic Package ₹1899 / sq.ft.
Premium Package ₹2299 / sq.ft.
Flat ₹100 /sq.ft. OFF
Complimentary Offers
Semi Modular Kitchen FREE
2D Map FREE
3D Elevation FREE
Structural Design FREE
Build Your Dream Home This Diwali with Concept
High Quality Construction
Expert Team
Transparent Pricing
On-Time Delivery
Call Now for Site Visit & Consultation
8668966031
Raj Chauragade

कथा



शोधाच्या दोन धारा

प्रश्न फक्त शोध लावण्याचा नाही तर त्याचा उपयोगा आपण कसा करतो हा आहे! जर मानवाने आपली बुद्धी आणि उत्सुकता निसर्गसंवर्धन, मानवकल्याण आणि विकासासाठी वापरली तर मानवजातीचे भविष्य सुरक्षित राहील, अन्यथा, हव्यास आणि स्वाथार्मुळे आपण स्वत:च्या विनाशाकडेच धाव घेत आहोत! खरचं शोधाची एक धारा जीवनाला पुढे नेणारी असते, तर दुसरी धारा विनाशाकडे नेणारी. माझे मन या सगळ्या न उकलणाऱ्या विचारांच्या भोवऱ्यात अडकले होते!

- डॉ. जयश्री हजारे

मी माझ्या घरच्या ऑफीसमध्ये काम करीत बसलो होतो. तेव्हा तेथे शैलजा आली आणि मला म्हणाली, 'डॅड, इट्स नॉट फेअर, शशांक हॅज लॉस्ट हीज जॉब बिकॉज इन हिज इंडस्ट्री नाऊ मोस्ट ऑफ द वर्क इज डन बाय रोबोट.'

शैलजा भयंकर चिडली होती. तिचं चिडणं बरोबरच होतं म्हणा, कारण नोकरी गेल्यानंतर घरासाठी, कारसाठी, दर महिन्याला द्यावे लागणारे इ.एम. आय., मुलांचा शाळेचा खर्च सर्व तिच्या एकटीच्या पगारात होणे शक्यच नव्हते. तिचे बोलणे ऐकून मलाही धक्काच बसला होता. मी एका रोबोटीक रिसर्च इन्स्टिट्यूटमध्येच काम करतो आहे. नकळतच माझे मन भुतकाळाच्या भोवऱ्यात फिरू लागले. मला यु.एस.ला येऊन आता ५० वर्षे होतील. मी भारतातून फिजीक्स मध्ये एम.एस्सी. केले होते. मी गोल्ड मेडॅलिस्ट होतो आणि नंतर मी उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत आलो. मी पी.एच. डी. केले आणि अमेरिकेतच रिसर्च इन्स्टीट्युटमध्ये नोकरीला लागलो.

आमच्या इंस्टिट्यूट मध्ये सगळ्या प्रकारच्या नवीन नवीन गोष्टींवर सतत संशोधन सुरू असते. आमच्या जनरेशनने कितीतरी बदल बघितलेले आहेत. विज्ञानामुळे तसेच नवीन,नवीन अडव्हान्स टेक्नालॉजीमुळे आपल्या आयुष्यात आपण आता अनेक चांगल्या गोष्टींचा उपभोग घेऊ लागलो. आधी साधा रेडिओ मग व्हिडिओ,टेप रेकॉर्डर आणि आता स्मार्ट टी. व्ही.तसेच सुरवातीला लॅन्ड लाईन फोन नंतर कॉर्डलेस फोन आणि आता मोबाईल. मोबाईलने तर मोठी क्रांती घडवली आहे. मोबाईलने प्रत्येकाचे जीवन बदलले आहे. आपला मेंदूचा वापरही कमी झाला आहे.पुर्वी आपल्याला महत्वाचे फोन नंबर लक्षात असायचे आता १-२ महत्वाचे नंबर सोडून आपण कोणतेच नंबर लक्षात ठेवत नाही.

आता मोबाईल फोन मुळे आपण साधा कॉल, व्हिडिओ कॉल,मेसेज पाठवणे चॅट करण्यापासून तर कॅमेराने फोटो काढण्या पर्यंत सर्व करू शकतो तसेच वेगळे वेगळे ॲप डाऊनलोड करून त्याचाही उपयोग केला जातो.आजकाल पुष्कळ जण ऑनलाईन शॉपींगच करतात. मोबाईलमुळे आपल्या हालचाली कमी झाल्या,लहान मुले तासन्तास मोबाईलवर गेम खेळत असतात. या मोबाईलचा आपल्या आरोग्यावर पण वाईट परिणाम होतो आहे. लहान मुलांवरही त्याचा वाईट परिणाम होतो आहे. आजकाल आमच्या कडे तसेच वेस्टर्न देशांमध्ये ॲलेक्सा मॅडम सारखे नवीन टेक्निक्स सगळे जण वापरतात, त्यांची मदत घेतात.ॲलेक्सा लाईट लावणे, बंद करणे, रोजचे हवामान सांगणे,गाणे ऐकवण्यापासून तुम्हाला ओषधांची आठवण करून देण्यापर्यंत सर्व कामे करतात. एकदा लंडनला राहणाऱ्या माझ्या भावाचा सात वर्षाचा नातू

त्याच्या वडिलांना विचारायला लागला,"डॅडी कॅन अलेक्सा डू माय होमवर्क़ तेव्हा आम्ही सगळे हसले होतो पण तेही शक्य आहे आणि त्याचा दुरुपयोगही होऊ शकतो."

आजकाल ए.आय.मुळे सगळी माहिती तुम्हाला एका क्लिकवर उपलब्ध होते. एकाने तर ए.आय. चा उपयोग करून पुस्तक पण प्रकाशित केले होते म्हणे! पण या सगळ्या गोष्टींचा आपल्या विचार शक्तीवर नक्कीच वाईट परिणाम होतो. शेवटी ही सर्व उपकरणे आपण व्यवस्थित वापरली तरच उपयोगाची आहेत. पण आपण या सर्व गोष्टींचा आपल्या शरीरावर, विचार शक्तीवर, मेंदूवर होणाऱ्या दुष्परिणामांचा फारसा विचार करत नाही. आता रोबोटचा मनुष्याला प्रत्येक गोष्टीत कसा उपयोग होऊ शकेल याचेच संशोधन सुरु आहे. आधी डॉक्टरांना सर्जरी करण्यासाठी सोपे व्हावे म्हणून रोबोटीक सर्जरींमध्ये संशोधन करण्यात आले. अशा प्रकारच्या रोबोटीक सर्जरीमुळे कमी रक्तस्त्राव होतो आणि त्यामुळे पेशंट लवकर बरा होऊ शकतो. पेशंटसाठी ही पध्दत फारच उपयुक्त आहे. काही ठिकाणी दुकांनामध्ये अगदी लहान लहान कामांसाठी रोबोट्सचा उपयोग केला जातो, पण आता आरटीफीशीअल इंटेलिजन्स आणि रोबोट दोन्हींचा उपयोग काही इंडस्ट्रीजमध्ये भरपूर करण्यात येत आहे हे मला माहिती होते, पण आज त्यामुळे माझ्याच जावयाची नोकरी गेली होती. आज आमच्याच एका संशोधनामुळे माझ्या कुटुंबावर संकट आले होते आणि माझ्या लाडक्या शैलजा वर दु:खाची कुऱ्हाड कोसळली होती.

तिच्या आईच्या निधनानंतर मी एकट्याने, खूप प्रेमाने शैलजाचा सांभाळ केला होता. मला फारचं वाईट वाटत होते. माझ्या जावयाला, शशांकला दुसरी चांगली नोकरी मिळेल, तो हुशार आहे पण त्याच्याप्रमाणेच आणखी कितीतरी लोकांच्या नोकऱ्या गेल्या असतील. आजकाल इकडे नोकरी मिळणे तसेही कठीणच झाले आहे. काहीजण तर वयाच्या पन्नाशीत असतील, त्यांचे काय! रोबोटमुळे मोठमोठ्या कंपनीचा नक्कीच फायदा होत असणार पण लोकांच्या "रोजी-रोटीचे" काय? आधी ॲटमचा शोध लागला, नंतर ॲटम बॉम्बचा.

ॲटम बॉम्बमुळे हिरोशिमा, नागासाकी बेचिराख झाले होते आता युक्रेन, रशिया गाझा, इराण, अमेरिका सगळीकडे तेच सुरू आहे. माझे मन विषण्ण झाले होते, मला फारच वाईट वाटत होते. मी विचार करीत होतो माणूस उत्सुकतेपोटी, हव्यासापोटी, स्वत:च्या स्वार्थासाठी नवीन, नवीन शोध लावतो आहे. हे चक्र युगानुयुगे सुरू आहे आणि सुरूच राहणार. म्हणूनच, प्रश्न फक्त शोध लावण्याचा नाही तर त्याचा उपयोगा आपण कसा करतो हा आहे!

जर मानवाने आपली बुद्धी आणि उत्सुकता निसर्गसंवर्धन, मानवकल्याण आणि विकासासाठी वापरली तर मानवजातीचे भविष्य सुरक्षित राहील, अन्यथा, हव्यास आणि स्वार्थामुळे आपण स्वत:च्या विनाशाकडेच धाव घेत आहोत! खरचं शोधाची एक धारा जीवनाला पुढे नेणारी असते, तर दुसरी धारा विनाशाकडे नेणारी. माझे मन या सगळ्या न उकलणाऱ्या विचारांच्या भोवऱ्यात अडकले होते!

नागपूर (महाराष्ट्र)
मो. ९९२२९६८५०२


स्व. अरविंदबाबू देशमुख
स्व. मांधुरीबाई देशमुख
श्रीमती रूपा देशमुख
श्री रणजीत देशमुख
यांच्या आशीर्वादाने
दिवाळीचा संकल्प
जलस्रोतांना नवजीवन.
शेतीला नवी उभारी.
गाळकाढणी • खोलीकरण • दुरुस्ती
आपणा सर्वांना दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा !
डॉ. अमोल रणजीत देशमुख
मला फॉलो करा
@dramolrdeshmukh


KALPANA
JWELLERS
Timeless Elegance... Forever Yours...
आप सभी को
शुभ दीपावली
की हार्दिक शुभकामनाएं ।
माँ लक्ष्मी की कृपा से
आपके जीवन में सुख, समृद्धि
और खुशियों का प्रकाश सदैव
बना रहे ।
विशेष
दीपावली ऑफर
मेकिंग चार्जेस
की शुरुआत मात्र
3%
शुभ दीपावली के इस पावन पर्व पर, अपनी पसंद के आभूषणों के साथ
अपने जीवन को और भी खूबसूरत बनाएं ।
83, Dr, KHANKHOJE NAGAR
MANEWADA ROAD NAGPUR - 440024
Contact No.
8600362268
Shine Brighter This Diwali with Kalpana Jewellers


गट ग्रामपंचायत
नक्षी
आपले हार्दिक स्वागत
करीत आहे
गट ग्रामपंचायत नक्षी
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..!
दिपावलीच्या या मंगलमय पर्वानिमित
आपणांस व आपल्या परिवारास आनंद, आरोग्य
आणि भरभराटीच्या शुभेच्छा !
अनिकेत ज्ञानेश्वरजी वराडे
सरपंच, ग्रा.पं. नक्षी
राजेंद्र आदमने
विवेकजी जगताप
गजाननजी समर्थ
स्वप्निलजी भोयर
संगिताताई नक्षीणे
नर्मदाताई खोब्रागडे
जयश्रीताई भोयर
कविताताई आदमने
सविताताई करकाडे

कथा

वादळ

लाखो रुपयांना पेपर विकून ही पैशावांल्याची मूलं पास होता आहेत. हा पेपर फुटीचा घोटाळा करणारे घुसखोर चोटे मास्तर यांना अद्दल घडवलीचं पाहिजे. आमच्या मेहनतीचा सारा बट्याबोळ झाला. आमच्या स्वप्नाचा इथल्या व्यवस्थेने चुरडा केला. आता आम्ही माघार घेणार नाही,असं आपल्या परभ्याचं भाषण ऐकून पारु मायच्या डोळ्यात गच्च आसवं दाटून आले. तिच्या मनाचा लोंढा खंगाळून वाहू लागला. आमच्या गावाचा भग्या म्हणजी एक बातम्याचं दुकानं होतं. परभ्याचं भाषण संमद्या भारतात व्हायरल झालं. परभ्याच बाप कडूबानं बी आपल्या मोबाईलवर हे भाषणं ऐकलं अन् चार चौघाला दाखवित फिरु लागला.

- प्रभाकर शेळके



कुरणात बैल चरत व्हती. कडूबाच ध्यान मोबाईल मधी व्हतं. तशी पारूनं आरोळी ठोकली.

'अहो म्या काय म्हणते? परभ्या जातोय जणू पुण्याहून.'

'ऐकता का?' तसं कडूबानं मोबाईल मधून डोकं वर काढलं.

अन् गुळमट हसल्यावानी केलं. त्यो रिळ पाहत व्हता.

'अहो ! परभ्याच पैसे संपलं.तसा त्यो भानावर आला.मनात स्वगत बोलावं तसं मनाला आळेपिळे देऊन तो मनाला बोलत होता.

''हे पह्ये आता काही पैसे नाहीत म्हणावं अन् कशाला येतो म्हणा गावाकडं? कामना धाम तिकडचं पाह्य म्हणा कंपनी फिंपनीत काम! पैसं खत्तम झाले की फोन पे करा म्हणतोय. बसं झालं म्हणा शिक्षण काही कामं धंद्याचं पहा म्हणावं.'' मुडद्यात जीव यावा तसा अर्बळल्यावानी कडूबा बोल्ला.

"आता जीव देऊ का?"

"या माय बाई एकुलता एक लेक हाय ना त्यो"

"मग काय झालं? आता त्यो नादानं हाय का?"

"वय हाय त शिकू द्याना.कुठं चिटकला तवाच पोरगी देतेन नाहीत शेतक०यांच्या पोराला कोणी इच्यारीना अन् पुशीना.''

आपलं पोरगं पुण्याला शिकायला हाये त् सोयरे धायरे टपून बसलेत. लोकं 'खोस' काढून राहिले दोन वर्षांपूनं.

मायंदळ पगाराची नोकरी लागन म्हणतेत. तसं शिक्षाण झालंय त्याचं. गावाल्या पोरीचे लग्न होईना. कुणीबी निरुप, सांगावा धाडीना. आता नोकरीवालाचं पाहिजे,म्हुण पोरीवाले खुट्टून बसलेत. अन् शिक्षणाच्या नावाखाली वय वाढयलेत. लग्नाला पोरीचं भेटाना.शहरात जाऊन मोबाईल रिचार्ज रिपेरिंगचे दुकान टाका. शहरात जाऊन कंपनीत काम करा. शहरात राह्याला लागला की मुलगी देतो म्हणायलेत. शेतात काम करायला आम्ही मुलगी शिकवली नाही म्हणतेत. पोरीवाले लयच भाव खायलेत. पोरीबी नोकरीवालाच पाहिजे म्हणत्यात. अन् झालं एकदाचा शेतीबाडीचा जूना बारदाना मोडून पडला. शेतात नवे अवजार आले ते समंदे डिझेलवर चालू लागले. शेती बारभाई खेती झाली.

''ज्यो इमाने इतबारे करलं त्याची शेती राहिली भाऊ. नाहीतं निखुळ रघत पारख झालं. गावशिवात बिगर लग्नाचे''

'ये टग्गरच्या टग्गर पो०हं झाले. वयाचं रुम्हण मोडून पल्ड. तवा पोट्या अन् पोट्टे रात्यातून शहरात उधळले.'

गावातल्या पोरीची पोलिस भरतीची तयारी करु लागल्या. अंगापिंडानं जांम पोरी भरल्या.टीवीसन क्लास लावून अन् ग्राऊंड मारुन झटक्यानं पोलिसनी होऊ लागल्या. पर नोकरीवाला नवरदेवच भेटांना तवा आली का हुंबल. तसे गावकडचे पोरं कुठं मी कंपनीत काम पाहून. कंपनीत चिटक्लो म्हणू निरोप धाडू लागले. तसे पोरीवाले बारचंदे लोकं खोस काढून इच्चारपुस करु लागले. हरघडी मोबाईलची बेडी.कानात घुसली बाराखडी. ज्यो त्यो जवा तवा निखुळ मोबाईलवर सोडलेला सैयलम् सांड्या अन् स्क्रीन मांड्या झाला होता.

नव्या पिढीचे भवितव्य हे तर लयच बुंगाट झालं कुणीच कुणाला बोलाना गेलं. गाडीवर अन् माडीवर शेतीबाडीवर हुर्रूळ लागावं तसं संमदे मोबाईलधारी झाले. तसा खडूस गोंयद्याचा मोंकीदा पारावरल्या म्हाता०याला सांगत व्हता.

"तात्या लय बेक्कार झालं ना,नीटचा पेपर फुटला"

"अरं फुटला त् त्याचं बी कपाळं फुटनं"

"इथं आपल्या गावचे दहीक पोरं व्हती "

" बोक्यागावकरला ठोकल्यानं बेड्या"

"अरं गरीबायच्या लेकरानं काय करायचं?"

"नीट माय घालायची वावरात"

"शेतक०यांच्या पोरांना शिकायचंय नाही "

"खरंच हाय ना भवू. हे संमदे पैसे देऊनच डिग्र्या घेते अन् डाक्टर व्हतेतं "

"रावशा तूला म्हणू म्या सांगतो"

"आपल्या खेटून पायमोडे डाक्टरनं पैसे देऊनचं हे दोन बैल डाक्टर केले"

"या बारीनं आमचा महेश नीट परीक्षा झाला असता"

"खरंच हाये भावड्या. तुमचा महेश खरंच हुशार आहे"

"शिक्षणात बी चोट्ये लय मोट्ठे झाले"

"अरं नीटचे पेपर फोडले"

"तात्या फोल्डे त् फोल्डे अन् दाबाव तेहचे नल्डे"

"नल्डे दाबा नहींत कोल्डे हाना. पर आपले पोरं!"

"आपले पोरं गेले कोमातं"

"नीट ची फिट येऊ राहिली भवू पोराला"....

दुपार टळून गेलती तशी पारू आपल्या वावराच्या बांधाहून पोराला फोनवर बोलत व्हती.

"परभ्या! तुहा बाप म्हणतो कशाला पैसं पाहिजीन?"

"मम्मे मला दिल्लीला जायचयं"

"कशाला रे भाऊ?"

"जंतर मंतरवर मोर्चा हाय दिल्लीला "

"किती पाठवायचे रे भावड्या पैसे?"

" दोन हजार पाठीवं.आता मी माझं घेतो पाहुन"

तसा परभ्यानं फोन बंद झाला. पारुनं पोराला फोन पे केले.

एका खेड्यातला पुण्यात राहणारा परभ्या दिल्लीच्या तख्तावर मोर्चा करता जाणार होता. पारूच्या विचाराचा पदर खोचून मन हरखून गेलं. बाई मव्ह पोरगं काहीना काही केल्या बिगर राहणार नाही. बिराण्याच्या लेकरावानी मव्ह पोरगं काही वालंन्टर नाही. गेल्या अडीच वर्षापून पुण्याला राहतयं. काम करून शिकतोय. आता दिल्लीला मोर्चात जातोय म्हणजी नकी काहीतरी नादर व्हायचं असलं माय तवाचं मव्हा परभ्या दिल्लीला जातोय. पारुच्या डोक्यात असले विचार चालू व्हते. तसा दामूचा भग्या पळत आला अन् मोठ्यानं म्हणला.

"पारु भाभी,तुमचा परभ्या बातम्यात अन् मोबाईलच्या इन्स्टाग्रामवर दिसला."

"दाखीवं बरं,"अशी पारू म्हणताचं. लगेचं परभ्याचं भाषण दाखवू लागला.

"दिल्लीच्या जंतरमंतर वरुन परभ्याची मुलाखत लाईव्ह चालू होती."परभ्या बोलत होता.

"आम्ही सारे गाव खेड्यातील मूलं अहोत''.

कॉंकरोझ जनता पार्टीचा मुख्य अजेंडा म्हणजे नीट पेपर फुटला. देशाच्या शिक्षणमंत्री यांनी राजीनामा द्यावा.या शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रात हा घोटाळा आम्ही सहन करणार नाही. आम्ही सारे मध्यमवगीर्यांची मुलं मुली प्रमाणिक प्रयत्न करतो आहोत. इथे आलेले मुलं ही शेतकरी, शेतमजूर, कामगार गोरगरीबांची मुलं आहोत.आम्ही अहोरात्र मेहनत घेऊन नीटचे पेपर देतो अहोत. पण इथे लाखो रुपयांना पेपर विकून ही पैशावांल्याची मूलं पास होता आहेत. हा पेपर फुटीचा घोटाळा करणारे घुसखोर चोटे मास्तर यांना अद्दल घडवलीचं पाहिजे. आमच्या मेहनतीचा सारा बट्याबोळ झाला.आमच्या स्वप्नाचा इथल्या व्यवस्थेने चुरडा केला. आता आम्ही माघार घेणार नाही,असं आपल्या परभ्याचं भाषण ऐकून पारू मायच्या डोळ्यात गच्च आसवं दाटून आले. तिच्या मनाचा लोंढा खंगाळून वाहू लागला. आमच्या गावाचा भग्या म्हणजी एक बातम्याचं दुकानं होतं. परभ्याचं भाषण संमद्या भारतात व्हायरल झालं. परभ्याच बाप कडूबानं बी आपल्या मोबाईलवर हे भाषणं ऐकलं अन् चार चौघाला दाखवित फिरू लागला.



"बघाना आमच्या परभ्याचं नीट परीक्षा अन् शिक्षणमंत्र्याचा राजीनामा."

तसा त्रिसूळ नाथ्या बोलू लागला.

"कडू भवू, आपल्या गावचे पोरं दिल्लीला मोर्चात गेले"

"संभाजीनगराचा पोरगं हाये त्यो अभिजित दिपके "

"अमेरिकेत शिकायला व्हता जणू "

"शिक्षणाचं नको सांगू गड्या,संमदा धिंगाणा झालायं बिट्या!"

"आता पदव्या म्हणजे नुसता पादु झालाय भवू"

"संदूकभर पदव्या घेऊनबी काय कामाच्या नाही"

"हुनर पाहिजे हुनर!तवा उड्या मारतय वानर"

ज्याच्या जवळ अस्सल स्किल आहे त्याचा हाये भावड्या ह्यो जमाना!.नाहीतर कुठबी जमाना!

"खरंच दाजी!आपण काय नुसते पदवीधर झालो"

"इळभर शेती मातीत खपून काय बुचका येतो आपल्या हातात?"

"कशातबी भेसळ झाली ना गड्या हो!"

सांज लखाटून आली होती. रानशिवारवर पिवळं धम्मक उन पडलं होतं.बोरी बाभाळी हिरव्या गदाड झाल्या होत्या. रानफुले फुलली होती. रानपाखरं कशी मजेत खेळत होती. इथं ज्यो त्यो माणूस बेकार फिकीरत होता. झाडाखोडावरचा नाकतोडा चिर्र चिर्र करून इवळत होता. आभाळानं आपला नुसता पावसाचा घोंगता घेतला.

कुणाचंच मन था०यावर नव्हतं. माघामोलाचं बी भरन घेतलं पर उगवून आलं नव्हतं. असे दहाबारा शेतकरी तक्रार दाखल करण्यासाठी गेले होते. या डुप्लीकेट बियाणे विक्रेता. दुकान बंद करून पळून गेला.त्याचं राती त्यांनी दुकानंच दिलं पेटून. भेसळ,मिसळ अन् डोक्यात हानलं मुसळं. शेतक०यांच्या डोक्यात मुसळ.ज्यांनी तक्रारी केल्या. तेहलाचं पोलिसांच्या नोटीस आल्या. हागनं मुतनं आलं जागीचं. उरावर घ्या अन् भवताली पहा. अशी शेतक०यांची अवस्था झाली. जहर खा नाहीतर फाशी घ्या.

पोलिस कवा येतील अन् बेड्या घालून घेऊन जातील नेम राहिला नाही. निखुळ धोसरा घेऊन ही कुणबीक चालू आहे. त्यात नीटचा पेपर फुटला होता. संमद्या राष्टानातली

लेकरं डिप्रेशन मधी गेलती. नीट पेपर फुटला तसं जणू कपाळं फुटल्यावानी झालतं. परभ्याचं भाषणं या गावातल्या पोरा पोरीनं ऐकलं होतं. त्याला फोन सुरू झाले. तसं एका पोरीनं परभ्याला फोनवर बोलली.

"अभिनंदन मित्रा! लय भारी बोलला. तू ज्या गावाचा आहेस तिथं माझं बालपण गेलं.मीपण नीटचा पेपर दिला आहे.

"भगिनींनो संघर्ष चालू ठेवा, रडायचं नाहीतर आता लढायचं आहे!"

फोन कट झाला. दिवस वेळ काळ कुणासाठीच थांबत नाही. या शेतात कष्टकरी बापाचं मोल अनमोल आहे. जीवाचं रानं करून ते पैसे पाठवतात. त्यांच्या मनाची किंमत करून आपण हिंमत हारून चालणार नाही. नीट ही आता धीट होऊन द्यायची आहे. गेलेला आत्मविश्वास त्यात नवा श्वास भरून दमदार अभ्यास करून पावलं टायायची आहे. आपण डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक संघर्षाची ठिणगी होऊन लढायचं आहे. आजचे तंत्रज्ञान कौशल्ये आत्मसात करूनच यश मिळवायचे आहे. आपल्या देशातील शिक्षण इथल्या गढुळ व्यवस्थेने जरी गदळ केले असले तरी मन शाबुत तर सर्व काबुत आहे, असे विचार परभ्याच्या मनात येऊन गेले. लागलीच त्यांने आईला फोन केला.

" हॅलो मम्मी! मी दिल्लीहून येतो गं"

क्षणभर पारुबाईचं मन पाखरू झालं.आपल्या लेकराला कुशीत घेऊन ती गहिवरल्या मनाने बोलली.

"जेवण केलं कारे बाळा?" कधी येतोय बाळा?"

"हो मम्मी! म्या जेवलो."

"काय खालास रे बाळा?"

"वडा पाव मिसळ खाल्ली दिल्लीची"

"भाजी भाकरी नव्हती का रे "

"मोर्चा होता मम्मी त्यो. तिथं कुठं?"

"चलं माय ये लवकर घरी " असं सारं जग मुठीत घेणारं पुस्तक म्हणजे मोबाईल. आपल्या सा०यांच्या हातातआला.

पण, माय बापाची माया जिव्हाळा प्रेम आपूलकी कोरडीच. नात्याची नाळ तूटत चालली. माणूसं माणसाला पारखा होतं चाललेला. हे सारं झपाटलेपण आले नी माणूस सुसाट झाला. सारेचं नी सगळेच नोकरीच्या शोधात धावता आहेत. शहराच्या प्रंचड कोलाहलात माणूस नुसता धुळ झाला आहे. असे हे खोस घेणारे फोन परभ्याच्या मम्मीला

सुरू झाले.

"हॅलो पारुबाई.. झालं का मुलाचं शिक्षण"

"हो! झालं ना"

"मुलगा नोकरीला लागला काय पुण्याला?

"करतो एका कंपनीत काम"

"नाही म्हणलं कालच्या मोर्चाचं भाषण ऐकलं त्याचं लयच नादर बोला माया तुमचा पोरगा"

"शिक्षणात अन् भाषणात हुशार हाये त्यो"

"एक इचाराचं व्हतं माय "

"इचारा की, आमच्या सुमीची पोरगी व्हती"

"किती शिक्षण झालं तिचं?"

"इंजिनिअर शेवटीचं वर्ष,चालू आहे "

"बरं बाई लय मायंदळ शिक्षण झालं मग "

"तुमच्या पभूबी इंजिनिअर हाई म्हणी" तसा पारुबाईनं मोबाईलचा गच्चकन गळा दाबला अन् मोबाईल बंद केला.

पारूच्या मनांत आनंदाच्या उकळ्या फुटल्या. आपलं पोरगं पोटाला चिमटा घेऊन शिकलं. त्याला फक्त माय बापचं नावं कमवायचं म्हणून. पारूनं लोकांच्या वावरात राजाराजी निंदन खुरपनं करून पोरगं शिकवलं. कडूबानं सालं महिने घालून आपला शेतीचा बारदाना वाढीवला. सालं उलटे पडतं गेले. कर्जाच्या विळख्यातून सुटता सुटेना.

सोसायटीची फसाटी वरखंडा मारीतचं राहिली. पोरीचं लग्न झालं. पारूच्या डोक्यात कधीच गर्व आला नाही. खरचं गर्वच घर खाली असतं. म्हणून दिसत तसं नसतं. आज

परभ्यानं पुण्याला शिकायला टाकलं म्हणू सोयरे धायरे खोस काढून राहिले. आता त्याच्या मनानं त्याच्या पसंदीनं पोरगी पटली तरच लग्न.असे विचार तिच्या मनात चालू होते तितक्यात फोन वाजला.

"पारूबाई बोलता का?"

"हावं कोण बोलतं"?

"बाई म्या! सुकदेव तुमचा चुलतं भाऊ, दाजीला लावला त् ते उचलाना फोन "

"ते वासरू बांधू राहिले. बोला ना भाऊ,"

"आमचे भाच्चे आले का दिल्लीहून,लय गाजलं त्यांचं भाषणं"

"आज येणार आहे त्यो, बसला म्हणी गाडीत"

"येतो मग भेटायला"

"यांना दादा. तुमच्या बहिणीचं हक्काच घर हाये"

फोन ठेवून दिला. अशी फोनाफानी सुरू झाली खोस काढून इच्चारपुस करु लागली. तशी पारुबाई चिंतातूर झाली. खरचं माय बाई लेकी बाळीचा जनम असाच असतो. जावाई करून लेकं परक्याच्या पदरात टाकायची. लग्न लावून कन्याचं दान करायचं.तिला सुख मिळावं म्हणून नोकरीवाला लाल पाहयचा. पण ह्योच लाल व्यसनाचा गुलाल उधळीत निघाला तर वाटुळ झालं म्हणू समजा. कारण आजची तरुणाई ही भलती बोंदाडी झाली आहे. माय बापाच्या नजरेआड पोरं काय करता आहेत?

'ज्याला मायबापाचा धाक त्याचंच चांगलं फिरलं चाकं. नाहीत आयुष्याचं मोडलं आक' असं जाणती माणसं आडुख्यात बोलायची. अन् त्याचं राती परभ्या माय बापाला भेटायला गावी आला. तशी गावातल्या पोरांनी त्याची मिरवणूक काढली.मारोतीच्या पारावर त्यानं भाषणं दिलं.

"माझ्या गावातील नवं तरुण सन्मित्रानों.आता आपण नोकरीच्या मागे लागायचं नाही. इथं सा०या कंपन्या. बाहेर राज्यातील लोकांच्या आहेत. आपण आपल्या उद्योग धंद्यात उतरा. आणि स्वत:चे मालक व्हा! मी अनुभव घेण्यासाठी या कंपनीत काम करतो आहे. मी माझ्या गावं खेड्यातील मुलांना आता रोजगार उपलब्ध करून देणार आहे. थोड्याचं दिवसात श्रीक्षेत्र राजूर गणपती येथे बडोद्याची कंपनी मी टाकतो आहे. मुलांनी टाळ्या वाजवल्या. मी माझ्या आईकडे दोन हजार रुपये मागितले.

आता मी काही दिवसात दोन हजार कोटींचा शेती मातीशी मशागत करणा०या अवजारे बनवणारा कारखाना घेऊन येतो आहे मुलांनी टाळ्या वाजवून त्याचं अभिनंदन केलं.

वाजत गाजतं परभ्या घरी आला. मायबापाच्या पाया पडला. तसे चौखून लोकं त्याची चौकशी करायला लागले. तसा एक बारचंद्या म्हणाला,

"करे परभू! तुला त् नोकरी हाय म्हणी''

"कंपनीत असिटंट मॅनेजर म्हणून करतो"

"अरं मग चिटक्ला की तू". असं म्हणताचं दोनचार जणं बच्याळ्या काढून हसले. आता मी आपल्या गावाच्या मुलांना मोफत मार्गदर्शन व मदत करणार आहे. नीट परीक्षा पेपर फुटल्यामुळे आत्महत्या करायच्या नाही. रोजगाराभिमुख शिक्षण घेतलं हीच खरी संजीवनी आहे. काळची काळी चिमणी भूर्कून उडून गेली. उद्याचा नवा सूर्य उगवला. झाडं फांदीला नवी पालवी फुटवी तसेच झाले. परभ्याची प्रभा महाराष्ट्रभर झळाळली. काही महिन्याभरात त्याचा कारखाना उभा राहिला. सोयरीकीचे 'खोस' काढणारे आता म्हणून लागले. आपलं पोरगं तेवढं नोकरीत घ्या. हे सारं जंतर मंतर न्यारचं तंतर झालं. परभ्या लय हुशार. आता कोणतंबी येऊ गंडातर. हा महाराष्ट्राचा पोरगा मागे हाटनार नाही. रोजगार मिळवून दिल्या शिवाय राहणार नाही.आता आमदार खासदार या परभ्याचा खोस काढू लागले.

जालना
मो. ९९७५१३७३३७




दीपपर्वाच्या
हार्दिक शुभेच्छा
तेजोमय दीपांच्या प्रकाशात
उजळू दे आयुष्याची प्रत्येक वाट...
शब्दांच्या सुगंधाने, विचारांच्या तेजाने आणि
सृजनाच्या आनंदांने प्रत्येक क्षण दीपोत्सवासम उजळो.
All Types Of Creative Writing • Design • Documentary Creation •
Photography • All Types Of Printing
WORDS & VIEWS
संपर्क - 8554982677, 8698788666



पालकत्व

शेवटी देशमुखांनीच मध्यस्थी केली. संकल्पच्या आईला समजावले. प्रकरण मिटले. त्या दिवसापासून चिटणीसांनी मुलांनी त्यांच्या कंपाउंडमध्ये बॉल फेकला, त्यांच्या गेट जवळ लॅम्प तुटला,फोरव्हीलरला बॉल लागला तरी मुलांचा नाद केला नाही. परंतु देशमुख व मुलांचे पुन्हा पुन्हा वाद होत. मुलांना साधनाची फूस होती. साधना घटस्फोटीत होती. तिचे सतत फोन चालत. त्यामुळे मीहीर घराबाहेरच असलेला तिला चांगला वाटायचा. एकेदिवशी संध्याकाळ झाली. सात वाजले. अंधार पडला. मुले चार वाजेपासून खेळत होती. साडेसात वाजले तरी कोणी घरी जायला तयार नाही.

- अर्चना पाटील

विनोद देशमुख चाळीस वर्षापासून देशमुख नगर मधील रहिवासी आहेत. पाच सहा वर्षापूर्वी त्यांचा एक तरुण मुलगा आर्यन कॉलेजच्या रॅगिंग प्रकाराने मरण पावला. एकुलत्या एक मुलाच्या मृत्यूच्या धक्क्याने त्याची आई उषाताई पण दहा-बारा दिवसातच हे जग सोडून गेली. विनोद देशमुख आयुष्यात पूर्णपणे एकटे पडले. आर्यनच्या जीवावर उठलेल्या मुलांना कोर्टकेस करून शिक्षा देण्याचे बळही त्यांच्यात उरले नव्हते. जगण्याची उमेद संपली. नोकरी सुटली. आज वयाच्या साठीत ते दिवसभर ओट्यावर बसून राहतात. सकाळ -संध्याकाळ महादेव मंदिरात आरतीला जातात. अशा नैराश्यपूर्ण आयुष्यात प्रसन्नता निर्माण करणारा एक कोवळा जीव सारस त्यांच्या आयुष्यात आला. सारसची आई गौतमी देशमुखांच्या शेजारच्या बंगल्यात राहायला आले. कुरळ्या केसांचा बारा वर्षांचा. सावळ्या रंगाचा पण सरळ नाकाचा सारस देशमुखांना पाहताच क्षणी खूप भावला. स्वत:चा आर्यनच ते त्याच्यात शोधू लागले. सारसची आई गौतमी शिक्षिका होती. गौतमी सकाळी साडेनऊला नोकरीवर गेली की संध्याकाळी साडेसहाला घरी येत असे. गौतमीची शाळा घरापासून ३५ किलोमीटर दूर होती. सकाळ-संध्याकाळ एसटीचे धक्के खाऊन तिच्यात सारससाठी खचितच काही उरत असे. सारस दुपारी दीड वाजता शाळेतून घरी आला. व्हॅनमधून उतरताच त्याची नजर देशमुखांवर पडली .

''सुटली का शाळा? नाव काय तुझे?''

''सारस''

''छान,सगळ्यात उंच भरारी घेणारा पक्षी आहेस मग तू''

''हो माझे बाबा नाहीत. त्यामुळे मीच भरारी घेऊन एक दिवस

आईला विश्रांती देईन.''

''काय गोड बोललास. ही घे कॅडबरी.''

''नको, आई ओरडेल.''

''आईला सांगूच नकोस.'' देशमुखांनी हात पुढे करून फ्रेंड्स म्हणून साद घातली.

सारसने ताबडतोब देशमुखांचा प्रस्ताव स्वीकारला. सारस घरात शिरला. भेंडी भाजी पोळी खाऊन पोकेमॉनची किमया टीव्हीवर बघत बसला. तरीही चार वाजता त्याला कंटाळा आलाच. कॉलनीतील मुले त्याला रस्त्यावर कुजबूज करताना दिसली.सारसही त्यांच्यात शिरला.

''नवीन दिसतोस'',मीहीर म्हणाला.

''हो ,कालच आलोय''

''आमच्या खेळतोस का?'', वरूणने विचारले.

''हो''

''नको रे, चिल्ला पिल्ला आहे तो'',रोशन म्हणाला.

सारस नाराज होऊन देशमुखांच्या ओट्यावर जाऊन बसला. मुले क्रिकेट खेळू लागली. इकडून एक घरांची लाईन, तिकडून एक घरांची लाईन आणि मध्ये सहा फुटी रस्ता. हा रस्ता म्हणजे मुलांची खेळण्याची जागा. कॉलनीला ओपन स्पेस आहे पण तेथे गवत वाढले आहे. खेळता खेळता बॉल देशमुखांच्या कंपाउंडमध्ये जाऊन पडला.

तोच देशमुख ओरडले,''कारटे दुपारी पण शांततेत झोपू देत नाही.''

देशमुखांनी बॉल जमा करून घेतला. संकल्पने मुद्दाम सगळ्या मुलांना जोरात आरोळ्या मारण्याचा सल्ला दिला.सगळी मुले ओरडू लागली. तेवढ्यात चिटणीस बाहेर आले.

''काय गोंगाट लावलाय ...घरी जाता की नाही.''

देशमुख ही त्यांच्यासोबत ओरडू लागले.

''तुझं घर कुठे? तू खेळतो कुठे? आमच्या गल्लीत पाय ठेवायचा नाही आजपासून....''

''ही गल्ली तुमच्या बापाची आहे का?'',संकल्प देशमुख वर ओरडला.

''लहान-मोठ्याची पायरीच राहिली नाही या पोरांना'',चिटणीस म्हणाले.

तेवढ्यात मिहीरची आई साधना बाहेर आली. सगळ्या मुलांना स्वत:च्या घरात घालून घेतले.

''तुम्ही सगळ्यांनी तुमच्या आईला घेऊन या... आपण चिटणीसांनी संकल्पला मारले असे सांगायचे ...कोण तुम्हाला या गल्लीत खेळू देत नाही तेच बघूया...''

साधनाच्या प्लॅन नुसार सगळ्या स्त्रिया जमल्या व चिटणीसांशी भानगड करू लागल्या.

''तुम्ही मुलांवर हात उगारता हे बरोबर नाही... आज संकल्पला मारले. उद्या तुम्ही आमच्या मुलांनाही माराल...''

''काहीही काय आरोप करतात तुम्ही ...माझा माणूस काही रिकामा नाही हं तुमच्या मुलांशी मस्त्या करायला'', मिसेस चिटणीस म्हणाल्या.

आरडाओरडा सुरू झाला. शेवटी देशमुखांनीच मध्यस्थी केली. संकल्पच्या आईला समजावले. प्रकरण मिटले. त्या दिवसापासून चिटणीसांनी मुलांनी त्यांच्या कंपाउंडमध्ये बॉल फेकला, त्यांच्या गेट जवळ लॅम्प तुटला,फोरव्हीलरला बॉल लागला तरी मुलांचा नाद केला नाही. परंतु देशमुख व मुलांचे पुन्हा पुन्हा वाद होत. मुलांना साधनाची फूस होती. साधना घटस्फोटीत होती. तिचे सतत फोन चालत. त्यामुळे मीहीर घराबाहेरच असलेला तिला चांगला वाटायचा. एकेदिवशी संध्याकाळ झाली. सात वाजले. अंधार पडला. मुले चार वाजेपासून खेळत होती. साडेसात वाजले तरी कोणी घरी जायला तयार नाही.

''मला इथे आता चकरा मारायच्या आहेत. बंद करा तुमचं डब्बागुल.''

मुले घोळका करून तिथेच उभी राहीली. देशमुख संताप करत घरात निघून गेले. सारसला वाईट वाटले. सारसची आणि देशमुखांची आता गट्टी जमली होती. सारस देशमुखांकडे गेला.त्यांना समजावू लागला.

''जाऊ द्या बाबा, सकाळी चकरा मारून घेत जा तुम्ही.''

''हो रे माझ्या सोन्या''

सारसची देशमुखांशी असलेली सलगी रोशन, मिहीर व संकल्पला खटकत होती.

''आजपासून या सऱ्याला कोणीच आपल्यात खेळू द्यायचे नाही सगळ्यांना सांगतोय मी. गल्लीत जो त्यांच्यात खेळला त्याची खैर नाही,'',संकल्प म्हणाला.

''बरोबर'',रोशन व मिहीरने दुजोरा दिला .

दुसऱ्या दिवशी दुपारी नेहमीप्रमाणे मुले क्रिकेट खेळू लागली. सारस बाहेर निघाला.

''सऱ्या ...घरी निघ... तू ...त्या देशमुखांचा चमचा आहेस.आमच्यात यायचं नाही आजपासून ...'' संकल्प म्हणाला.

सारसच्या डोळ्यात पाणीच आले व तो पटकन घरात पळाला. रविवार होता त्यामुळे सारसची आई गौतमी घरीच होती. सारसचा हिरमोड पाहून गौतमीचा संताप झाला.

''काय रे हिजड्या... आमच्या अंगणात खेळतोस आणि आम्हालाच खेळू देत नाही.''

''ओ काकू ,काहीही काय बोलता.. जरा तोंड सांभाळून बोलत जा''

''तू बोलतो का नीट ...मवाली, टुकार, हुशाऱ्या करतोस. थांब तुझ्या बापाकडेच येते मी.''

साधनाने मिहीरला घरात घालून घेतले. गौतमी स्कुटी घेऊन संकल्पच्या घरी धडकली. गौतमीने दरवाज्याची बेल वाजवली संकल्पच्या वडिलांनी दरवाजा उघडला.

''तुमच्या मुलाला तुम्ही आवरून घ्या.. दादागिरी करतो तो ...उद्या जर मी त्याला झोडून काढले तर भांडण करायला येऊ नका.'', दरवाजा उघडतात गौतमी चढ्या स्वरात बोलू लागली.

''अहो ताई, घरात तर या. बोलू आपण'', संकल्पची आई म्हणाली.

गौतमी थोडी शांत होऊन घरात शिरली.

''हे बघा, तुमचा मुलगा मला माझ्या मुलासारखाच आहे.म्हणून सांगते तुम्ही सर्वप्रथम मिहीर व रोशन पासून त्याची संगत तोडा. अत्यंत वाईट मुले आहेत हो ती''

''अहो मॅडम मीच संकल्पला कीदरून गेली आहे. माझ्या गुरु महाराजांकडे दर रविवारी मी त्याला सत्संगमध्ये घेऊन जाते पण काही फरक पडत नाही. घरात पण त्याच्या बहिणीला तसेच करतो तो.''

''अहो ती मिहीरची आई.. किती अफेअर्स आहेत त्या बाईचे आणि तिच्या इशाऱ्यावर तुमचा संकल्प उड्या मारतो. समजवा त्याला. येते मी.'', गौतमी बेचैन अवस्थेतच तेथून उठून आली.

संकल्प घरी आला. गल्लीतील सर्व मुले सोबत घेऊन आला पण आई-बाबांनी जास्त संताप केला नाही हे पाहून बालकनीतूनच इशारा करून त्याने मुलांना घरी पाठवून दिले. गौतमी पण घरी आली. सारस पण चिंतेतच बसला होता.

''जसं मी कुत्र्यासारखं त्याला काहीही बोलून गेली तू पण तसेच करायला हवे होते. जेव्हा आयुष्यात टारगट मुले भेटतात तेव्हा तोंडात येतील त्या शिव्या देऊन मोकळे व्हायचे.''

''हो आई ,असंच करेल मी आता, जेवण दे लवकर. मला भूक लागली आहे.''

सारसने गौतमीचा मूड बदलण्याचा प्रयत्न केला. गौतमीने खिचडीचा कुकर लावला. तेवढ्यात देशमुख येऊन बसले.

''चिंता करू नकोस.तू मला मुली सारखी म्हणून सल्ला देतोय.''

''कसे लोक असतात ना.. आई दिवसभर सत्संगमध्ये, वडील दिवसभर दुकानात आणि पोरगा वाऱ्यावर, मी म्हणते आपल्याला वेळ नाही तर मुले जन्माला घालूच नयेत की..'', देशमुख गालातल्या गालात हसत होते.



''मला तर प्रश्न पडलाय मोबाईलमुळे मुले बिघडली आहेत की आई वडील ...ती रोशनची मम्मी रात्रं दिवस प्रतिलिपीवर गोष्टी वाचत असते. रात्री दोनपर्यंत गोष्टी वाचते आणि दुपारी झोपा ठोकते आणि तो रोशन फिरतो की मग बेवारश्यासारखा.. याला त्याला आवाज देत. मला सारसला वेळ देता येत नाही म्हणून मी किती गिल्टी फील करते... काय सांगू तुम्हाला आणि या बायांना वेळ असून त्या स्वत:च्या मुलांकडे लक्ष देत नाही .''

''बस, बस... किती त्रागा करून घेशील. शांत हो.''

''माझी चिडचिड सारस मुळे होते आहे. खेळणं ही त्याची गरज आहे देशमुख काका. बाबा नाही, मोबाईल नाही, टीव्ही नाही, आणि आता खेळणंही नाही. संकल्प, मिहीर आणि रोशन सोडून जी उरलेली मुले आहेत ती पण त्याच्यासोबत या गुंड पोरांमुळे खेळत नाही. त्यामुळे तो खूपच उदास होऊन जातो.''

''मी त्याला उद्यापासून बॅडमिंटन खेळायला घेऊन जाईल एका हॉलमध्ये. चिंता करू नकोस''

''पण मित्र तर हवेत ना आयुष्यात.. अगोदरच तो खूपच एकलकोंडा झालाय..''

''होईल सगळं व्यवस्थित. येतो मी.'' देशमुख काका पण आता सारसबाबत विचार करू लागले.

''बिचाऱ्याचा काय दोष? का म्हणून ही टारगट मुले खेळू देत नाही यांची काय एवढी गुंडगिरी.. आठवी नववीची तीन माकडे. एका निरागस बालकाचे बालपण हिरावून घेत आहेत ती साधना तीच त्यांना खत पाणी घालते आहे. बघतोच आता एकेकाला...'', देशमुख काका मनात विचार करत करतच झोपले. संकल्पच्या घरीही जेवणे झाली.

''काय रे कारट्या, कीती जीव घेशील.''

''मी काय केलयं...उलट तीच बाई मला हीजडा म्हणाली. हीजडा शब्दाचा अर्थ तरी समजतो का तिला...मीहीरच्या आईला विचारा तुम्ही. माझी काहीच चूक नव्हती.''

''बस कर.जीव कंटाळला आता तुला.'',संकल्पचे बाबा वैतागून घराबाहेर निघून गेले. गौतमीही दुस०या दिवशी शाळेत आली. वर्गाच्या बाहेरच एक पालक उभे होते.

''अहो मॅडम, हा खूप टीव्ही पाहतो. याला काही सांगा ना''

''टीव्हीचे रिचार्ज मारू नका. त्याला सांगण्यापेक्षा तुम्हालाच सांगते मी '',गौतमी चिडूनच बोलली.

''काय गं..एवढी काय चिडचिड करतेस तु..'', चौधरी मॅडम म्हणाल्या .

''बरोबरच आहे ना मग. मुलं मोबाईल पाहतात. टीव्ही पाहतात. यात शिक्षक काय करणार. स्वत:चा दोष कोणाला दिसत नाही पालकांनी स्मार्टफोन वापरला नाही तर मुलांना तरी कोठून मोबाईलचं व्यसन लागणार आहे. बरं सगळ्यांनाच अँड्रॉइड मोबाईल का लागतो तेच समजत नाही मला. साधे मोबाईल कोणीच वापरायला तयार नाही. आजी बाबा पण नाही आणि खुशाल म्हणतात मुले बिघडली आहेत. माझे तर ठाम मत आहे पालकच बिघडले आहेत.''

''बरोबर म्हणतेस तू'',चौधरी मॅडमांनी दुजोरा दिला.

दिवसा मागून दिवस जात होते. मुले गल्लीत खेळत होती. गोंगाट घालत होती. सारस बिचारा घराच्या खिडकीत उभे राहून हिरमुसून दिवसभर त्यांची गंमत पहायचा. देशमुखांना आता हे सहन होत नव्हते. देशमुखांनी एक दिवस रोशनच्या आईला गाठले. सकाळचे आठ वाजले होते

''ताई मी काय म्हणतो तुमचा मुलगा चुकतो आहे.''

''तुम्हाला काय शिकवायचे आहे. मला पहिलेच माहिती आहे काका ..अहो मुलं या वयात खेळणार नाही तर केव्हा खेळणार तुमच्या घरात मुले नाहीत म्हणून तुम्ही या लेकरांचा राग करतात.'' देशमुखांना रागच आला.

''अहो खेळांना. ओपन स्पेस मध्ये खेळा. पैसे द्या. मजूर लावा. तेथील गवत काढून घ्या. खुशाल खेळवा तुमच्या पोरांना. नियमात जे आहे ते करा.''

''आमच्या पोरांचा नाद सोड देशमुख. निघ इथून'',रोशनचे वडील श्रीयुत बिराजदार म्हणाले.

देशमुख ताबडतोब निघाले. संध्याकाळी रोशन पाच वाजता क्लासला गेला. तो घरी परत आलाच नाही. रात्रीचे दहा वाजले .रोशनची आई वसुधा

प्रत्येक गल्लीत मुलाच्या नावाने आरोळ्या मारू लागली. रोशनचे वडील श्री बिराजदार कंपनीतून घरी आले. पोरगा घरी नाही पाहून वसुधावर संताप करू लागले.

''तुझ्या या मालिका आणि तू ..दिवसभर फक्त टीव्ही... एकच मुलगा दिला आहे देवाने.. बारा वर्षांनी नवसाचा... तोही तुला सांभाळता आला नाही... करतेस काय तू दिवसभर... क्लास सात वाजता सुटतो आणि तू.. आता त्याचा तपास करते आहेस.''

''अहो तो रोज उशिराच घरी येतो. मित्रांसोबत गल्लीत गप्पा मारत बसतो. रोजच नऊ वाजता त्याला.''

''होपलेस बाई आहेस तू.. तो घरी येताच तुझ्या छातीवर बसेल म्हणून तूच त्याला घराबाहेर फिरायचं

वळण लावलेस. तुझ्या किटी पार्टी, योगा क्लास, भिशी सगळं आटोपत तुलाच नऊ वाजता घरी यायला.'', शेजारी आता बोलू लागले.

''पहिले रोशनला शोधा. तुम्ही नंतर भांडा बिराजदार.''

बिराजदार टूव्हीलर घेऊन निघाले. त्याच्या सगळ्या मित्रांकडे जाऊन आले. पूर्ण गाव पालथे घातले. रात्रीचे दोन वाजले. शेवटी पोलीस स्टेशनला तक्रार करून आले. गल्लीत एक भीषण प्रकारची शांतता निर्माण झाली. सारस ही आता घाबरून देशमुखांकडे जाऊन बसत असे. गल्लीतील मुलांचे खेळणेच बंद झाले. मिहीर व संकल्प सोबतच क्लास व शाळा करत असत. एकेदिवशी सकाळी सात वाजता ते सायकलवर शाळेत जायला निघाले. तेवढ्यात दोन रुमालाने चेहरा बांधलेले दोन व्यक्ती त्यांचा पाठलाग करू लागली. दोघेही घाबरत घरीच पळून आले. पुन्हा कधी शाळेत जाणार नाही असे म्हणायला लागले. कॉलनीत पोलीस आले. प्रत्येकाची चौकशी करू लागले. रोशन मिहिर व संकल्पच्या आईने गौतमीवरच संशय घेतला.

''हिच्या सारसला आमची पोरं खेळू देत नाहीत म्हणून हीच आम्हाला त्रास देते आहे'',साधना पोलिसांना म्हणाली.

''अगं ये बये ..बाहेरचे बारा कुत्रे ताजे करणारी तू माज्यासारख्या चारित्र्यसंपन्न स्त्री वर बोट ठेवतेस. आज रात्री कोण तर दुसऱ्या रात्री कोण. तुझ्या औकातीत राहा.वेश्या कुठली'', गौतमी खेकसलीच.

मिहीर समोर साधनाचा असा झालेला अपमान साधनाच्या मनाला खूपच लागून गेला. संकल्प व मिहीर एकमेकांच्या घरी जाऊन बसू लागली. रोशनसारखे आपण पण गायब होणार की काय त्यांना भीती वाटू लागली. कॉलनीत आता कोणीच खेळत नव्हते त्यामुळे सारस पण शांत व प्रसन्न राहत होता. संध्याकाळी देशमुख त्याला बॅडमिंटन क्लासला घेऊन जात होते. त्यामुळे शारीरिक थकवा येऊन तो रात्री पण लवकर झोपत असे. रोशनचे आई-वडील मुलासाठी खूप चिंतेत होते. एक आठवडा झाला तरी रोशनचा पत्ता लागत नव्हता. श्री बिराजदार क्षणाक्षणाला वसुधालाच दोष देत होते.

''धबधबे ,किल्ले, शॉपिंग, हॉटेलिंग आणि फोटो... बसं एवढंच येतं तुला... आई म्हणून कधी त्याच्यासोबत फेरफटका मारला का.. गप्पागोष्टी केल्या का... तुझा वेळ जर माझ्या रोशनला मिळाला असता तर आज ही वेळ आली नसती''

वसुधा थोड्या थोड्या वेळाने बेशुद्ध पडत होती. संकल्प व मिहीरचे पालक ही घाबरले होते. आपल्या मुलांसोबत पण असेच काही घडले तर.. या विचाराने त्यांना पण झोप लागत नव्हती. संकल्पचे आई-वडील व साधना गौतमीला घरी जाऊन भेटले.

''आम्ही माफी मागतो तुमची. आमच्या मुलांमुळे तुम्हाला खूप त्रास झाला पण यापुढे सारसला कॉलनीत काही त्रास होणार नाही याचा शब्द आम्ही देतो.''

''रोशनच्या गायब होण्यात माझा हात आहे असं वाटतंय की काय तुम्हाला. अहो मी पण एक आई आहे व माझेही एक लेकरू आहे. मी कशी अशी वागू शकते. विश्वास ठेवा माझ्यावर.''

''तसं नाही. आमची चूक आम्हाला समजली म्हणून आलो. एवढेच.''

देशमुख खिडकीतून सगळी गंमत बघत होते.

''आले एकदाचे वठणीवर. तोंडाने आरोळ्या मारून सांगत होतो. पोरांना आवरा... तेव्हा कोणी लक्ष द्यायला तयार नव्हते.आताच रोशनला सोडून देतो''

देशमुख खिडकीत उभे राहून स्वत:शीच बोलत होते. देशमुख यांनी पाठ फिरवताच त्यांना त्यांच्या मागे सारस दिसला.

''अरे लबाडा, तू केव्हा आलास?''

''केव्हाच पण बाबा हे बरे नव्हे.. जा आणि लवकरच सोडा त्याला.''

''हो रे.. पण हे सिक्रेट कोणाला सांगायचे नाही हं ''

एका तासातच रोशन झोपलेल्या अवस्थेत एका शेतात सापडला. पोलिसांचा फोन आला. बिराजदारांच्या जीवात जीव आला. सगळी कॉलनी त्याला पाहायला शेतात गेली. रोशनला पोलिसांनी प्रथम दवाखान्यात आणले. त्याला गुंगीचे औषध देण्यात आले होते. पोलिसांनी पुन्हा पुन्हा विचारूनही त्याला काहीच माहिती देता आली नाही.

''संध्याकाळी क्लासवरून घरी येत होतो .दोन माणसांनी स्प्रे मारला आणि डोळे बंद झाले यापुढे काहीच आठवत नाही.'', रोशनच्या या वाक्यामुळे पोलिसांना तपासासाठी काहीच फायदा झाला नाही. रोशन संकल्प व मिहीर या तिघांची गुर्मी उतरली. पालक ही त्यांच्या वाईट सवयी बदलू लागले. देशमुखांना अपेक्षित असलेला बदल पालक व मुलांमध्ये घडून आला. सगळी मुले सातच्या आत घरात जाऊ लागली. कॉलनीतील सगळीच मुले सारस सोबत प्रेमाने राहू लागली. देशमुख खूप आनंदात सोफ्यावर बसले होते.

''काय बाबा आज एकदम खुश''

''हो. याच तीन मुलांनी मोठे होऊन माझ्या आर्यनसारख्या गरीब मुलाचा कॉलेजच्या रॅगिंगमध्ये जीव घेतला असता पण आता ती वळणावर आलीत. भविष्यात आयुष्यात ती कोणाशी उर्मटपणे वागणार नाहीत. माझा प्रयत्न यशस्वी झाला. सगळ्यात महत्त्वाचे माज्या सारस बाळाला आता कॉलनीत खेळायला खूप खूप मित्र मिळाले. त्याला आता महागडे क्लास लावून बाहेर खेळायला जायची गरज नाही.''

सारस गालातल्या गालात हसू लागला.

अमळनेर, ज़ि जळगाव
मो. ८२०८९१७३३१



कथा

एका वैज्ञानिकाची शोधयात्रा

आरवचे ध्येय मोठे होते. त्याला भारतासाठी संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या दोन अभेद्य भिंती उभ्या करायच्या होत्या; 'अॅरो-सिस्टम', जी अंतराळात जाऊन शत्रूची क्षेपणास्त्रे नष्ट करेल, आणि 'आयरन बीम', जी लेझरच्या साह्याने एका क्षणात ड्रोन आणि रॉकेट राख करेल. पुण्यात राहणाऱ्या आपल्या लाडक्या पत्नीच्या, मीराच्या आणि आपल्या दोन लहान मुलांच्या आठवणी आरवला त्या दुर्गम बेटावर काम करण्याची ऊर्जा देत असत.

- अनिमिष मिरासे 'अभी'

पुण्याच्या एका मध्यमवर्गीय देशपांडे गुरुजींच्या घरात जन्मलेला आरव लहानपणापासूनच जिज्ञासू होता. ताऱ्यांकडे बघताना त्याला केवळ प्रकाश दिसत नसे, तर त्यामागची गणिते दिसत. शाळेत नववीत असताना त्याने 'नॅशनल सायन्स ऑलिंपियाड'मध्ये देशात प्रथम क्रमांक मिळवला, तेव्हा त्याच्या शाळेत मोठा सत्कार समारंभ झाला होता. मुख्याध्यापकांनी गौरवास्पद शब्दांत त्याचे वर्णन केले होते, "आरव, तू केवळ अभ्यासू नाहीस, तर तू भारताचे भविष्य आहेस." त्या दिवशी आरवने व्यासपीठावर उभे राहून ठामपणे म्हटले होते, "सरांचे आभार. पण मला वैज्ञानिक बनायचे आहे ते केवळ पदव्यांसाठी नाही, तर मला भारतीय सैन्यासाठी अशी ढाल बनायची आहे की, ज्यामुळे देशाच्या सीमेवर एकाही सैनिकाला नाहक प्राण गमवावे लागणार नाहीत." तो निर्धार त्याने आयुष्यभर पाळला.

कालांतराने आरव वैज्ञानिक झाला, मीराशी लग्न झाले आणि आयुष्यात दोन गोड मुले आली. पण सीमेवरील असुरक्षिततेच्या बातम्या वाचून त्याचे मन अस्वस्थ व्हायचे. एका रात्री मीराशी बोलताना तो म्हणाला, "मीरा, मी घरात सुरक्षित राहून विज्ञानाचे पुस्तक लिहीत राहिलो, तर त्या ज्ञानाचा उपयोग काय? मला 'प्रोजेक्ट वज्र'वर काम करण्याची संधी मिळाली आहे. हे काम गुप्त असेल, धोकादायक असेल, पण देशासाठी आवश्यक आहे. मी माझा पगार तुझ्या खात्यात जमा होत जाईल अशी व्यवस्था आधीच केली आहे. जेणेकरुन इथे तुम्हाला कसली ही अडचण येणार नाही." मीराच्या डोळ्यांत पाणी होते, पण तिने त्याच्या कपाळावर हात ठेवत म्हटले, "तुमच्या देशप्रेमानेच मला तुमच्या प्रेमात पाडलं होतं, आरव. जा, आणि यशस्वी होऊन परत या. मी आणि मुले तुमची वाट पाहू."

हिंदी महासागराच्या निळ्याशार पाण्याचा वेढा असलेल्या अंदमानच्या एका निर्जन बेटावर, घनदाट झाडीच्या आड एक अशी जागा होती जिथे निसर्गाचा नियमही थोडा थबकायचा. ती

होती 'प्रोजेक्ट वज्रची गुप्त लष्करी प्रयोगशाळा. तिथे हा आपला ३२ वर्षांचा डॉ. आरव देशपांडे कार्यरत होता. आरव म्हणजे विज्ञानाचा एक चालता-बोलता चमत्कारच. सडपातळ बांधा, भेदक नजर आणि मेंदूत हजारो गणिते धावणारा हा तरुण देशभक्तीच्या भावनेने ओतप्रोत भरलेला होता. आरवचे ध्येय मोठे होते. त्याला भारतासाठी संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या दोन अभेद्य भिंती उभ्या करायच्या होत्या: 'ॲरो-सिस्टम', जी अंतराळात जाऊन शत्रूची क्षेपणास्त्रे नष्ट करेल, आणि 'आयरन बीम', जी लेझरच्या साह्याने एका क्षणात ड्रोन आणि रॉकेट राख करेल. पुण्यात राहणाऱ्या आपल्या लाडक्या पत्नीच्या, मीराच्या आणि आपल्या दोन लहान मुलांच्या आठवणी आरवला त्या दुर्गम बेटावर काम करण्याची ऊर्जा देत असत.

संशोधन पूर्ण होण्याच्या अगदी शेवटच्या टप्प्यावर असताना, एका रात्री चुकून प्रयोगशाळेबाहेरील लाईट्स चालू राहिल्यामुळे शत्रू राष्ट्राच्या गुप्तहेरांना या प्रयोगशाळेचा सुगावा लागला. बेटावर भीषण हल्ला झाला. आरवने महत्त्वाची माहिती वाचवण्याचा प्रयत्न केला, पण स्फोटात तो गंभीर जखमी झाला. त्याचे शरीर छिन्नविछिन्न झाले होते, पण मेंदू जिवंत होता. त्याला दिल्लीच्या 'आर्मी रिसर्च अँड रेफरल हॉस्पिटल'मध्ये हलवण्यात आले. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले, पण आरवला वाचवणे अशक्य होते. लष्करी अधिकाऱ्यांसमोर यक्षप्रश्न उभा राहिला. आरव जर मेला, तर भारताचे ते महाकाय संशोधन कायमचे गाडले जाणार होते. नेमके त्याच वेळी, न्युमोनियामुळे ब्रेनडेड झालेल्या एक धष्टपुष्ट, २८ वर्षांच्या जवानाचे, विक्रमचे शरीर रुग्णालयात उपलब्ध होते. लष्कराने एक धाडसी आणि अनैतिक वाटणारा निर्णय घेतला, 'ब्रेन ट्रान्सप्लांट'

शस्त्रक्रिया यशस्वी झाली. काही दिवसांनी आरवच्या मेंदूने विक्रमच्या धष्टपुष्ट शरीराशी ताळमेळ साधायला सुरुवात केली. जेव्हा आरवचे डोळे उघडले, तेव्हा समोर आरसा होता. पण आरशात त्याला स्वत:चा चेहरा दिसत नव्हता. तो पूर्णपणे एक अनोळखी, रांगडा सैनिक होता. सुरुवातीला आरवला स्वत:च्या अस्तित्वाचा संघर्ष करावा लागला. त्याच्या मनात वैज्ञानिक आरवच्या आठवणी होत्या, तर नसांमध्ये सैनिक विक्रमची ताकद आणि स्वभाव होता. लष्करी अधिकाऱ्यांनी त्याला समजावून सांगितले की, आता तो आरव नाही, तर देशाची एक मोठी गरज आहे. आरवने त्या नव्या शरीरात राहूनच 'ॲरो सिस्टीम' आणि 'आयरन बीम'चे संशोधन पूर्ण केले.

संशोधन यशस्वी झाल्यावर, आरवने पुण्याला जाण्याची परवानगी मागितली. त्याच्या मनात फक्त मीरा आणि आपली मुले होती. आरव पुण्याच्या घरी पोहोचला.तेव्हा साडेतीन वर्षांची मुलगी आणि पाच वर्षांचा मुलगा अंगणात खेळत होते. त्यांना पाहून आरवच्या डोळ्यांत पाणी आले. त्याने उत्साहाने त्यांच्या दिशेने हात पसरले, "बेटा... पप्पा आलेत!"

पण त्या लहान मुलांना तो एक अनोळखी 'लष्करी अधिकारी' वाटला. त्यांच्या चेहऱ्यावर भीती होती. आरव जवळ जाताच ते ओरडत मीराच्या मागे पळाले, "आई, हा अंकल कोण आहे? आम्हाला घाबरवतोय!"

मीरा बाहेर आली. तिच्या चेहऱ्यावर संशय होता. "तुम्ही कोण आहात? माझ्या नवऱ्याचा गणवेश घालून इथे येण्याचा प्रयत्न का करताय?"

आरव गदगद झाला. त्याने लडिवाळपणे म्हटले, "मीरा, मी तुझा आरव! आठवतंय? आपण लग्नानंतर पहिल्यांदा महाबळेश्वरला गेलो होतो, तिथे पावसाच्या पाण्यात तू भिजली होतीस... मी तुला सावरून धरलं होतं. मुलांच्या खांद्यावरच्या त्या खुणा, मी त्यांना रात्री गोष्ट सांगताना करत असलेली नक्कल..."

मीरा थबकली. हे रहस्य तो कशाला सांगतोय? पण समोरचा माणूस पूर्णपणे परका होता. ती कठोर आवाजात म्हणाली, "आरव गेल्याला वर्ष झालं. तुम्ही कोण आहात, हे मला माहीत नाही, पण माझ्या मुलांच्या बालपणाशी खेळू नका. निघून जा इथून!" आरव हळूच बोलला, "मीरा, अगं मीच आरव. आपल्या मुलांच्या खोलीत मी लहानपणी गणिताची सूत्रे लिहिली होती, तुला आठवतंय? मी खरंच परतलो आहे गं."

मीरा विस्फारलेल्या डोळ्यांनी त्याच्याकडे पाहत म्हणाली, "आरव गेल्याची बातमी सरकारने दिली आहे. तू कोण आहेस? माझ्या नवऱ्याच्या बोलण्याची वागण्याची नक्कल करून तू इथे का आला आहेस? जा इथून! जर तू अजून एक पाऊल पुढे टाकलंस, तर मी पोलीस बोलाविन."

आरवच्या काळजात कळ उठली. त्याच्या डोळ्यांतून पाणी आले, पण ते अश्रू विक्रमच्या डोळ्यांतून वाहत होते. तो म्हणाला, "मीरा, माझे शरीर बदलले असेल, पण माझ्या प्रेमाची स्पंदने आजही त्याच आरवची आहेत. तू मला स्पर्श करून पाहतेस का? तुला माझ्या हृदयाचे ठोके ऐकू येतील."

मीरा मागे सरकली आणि तिने दरवाजा बंद केला. त्या क्षणी आरवला जाणवले, तो आता या जगासाठी केवळ एक 'परका' आहे. आरवकडे पुरावा होता, पण तो कोणालाही सांगू शकत नव्हता. एका परक्या शरीरात अडकलेला वैज्ञानिक मीराला तिची सांत्वना देऊ शकला नाही की स्वत:च्या लेकरांना शेवटचं डोळे भरून पाहू ही शकला नाही. तो तुटलेल्या हृदयाने परतला. आरवला वाटले, किमान विक्रमच्या कुटुंबाला तरी आपली ओळख पटेल.

अत्यंत निराश होऊन आरव हरियाणामध्ये विक्रमच्या गावी गेला. विक्रमचे वृद्ध वडील दारात तंबाखू मळत बसले होते.

"बाबा, मी विक्रम..." आरवची वाणी अडखळली.

वृद्ध वडिलांनी त्याच्याकडे पाहिले, डोळे बारीक केले. "तू विक्रम आहेस? पण विक्रमच्या डोळ्यांत आग होती, तुझ्या डोळ्यांत तर कोमेजलेली फुले दिसतायत. आणि विक्रम शहिद झाल्याचं पत्र आम्हाला केव्हाच पोहोचलंय"

आरव काहीच बोलू शकला नाही. त्याला उमजले की, शरीर तेच असले तरी माणसाचा 'आत्मा' हा ओळखीचा आधार असतो. लोक शरीराशी नाते जोडतात, आत्म्याशी नाही. तो तिथेही नाकारला गेला. दोन्ही बाजूंनी नाकारल्या गेल्यानंतर, आरव एका निर्जन वळणावर उभा होता. आता त्याचे कुटुंबही राहिले नव्हते आणि स्वत:चे अस्तित्वही उरले नव्हते. तो आरवही नव्हता आणि विक्रमही नाही. तो केवळ देशासाठी लढणारा एक 'अदृश्य योद्धा' बनून राहिला होता.

अत्यंत निराश होऊन, त्याने जगापासून दूर जाण्याचा निर्णय घेतला. त्याने आपल्या लष्करी वरिष्ठांना पत्र लिहिले आणि एका अज्ञात मोहिमेवर निघून गेला. आजही देशाच्या सीमेवर जेव्हा एखादा लेझर बीम शत्रूचा ड्रोन पाडतो, तेव्हा कोणालाही ठाऊक नसते की, त्यामागचा मेंदू एका वैज्ञानिकाचा आहे आणि हात एका सैनिकाचे जो नियतीच्या खेळात स्वत:ची ओळख हरवून बसला आहे.



यवतमाळ
मो. ७७७६८७५६४६

कथा

पहिला पाऊस



एका स्टेशनवर 'परख' या सिनेमातलं 'ओ सजना बरखा बहार आयी' हे सुंदर गीत चालू होतं. ते ऐकता ऐकता मी शाळेच्या दिवसात कधी गेलो ते कळलचं नाही. हे गाणं तुम्ही एकदा शाळेच्या स्नेह-संमेलनाच्या वेळी गायलं होते. त्यावेळी मी सातवीमध्ये असेन बहुतेक. पण अजूनही ते तुम्ही गायलेलं गाणे डोक्यातून गेलेलं नाही. फारच सुंदर गायले होतं. तुमच्यामुळे ते गाणं माझ्या आयुष्यात पहिल्यांदा ऐकलं, आणि अजूनही त्या गाण्याने माझी पाठ सोडलेली नाही.

- श्रीपाद टेंबे

आज पाळणा घरी पोहचायला तिला थोडा उशीरच झाला होता. पाळणाघराच्या मावशी तिच्या येण्याची वाटच बघत होत्या. आपल्या बाळाला मावशींच्या हवाली करतांना तिने बाळाचे खूप मुके घेतले, कारण तिला गाडी पकडायची घाई होती. ती तशीच मागे वळली आणि चालू लागली. मागे वळून पहायचा मोह तिला पुष्कळ वेळा झाला, पण तो तिने प्रयत्नपूर्वक टाळला. इतका वेळ दाबून ठेवलेला डोळ्यातील अश्रूंचा खारटपणा आत्ता तिच्या गळ्यात उतरला होता. आवंढा गिळणे कठीण झालं तेव्हा तिने आपल्या पर्समधली पाण्याची बाटली काढली आणि तोंडाला लावली. धापा टाकीतच ती स्टेशनवर पोहचली तेव्हा कुठे ती एका जागी शांतपणे उभी राहिली. घामाने तिला अक्षरशः आंघोळ घातलेली होती. तिने आकाशाकडे बघितलं सकाळच्या नऊ वाजता दुपारच्या बारा वाजल्यासारखे आकाश दिसत होतं. कधी येणार हा नेहमीचा पहिला पाऊस? तिच्या मनात हा विचार यायला आणि ट्रेन यायला एकाच गाठ पडली.

लंच ब्रेक झाल्यावर ती आपल्या खुर्चीवर थोडी विसावली. टेबलवर नजर टाकली तर फक्त फायली आणि कागदांचा ढीग होता. त्यावर एक नाराजीचा कंटाळवाणा कटाक्ष टाकून तिने आपला मोबाईल पर्समधून बाहेर काढला. आलेले सगळे मॅसेज वाचून झाले तरी ती उगाचच मोबाईलशी खेळत राहिली. मग तिने दोन तीन फोन केले. एक नव०याला, एक तिच्या आईला. पाय लांब करून मंगलसूत्राशी खेळत बराच वेळ ती बोलत राहिली. बोलून बोलून कंटाळा आला तेव्हा बोलणे संपवून तिने आपले लक्ष आपल्या ऑफिसच्या कामाकडे वळवले. बराच वेळ ती कॉम्प्युटरच्या स्क्रीनकडे बघत आणि मध्येच टेबलवरच्या कागदांकडे बघत बरंच काही काही टाईप करत होती. तेवढ्यात दुपारच चहा आला. तिने चहाचा पहिला घोट घेतला आणि तेवढ्यात फोन वाजला. फोनच्या स्क्रीनवर आलेला नंबर पूर्णपणे अनोळखी दिसत होता.

तिने `हॅलो, कोण बोलतयं`?

असं म्हणताच पलीकडून तिला पुरुषाचा आवाज ऐकू आला.

`हॅलो, हा शालिनी मॅडमचा नंबर आहे कां? आणि तुम्ही कोण आहात`?

शालिनी हे तिच्या माहेरचं नावं होतं? तिने आश्चर्याने तिने 'कोण'? विचारलं.

'माझं नावं अनिल. सगळे मला निल्या म्हणायचे आपल्या शाळेत. काही आठवलं का'?

'नाही लक्षात आले अद्याप'? टेबलपासून आपली खुर्ची थोडी दूर सरकवत ती म्हणाली.

'अशोकचा भाऊ. त्याच्याकडूनच मला तुमचा नंबर मिळवला आहे'.

'अच्छा अच्छा अशोक होय, आठवलं मला सगळं आता. कसा आहे तो? अमेरिकेत असतो ना तो? नुकतंच कोणीतरी म्हणालं होतं'.

'हो बरोबर.'

'बोला, माझ्याकडे काही काम होतं'?

'अं...म्हटलं तर विशेष असं काही नाही , म्हटलं तर आहे'.

'मला तुमचं म्हणणं कळलेलं नाही, नीट सविस्तर सांगाल कां'?

'ठीक आहे, आज मी गाडीतून ऑफिसला जात होतो. रेडिओवर गाण सुरु होतं. एका स्टेशनवर 'परख' या सिनेमातलं 'ओ सजना बरखा बहार आयी' हे सुंदर गीत चालू होतं. ते ऐकता ऐकता मी शाळेच्या दिवसात कधी गेलो ते कळलचं नाही. हे गाणं तुम्ही एकदा शाळेच्या स्नेह-संमेलनाच्या वेळी गायलं होते. त्यावेळी मी सातवीमध्ये असेन बहुतेक. पण अजूनही ते तुम्ही गायलेलं गाणे डोक्यातून गेलेलं नाही. फारच सुंदर गायले होतं. तुमच्यामुळे ते गाणं माझ्या आयुष्यात पहिल्यांदा ऐकलं, आणि अजूनही त्या गाण्याने माझी पाठ सोडलेली नाही. घरी येऊन माझ्या बाबांना विचारलं. माझ्या नशिबाने त्या गाण्याची सीडी आमच्याकडे होती. शंभरवेळा ऐकून देखील, अजूनही मन भरलेलं नाही. इतकी जादू आहे त्या गाण्याची. तेव्हापासून हे गाणंजेव्हा जेव्हा ऐकतो, तेव्हा तुमच्या त्या स्पर्धेतील गायलेल्या गाण्याची आठवण येते'.

'हॅलो शालिनी, ऐकते आहे ना'? असो, तुझं गाणं कुठवर आलंय? गातेना नां अजून की झालं बंद?

'अं.. असं खास नाही. रियाझ वगैरे काही नाही. पण अधून मधून गाते मी'.

'ओके, गाणं बंद करू नका. चालू ठेवा, असा आवाज फार कमी लोकांच्या वाट्याला येतो. बाकी कसं काय चालू आहे? कुठे असत तुम्ही आजकाल'?

रेस्टरूममधल्या बेसिनमध्ये जाऊन तिने चेहऱ्यावर पाणी मारलं. समोरच्या आरशात बघितलं तर डोळ्यातलं पाणी थांबण्याचे नावं घेत नव्हते. अशा रडक्या चेहऱ्याने बाहेर जाण्यापेक्षा ती बराचवेळ रेस्टरूममध्येच टंगळमंगळ करत राहिली.

घरी जातांना तिला ट्रेनमध्ये तिसरी सीट मिळाली. शेजारच्या बायका अधूनमधून गप्पा करीत होत्या. ती मात्र त्यांना एखाद्या रोबोप्रमाणे फक्त हो किंवा नाही अशी उत्तरे देत राहिली. तिच मन मात्र भूतकाळातून बाहेर यायला तयार होतं नव्हतं. आपली गाण्याची आवड, गाण्याच्या क्लाससाठी धरलेला हट्ट, पैसे नाहीत म्हणून बाबांनी दिलेला नकार, आईची होणारी कुचंबणा, मोठ्या भावाचा मूक पाठींबा, त्याने आणि आईने साठवलेल्या पैशातून घेऊन दिलेली ती गाण्याची पुस्तके, वेगवेगळ्या स्पर्धांसाठी आपल्याला ठिकठिकाणी घेऊन जाणाऱ्या शाळेतील देशमुख मॅडम, वह्या, पुस्तके ठेवण्याच्या कपाटाच्या दारावर चिकटवलेला लता मंगेशकरांचा फोटो, कधीच न परवडणारा दुकानातल्या काचेच्या शोरूममध्ये असलेला तो तंबोरा, बघायच्या किंवा चहा पोहेच्या कार्यक्रमाच्या पुरतेच माझी गाण्याची आवड आणि शेवट लग्न, संसार, मुलं, धावपळ करत नोकरी. जीव कसा मेटाकुटीला आलेला आणि त्यातच आज त्या अनिलच्या फोनची भर. तिचं स्टेशन आलं तसं, ती स्वत:ला कसबस सावरत स्टेशनच्या बाहेर पडली. भराभर पावलं उचलत तिने घर गाठलं. पाळणाघरातून बाळाला आणून नवरा सोफ्यावर लोळत टीव्ही बघत होता. बाळ पाळण्यात खेळण्याशी खेळत होतं. हातपाय धुवून ती बाहेर आली.



बाळाला छातीशी कवटाळून तिने बाळाचा एक मोठ्ठा पापा घेतला. नवऱ्याच्या आणि बाळाच्या पोटातील भूक त्या दोघांच्याही चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. बाळाला पाळण्यात

ठेवून ती स्वयंपाकघरात शिरली. रात्री निजानीज झाल्यावर तिने तिचे कपड्यांचे कपात हळूच उघडलं. काही साड्यांच्या खाली निट जपून ठेवलेला लतादीदींचा तो फोटो काढला. त्यावरून हळुवारपणे हात फिरवला, आणि नीट दिसेल असा कपाटात ठेवला. सकाळी पाच वाजताच गजर झाला. तिने यांत्रिकपणे उशीच्या बाजूला ठेवलेला मोबाईल उचलला आणि मिटलेल्या डोळ्यांनीच गजर बंद केला. अंगावरचे पांघरून बाजुला करून काही क्षण ती तशीच बसून राहिली. शेजारी झोपलेल्या बाळाचा तिने एक हलकासा पापा घेतला. अंधारातच आणि हवेतल्या हवेत तिने नेहमीच्या जागेवर असलेल्या देवाच्या तसबिरेकडे बघून नमस्कार केला, आणि ती पुढची तयारी करण्यासाठी आतल्या खोलीमध्ये निघून गेली. तिने एकवेळ स्वत:ला आरशात बघितलं, आणि कितीतरी वेळ स्वत:लाच बघत राहिली. केस विस्कटलेले, तर काही रुपेरी, तेलकट चेहरा, डोळ्याखाली काळी वर्तुळ याआधी शेवटचं पार्लरमध्ये कधी गेलेलो? बहुतेक लग्नाच्या आधी. तेही सगळ्यांनी फारच आग्रह केला म्हणून.

कुकरच्या शिट्ट्या फोडणीचे वास, भांड्यांचे होणारे आवाज, अशा विविध आवाजांनी थोड्या वेळापूर्वी शांत असलेले घर भरून गेलं. बेडरूम आणि किचन यामधला दरवाजा तिने लावून घेतला. डायनिंग टेबलवर ठेवलेला मोबाईल उचलून तिने त्यावर तिच्या आवडीची गाणी लावली. स्वयंपाक करतांना घामाच्या धारा लागल्या होत्या. मधून मधून ती खिडकीतून बाहेर डोकवून बघत होती. आकाशात काळे ढग दिसतायत कां ते बघायला. आकाश भरून आलंय कां ते बघण्यासाठी, का कुणास ठाऊक, परंतु तिने आज खिडकीतून बाहेर पाहिलं नाही.

तिने मोबाईल बंद केला. 'ओ सजना बरखा बहार आयी, रस की फुंहार, अखियों में प्यार लायी' हे स्वर तिच्या गळ्यातून उमटले, आणि तिच्या अंगावर शहारा आला. 'अखियों में रैना आ गयी', या ओळीची जागा पूर्वीसारखी आली नाही पण तरीही ती गात राहिली.

कदाचित 'पहिल्या पावसात' तिचं भिजून झालं होतं, म्हणून असेल!

पुणे
मो. ९१५८०८८०४२

कथा



गुलाची भेली

- सुधाकर रा. जाधव

जानराव भौ च्या मोठ्या पोरीचं लगीन व्हतं. जानराव भौ गावचा सरपंच. तिकडे पोलीस पाटील रामराव भौ च्या आंगनात भी मांडव टाकेल व्हता. काय त म्हने त्याच्याभी पोरीचं लगीन हाय. मंग काय इचारता, साऱ्या गावात लगीनघाई! मी सरपंच्या घरचा पाव्हणा. चवथी पाचवीतलं पोरं. पर मले खेळाईले दोस्त भेटले पाटलाच्या मांडवातले. दोनी घरच्या आंगनात हिरव्या पाल्याचा मांडव. सावलीच सावली, कुटं बी खेला, मजाच मजा. पर आमचा कल्ला- धिंगाना पाहून इकडून तिकडे आन तिकडून इकडे हाकलून द्याचे. राती मी झोपाले मातर सरपंच्याकडेच. तिथल्या खोलीत आचाऱ्याच्या सैपाकासाठीच सारं सामान भरलेलं व्हतं. कोपऱ्यात एक गुळाची भेली, पोत्यानं झाकून ठिवली व्हती. सारे झोपले का आमी पोरं त्या भेलीवरच पांघरून काढून, गुळाच्या भेलीवर ताव माराचो. बाकीची भेली चिटकलेल्या माकोड्यासाठी सोडून झोपी जायचो. असं लई दिवस चाललं.

एका दिवशी सकाळी वाजंत्र्याच्या आवाजाने जाग आली, तवा शेजारच्या पोट्टग्रले इचारलं, "कांबे आज लगन हाय काय, वाजून रायलं? "

"नई बे आज हयद हाय ना!"

नवरीले हयद लागाची तयारी सुरु झाली. आमचं सारं ध्यान सुवाराकड़े.

हयद, न्हानोरा, जेवनं आटोपून पुन्हा रात्री गुळाच्या भेलीच्या खोलीत झोपाचे. पुन्हा भेली उघडी कराची, मन भरेपावतर गुळ खाचा, आन झोपाचे. उन्हाळ्यात बर्फाची लादी वितळून लहान लहान होत जाते, तशी गुळाची भेली लहान लहान होत संपत गेली.

झालं, लग्नाचा दिवस उजयला. नवरदेव एस. टी. ने येणार. पण गावचा रस्ता चांगला नसल्याने एस. टी. चार सहा फलाट दूरच थांबणार. मंग नवरदेवाले आनाले रेंगी पाठवली. एस टी चा आवाज ऐकून वाजंत्र वाजने सुरु झाले. अरे धत!! या नवरदेव त पाटलाच्या इकडचा व्हय. वाजत्र बंद! पुन्हा थोड्या टाईमान दुसरी गाडी आली, आता तशी गफाल्लत हू नये म्हून वाजत्र वाजलच नाही. नवरदेव मात्र सरपंच्याचा व्हता. नवरदेवाच्या बापाचा पारा चढला. "हे काय स्वागतं कराची पद्धत, वाजत्र नाही, काही नाही. कुठं हाय नवरीचा मामा."

आम्ही पोट्टे धावतच मांडवात गेलो, " आला..आला.. आपला नवरदेव आला. "

मामा लगबगीने निघाला, वाजंत्रीवर गरजला, " वाजवा बे नवरदेव आनाचा हाय.. "

मामाने मामीला फर्मावले, "सगून घागरीची तयारी कर, नवरदेवाले आनाचे हाय. कयसाच पाणी,गुळाचा खडा आठोनींन घे."

मामी लागली गूळ शोधायला. "अव, गूळ कुठं हाय, दिसत नाही."

"चांगली पाहाय, एवढी मोठी भेली तुले दिसत नाही."

"तुम्ही पहा, साजऱ्या डोयान. मले नाई दिसत. " ...इति.. मामी

"बापा, इथची गुयाची भेली काय झाली. उपयली का काय? "....इति.. मामा.

आमच्या सोबतीन एक गुरुजी झोपले असायचे, ते म्हणाले, "गुळाची भेली माकोडेनं खाल्ली, तुमच्या घरात खूप सारे मोठं मोठे माकोडे हायेत. तेईचा बंदोबस्त करा आदी. "

मामीनं शेजारीणच्या घरून उसना गुळाचा खडा घेतला. अन निंघाली दोन-तीन कुरोडन्या सोबत घिऊन नवरदेव आनाले. तै पावतर नवरदेव मारोतीच्या पारावर आला व्हता, अन रुसून बसला व्हता. मामीनं त्याले अक्षद कुकवाचा टिक्का लावून गूळ चारला. नवरदेवाचा रुसवा दूर झाला. तवा कुठं आमाले या गुळाची किंमत समजली. लावला कानाले खडा, घेतली शप्पथ, '" आता नवरदेव बने पावतर गूळ खावाचा नाही.

अमरावती
मो. ७८७५४४८२७४

आपल्या प्रत्येक स्वप्नाला
नव्या प्रकाशाची दिशा देणारी...

श्री. मराठा
डेव्हलपर्स प्रा. लि.
स्वप्न तुमचे, वृष्टी आमची

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

Project By

श्री. मराठा
डेव्हलपर्स प्रा. लि.
स्वप्न तुमचे, वृष्टी आमची

शांतीधाम नगरी - २
वेलाहरी

KH. NO. 75/2 NAGPUR (RURAL) DIST. NAGPUR

लेआउट प्लॅन



लोकेशन मॅप



प्रमुख सुविधा

- Cement Road
- Storm Water Drains
- Sewer Lines
- Electrification with Transformer
- Drinking Water Lines
- Open Space Wall Compound
- Tree Plantation
- STP Plant

बँक लोन 80%

Website: www.marathaestate.com

Office: Sakar Building, 2nd Floor,
In front of Sangam Hotel, Medical Sq.,
Nagpur - 09

Office: Venue Enclave, 1st Floor,
Tata Sq., Manewada Besa Road,
Near Indian Bank, Nagpur - 24

कथा

काय चूक झाली बुवा!

आज आमच्या राणी सरकारांचे चहासाठी "आले"; जरा जास्तीचं जोराने ठेचणे चाललंय असे मला वाटले! कांय झाले बुवा? मी तर काल बाहेर जातांना नेहाला आधीच सांगितले होते की मला परतायला जरा उशीर होईल- तसाही बाईसाहेबांचा मूड मागल्या दोन-तीन दिवसांपासून जरासा वेगळाचं वाटतं होता. पण मी विचार करीत होतो एखादवेळेस कामाचे प्रेशर वगैरे असेल. आता मात्र माज्या मनात विचार येऊन गेला- यावेळी माझे तर कांही चुकले नसेल ना!

- राजश्री शिरभाते

मी डोळे मिटले आणि परमेश्वराला पुन्हा एकदा धन्यवाद दिलेत,मनात विचार आला- खरचं, हा वीकेंड काय इव्हेंट फुल गेला होता! शुक्रवारी मी घरी आलो तर नेहा आधीच घरी आलेली होती. उद्याला सेकंड सॅटरडेची सुट्टी असल्यामुळे खूप छान लॉन्ग वीकेंड मिळणार होता. त्यामुळे आम्ही दोघेही खुश होतो. नेहाने छान मुगाची खिचडी, कढी, पापड, लोणचे असा बेत केला होता. गप्पा मारत आम्ही दोघांनी जेवण आटोपले आणि नंतर आरामात एक सिनेमा बघितला. एकूण संध्याकाळ छानचं गेली होती! मला सकाळी लवकरच जाग आली. आज मी जरा खुशचं होतो, कारण खूप दिवसांनी, नव्हे महिन्यांनी आम्ही तिघे मित्र- मी, अमोल आणि संजय आज भेटणार होतो. आम्ही तिघे लंगोटीयार, सोबतच कॅम्पस इंटरव्हु नंतर पुण्याला आलो आणि इथेच रमलो. दोन वर्षात एकापाठोपाठ आमची तिघांचीही लग्ने झालीत. अमोलची बायको नीता, दोन दिवसांसाठी तिच्या बहिणीकडे गेलेली होती. आणि म्हणून आम्ही तिघांनी आज संध्याकाळी अमोलकडे भेटायचा घाट घातला. आमचे आमच्या बायकांवर अपरंपार प्रेम तर आहेच म्हणा, पण तरीही पुन्हा एकदा थोडा वेळ का होईना, पण आम्ही सगळे बॅचलर लाईफचे सुख उपभोगणार होतो, म्हणून मी खुश होतो, अगदी 'फ्री बर्ड' मूडमध्ये होतो!

मित्रांशी भेट, बायकांशिवाय गप्पा, आणि थोडा 'बॅचलर फील' खरचं एकप्रकारे स्वर्गसुखचं होते ते! हा विचार करतानाच माझी नजर बाजूला गेली तर नेहा अजूनही साखर झोपेतच होती. मी बाईसाहेबांची झोपमोड होणार नाही याची काळजी घेत बेड मधून हळूच चोरपावलाने बाहेर पडलो. थोड्या वेळाने नेहा उठल्याची चाहूल लागली तसा मी मस्त फक्कड चहा बनवला आणि चहा, टोस्ट, बटर, जाम ट्रे मध्ये घेऊन डायनिंग टेबलवर ठेवला. नेहा आली आणि हसत म्हणाली,

'अरे व्वा, एकूण स्वारी आज माहेरच्या लोकांना भेटणार म्हणून भारीच खुशीत दिसते!'

मी म्हटले, 'हो, अगं नेहा, आज कित्येक दिवसांनी आम्ही तिघे भेटणार आहोत आणि तेही बायकांशिवाय! आपण कांय



बोललो हे लक्षात येताचं मी जीभ चावली, अन् म्हटले,'अगं तस नव्हे

मला थांबवत नेहा म्हणाली, 'पुरे, पुरे- तुम्ही छानं एन्जॉय करा सगळे, बायकांशिवाय!'

मी म्हटले, 'नेहा, अगं- पण तुझा प्लान काय आहे, तू काय करणार संध्याकाळी?'

नेहा लगेचं म्हणाली,'अरे मला जरा लिखाण करायचे आहे. छान, शांत निवांत पणे मी ते करणार!'

संध्याकाळी आम्हा तीन लंगोटीयार मित्रांचे पाच,सहा तास कसे गेले ते कळलेही नाही! मला अमोलच्या ड्रायव्हरने घराजवळ सोडले आणि मी हलकीशी शीळ वाजवीत लॉक उघडून घरात शिरलो. तसा उशीरचं झाला होता, रात्रीचे साडे बारा वाजले होते.

मी बेडरूममध्ये डोकावलो तर नेहाला झोप लागलेली दिसत होती. मी अगदी चुपचाप आणि कमीतकमी आवाज होईल ही काळजी घेत कपडे बदलले, ब्रश केला आणि बेड मध्ये शिरलो. पण मला अजून झोप मात्र येत नव्हती, कदाचित एक्साइटमेंटमुळे असेल! माझ्या मनात विचार आला- खरचं यार, आज कित्येक दिवसानंतर आम्ही तिघे दोस्त छान आरामात भेटलो होतो आणि तेही आमच्या बायकांशिवाय!! छानचं गेली होती आजची संध्याकाळ, जुन्या आठवणीमध्ये रमतांना! विचार करता करता मला केव्हा तरी झोप लागली.

रविवारी सकाळी मला जरा उशिराच जाग आली आणि मी डोळे उघडले. अन् आपोआपचं माझी नजर बाजूला गेली तर नेहा बेडवर नव्हती! मला जरा आश्चर्यचं वाटले. कारण आमचा रविवारच्या सुट्टीचा दिवस म्हणजे अगदी आरामात उठून सकाळचा काही वेळ एकमेकांसोबत रमत गमत ब्रेकफास्ट, गप्पा करण्यात घालवायचा असतो. पण नेहा तर आज आधीचं उठलेली दिसतं होती. तसा मला उठायला जरा उशीरच झाला होता म्हणा मी माझे आन्हिक वगैरे आटोपून हॉल मध्ये आलो तर स्वयंपाकघरातून मला जोरात खलबत्त्यात काहीतरी ठेचल्याचा आवाज येत होता.

आज आमच्या राणी सरकारांचे चहासाठी ''आले''; जरा जास्तीचं जोराने ठेचणे चाललंय असे मला वाटले! कांय झाले बुवा? मी तर काल बाहेर जातांना नेहाला आधीच सांगितले होते की मला परतायला जरा उशीर होईल- तसाही बाईसाहेबांचा मूड मागल्या दोन-तीन दिवसांपासून जरासा वेगळाचं वाटतं होता. पण मी विचार करीत होतो एखादवेळेस कामाचे प्रेशर वगैरे असेल. आता मात्र माझ्या मनात विचार येऊन गेला- यावेळी माझे तर कांही चुकले नसेल ना!

मी मनातल्या मनात स्वत:शी घोकले - आज बाईसाहेबांचा वाढदिवस! - नाही.

आमची मॅरेज ॲनीव्हरसरी - नाही, नाही- ती तर जूनमध्ये असते. नेहाच्या माहेरच्या कुणाचा वाढदिवस! माझ्या कॅलेंडर मध्ये तर तसे काहीचं दिसतं नाही! विचार केल्यानंतरही मला मी नेहाच्या माहेरच्या लोकांबद्दलही कांही ''असे तसे''; बोलल्याचे आठवत नव्हते!

मगं, बाईसाहेबांचा मूड बिघडायला झाले तरी काय?

खरचं, कांहीही डोकं चालतं नाही!! पण म्हणजे, आमचा आजचा रविवार असाचं जाणार कां! माझे मन खरोखरचं हिरमुसले झाले.

तेवढ्यात नेहा स्वयंपाकघरातून बाहेर आली आणि फक्त ''हे घे चहा''; म्हणत चहाचा मग आणि बिस्किट्स समोर ठेवलेत अन परत निघून गेली. मला चहाचा मग पण नेहमीपेक्षा जरा जोरातचं टेबलवर ठेवल्या सारखा वाटला. मी नेहाला नाराजीच्या सुरात म्हटलेही,

''अगं नेहा, आज रविवार. आपला रविवार स्पेशल ब्रेकफास्ट असतो, ना! आणि आजसाठी तर आपला छान कांदे पोहे आणि शिऱ्याचा बेत होता ना! मागच्याच रविवारी तर आपण तसा प्लान केला होता,मगं आज फक्त चहा आणि बिस्किट्स कसे कांय!!'';

तर नेहा जराशा गुश्यातचं उत्तरली, ''आज मला बरीचं काम आहेत आणि मला वेळ नाही रविवारचा स्पेशल ब्रेकफास्ट करायला!''

मी मनात म्हटले, 'हं, म्हणजे मामला खरोखरचं खूपचं सिरीयस दिसतो आहे! खूप दिवसानंतर बाईसाहेबांचा हा असा मूड बघितला होता. काय चूक झाली बुवा! काहीचं तर लक्षात येत नाही आहे.'

खरं म्हणजे आम्ही दोघेही आमच्या सुट्टीचा रविवार छान एन्जॉय करतो. दोघांनीही आरामात उठायचे, मग गप्पा मारीत, पेपर वाचतं नेहाच्या हातचा आणि माझ्या थोडाफार मदतीने झालेला स्वादिष्ट रविवार स्पेशल ब्रेकफास्टचा आस्वाद घ्यायचा. आणि संध्याकाळी काहीतरी वेगळे करायचे, पण आज मात्र सगळेच जरा निराळेचं दिसतं होते!

मी विचार करता करता माझ्या मनाने मागच्या दोन तीन दिवसांचा आढावा घ्यायला सुरवात केली. नेहामध्ये गुरवारी तसा कांही विशेष फरक जाणवला नव्हता, उलटं जरा खुशचं वाटतं होती. पण आता विचार करतांना नेहा शुक्रवारी रात्री आणि शनिवारी मात्र जरा शांत, शांत वाटतं होती. तेवढ्यात नेहाचा आवाज आला आणि माझी विचारशृंखला तुटली.

बाईसाहेबांची फर्माईश झाली, ''नितीन, लवकर लवकर आंघोळ आटोपून बाजारातून दोन ओले नारळ आणून दे. अन हो, बाथरूम सींगर- आज गाणे जरा आवरते घ्या.''

माझ्या तोंडातून नकळत निघाले, ''हो, हो. चटकन आंघोळ करून बाजारात जातो.''

आज 'नाही' म्हणायची किंवा नारळ कशासाठी हवेत विचारायची वगैरे आपली तर बिशाद नाही बुवा!

मी कसाबसा चहा घेतला, पोटात कांहीतरी घालावे म्हणून बिस्किट्स खाल्लीत अन् उठलो. का कोण जाणे पण टेबलवरची रविवारची पुरवणी पण माझ्याकडे असाहाय्यपणे बघते आहे असे मला वाटले. मनात म्हटले, ''चला... नितीनरावं- एखादवेळेस शॉवर घेतांना ट्यूब लाईट लागेल अन् लक्षात येईल आपली चूक!''

मी घाईघाईतचं दाढी आटोपली आणि नेहाने बजावले होते तरीही पण आज मी जरा जास्तीचं वेळ शॉवर घेतला. पण सारे व्यर्थचं म्हणायचे, कारण शॉवरचाही कांहीही उपयोग झाला नाही. आमचा ट्यूब लाईट कांही केल्या लागेना!! विचार करून करून माझा मेंदू मात्र थकला होता. आमच्या बाईसाहेबांचे कांय बिनसले, कांय झाले, माझे कुठे चुकले कांही, काहीही कळायला मार्ग नाही!

आज रविवार, आज छान रीलॅक्स करायचे,दोघांनी मिळून संध्याकाळी फीरायला जायचे, एखादा छान सिनेमा बघायचा, डीनरही बाहेरचं घ्यायचे असा मी माझ्या मनाशी प्लान केला होता, पण आजचे वातावरण जरा वेगळेच होते. तयार होऊन ''चला, बाजारात तरी जावून यावं''; असा विचार करीत मी नेहाला म्हणालो, ''बरं नेहा, येतो मी.''

तर नेहा स्वयंपाकघरातूनचं बोलली, ''नितीन, आज टाईम पास अजिबात करायचा नाही हं, मला ओल्या नारळाच्या करंज्या करायच्या आहेत.''

जशी आज आमची बिशाद होती टाईम पास करायची!! मी नरमत्या आवाजात म्हणालो, ''नाही अगं नेहा, उगाचच टाईम पास करतं नाही हिंडणार. लवकरचं परत येतो. तुझा तर मस्तचं बेत दिसतो आहे आजचा. व्वा, व्वा ओल्या नारळाच्या करंज्या!''

नकळत माझ्या तोंडून बाहेर पडले, 'पण काय गं नेहा, तुझ्या मूडला आज काय झाले?''

तर नेहा फटकारलीचं - ''माझ्या मूडला कांय होणार! मी चांगली आहे.''

कसबसं मी बोललो, ''बरं, मी असा गेलो, नी असा आलो!''

मला खरचं कळतं नव्हते - कांय झाले, काय चूक झाली बुवा!

मी बाजारात पोहचलो आणि सर्वप्रथम बाजारातून बाईसाहेबांच्या फर्माईश प्रमाणे दोन ओली नारळ घेतलीत. थोडा पुढे गेलो तर समोर नेहाची मैत्रीण प्राची दिसली. अरे प्राची! कशी आहेस तू? आणि काय खरेदी चालली?



तरं प्राची म्हणाली - ''नितीन, ते सारे जावू दे. सर्वप्रथम खरचं मन:पूर्वक अभिनंदन हं. मला आपल्या नेहाचे फारचं कौतुक वाटतं. नेहाने दिवाळी अंकात कांय सुरेख कथा लिहीली आहे आणि पारितोषिक पण पटकावले.''

मी हसतं म्हटले, ''थॅन्क्स, प्राची. पण सगळं क्रेडिट नेहाला हं. आय एम रिअली व्हेरी प्राऊड ऑफ नेहा.''

';हं, ते तर तू असणारचं नितीन! बरं, पण मी निघते आता. आणि आपण संध्याकाळी तुमच्या घरी सेलिब्रेट करण्यासाठी भेटणारचं आहोत.'

मी आवंढा गिळत घाईघाईतचं म्हटले, 'हो, हो अगदी जरूर, नेहाने सांगितले मला. चला, तर मगं - भेटूया संध्याकाळी आणि मस्त धम्माल करूया.'

जाता जाता प्राचीने मला विचारले, 'नितीन, संध्याकाळी आणखी कोण, कोण येणार आहेत रे? ती शिष्ट सुगंधा पण येणार आहे का? सुगंधा असली की तिचेच, सुगंधा पुराण ऐकत बसावं लागतं! माझं असं नि माझं तसं,फार बोअर करते ती.'

मी म्हणालो, 'कोण, कोण येणार ते सरप्राईज आहे, संध्याकाळी समजेलच.'

मनात म्हटले, 'मला पण ते सरप्राईजचं आहे!'

आत्ता माझ्या डोक्यातला ट्यूब लाईट झटकन लागला होता! अरेच्या, पुन्हा माझ्याकडून चूकझालीचं राव! तरीचं, पुस्तकाचा दिवाळी अंक दोन, तीन दिवसांपासून दिमाखात समोर टेबलवर झळकतं आहे! पण मी मात्र तो उघडूनही बघितला नव्हता! जेव्हा की आत्ता मला आठवले, की मध्ये नेहा एकदा बोलली पण होती, तिची कथा एका प्रसिद्ध पुस्तकाच्या दिवाळी अंकासाठी निवडल्या गेली आहे म्हणून. पण माझ्या वेंधळ्या डोक्यातून मात्र ते पाऽर निघून गेले होते! आणि एवढेचं नाही तर आपण काल जेव्हा नेहाला विचारले, 'तुझा संध्याकाळी कांय प्लान आहे?' तेव्हा पण ती आपल्या लिखाणाबद्दल बोलली.

अमोल आणि संजय पण म्हणत होते, 'नितीन, नेहाने एवढ्यात कांय लिहिले? छानचं लिहीते यार ती. पण, आमची ट्यूब लाईट लागायला हवी ना!'

मी उत्साहाने मनात म्हटले, ''चला, आता नेहासाठी सुरेख फुलांचा गुच्छ घेऊया.''

'आज काहीही झालं तरी नेहाला खुश करायचंच!' असा निर्धार करूनच मी सुंदर फुलं घेतलीत. मात्र दुकानातून बाहेर पडताना दुकानदार हसत म्हणाला, 'साहेब, गुच्छ सरळ धरा', तेव्हा लक्षात आलं, मी तो उलटाच धरून चाललो होतो! स्वत:शीच हसतं मी तो नीट केला. मी सुरेख फुलांचा गुच्छ घेऊन अगदी आनंदी मनाने घराकडे निघालो. घरी गेल्यानंतर नेहाला नारळ दिलीत आणि फुलांचा गुच्छ नेहाच्या हातात देत म्हणालो,

''नेहा, ही फुलं तुझ्यासाठी. काँग्रॅच्युलेशन्स नेहा. खरचं नेहा, मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन हं. आय एम व्हेरी प्राऊड ऑफ यू. आणि बाईसाहेबांनी छान पारितोषिक पण पटकावले.''

नेहा आनंदाने आणि आश्चर्यचकित होऊन माझ्याकडे बघायला लागली. तिने माझ्याकडून फुलांचा गुच्छ घेतला आणि मला बिलगतं म्हणाली, ''कित्ती सुरेख फुलं आहेत नितीन. आणि काय रे, तरं तुला माहिती होते म्हणायचे!''

मी पण उत्साहाने म्हणालो, ''अगं, म्हणजे काय? मी तुझी जरा गंमत करीत होतो!'';

नेहा माझ्यापासून दूर होत म्हणाली, ''बरं, बरं समजलं महाशय, आता मात्र आपण लवकर, लवकर आवरून घेऊ या. आज संध्याकाळी प्राची आणि समीर येत आहेत सेलिब्रेट करायला.''

मी नेहाला म्हटले, ''नेहा, आणखी कोणी येणार आहेत का, गं?''

तेव्हा नेहा म्हणाली, ''नाही नितीन, मी आणखी कोणालाही बोलवलेले नाही. फक्त प्राची आणि समीरलाच माझ्या लिखाणाचे कौतुक आहे.'

मी लगेच म्हणालो, 'म्हणजे समीर जेवायला येणार आणि प्राची कौतुक करायला- परफेक्ट कॉम्बिनेशन हं!'

मी म्हटले, ''नेहा, गंमत सोड पण बेत तर छानचं आहे. आजची ही छोटीशी पार्टी मात्र तू खूप छान अरेंज केलीस. आपण चौघे छान गप्पा मारू, जेवण करू आणि सेलिब्रेट करू या.'

अन का गं नेहा, करंज्यांची फर्माईश प्राचीचीच आहे वाटतं.'

तर नेहा म्हणाली, ''असं कांही नाही बरं नितीन, मी केलेल्या ओल्या नारळाच्या करंज्या तुला फार आवडतात ना, म्हणून तो बेत केला आहे!''

मी नेहाला म्हटले, 'वा! म्हणजे आज आमचा लकी दिवस दिसतो! नाहीतर करंज्या होतात एकतर दिवाळीला, नाहीतर तर आमचे जगात आगमन झाले त्या दिवशी, हो ना!'

'बरं ते सोड, पण हे मात्र खरं की तुझ्यासारख्या करंज्या करायला कोणालाच जमतं नाही.'

नेहा म्हणाली, 'बरं महाशय, आता पुरे.''

तेवढ्यात नेहमीच्या वेळेवर आमच्या रमाकाकु पण आल्या. नेहा रमाकाकुंना आजच्या पार्टीचा मेन्यू सांगायला त्यांच्याबरोबर स्वयंपाकघरात गेली. दोन-तीन तासात रमाकाकु सगळे आटोपून परतं गेल्यात. तोपर्यंत नेहाने बाकीची आवराआवर करून मी दिलेल्या फुलांची सुरेख, मनमोहक फ्लॉवर अरेंजमेंट केली होती.

मला पण थोडी सवड मिळाली अन मी नेहाची कथा वाचली. नेहाने कथा फारचं छान, जरा हटके एका वेगळ्या विषयावर लिहीली होती. नात्यांमधल्या सूक्ष्म भावनांवर आधारित. वाचताना माझ्या मनात विचार आला- खरचं माझी नेहा किती छान लिहिते! ही कथा तर खरोखरचं पुरस्कार योग्य आहे.

नेहाने आज मोती कलरची आणि त्याला फुलांची सुंदर बॉर्डर असलेली सुरेख प्युअर सिल्कची साडी नेसली होती आणि गळ्यात एक मोत्याचा सर आणि मोत्याचे कानातले. किती सुरेख दिसत होती माझी नेहा. मनात विचार आला-

'खरचं, आपण इतके नशीबवान कसे काय?'

ठरल्याप्रमाणे सात वाजता प्राची आणि समीर आलेत. समीर आत येताच म्हणाला, 'मी थेट जेवणासाठी आलोय बरं का, अभिनंदन वगैरे नंतर करेनचं!'

प्राची लगेच म्हणाली, 'अरे समीर, आधी अभिनंदन तर कर!'

तर समीर म्हणतो, 'हो हो, ते पण मी करणारचं आहे.पण प्लेट हातात असताना!'

नेहाने सगळ्यांसाठी ओल्या नारळाच्या खुसखुशीत करंज्या आणि कुरकुरीत खमंग अळू वड्या आणल्यात. समीरने एक अळूवडी तोंडात टाकली आणि डोळे मोठे करत म्हणाला, 'वा, वा! ही तर अगदी लाजवाब आहे!' थोड्याचं वेळात प्लेट बाजूला ठेवून समीर ग्लास उचलत म्हणाला,

'आजचा टोस्ट आपल्या लेखिका नेहासाठी! आणि आम्ही सगळ्यांनी टाळ्यांच्या गजरात नेहाचं अभिनंदन केलं'

समीर म्हणाला,'प्राचीला आणि मला नेहाचे लिखाण नेहमीचं आवडतं, आणि मुख्य म्हणजे एवढ्यातचं लिहायला सुरवात केली असतांनाही नेहाला हे पारितोषिक मिळाल्यामुळे आम्हाला खरचं नेहाचे खूप कौतुक वाटतं.'

आणि 'नितीन, तू पण नेहाला खूप सपोर्ट करतोस हं!'

मी हसत म्हणालो, 'हो, मीच तर तिचा 'बॅकबोन' आहे! आय एम रिअली व्हेरी प्राऊड ऑफ माय नेहा.'

नेहा माझ्याकडे बघत हसली का कोण जाणे पण मला वाटले जणू त्या हसण्याचा अर्थ होता

'खूप उडू नकोस!'

गप्पा मारीत, मारीत दोन तास कसे गेलेत कळलेही नाही. नऊ वाजलेत अन् समीर म्हणाला, 'नेहा, मघापासून विचार करतोय, आजच्या सेलिब्रेशनचा मेन्यू काय असेल म्हणून!'

नेहा हसत म्हणाली, 'समीर, थोडा धीर धर- टेबल लावतेचं.'

नेहाने आणि प्रियाने टेबल लावले आणि आम्ही सगळे टेबलवर जेवायला बसलोत. आजचा जेवणाचा मेन्यू पण चविष्टच होता- दहीवडे, मसालेभात, पापड, लोणची, मेथी पनीर आणि आलू पराठा. आणि डेझर्टसाठी होते मस्त फ्रुट सॅलड. आमची हसत, खेळत गप्पा मारीत जेवणं चालू होती.

समीर म्हणाला, 'मी आता अजून कांही खाल्ले तर मला इथेच राहावं लागेन!'

मी हसत म्हणालो, 'काही हरकत नाही समीर, भांडी घासायला मदत केलीस तर राहू शकतोस!'

जेवण झाल्यानंतर काही वेळ आणखी गप्पा, गोष्टी करून प्राची आणि समीर अगदी आनंदी मनाने घरी परतलीत. थोड्या वेळाने मी आणि नेहा समाधानी मनाने अंथरुणावर पडलो.

नेहा हसत हसत म्हणाली, 'नितीन, जेव्हा दोन दिवस तू काहीच प्रतिक्रिया दिली नाहीस ना, तेव्हा मात्र मला खरचं खूप राग आला होता मी डोकं खाजवत म्हणालो, आणि म्हणूनच ते खलबत्त्यात आले ठेचणे जरा जास्त जोरात चाललं होतं का?

नेहा हसत म्हणाली, 'हो, हो अगदी! ते आले नव्हतं, तो माझा रागचं होता!'

आम्ही दोघांनीही एकमेकांकडे बघून मंद स्मित केले. माझ्या मनातं विचार आला खरचं आजचा दिवस काही आगळा वेगळांच होता! हलक्याशा वादळाने सुरवात झालेला आजचा दिवसं, मला माझी चूक उमजल्यानंतर मात्र किती आनंदात, मजेत आणि समाधानात गेला होता. मनातल्या मनात पुन्हा एकदा मी प्राचीला शतशः धन्यवाद दिलेत अन् म्हटले....तू तर खरचं आज मला वाचवलेसं गं माझे आई!!

इंग्लंड
मो. ००४४७५५२६७६७७४





जि द्द

-डॉ. प्रकाश पांडे

भुजंगराव रात्री गावातल्या मंदिरातील भजन आटोपून घरी परतले, रात्रीचा एक वाजला होता, तरीही शुभम पुस्तकात डोकं घालून बसला होता! बाबा घरात आल्याचेही त्याला कळले नाही! मग भुजंगराव त्याला आवाज देत "अरे शुभम तू झोपला नाहीस अजून..? आपल्याला उद्या सकाळी लवकरच उठावयाचे आहे, सोयाबीन काढायची आहे ! आणि लवकर शेत तयार करुन गहू हरबऱ्याची पेरणी करायची आहे, आजकाल मजुरही मिळत नाहीत, सारं आपल्यालाच करावं लागणार आहे, कामाची घाई केली तरच रब्बीचा हंगाम चांगला येईल, आणि या उन्हाळ्यात हेमाचं लग्न पण करावयाचे आहे, आणि तू नुस्ता पुस्तकात डोकं खुपसून बसला आहेस, आणि कितीही शिकलं तरी नोकरी कुठे मिळते"?

'आणि नोकरीसाठी आपल्याजवळ शिल्लक पैसेही कुठे आहेत '.

हे सगळं बाबांचं ऐकून शुभम विचारमग्न झाला, बाबांचही काही खोटं नव्हते, उदरनिर्वाहासाठी आणि इतर व्यवहार करण्यासाठी दुसरं साधन काहीच नव्हते. त्याचा नुकताच पदवी अभ्यासक्रम पूर्ण करून स्पर्धा परीक्षेचा अभ्यास चालू होता आणि परिक्षा दोन महिन्यांवर येऊन ठेपली होती, त्याला बाबांना प्रत्युत्तर देण्याची हिंमत होत नव्हती, पण परिक्षेत चांगले गुण मिळण्यासाठी तो जिद्दीला पेटला होता, हे कसे सांगावे यावर काय उपाय शोधावा याच विचारांचं काहूर त्याच्या डोक्यात माजलं होतं, एकीकडे परिक्षा आणि दुसरीकडे शेतीची अत्यंत महत्त्वाची कामे आणि ताईचं लग्न दिसत होते!

मग तो बाबाला शेतीकामात मदत करु लागला, एकदा सर्व न्याहारीच्या वेळी गप्पांच्या ओघात, ते जरा खुशीतच असताना शुभमने आपल्या मनातली गोष्ट काढून बाबांना तो म्हणाला, "बाबा मी स्पर्धा परिक्षेला बसलो आहे, मला या कामातून थोडातरी वेळ द्यावा,! मी माझ्या वाटेची कामे करून अभ्यास करीन."

बाबा म्हणाले" अरे शुभम.. तू आता या गोष्टीत विनाकारण वेळ घालवशील आणि आपल्या वडिलोपार्जित शेतीमध्ये शिकण्याचं हेच वय आहे, तुला जर परिक्षेत कमी गुण पडले तर तू दोन्हीकडून हूकशील नाही का "..?

'तरीपण तुझी इच्छाच आहे तर तुला दुपारी तीनच्या नंतर सुट्टी देईल' .

शुभम म्हणाला "ठिक आहे आहे बाबा"

त्यानं आता मनाशी पक्कं ठरवून टाकले की आपल्याजवळ साठ दिवस आहेत त्यातील सतत तीस दिवस शेतीकामात जाणार आहेत, आपल्याला मिळालेल्या वेळेचे संधीचे सोने करुन दाखवायचे आहे.! आणि शुभम शेती कामातून जेवढा वेळ मिळेल तसा चिकाटीने अभ्यास करु लागला, स्वभावाने प्रेमळ विनम्र असल्याने चांगले चांगले तज्ञ त्याला मोफत मार्गदर्शन करु लागले , दुपारच्या सुट्टीत जेवणाच्या वेळी आणि रात्र रात्र सुद्धा तो अभ्यास करु लागला त्याच्या मनाने पक्कं ठरवलं होतं की आपल्याला उच्च पदावर जायचं म्हणजे जायचं.मग तो स्पर्धा परिक्षेचा दिवस उजाडला, परिक्षेची प्रश्नपत्रिका सोडवून आल्यावर त्याच्या चेहऱ्यावरचे समाधानच सारं काही सांगून जात होते. काही दिवसांनी निकालही आला आणि त्याच्या परीक्षेतील उच्च स्थानावर गुणांकन मिळाले आणि त्याला सरकारकडून तहसीलदार या पदावर रुजू झाल्याचा आदेश आला. पदावर रुजू होण्याच्या पहिल्याच दिवशी शुभम आपल्या वडिलांना तहसील कचेरीत घेऊन गेला आणि बाबांना प्रथम त्या खुर्चीवर बसण्याची विनंती केली. पण बाबा मात्र नकारच देत म्हणाले,"नाही बाळा हा अधिकार तुझाच आहे."

पण शुभमने पुन्हा पुन्हा विनवणी केल्यावर पाच मिनिटांसाठी का होईना त्याच्या आग्रहाखातर त्या खुर्चीवर बसले. आणि त्याच्या डोळ्यात अश्रूंचे पाट वाहू लागले, आणि म्हणू लागले मी एवढा विरोध करत असतानाही आणि अत्यंत विपरीत परिस्थितीत स्वत:च्या जिद्द चिकाटीने एक मुलगा ध्यानी मनी नसताना तहसीलदार पदावर आरूढ होतो! यापेक्षा एका शेतकरी बापासाठी कोणती बाब अभिमानानाची असू शकते.

वाशीम
मो.

THE YAVATMAL URBAN CO-OP. BANK LTD., YAVATMAL

दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि., यवतमाळ

॥ साहसे श्री : प्रतिवसति ॥

मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 फोन : 07232-244241, 243703, 237442
Mail - ho_adm@yavatmalurban.bank.in Website - www.yavatmalurban.bank.in

दि यवतमाळ अर्बन बँक
तर्फे बँकेचे सर्व ग्राहक,
सभासद व हितचिंतकांना
दीपोत्सवाच्या
हार्दिक शुभेच्छा !



अमृत वर्षा

पुनर्गुंतवणूक ठेव योजना

6.60%*
योजनेचा सामान्य व्याजदर

7.10%*
जेष्ठ नागरिकांकरिता व्याजदर

गुंतवणूक कालावधी 444 दिवस
अंतिम तारीख - 31 मार्च 2027 पर्यंत

आम्ही जपतो वारसा विश्वासाचा

डॉ. नितीन खर्चे
अध्यक्ष

अजिंदरसिंह चावला
उपाध्यक्ष

श्रीधर कोहरे
मुख्य कार्यकारी अधिकारी

— संचालक —

श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री. आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री. प्रशांत अरूण माधमशेट्टीवार, श्री. संजय चिंतामणराव डेहणकर, श्री. प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड. श्री. प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री. गोवर्धन दयाराम राठोड, श्री. परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ. श्री. महेश दामोधर सारोळकर, श्री. वसंता रामजी सुपारे, श्री. संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ. शिला राजेश्वर निवल, श्री. नरेंद्र देवराव देशपांडे (तज्ञ संचालक), ॲड.श्री. संतोष विठ्ठलराव कुचनकर (तज्ञ संचालक)



कथा

अनुभवाचे शहाणपण..

गावच्या अनेक तरुण पोरांना त्यानी आपल्या हॉटेलात कामाला लावले होते. त्यातील काही टिकून राहिली तर काही आणखी मोठ्या हॉटेलात कामाला लागले. अशारीतीने सर्वांना सांभाळून घेत राजारामरावांनी धंद्याचा व्याप चांगलाच वाढविला होता. घरच्या धंद्यात बहुधा भाऊ, मुलगा वगैरे घरचा माणूस भागिदार असतो. या प्रथेनुसार राजारामरावानी आपला मुलगा महेशने धंद्यात लक्ष घालावे यादृष्टीने पुरवठादार, किचन स्टाफ वगैरेंच्या नेमणूका करताना महेशला आपल्या सोबत बसवत, त्यामुळे धंद्यातील खाचाखोचा त्याला समजाव्यात ही अपेक्षा होती.

- दुर्गाप्रसाद खांडाळेकर

राजाराम देसाईंचा चिरंजीव महेश याने कला शाखेच्या शेवटच्या वर्षात प्रवेश केला होता. महेशची घरची परिस्थिती उत्तम होती कारण त्याच्या वडीलांची मूळचे गिरगावात व दुसरे माहिम या दोन ठिकाणी हॉटेल्स होती. मोठी बहिण मीनाने ज्वेलरी डिझायनिंगचा कोर्स केला होता व ती आपली डिझाईन्स शहरातील नामांकित ज्वेलर्सना विकून या काहीशा नव्या क्षेत्रात आपला जम बसवू पहात होती. राजाराम देसाईंच्या पत्नी आजकालच्या भाषेप्रमाणे हाउसवाइफ असल्या तरी एका राजकीय पक्षाच्या महिला आघाडी प्रमुख होत्या व त्याद्वारे त्या थोडे सामाजिक कार्य करीत. राजाराम साहेबांना धंद्याच्या व्यापात घराकडे आवश्यक तेवढे लक्ष देता येत नसे. मुलगा महेशचे कॉलेजचे अंतिम वर्ष असल्यामुळे तो वडीलांना धंद्यात फार मदत करु शकत नसे.

गिरगावातील "मालवणी महाराजा " हे त्यांच जुन व प्रसिद्ध हॉटेल होत. मांसाहारी पदार्थात त्यांच्या इतके विविध प्रकारचे पदार्थ इतरत्र मिळत नव्हते. यामुळेच त्यांची वर्षानुवर्षाची बांधलेली गिऱ्हाईक होती. मांसाहारी पदार्थात 'मालवणी महाराजा' इतके विविध व चविष्ट पदार्थ इतरत्र मिळत नव्हते. मासळीचे पदार्थ ही हॉटेलची खासियत होत राजारामरावांनी उत्तम स्वयंपाकी हॉटेलात कामाला ठेवले होते. हॉटेलात स्वयंपाकासाठी आणली जाणारी मांसमच्छी व स्वयंपाकासाठी वापरले जाणारे पदार्थ यांच्या दर्जाबाबत कोणतीच तडजोड हॉटेलात होत नसल्याने तयार होणारे पदार्थ उत्तमच असत. वयोमानानुसार प्रत्यक्ष खरेदीला राजारामराव जात नसले तरी प्रत्येक खरेदीवर त्यांची बारीक नजर असे या सर्वामुळेच गेली कित्येक वर्ष पदार्थांचा उत्तमच होता.

गावच्या अनेक तरुण पोरांना त्यानी आपल्या हॉटेलात कामाला लावले होते. त्यातील काही टिकून राहिली तर काही आणखी मोठ्या हॉटेलात कामाला लागले. अशारीतीने सर्वांना सांभाळून घेत राजारामरावांनी धंद्याचा व्याप चांगलाच वाढविला होता. घरच्या धंद्यात बहुधा भाऊ, मुलगा वगैरे घरचा माणूस भागिदार असतो. या प्रथेनुसार राजारामरावानी आपला मुलगा महेशने धंद्यात लक्ष घालावे यादृष्टीने पुरवठादार, किचन स्टाफ वगैरेंच्या नेमणूका करताना महेशला आपल्या सोबत बसवत, त्यामुळे धंद्यातील खाचाखोचा त्याला समजाव्यात ही अपेक्षा होती. तसेच हॉटेल मधील दैनंदिन गोष्टी पाहाणाऱ्या रघू मालवणकरशी सुध्दा राजारामरावांनी ओळख करुन दिली होती. महेशचे कॉलेज सकाळचे असल्याने संध्याकाळी महेश हॉटेलमधे गल्ल्यावर बसत असे त्यामुळे अण्णांना हॉटेलमधील घडामोडींची माहिती मिळत असे.

या हॉटेलद्वारे अण्णानी बऱ्यापैकी पैसा कमविला होता व त्याच जोरावर दादरसारख्या मराठी वस्तीमधे मोक्याच्या जागी 'मोदक' नावाचे छोटेसे शाकाहारी हॉटेल जवळच्या मित्राच्या देखरेखीखाली चालू केले होते. तेथील मोदक व इतर उपासाच्या पदार्थांवर गिऱ्हाईकाच्या उड्या पडत. गिरगावात मात्र परिस्थिती पूर्वीसारखी राहीली नव्हती, कारण हॉटलचा मुख्य आश्रयदाता मध्यमवर्ग येथे मिळणाऱ्या जागेला मिळणाऱ्या भरमसाठ किमतीला भुलुन उपनगरात मोठ्या जागा घेऊ लागला होता परिणामी हॉटेलला पूर्वीप्रमाणे गिऱ्याईक राहिले नव्हते. शिवाय पंजाबी गुजराती वगैरे पैसेवाल्या लोक येथे येऊ लागल्याने त्यांच्याशी टक्कर देणे शक्य नसल्याचे अण्णांच्या लक्षात आले होते. त्यामुळे त्यांनी उपनगरातील काही हॉटेलच्या किमती विषयी आपल्या खास माणसांकडे चौकशी सुरुही केली होती. अशी खास कामे करण्यासाठी हॉटेलच्या पाठी असलेल्या चाळीत अण्णांनी पूर्वीच एक रुम घेतली होती.

तेथे कागदपत्रे,कामाच्या फाईल्स वगैरे ठेवण्यासाठी एक कपाट, टेबल खूर्च्या असे मोजकेच सामान होते. याची माहिती हॉटेल मॅनेजर रघू मालवणकरलाच होती. महिन्याभरापूर्वी रघू अण्णांबरोबर तेथे गेला असता जागेचा दलाल जसूभाईला त्याने तिकडे पाहिले. महिन्याभराने परत जसूभाय अण्णा व ॲडव्होकेट जगदाळे यांची मिटींग झाल्याचे अण्णांच्या ड्राइव्हरकडून त्याला समजले. काहितरी जागेचा व्यवहार चालला असल्याचे चाणाक्ष रघूच्या लक्षात येते. जास्त माहिती मिळविण्याच्या हेतूने धाकटे मालक महेशकडे याविषयी वरवर चौकशी करतो पण अण्णांनी ही गोष्ट कोणालाच ही गोष्ट न सांगितल्याने महेशला काही माहित नसल्याचे तो सांगतो तेव्हा अण्णा ''तुम्हाला सगळ सांगत नाहीत वाटतं''! असं म्हणून महेशला भडकवतो. अशामुळे अण्णा आपल्याला विश्वासात घेत नाहीत असे शल्य त्याच्या मनात तयार होते. दुसऱ्या दिवशी अण्णांच्या नकळत ऑफिसमधे जाऊन महेश तेथील कागदपत्रे पाहातो तेव्हा पार्ले येथील एक जुने हॉटेल घेऊन त्याला नवे रुप देण्याचे अण्णानी ठरविल्याचे कागदपत्रावरून त्याच्या लक्षात येते. एवढा मोठा निर्णय आपणास जराही न कळविता अण्णानी घेतला याबद्दल महेश अण्णांवर खूप नाराज होतो व घरी येऊन काही न बोलता डोळे मिटून पडून राहतो.

राजारामराव आस्थेने त्याची चौकशी करावयास जातात, तेव्हा महेश त्यांच्यावर एकदम संतापतो व त्यांना सुनावतो की 'महत्वाचे निर्णय तुम्ही मला पत्ता लागू न देता घेता,आता माझ्यावरील प्रेमाचे नाटक करु नका. तुम्ही ज्या गोष्टी मला विश्वासात घेऊन सांगणे जरुरी होते त्या गोष्टी मला बाहेरून समजतात हे माझे दुर्दैव आहे'. मनोरमाबाईना बापलेकाचे कशावरुन वाद चालू आहेत याची कल्पना नसते.



त्या महेशला आवरतात व सांगतात 'अण्णांशी शांतपणे बोल ते एवढी वर्षे या धंद्यात आहेत ते योग्यच निर्णय घेतील.'

हा कालचा पोर आपल्यावर एवढा डाफरतो आहे याचा प्रथम अण्णांना राग येतो, पण या व्यवहाराची त्याला कल्पना न दिल्याने महेश बिथरला आहे याचा त्यांना अंदाज येतो. बाप लेकात झगडा लावण्याचे काम बहुधा रघु मालणकरने केले असावे हे त्यांच्या लक्षात येते. तेव्हा ते आपला रागाचा पवित्रा लगेच बदलतात व समजूतीच्या सूरात म्हणतात 'ही गोष्ट तुला अगोदर न सांगणे ही माझी चूक' असल्याचे मला मान्य आहे. पण तुझी अंतीम वर्षाची परीक्षा जेमतेम आठवड्यावर आल्याने या गोष्टीचा तुझ्या डोक्याला त्रास नको या हेतूने तुला सांगितले नाही हे लक्षात घे. आता तुला अर्धवट समजले आहे आता पूर्णच माहिती देतो.

गिरगावातील आपली गिऱ्हाईक येथे घरांना मिळणाऱ्या चढ्या भावामुळे मोठी घरे घेण्याकरता उपनगरात राहण्यास जात आहेत त्यामुळे गेली दोन तीन वर्षे गिरगावातील धंदा बसत चालला आहे. तसेच बाहेरील पैसेवाले हॉटेल व्यवसायिक गिरगावात येत आहेत. एक हॉटल तर आपल्या हॉटेलपासून केवळ पाच मिनिटाच्या अंतरावर येत आहे. त्यांच्याशी स्पर्धा करणे आपल्याला शक्य नाही. उपनगरात अनेक हॉटेल्स असणारा माझा जुना दोस्त त्याचे पार्ल्यातील जुने हॉटेल बाजारभावापेक्षा कमी किमतीत देण्यास तयार आहे. तसेच दक्षिण मुंबईपासून जवळ असलेल्या गिरगावात अत्यंत चढ्या दरात हॉटेल विकत घेण्यास व्यवसायिक तयार आहेत. आपल्या हॉटेलला देखील उत्तम खरेदीदार मिळाला आहे. आता फक्त टोकन मनी दिला आहे. पूर्ण व्यवहार होईपर्यत गुप्तता पाळणे जरुरी असते. केवळ म्हणूनच मी गप्प होतो हे लक्षात घे. अंतिम व्यवहार तुझी पंधरा दिवसात परीक्षा झाली कि, मगच तुला सर्व गोष्टी सांगूनच करण्याचे ठरले होते. शिवाय सोडून जाणाऱ्या कामगारांना कायद्यापेक्षा जास्तच परतावा देणार आहे.

''तुला कोणी भडकविले आहे याची मला पूर्ण कल्पना आली आहे. त्याला योग्य वेळी मी धडा शिकवेनच. वाईट इतकेच वाटते कि, मला विश्वासात घेऊन विचारले असतेस तर हा मनस्ताप टळला असता. असो झाले ते झाले. आताच्या घडीला शांत चित्ताने परीक्षा देऊन ऊत्तम यश मिळवणे हे तुझे प्रथम कर्तव्य आहे. नंतर आपण दोघे नव्या दमाने नवीन हॉटेलला सुरवात करू.''

सदैव आपली काळजी करणाऱ्या आपल्या वडीलांना आपण उद्धटपणे बोलून व त्यांच्यावर अविश्वास दाखवून आपण मोठीच चूक केल्याचे महेशच्या लक्षात येते. व तो त्यांच्या पाया पडून वडिलांची क्षमा मागतो. व्यवहारात मिळालेल्या शहाणपणाच्या जोरावर राजाराम शेट कौशल्याने या घरगुती समस्येवर मात करतात.

बोरिवली, मुंबई
मो. ९९६९३४७१०६

लेख

हिंदुंचे सण व संस्कृती

जगाच्या पाठीवर कुठेही गेलात तरी आपल्या वागण्यावरुन लोक ओळखतात की या मुलावर आजी-आजोबांनी व आई-वडिलांनी चांगले संस्कार घडवलेले आहेत. असे नाही की कोणीही सण करतच नाहीत. आज जे हिंदू (मराठी) बांधव परदेशात कामानिमित्त आहेत त्यांना आपल्या सणांचा खूप अभिमान आहे आणि आठवण आली की ते तिकडे सण साजरे करतात हे आपले संस्कार आहेत. शेवटी सण आणि संस्कृती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

- महेश रामनाथ वैजापूरकर



भारत हा शेतीप्रधान देश आहे आणि ही भूमी संतांची आहे म्हणून प्राचीन काळापासून हिंदू धर्मात अनेक पवित्र सणांना अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. सणांच्या माध्यमातून त्यांचे महत्त्व व आपल्या संस्कृतीचे संस्कार आजच्या तरुण पिढीला जाणून घेणे अतिशय आवश्यक आहे. आता आपण पाहूया की नवीन वर्ष सुरू झाले की क्रमाने येणारे हिंदूंचे सण व संस्कृती. प्रथम येते मकर संक्रांत या सणानंतर दिवस हळूहळू मोठा होत जातो व रात्र लहान होते. मुले पतंग उडवू लागतात सगळीकडे खूप आनंदाचे वातावरण असते व उत्साहाने सर्व नाती एकमेकांना भेटून "तिळगुळ घ्या-गोड गोड बोला" असे म्हणत सण साजरा होतो. त्याचप्रमाणे प्रत्येक हिंदू सणांचे महत्त्व ऋतूप्रमाणे व निसर्गाच्या वातावरणानुसार खाद्यपदार्थांचे पण महत्त्व असते. संक्रांतीच्या दिवसात थोडी थंडी असते म्हणून तीळगूळ व गुळाची पोळी आपण करतो आणि प्रत्येक सणानुसार पूजा केली जाते. नंतर येतो गुढीपाडवा म्हणजे मराठी नवीन वर्ष, सर्वत्र उत्सवाचे वातावरण, परंपरेनुसार नवीन कपडे घालून गुढी उभारून नवीन वर्षाचे स्वागत करतो काही ठिकाणी शोभायात्रा निघते, विविध सांस्कृतिक कार्यक्रम करून सण साजरा केला जातो. पुढे रामनवमी, हनुमान जयंती, होळी, गोकुळाष्टमी, नारळी पौर्णिमा (रक्षाबंधन), गणेश उत्सव, नवरात्र, दसरा, दिवाळी आणि कोजागिरी असे धार्मिक अनेक सण हिंदू संस्कृतीमध्ये प्रत्येकाच्या परिस्थितीनुसार सणांचे पवित्र ठेवून साजरे केले जातात त्यामुळे आपल्या मुलांवर चांगले संस्कार व मराठी संस्कृतीचे धडे त्यांना मिळतात. सण साजरा झाला खूप मोठा उत्सव केला की तो दिवस संपला आता आपले काम झाले असं नाही किंवा त्या दिवसापुरता उदा. रामनवमी, नामाचा जप केला प्रवचने वाचली की झाले असे नव्हे. रोज नित्याने कामात राहून देवाचे नाव घेतले तर आपले सर्व दु:ख कमी होऊन काम सुलभ होतात कारण नामात फार मोठी शक्ती आहे हेच आपले संस्कार आणि संस्कृती आहे. आपण होळी हा सण का साजरा करतो कारण त्यामागे असा उद्देश (संदेश) आहे की सर्व पाप, वाईट प्रवृत्ती यांचा नाश होऊन चांगल्या विचारांचे ध्येय समोर ठेवून एक संकल्प आपण करतो त्यामध्ये एकमेकांबद्दल असणाऱ्या शत्रुत्वाचा आपण होळीत अर्पण करून त्याचा नाश होतो व मित्रता, बंधुभाव आणि प्रेम निर्माण होऊ दे अशी प्रार्थना करतो. या सणांमध्ये " होळी रे होळी - पुरणाची पोळी " असा जल्लोष करतात म्हणजे पुरणपोळीला विशेष महत्त्व असते व त्याचा प्रसाद होळीला दाखवला जातो हे आपले संस्कार आणि संस्कृती आहे.

ज्याप्रमाणे प्रत्येक महिन्यात सण येतात त्यानुसार त्या सणाचे महत्त्व असते त्यातील काही सण गावी उत्साहात साजरे केले जातात. विशेषत: कोकणात होळी व गणेश उत्सव मोठ्या प्रमाणात आनंदाने सगळे मिळून साजरे करतात. नंतर येते रंगपंचमी हा संण तरुणांच्या खूप आवडीचा की ज्याची ते खूप वर्षभर आतुरतेने वाट पाहतात अगदी लहान मुले सुद्धा त्यामध्ये सामील होतात व रंगीबिरंगी गुलाल उधळून रंगपंचमी साजरी करतात. पुढे वर्षा ऋतूतील अत्यंत पवित्र समजल्या जाणऱ्या श्रावण मासाची सुरुवात होते आणि मराठी संस्कार व संस्कृतीतून सणांना सुरुवात होते. श्रावणातील निसर्ग सौंदर्य, सण-उत्सव आणि मनाला भुरळ घालणाऱ्या वातावरणाचे अत्यंत सुंदर असे दृश्य आपल्याला पाहावयास मिळते. श्रावण महिन्याचा महिमा किती सांगावा तेवढा थोडाच आहे. पावसाच्या आगमनाने सर्वत्र हिरवागार निसर्ग नटलेला असतो. श्रावणाच्या सरी येतात ऊन पावसाचा खेळ चालतो. हिंदू संस्कृतीमध्ये सांगितल्याप्रमाणे अनेक पूजा, व्रतवैकल्य करून पुण्य मिळवण्याकरता दानधर्म करतात त्यामुळे या महिन्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सर्व महिला वटपौर्णिमा हा सण आनंदाने साजरा करतात हे आहेत संस्कार व हिंदूंची संस्कृती.

यापुढे सर्वांचा आवडता ज्याची वर्षभर उत्सुकतेने वाट पाहतात तो सण म्हणजे गणपती उत्सव. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला प्रथम हा सण घराघरातून करत असे नंतर या सणाला सार्वजनिक स्वरूप प्राप्त झाले आणि मोठ्या प्रमाणात कार्यक्रम करण्यास सुरुवात झाली. नंतर नवरात्री उत्सव म्हणजे नऊ रात्र देवीची उपासना अखंड करणे त्याचबरोबर गर्भा खेळून देवीला प्रसन्न करणे ही त्या मागची भूमिका असते. या सणांच्या संस्कृती मागे एकच हेतू आहे की या सणांचे महत्त्व सर्वांना कळले पाहिजे. पुढे येतो दसरा (विजयादशमी) या सणाचे पवित्र वैशिष्ट्य हिंदू धर्मात खूप महत्त्वाच आहे कारण या दिवशी प्रभू श्रीराम रावणा विरुद्ध युद्ध करून त्याच्या अहंकाराचा नाश (वध) करुन अयोध्येला परत आले. हिंदू संस्कृतीमध्ये त्यादिवशी सिमोलंघन करण्याची प्रथा आहे. सिमोलंघन करून आल्यावर घरातील स्त्री ही औक्षण करते व नंतर घरात पुरुष प्रवेश करून आनंदाने सण साजरा केला जातो ही या सणाची संस्कृती व संस्कार आहेत.

यानंतर येणारा सण म्हणजे दिवाळी (दीपावली) म्हणजे सगळीकडे रोषणाई, नवीन वस्तू खरेदी करून अतिशय उत्साहाने हा सण साजरा करण्यात येतो. चारही दिवसांचे महत्त्व व या सणाची हिंदू संस्कृतीप्रमाणे पूजा करण्यात येते. ज्याप्रमाणे रक्षाबंधन त्याचप्रमाणे भाऊबीज या सणाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. बहिण वाट बघत असते की आपले रक्षण करणारा भाऊ येणार व व एक अनमोल प्रेमाची भेट आपल्याला देणार याची तिला खात्री असते. प्रत्येकाच्या आयुष्यात कधीही न विसरणारा असा भाऊबीज हा सण दिवाळीत साजरा केला जातो. ही या सणाची हिंदू संस्कृती व संस्कार आहे. अशा प्रकारे हिंदू धर्माची शिकवण, सण व संस्काराचे वैशिष्ट्य आहे त्यामागील एकच उद्देश आहे की आपल्या भारतातील सर्व समाजातील लोकांनी कुठलाही प्रकारचा भेदभाव न ठेवता समानता, बंधुप्रेम आणि माणुसकीला धरून सर्वांनी वागावे व सण साजरे करावे जेणेकरून आपल्या देशातील सर्व भगिनींना ताठमानाने जगता येईल.

मला असे वाटते की कुठल्याही श्रीमंतीपेक्षा सणांच्या संस्काराची श्रीमंती खूप मोठी आहे. कुठल्याही प्रकारे अतिशयोक्ती न करता जेणेकरून अन्नाचे नासधूस, नुकसान होईल असे प्रकार टाळून सर्वांनी एकत्र आपुलकीने सण साजरे केले तर नक्कीच आपला देश एक प्रगतशील महान भारत होण्याचे उद्याचे स्वप्न पूर्ण होईल. माणूस श्रीमंत किंवा गरीब पैशाने ओळखला जात नाही तो संस्काराने ओळखला जातो असे आपल्या सणांचे महत्त्व आहे. आज परिस्थितीमुळे व शर्यतीच्या जगात मुले आपल्यापासून लांब जातात त्यांना सण साजरे करायला वेळ नसतो पण जे सण व संस्कार लहानपणापासून झालेले असतात ते कधीही विसरू शकत नाही. जगाच्या पाठीवर कुठेही गेलात तरी आपल्या वागण्यावरून लोक ओळखतात की या मुलावर आजी-आजोबांनी व आई-वडिलांनी चांगले संस्कार घडवलेले आहेत. असे नाही की कोणीही सण करतच नाहीत. आज जे हिंदू (मराठी) बांधव परदेशात कामानिमित्त आहेत त्यांना आपल्या सणांचा खूप अभिमान आहे आणि आठवण आली की ते तिकडे सण साजरे करतात हे आपले संस्कार आहेत. शेवटी सण आणि संस्कृती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

डोंबिवली
मो. ९३७२२३८८११

कथा

गुरूदक्षिणा

बोलताना आईला तिचे नाव वृंदा असल्याचे कळाले होते. आई तिला पुस्तक, अंकलिपी,वही आणि नवीन पेन आणण्यासाठी बाजारात गेली. तिला वृंदाला साक्षर करण्यासाठी प्रयत्न करायचे होते.आपल्या मुली एवढीच असणारी ही कोमल कळी फुलवायची होती. दुसऱ्या दिवसापासून वृंदा नियमितपणे घरी येवू लागली.आल्याबरोबर ती अंगण झाडून लख्ख करायची. तुळशीवृंदावनाला पाणी घालून सुंदर रांगोळी रेखाटायची.

- सौ. भारती दिलीप सावंत

आई अंगण झाडत होती. बाहेर थोडे फटफटले होते. सूर्य डोंगरा आडून हळूच डोकावत होता. आईची ही रोजचीच सवय! पहाटे उठून घर, अंगण झाडायचे. तुळशीला पाणी घालायचे. आई वृंदावनासमोर सुंदर रांगोळी काढायची. घर-अंगण लख्ख ठेवायची. ती आम्हां भावंडांनाही लवकर उठवायची. सकाळी लवकर उठविल्याबद्दल आम्हांला कधी कधी तिचा रागही यायचा. पण ती समजावून सांगायची, "अगं लवकर निजे, लवकर उठे लक्ष्मीचा वास तिथेच भेटे. सूर्यनारायण आकाशात येण्या आधी घर, अंगण झाडून पुसून उजळवले तर लक्ष्मी प्रसन्न होते. घरात बरकत येते".

नेहमीप्रमाणे आजही अंगण झाडताना आईला गोड गळ्यातील भजनाची धून ऐकू आली. आईने थोडासा कानोसा घेतला. इतक्यात फाटक्या पण स्वच्छ कपड्यातील एक मुलगी समोर येऊन उभी राहिली. तिने स्वच्छ आंघोळ करून केसांना चापून-चोपून तेल लावून दोन घट्ट वेण्या बांधल्या होत्या.

तिच्या आवाजात एकसुरी गोडवा होता. ती समोर येताच आईने विचारले,

"कोण गं तू? नवीनच दिसतेस!"

तशी ती बोलली, "माय, आम्ही लांब नगरकडच्या आहोत. ऊस तोडीला माय-बाप आलेत. त्यांच्यासंगं मी बी आलीय. सावकाराची देणी फेडायला माय बापाला असं दूर येऊन ऊस तोडीचं काम करावं लागतं!" आईने विचारले,

"तिकडे कोणी नाही का तुला सांभाळायला? शाळेतबिळेत जातेस की नाहीस?"

तशी ती बोलली,"माय माझं नाव वृंदा हाय. आमची जमीन लय हाय पण पाऊस पाणी पडत नाही, त्यानं ती तशीच पडून राहिलीय. मला तानुला भाऊ हाय. माय-बाप कामाला गेल्यावर मी त्याला सांभाळत घरचं काम बी करते"

आईला खूप वाईट वाटले. आमच्या वयाची तरतरीत दिसणारी ती मुलगी सकाळी भजन म्हणत आमच्या अंगणात आली होती. घरातली सगळी कामं करत भावाला सांभाळत होती. आईने उत्सुकतेने तिला



विचारले, "पण तुला कसं जमतं भावाला सांभाळायला?"

तशी ती झटक्यात बोलली, "माय वेळ आली की समदं जमतं. माय-बाप कामाला गेलं नाहीत तर पैका कोण देईल? सावकार दारात येऊन उभा राहील. मागचं ऋण फेडलं तर पुढंला दारात उभं करील. माय काय काम असलं तर सांगा मला. मी धुणी-भांडी, सडा-सारवण सगळं करते. माझी माय घरात हाय तवर तुमचं काम करून जाईल .तेवढेच मीठ-मीरचीला पैसा मिळंल".

आईला तिच्या बोलण्यातला समजूतदारपणा तसेच स्वत:च्या आई-वडिलांविषयी वाटणारा जिव्हाळा खूप भावला. आई म्हणाली,

" बरं, येत जा सकाळी सडा-सारवण, रांगोळी कर. तुला जेवण देत जाईन".

तसे तिचे पाणीदार डोळे लकाकले. "व्हय करती मी काम" असे म्हणत ती घराकडे पळाली.

दुसऱ्या दिवशी उजाडायच्या आत ती दारात हजर झाली. येताच ती आईला म्हणाली," माय,आणा बघा झाडू.तुमचं अंगण लख्ख झाडून देते".

आईने तिच्या हातात झाडू दिला खरा पण तिला त्या मुलीविषयी खूप कळवळा वाटला. एवढे खेळण्या बागडण्याचे तिचे वय! पण परिस्थितीने तिला शहाणपण शिकवले होते. एखाद्या पोक्त बाई प्रमाणे ती पोरगी घर, भाऊ सांभाळत दोन पैसे कमवायला काम करू पाहतेय. ज्याच्या घरात पडेल तिथे सोन्याचा संसार करेल. तिला शिक्षण मिळणे गरजेचे आहे. आता आईला तिची नव्याने ओळख होऊ लागली.

आईने तिला विचारले, "काय गं, तुझी शाळा कुठपर्यंत झालीय? तुला इथे बसून अभ्यास करायला आवडेल का? मी शिकवीन तुला" आईचे हे शब्द ऐकताच तिच्या डोळ्यांत वेगळीच चमक आली.

ती आईला म्हणाली," खरंच शिकवणार का मला लिहाय,वाचाय? मला बी शाळंला जावू वाटतं. माझ्या मैतरणी शाळेत जाताना मला रडू यायचं पण आमची परिस्थिती गरीबीची म्हून शाळंत घातलं न्हाय माझ्याबाबानं". तिच्यातील हुशार वृत्तीमुळे आईला तिच्याविषयी ममत्व वाटू लागले.

आई तिला म्हणाली," उद्या तुला नवीन वही,पेन आणीन मग आपण शाळेचा श्रीगणेशा करू".

बरं बरं म्हणत अतीव आनंदाने ती उड्या मारतच घराकडे पळाली.

बोलताना आईला तिचे नाव वृंदा असल्याचे कळाले होते. आई तिला पुस्तक, अंकलिपी,वही आणि नवीन पेन आणण्यासाठी बाजारात गेली. तिला वृंदाला साक्षर करण्यासाठी प्रयत्न करायचे होते.आपल्या मुली एवढीच असणारी ही कोमल कळी फुलवायची होती.

दुसऱ्या दिवसापासून वृंदा नियमितपणे घरी येवू लागली.आल्याबरोबर ती अंगण झाडून लख्ख करायची. तुळशीवृंदांवनाला पाणी घालून सुंदर रांगोळी रेखाटायची. काम उरकले की हातपाय धुवून देवाला,आईला नमस्कार करायची आणि आईने नेमून दिलेल्या जागेवर पाढे पाठ करत बसायची. दिवसेंदिवस होणारी तिची प्रगती पाहून आईदेखील तिच्यावर खूश होती.आईने दिलेला गृहपाठ न चुकता करायची.

आत्ता तिला वाचन लिखाण बऱ्यापैकी जमू लागले होते.पाढेही पाठ झाले होते.एके दिवशी ती घरी आली ते तोंड पाडूनच! आईला वाटले तिची तब्येत ठीक नसेल.

आईने आत्मीयतेने तिला विचारले,"काय गं वृंदा, आज तब्येत ठीक नाही का? आज अभ्यासाला सुटी घ्यायची का?"

तशी वृंदा हमसुन हमसून रडू लागली आणि आईला म्हणाली,"माय, आमी आता आमच्या गावाला चाललोय. इथला साखर कारखाना बंद झालाय. माझे आई-बाबा म्हणत होते उद्याच चालू पडायचे.आता मला कोण शिकवील शाळा?"

तिचे बोलणे ऐकून आईचे मनही गहिवरले. तिची समजूत घालण्यासाठी आई बोलली,

"वृंदा तू पुन्हा येईपर्यंत एखाद्या मैत्रिणीकडून पुढचे शिकून घे.पुढच्या वर्षी आलीस की मी तुला सगळं शिकवीन" वृंदा नाराज होती.

तरीही होकाराची मान हलवत घरी गेली. रात्री आपल्या आई-बाबांना सोबत घेऊन आली.तिच्या आई-बाबांनी आईच्या पायांवर आपले डोके टेकवले आणि सद्गदित होऊन बोलले,"बाई, तुम्ही ना नात्याच्या ना जातीच्या पण आमच्या पोरीला लिहाय वाचाय शिकिवलं. तुमचं लै उपकार झालं."

असं म्हणत जवळच्या पिशवीतून एक छानशी रेशमी साडी काढली आणि आईच्या हातात दिली.आईला ती काय करतेय हेच समजत नव्हतं.

आईच्या हातात ती साडी देऊन वृंदाची माय बोलली,"आम्हां गरीबाकडनं ही साधी भेट घ्या. न्हाय म्हणू नकासा.आमची पोर रोज तुमचं गुणगान गात व्हती. म्हून पैशाची उचल काढून तुम्हाला ही गुरूदक्षिणा आणलीय.आमची पोर लै खुश झालीय तुम्हाला साडी दिल्यासाठी".

आईने नको वाटली तरी प्रेमाने आणलेली ती साडी स्वीकारताच वृंदाच्या डोळ्यात एक वेगळीच चमक दिसली.आईने तिला घट्ट मिठी मारली आणि दोघींच्या डोळ्यांतून गंगाजमुना वाहू लागल्या. मी आणि माझे बाबा ते अनोखे दृष्य तोंडाचा आऽ वासून पहात राहिलो की वृंदा आणि तिचे आई-वडील गेल्याचेही भान राहिले नाही.

खारघर, नवी मुंबई
मो. ९६५३४४५८३५



कथा

मैत्रेयी

ती निघून गेली असली तरी रोज त्याचा चेहरा विडियो कॉलमध्ये पाहिल्याशिवाय तीचा दिवस पूर्ण होत नसे. दिवसभराच्या धावपळीत बाबाने फोन उचलला नाही तर रागावलेल्या 'ती'चा चेहरा पाहून 'बाबा' अस्वस्थ होई, 'दोघांमधले नाते कोणत्या जन्मीचे होते. कुणास ठावूक. एकदा धावपळीत फोन सायलेंट मोडवर गेला हे बाबाला कळलेच नाही रात्री झोपतांना सहज फोनकडे लक्ष गेले आठ मिसकॉल 'ती'चे होते ?

- संजय वासुदेव कठाळे



बेल वाजली म्हणून 'बाबा' ने दार उघडले तर ती समोर उभी. बाबाला पाहताच येऊन बिलगली. तीचा खुललेला चेहरा पाहताच बाबाचाही चेहरा फूलला. 'बाबा' म्हणजेच तीचा जीव की प्राण, सोफ्यावर बसताच तीने बाबाच्या गालाचे चार पाच मुके घेऊन टाकले. वीणा हे सारे पाहतच होती, तीला हे आवडले नव्हते. पण नवऱ्याचा खुललेला चेहरा पाहताच मौन झाली. 'ती'चा जन्म झाला आणि बाबाचे आयुष्यच बदलून गेलं एक निरागस फुलाने त्याचे आयुष्यच फुलून आलं, निस्पर्ण झालेल्या वृक्षाला अचानक पालवी फुटून वृक्ष बहरून यावा तसा बाबाचे जीवनात वसंत फूलला होता. जणू जीवनाचा भागच ती झाली होती. तीचा निरागस चेहरा पाहताच त्याची सकाळ व्हायची. नातं तसं आजोबा आणि नात असं. घरात सर्व बाबाच म्हणत असल्यामुळे त्याला 'ती' बाबाच म्हणायची. सकाळी चहा घ्यायला बसलेला बाबाला पाहून ती मांडीवर बसत म्हणाली,

"बाबा मला तुझ्याच कपातला चहा हवा "

"माझा चहा कडू आहे गं , साखर नाही त्यात "

"पण मी हाच चहा पिणार "

परवानगीची वाट न बघता चहात बिस्किट बुडवून खायला लागली. आणि चहा गार होताच गटागटा पिऊन मोकळी झाली. बायको विणा दुसरा चहा समोर ठेवत म्हणाली 'चहा झाल्यावर भाजी आणि वाण सामान आणून द्या"

'ती' ने ते शब्द ऐकले "बाबाचा हात धरत म्हणाली

'बाबा' मी तुझ्या सोबत येते."

'मी कामाला चाललो आहे " बाबा

'खोटं बोलू नको, मी ऐकल आहे, तू भाजी आणायला जातोय"

बाबाची बोलतीच बंद झाली. बाबांचा हळवा कोपरा जागा झाला. त्याला नाही म्हणताच आले नाही.

स्कुटरवर बिलगून बसलेली 'ती' मॉल समोर येताच उतरली.

बाबा दोन-चार सामान घेत असताना 'ती' रॅकमधून चॉकलेट उचलत म्हणाली, "बाबा, या दोन कॅटबरी मी घेतल्या." असे म्हणून बास्केटमध्ये टाकल्याही, तीच्या बिनधास्त स्वभावाला बाबा जवळ उत्तरच नव्हते. घरी सामान ठेवताच वीणा म्हणाली,

"आंघोळ करून घ्या, पुजा करायचीय." बाबाला ऐकण्याशिवाय पर्यायच नव्हता. त्यातही लाडक्या 'तींचे निर्व्याज प्रेम पाहून वीणाचा जळफळाट व्हायचा, मनात म्हणायची

"मी जवळ ये म्हटले तर येत नाही. आणि याच्या अंगाला दिवसभर बिलगून असते. जरा वेळ सुध्दा सोडत नाही."

बाबाला ही धूसफूस नेहमीचीच होती. स्नान करून सोवळे नेसत असताना 'ती' जवळ येत म्हणाली,

"बाबा थांब मी तुझा भांग काढून देते'

विचार करायला वेळ न देता तेलांची शीशी आणि कंगवा घेऊन 'ती' हजर होती तेल लावणे भांग करणे इ. झाल्यावर बाबा पुजेला बसला

पुजा पुर्ण होताच बाबाने आरतीचे तबक हातात घेताच 'ती' 'धावतच आली "थांब बाबा" आरतीला सुरवात करताच तबक हातात घेऊन ओवाळत राहीली. आरत्या सर्व पाठच होत्या.

आरती संपताच म्हणाली 'आता प्रसाद दे''

प्रसाद खाऊन धूम पळाली. बाबा आपले लेखन काम करत बसला. तेवढ्या वेळ घरात शांतता होती.

जेवायची नेहमीची वेळ होताच बायकोने आवाज दिला,"अहो, जेवायला या"

बाबा आपले लेखन काम आटोपून टेबलवर जेवायला बसला झणझणीत वांग्याच्या भाजीच्या सुगंधाने बाबांची भूक जागृत झाली. चटणी कोशींबीर सारे वाढून झाल्यावर बाबाने नेहमीप्रमाणे भोजन मंत्र म्हटला. ''अन्नपुर्णे, सदापूर्णे, शंकरे प्राण वल्लभे ज्ञान वैराग्य सिध्यर्थ, भिक्षांदेहीच पार्वती "

बाबाच्या आवाजाने ती धावतच आली "बाबा, मी तुझ्यासोबत जेवते" असे म्हणून बाबा शेजारीच बसली.

मनू थांब, मी तुला पण वाढते." बायको विणा म्हणाली.

मला वेगळे ताट नको, बाबाच्या ताटातच जेवणार ती "बाळा, असे कुणाच्या ताटात जेऊ नये" वीणा" तरी पण मी बाबासोबतच जेवणार - ती

बाबा काही बोलणार इतक्यात पोळीचा तुकडा भाजीला लावून बाबाच्या तोंडात कोंबत म्हणाली "आज मी तुला जेऊ घालणार आहे. तो काही बोलणार पण तोडांतल्या घासामुळे बाबाची बोलतीच बंद झाली. त्याचे बरोबर स्वत: ही जेवत राहिली. बायकोने काही बोलावे इतक्यात बाबाने डोळ्यातूनच खूण केली. बायकोचे शब्द ओठातच राहिले "एवढी तीखट भाजी ही कशी खाते. तेव्हा हिला पाणी पण लागत नाही."

नवऱ्याशी काही बोलावे, तीच्या वागणुकीबद्दल रागवा असे वीणाला सांगायचे होते. पण जेवण झाल्यावर औषध घेण्यासाठी खोलीत वळला आणि वीणाचे शब्द मनातच विरघळले.

ती'चे बाबा बरोबरचे वागणे, अंगाशी लगट करून खेळणे, हट्ट करणे, आणि त्यानेही 'ती' ला तसे करू देणे वीणाला अजिबात आवडत नव्हते. तीच्याबाबत वीणाने काही सांगावे, आणि बाबाने टाळून द्यावे हे नित्याचेच.

'ती'चे सुंदर लावण्य. 'ती' चे लाघवी बोलणे, हक्क गाजवणे सारे बाबाला आवडत असे 'ती'चे जवळ असणे म्हणजे जणू बाबाचा श्वासच होता. 'ती' घरात नसली तर त्याला करमत नसे.

वामकुक्षी नंतर बाबा बाहेर जायला निघाला तर लावण्यवती तयार होऊन उभी. सुंदर टपोरे डोळे, ओठांची सुंदर ठेवण, गोबरे गोबरे गाल, गालावर पडलेली खळी केस सुंदर बांधलेले, हळदीच्या रंगाचा कमीज, मोरपंखी रंगाची सलवार, तशीच नेटकी ओढणी घेतलेली 'ती' उभी "बाबा तिच्या रूपाकडे पाहतच राहिला.

"मी पण येते बाबा " तीच्या लाघवी बोलण्याने बाबा तंद्रीतून जागा झाला.

'मी बैठकीला जातोय" बाबा " "मी चूपचाप बसेन, हट्ट करणार नाही." बाबा निरुत्तर झाला. सोबत घेऊन जावे लागणार होतेच. नाहीतर भोकाड पसरुन रडणे सुरू झाले असते. बाबाला ती रडलेली आवडत नव्हती. बैठकीत बाबा काय बोलतो,कसे बोलतो हे ती न्याहाळत होती. एरवी हट्ट करणारी 'ती' हे सारे ती शांतपणे ऐकत राहीली.

स्कुटरवर बाबाला बिलगून बसल्यावर म्हणाली, ए बाबा तु किती छान बोलतोस, किती व्यवस्थित समजावून सांगतो, कुणावर रागवत नाहीस, मलाही असे जमेल काय?

तीच्या निरागस प्रश्नाला काय उत्तर द्यावे, हे बाबाला सुचेना, तो सहज बोलून गेला. "लक्ष देऊन ऐकलसं तर नक्की जमेल."

तीचे लाडिगोडी लावून बोलणे बाबाला लगेच कळले.

"चल पाणी पूरी खाऊ"

" कसा रे तू, तुला कसं कळलं मला पाणीपुरी खायचीय?

बाबाला तुझ्या मनात काय चाललयं के कळतं, तू तयार होऊन आलीस ना तेव्हा. "बाबा, तू माझा बेस्ट फ्रेंड आहे ना म्हणून आणि मी तुझी मैत्रीण आहे. बाबाने हलकेच स्मित करत तिचे गालगुच्चे घेतले. पोटभर पाणीपुरी खाऊन झाल्यावर स्कुटरवर बिलगून बसत म्हणाली,

"बाबा, आय लव यू, तू इतका चांगला का आहेस?

"तु इतकी माझ्यावर प्रेम करतेस ना म्हणून."

दोघेही खळखळून हसले. पाणीपुरीचे पार्सल घेऊन घरी आल्यावर पार्सल विणाचे हातात देत म्हणाली "हे तुझ्या साठी, खूप मस्त आहे. तर्जनी अंगठा जोडून खुण करत म्हणाली "मजा आली, तू खाऊन घे ना. तीच्या दिलखुलास बोलण्याने विणाचे चेहऱ्यावर हास्य फुलले. तीचा जिव्हाळा वीणा साठीही होताच. पण बाबा म्हणजे जीव की प्राण.

'तींच्या सहवासात चार सहा दिवस कसे निघून गेले. हे दोघांनाही कळलेच नाही. कामाची जुळवाजुळव करताना दिवसभराच्या धावपळीत



बाबा थकला होता. ती ला सांगून बाबा झोपायला आपल्या खोलीत अंथरुणावर पडला तेव्हा 'ती'चे नाजूक हात हळुवारपणे बाबाच्या केसातून फिरू लागलेत.कधी पाय दाबून देत होते. गाण्याचा मंजुळ स्वर खोलीतून ऐकायला आला म्हणून वीणाने सहज डोकावले. "थकलेल्या बाबाला 'ती' थोपडून झोपवत होती मध्येच थांबून म्हणाली "ए बाबा, मी उद्या जाणार आहे गावाला. मला सोडायला येशील ना? बाबाने नुसतीच मान डोलावून होकार दिला. तसेच ती म्हणाली आता झोप तू मला तयारी करायचीय "

एक सुंदर थंडगार वाऱ्याची झुळूक यावी, आणि मनाला स्पर्शून हळूवारपणे निघून जावी असेच बाबाचे झाले. आलेली थंडगार गयाची झुळूक निघून जाणार या विचाराने 'बाबा अस्वस्थ झाला. रात्रभर तीच्या सोबत घालविलेले क्षण आठवत राहीला. केव्हातरी झोप लागली"

"ए बाबा उठ उठ लवकर, मला सोडायला जायचयं तुला तिच्या मुलायम स्पर्शाने बाबाला जाग आली. लगेच तयार होऊन् बाबा तीला सोडून आलाही, पण 'ती' मात्र कायम त्याच्या मनात होती. ती निघून गेली असली तरी रोज त्याचा चेहरा विडियो कॉलमध्ये पाहिल्याशिवाय तीचा दिवस पूर्ण होत नसे. दिवसभराच्या धावपळीत बाबाने फोन उचलला नाही तर रागावलेल्या 'ती'चा चेहरा पाहून 'बाबा' अस्वस्थ होई', 'दोघांमधले नाते कोणत्या जन्मीचे होते. कुणास ठावूक. एकदा धावपळीत फोन सायलेंट मोडवर गेला हे बाबाला कळलेच नाही रात्री झोपतांना सहज फोनकडे लक्ष गेले आठ मिसकॉल 'ती'चे होते? शेजारी झोपलेल्या आवाज वीणाचा होता"जरा फोनकडे लक्ष देत जा तीचे आठ मिसकॉल माझ्या फोनवर होते. दिवसभर हैराण केलय तीने. दिवस भरभर उडून गेले, वर्षे संपली बाबाची चिमणी मोठी झाली. बाबा सारखीच दिसायला लागली बोलणे वागणे सगळे सारखेच. शिकून मोठ्या कलेक्टर या पदावर विराजमान झाली. मोठे अधिकारी, मंत्री यांच्या व्यस्ततेत वेळ मिळत नसला तरी "रोज फोनवर बाबाचा चेहरा पाहिल्या शिवाय तीचा दिवस संपत नसे. चार दिवस कामाचे धावपळीत फोन करणे तीला जमलेच नाही मंत्र्यांचे दौरे हिवाळी अधिवेशन आणि असेंब्लीत द्यावयाचे उत्तराची जुळवाजुळव करण्यात तीचा वेळ कसा गेला हे कळलेच नाही. खूप ताराबंळ उडाली.

इकडे बाबा अस्वस्थ झाला तीचा फोन आला नाही. ब्लडप्रेशर वाढले. सारखा चिमणीचा जप सुरू झाला. जेवण करणे बंद केले. वॉशरुमला जाताना चक्कर येऊन पडले. वीणाने लगेच ॲडमिट केले. मूले सूना पोरी जावई धावत पळत हॉस्पिटलला पोहचले.

रात्री ११ वाजता 'ती चा विडियो कॉल आला तेव्हा बाबा हॉस्पीटलच्या बेडवर झोपला होता. नळ्या लागल्या होत्या. बाबाला अशा अवस्थेत पाहून तीच्या काळजात धस्स झाले. काही वेळातच ती हॉस्पिटलमध्ये तीच्या गाडीचा ताफा पोहोचला. डॉक्टरानी औषध दिल्यामुळे बाबा ग्लानीतच होता.

'"ए' बाबा, उठ, मी आलीय ना.? ए बाबा उठ त्याला हालवत म्हणाली, बघ ना कोण आलय, तुझी बेस्ट फ्रेंड मैत्रेयी "

मैत्रेयी कानावर पडताच बाबा ग्लानीतून बाहेर आला. डोळे उघडून पाहिले तर त्याचा हात हातात घेऊन 'ती' उभी होती. तीच्या डोळ्यातून गळलेली आसवे त्याच्या गालावर पडताच त्याने डोळे उघडले. त्याला त्याच अवस्थेत बिलगून म्हणाली, "बाबा आता तुला सोडून मी कुठेच जाणार नाही "आणि तू पण मला सोडून कुठेच जाणार नाही. दोघांचे प्रेम पाहून सारे स्तब्ध झाले. सर्वांचे डोळे पाणावले. आनंदाश्रू वाहू लागले. ते दोघे मात्र एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडाले होते. आजोबा नातीचे प्रेम सर्व थक्क झाले. कलेक्टरच्या गाडीचा सायरन ऐकून डॉक्टरही धावत आले. तेव्हा बाबा मात्र नातीशी गप्पा मारण्यात व्यस्त होते. डॉक्टरांनी वातावरण पाहून हासतच सर्वांचा निरोप घेतला.

नागपूर
मो. ९५१८५१६५२५

॥ ॐ ॥ श्री ॥ ऋ ॥

श्री विश्वकृपा आयुर्वेदिय चिकित्सालय व पंचकर्म केंद्र

आयुर्वेदीय चिकित्सालय

आयुर्वेदिक उपचार

सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!

दीपोत्सवाच्या प्रकाशाने आपले आरोग्य, आनंद आणि समृद्धीच्या नव्या उंचीवर जावो...!

महिन्याचा रविवार
नागपुर ओ पी डी

अपॉइंटमेंट घेणे आवश्यक
☎ 9421738718, 9422353506

- liver चे आजार
- मधुमेह
- वातव्याधी
- fatty liver
- liver cirrhosis
- कॅन्सर
- SGOT/SGPT वाढणे
- जलोदर (पोटात पाणी होणे)
- पित्ताशय खडे होणे (Gall bladder stone)
- सोरियासीस/त्वचारोग
- किडनी फेल्युअर
- फुफ्फुसा संबधित आजार
- लैंगिक आजार
- स्त्रियांचे आजार (infertility)



डॉ. चरण पुं. सोनारे
आयुर्वेदाचार्य व पंचकर्म तज्ञ, पुणे
Reg I-42846-A1

पत्ता:-
सार्थक अपार्टमेंट, मॉडर्न सोसायटी, फ्लॅट नं. १०२, पाण्याच्या टाकीजवळ, राधेय मंगल कार्यालया opp रोड, प्रताप नगर, नागपूर.

https://goo.gl/maps/WuycnPL4GsPCJmsL8?g_st=aw



आ ति थ्य

- सौ. मनीषा चिंतामणी आवेकर

घरी येणाºया पाहुण्याचे स्वागत करणे, त्याची योग्य व्यवस्था ठेवणे हे गृहस्थाश्रमी माणसाचे कर्तव्य आहे, अशी आपली भारतीय संस्कृती आहे. अतिथी भर दुपारी आला तरी, पूर्वीच्या काळात त्याला घासातला घास काढून दिला जाई. 'अतिथी देवो भव' म्हणूनच म्हटले जाते. आता एखाद्या गावाकडच्या माणसाचे पुण्यात काम असले , तर तो ओळखीच्या माणसाकडेच उतरेल. भरमसाठ रेटने तो हॉटेलमधे उतरणार नाही कारण ते खिशाला परवडणार नाही. आता अशा माणसाला अतिथी म्हणून सामावून घ्यायला मोठ्या मनाची आवश्यकता आहे. एक अनुभवलेली गोष्ट सांगते. माझे सासर सोलापूर जिल्ह्यातले. अकलूज जवळ मळोली हे छोटेखानी गाव. त्यातील एक मावशी त्यांच्या कामासाठी पुण्याला येत असत. रात्रीच्या गाडीने सकाळी सकाळीच यायच्या. मिश्री लावून सावकाश दात घासायच्या. त्यांच्याजवळ कालच्या पोळ्या, चटणी असायचे. माझे पुतणे त्यांना शिळे खाऊ देत नसत. ताजी पोळी, भाकरी द्यायचे. ही जी माणूसकी दाखवली जायची, ती त्या मावशींना फार सुखावून जायची. आम्ही परतफेडीच्या अपेक्षेने काही करत नव्हतो, पण आमचा चांगुलपणा त्या गावाकडे सर्वांना भरभरून सांगायच्या.

जेवताना कोणी आले तर "या जेवायला", असं म्हणायची पद्धत आहे. सुरुवातीला मला सवय नसल्याने, दडपण यायचे पण नंतर अशा गोष्टींची सवय झाली. आतिथ्याचा तो एक उपचार आहे, हे नंतर समजले. गावाकडे न कळवता कोणी आले, तर जेवणाचे ताट सोडून घरची बाई अतिथीच्या जेवणाची सोय करायला उठेल, तेही न कंटाळता न कुरकुरता! गावाकडे मालही भरपूर असतो. बायका नोकरी करत नसल्याने त्यांना वेळही असतो. पण सर्वात महत्वाची लागते ती इच्छाशक्ती. ती असेल,व तरच येणारा अतिथी पोटभर जेवून तृप्त होतो.ग्रामीण मराठमोळ्या संस्कृतीमधे आतिथ्यभाव मनापासून दिसून येतो.

आतिथ्यामधे गरीब/श्रीमंत असा भेदभाव नसतो. कधीकधी एखाद्या घरी साधे जेवण मिळाले, तरी गृहिणीच्या चेह-यावरील समाधानी, आनंदी वृत्ती अतिथीला पोटभर जेवून तृप्त करते. तेच एखाद्या श्रीमंत घरी अतिथी आयत्यावेळी गेला, तर गृहिणीच्या चेहऱ्यावरील आठ्या, नापसंती अतिथीला नाराज करते. पुन्हा इथे कधीही यायचे नाही, असे तो मनोमन ठरवून टाकतो. आजकाल शहरामधे कुणाकडे आयत्यावेळी जायची सोयच राहिलेली नाही. फोन करणे, हा राजमार्ग. त्याला प्रतिसाद कसा मिळतो, ते महत्वाचे. घरची गृहिणी करणारी असली तर ठीक, नाहीतर "अरे, आम्ही त्या दिवशी सहलीला जाणार आहोत" अशी लोणकढी थाप घरच्या पुरुषाला मारावी लागते. मला आतिथ्याच्या संदर्भात परांजपे सरांच्या मिसेस अरुणाताईंचे खूप कौतुक वाटते. क्लास संपल्यावर "पाणी हवंय का?", असं त्या नेहमी प्रेमळपणे विचारायच्या. माझे घर लांब, सिंहगड रोडला आणि बाराची वेळ असायची. त्या खूप सुगरण! वेगवेगळ्या वड्या , चिवडे ,लाडू त्या नेहमी करायच्या आणि पाण्याबरोबर खायला लावायच्या. आजही त्यांच्याबरोबर आयत्यावेळी अंगतपंगत करायची वेळ आली तरी त्या प्रेमाने सामावून घेतात. ज्या घरची गृहिणी प्रसन्न चेहऱ्याने अतिथीचे स्वागत करते, तिथेच अतिथी तृप्त होऊन "अन्नदाता सुखी भव" असा भरल्या पोटाने आणि मनाने आशीर्वाद देतो.

आजकाल जीवन गतिमान झाले आहे. आलेल्या पाहुण्याला हॉटेलात नेऊन जेवू घालायची पद्धतही सुरु झाली आहे. त्याबाबतीत आदरणीय प्रवीण दवणे सरांचा एक लेख आठवतो. एक मित्र जेवायला बोलावतो. हॉटेलमधे विविध पदार्थांच्या ऑर्डर्स देतो पण त्याने सरांच्या मनाचे समाधान होत नाही."याने एक कपभर कॉफी देऊन गरमागरम खिचडी जरी घरी खायला दिली असती, तरी मला समाधान वाटले असते.", असे ते शेवटी म्हणतात आजकाल जीवन गतिमान झाले आहे. जो-तो पुढे पुढे धावत आहे. पण मला वाटते, कधी तरी येणाऱ्या अतिथीला आनंदाने चार घास खाऊ घालणे, हे आपले कर्तव्यच आहे.

हो, किनई!

पुणे
मो. ९७६३७०६२००


आधार फाउंडेशन,
हिंगणघाट, जि. वर्धातर्फे
सर्वांना दिवाळीच्या
कार्तिक पौर्णिमेच्या आणि
नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.....
दीपांच्या प्रकाशाने उजळू दे
प्रत्येकांचे आयुष्य,
सुख, समृद्धी, आरोग्य आणि
आनंदांचे नवे क्षितिज गाठू दे...
नव्या आशा, नव्या स्वप्नांनी
सजू दे हे नववर्ष...!
शुभेच्छुक -
आधार फाउंडेशन,
हिंगणघाट, जि. वर्धा

लेख

दिवाळीच्या दिव्यापेक्षा 'मोठा प्रकाश माणुसकीचा'

-सौ. माधुरी गजानन धनोकार



दिवे लावून घर उजळते,
प्रेम देऊन मन उजळते;
धन-दौलतीने जीवन सजते,
पण माणुसकीने जग सुंदर होते!

दिवाळी म्हणजे प्रकाशाचा उत्सव. अंधारावर प्रकाशाचा, निराशेवर आशेचा आणि दु:खावर आनंदाचा विजय साजरा करणारा हा सण. दिवाळी आली की घराघरांत पणत्या उजळतात, आकाशकंदील झळकतात, अंगणात सुंदर रांगोळी सजते आणि फराळाच्या सुगंधाने वातावरण प्रसन्न होते. नवीन कपडे, भेटवस्तू, मिठाई आणि आनंदाच्या क्षणांनी प्रत्येकाचे मन भरून जाते. पण या बाह्य प्रकाशापेक्षाही एक प्रकाश असा आहे, ज्याची तुलना कोणत्याही दिव्याशी होऊ शकत नाही. तो प्रकाश म्हणजे माणुसकीचा प्रकाश! दिवा काही तास जळतो आणि नंतर विझतो; पण एखाद्याच्या दु:खाच्या वेळी दिलेला आधार, अडचणीच्या वेळी केलेली मदत आणि निराश मनाला दिलेली आशा आयुष्यभर लक्षात राहते. म्हणूनच दिवाळीच्या असंख्य पणत्यांपेक्षा माणुसकीची एक छोटीशी ज्योत अधिक तेजस्वी असते.

आज आपण दिवाळी साजरी करताना आपल्या घरातील अंधार दूर करण्यासाठी दिवे लावतो. परंतु आपल्या आजूबाजूला असे कितीतरी लोक आहेत, ज्यांच्या आयुष्यात अजूनही अंधार आहे. कुणाकडे पुरेसे अन्न नाही, कुणाकडे अंग झाकण्यासाठी कपडे नाहीत, कुणी आजारपणाशी झुंजत आहे, कुणी वृद्धापकाळात एकटेपण अनुभवत आहे, तर कुणी परिस्थितीशी संघर्ष करत आपल्या मुलांच्या भविष्यासाठी झगडत आहे. अशा व्यक्तीच्या आयुष्यात आपण आशेचा एक दिवा लावू शकलो, तर तीच खरी दिवाळी!

माणुसकी म्हणजे नेमके काय?

माणुसकी म्हणजे केवळ गरिबांना पैसे देणे नव्हे. माणुसकी म्हणजे दुस०याच्या वेदना समजून घेणे. समोरच्याच्या परिस्थितीची जाणीव ठेवणे. एखाद्याला त्याच्या दु:खात साथ देणे. गरजेच्या वेळी मदतीचा हात पुढे करणे. कधी एखाद्या भुकेल्या व्यक्तीला अन्न देणे ही माणुसकी असते, तर कधी एखाद्या दु:खी व्यक्तीचे दोन शब्द शांतपणे ऐकून घेणेही माणुसकी असते. कधी एखाद्या विद्यार्थ्याला पुस्तक देणे, एखाद्या मुलीला शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे, वृद्ध व्यक्तीची विचारपूस करणे किंवा एखाद्या निराधार व्यक्तीच्या चेहऱ्यावर हास्य आणणे ही सारी माणुसकीचीच रूपे आहेत.

मदतीचा हात छोटा असो वा मोठा,
त्यामागची भावना मोठी असली पाहिजे.

आजच्या आधुनिक युगात विज्ञानाने आपल्याला खूप काही दिले. मोबाईलने जग जवळ आणले, इंटरनेटने अंतर कमी केले; परंतु माणसामाणसांमधील भावनिक अंतर मात्र वाढताना दिसते. हजारो 'फ्रेंड्स' सोशल मीडियावर असतात, पण मन मोकळे करण्यासाठी जवळचे दोन माणसे शोधावी लागतात. आपण एकमेकांना 'लाईक' करतो, 'कॉमेंट' करतो; पण एखाद्याच्या आयुष्यात खरोखर काय चालले आहे, हे जाणून घेण्यासाठी वेळ देतो का? दिवाळी हा याचाच विचार करण्याचा सण आहे.

घराची स्वच्छता आणि मनाची स्वच्छता

दिवाळीच्या आधी आपण घराची स्वच्छता करतो. वर्षभर साचलेली धूळ, कचरा, नको असलेल्या वस्तू घरातून बाहेर काढतो. घर स्वच्छ आणि सुंदर करतो. पण मनाच्या कोप०यात साचलेला राग, मत्सर, अहंकार, द्वेष, गैरसमज आणि जुन्या आठवणींची धूळ आपण कधी झटकणार? दिवाळीच्या निमित्ताने मनाचीही साफसफाई करूया. ज्यांच्याशी गैरसमज झाले आहेत, त्यांच्याशी संवाद साधूया. ज्यांच्याशी अबोला आहे, त्यांना प्रेमाने जवळ करूया. एखाद्याने आपल्याला दुखावले असेल, तर क्षमा करण्याचा मोठेपणा दाखवूया.कारण घरातील दिव्यांनी घर उजळते; पण क्षमेच्या आणि प्रेमाच्या

प्रकाशाने मन उजळते.

खरी श्रीमंती कोणती?

दिवाळीत आपण लक्ष्मीपूजन करतो. धन, संपत्ती आणि समृद्धी आपल्या घरी यावी अशी प्रार्थना करतो. धन आवश्यक आहेच; परंतु केवळ पैसा म्हणजे समृद्धी नव्हे. ज्याच्या घरात पैसा आहे पण प्रेम नाही, तो खरोखर श्रीमंत आहे का? ज्याच्याकडे मोठे घर आहे पण त्याच्या दारात मदतीसाठी आलेल्या माणसाला जागा नाही, त्याची श्रीमंती किती मोठी? याउलट, ज्याच्या घरात साधेपणा आहे पण मनात प्रेम आहे, जो आपल्या परीने दुसऱ्याला मदत करतो, दु:खी माणसाला धीर देतो आणि गरजूच्या चेहऱ्यावर हास्य फुलवतो, तोच खऱ्या अर्थाने श्रीमंत आहे.

''माणुसकी ही अशी संपत्ती आहे,
जी खर्च केली की कमी होत नाही;
उलट वाटली की वाढत जाते.
एका छोट्याशा मदतीची मोठी ताकद

आपण अनेकदा विचार करतो, मी एकट्याने काय करू शकतो?''

पण समाजात मोठे बदल नेहमी मोठ्या गोष्टींनीच घडतात असे नाही. एका छोट्या कृतीतूनही मोठा बदल घडू शकतो. एका मुलाच्या हातात दिलेले पुस्तक त्याचे भविष्य बदलू शकते. एका गरजू कुटुंबाला दिलेले धान्य त्यांची काही दिवसांची चिंता दूर करू शकते. एका वृद्ध व्यक्तीसोबत घालवलेला अर्धा तास त्यांचा एकटेपणा दूर करू शकतो. आणि एखाद्याला दिलेले दोन प्रेमाचे शब्द त्याला पुन्हा जगण्याची उमेद देऊ शकतात. म्हणून मदत करण्यासाठी आपल्याकडे खूप काही असण्याची गरज नाही. आपल्याकडे असलेले थोडेसेही मनापासून दिले, तर त्याची किंमत अमूल्य असते. दिवाळी प्रत्येकाची असावी आपण आपल्या घरात फराळ करतो. लाडू, चिवडा, करंजी, शंकरपाळे बनवतो. घरातील मंडळी आनंदाने त्याचा आस्वाद घेतात.

पण या आनंदातील थोडासा वाटा आपण एखाद्या गरजू कुटुंबाला दिला तर? आपल्या कपाटात न वापरलेले चांगले कपडे असतील, तर ते एखाद्या गरजू व्यक्तीला देता येतील. घरात अतिरिक्त धान्य असेल, तर ते एखाद्या कुटुंबाच्या उपयोगी पडू शकते. एखाद्या वृद्धाश्रमात जाऊन काही वेळ त्यांच्या सोबत घालवता येईल. एखाद्या बालकाश्रमातील मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवता येईल. अशा कृतींनी आपल्या दिवाळीचा आनंद कमी होत नाही; उलट तो अनेक पटींनी वाढतो.

माणुसकी आणि निसर्ग

माणुसकीचा अर्थ केवळ माणसांशी प्रेमाने वागणे एवढाच नाही. आपल्या निसर्गाशीही माणुसकीने वागणे गरजेचे आहे. दिवाळीच्या आनंदात पर्यावरणाचा विचार करूया. अनावश्यक फटाके टाळूया, ध्वनी आणि वायुप्रदूषण कमी करूया. पक्षी, प्राणी आणि निसर्गालाही या उत्सवात सुरक्षित स्थान देऊया. दिवाळीचा प्रकाश असा असावा की तो दुसऱ्याच्या डोळ्यांना त्रास न देता प्रत्येकाच्या आयुष्यात आनंद घेऊन येईल.

चला, माणुसकीची पणती पेटवूया!

दिवाळीच्या दिवशी प्रत्येक घरात पणती पेटेल. पण यावर्षी एक पणती आपल्या अंत:करणातही पेटवूया माणुसकीची!

ही पणती प्रेमाची असू दे,
ही पणती सहकार्याची असू दे,
ही पणती संवेदनशीलतेची असू दे,
ही पणती क्षमाशीलतेची असू दे,

आणि ही पणती प्रत्येकाच्या आयुष्यात आशेचा प्रकाश देणारी असू दे.

कारण समाज बदलण्यासाठी नेहमी मोठमोठ्या घोषणा करण्याची गरज नसते. प्रत्येक व्यक्तीने आपल्या परीने माणुसकी जपली, तर समाज आपोआप सुंदर होईल. आपण किती दिवे लावले यापेक्षा आपल्यामुळे किती



चेहरे उजळले, हे अधिक महत्त्वाचे आहे. आपण किती पैसा खर्च केला यापेक्षा आपल्या हातून किती प्रेम वाटले, हे महत्त्वाचे आहे. आपल्या घराची दिवाळी किती सुंदर झाली यापेक्षा आपल्यामुळे दुसऱ्याची दिवाळी किती आनंदी झाली, हे खरे समाधान आहे.

शेवटचा प्रकाश

दिवाळीच्या दिव्याला तेल लागते, वात लागते आणि ज्योत पेटवावी लागते. पण माणुसकीच्या दिव्याला फक्त स्वच्छ मन, प्रेमाची भावना आणि मदतीची तयारी लागते. दिवा विझतो; पण माणुसकीचा प्रकाश पिढ्यान्पिढ्या पुढे जातो.

म्हणून या दिवाळीत आपण एक संकल्प करूया,

एक दिवा घरासाठी,
एक दिवा देवासाठी,
आणि एक दिवा माणुसकीसाठी!

कारण,
पणती जळते क्षणभर,
प्रकाश देते घरभर;
माणुसकीची ज्योत पेटली,
तर उजळते जीवनभर!

या दिवाळीत आपल्या घरासोबत एखाद्याचे मन उजळवूया.
आपल्या आनंदासोबत एखाद्याचा आनंद वाढवूया.
आपल्या सुखासोबत एखाद्याचे दु:ख कमी करूया.
दिवाळीच्या दिव्यांपेक्षा मोठा प्रकाश माणुसकीचा आहे;
आणि तो प्रकाश प्रत्येकाच्या अंत:करणात पेटला,
तर खऱ्या अर्थाने 'दिवाळी' साजरी झाली असे म्हणता येईल.

अकोला
मो. ८४८२९६०११९

लेख

अविस्मरणीय...
आसाम मेघालय



आसाम आणि मेघालय ही आपल्या भारताची पूर्वोत्तरची, निसर्गाने मुक्तहस्ताने सृष्टी सौंदर्याची उधळण केलेली दोन राज्ये, हिरवाईचे लेणे लेऊन नटलेल्या उंचच उंच दिमाखदार डोंगरांच्या रांगा, मधून झुळझुळ वाहणारे निर्झर व खळाळणाऱ्या नद्या तसेच ठिकठिकाणी कर्णमधुर नाद करीत ऐटीत कोसळणारे लहानमोठे धबधबे, उंच सखल पहाडांमधे वसलेल्या वस्त्या व गावांना जोडणाऱ्या वळणदार वाटा व रस्ते व रस्त्यांच्या दुतर्फा शिस्तबद्ध उभ्या असलेल्या उंच वृक्षांच्या रांगा व वाहणारे गार आल्हाददायक वारे, हा सारा रोमांचकारी व मन प्रसन्नतेने भरून टाकणारा अनुभव आम्हाला गुवाहाटी-चेरापुंजी-शिलाँग-काझीरंगा-गुवाहाटी या प्रवासात घेता आला.

- गणेश पांडे

आम्ही कुटुंबातील तेरा सदस्यांनी नागपुर-दिल्ली-गुवाहाटी असा विमान प्रवास करीत गुवाहाटीपासुन पंधरा सिटर टेम्पो ट्रॅव्हलरद्वारे प्रवास करून सात दिवस हा अवर्णनीय आनंद अनुभवला. यातील तीन दिवस चेरापुंजी, एक दिवस शिलाँग, एक दिवस काझीरंगा व दोन रात्री गुवाहाटी असा आमचा मुक्काम राहीला.

(१) चेरापुंजी:- प्रथम आम्ही गुवाहाटी वरून शिलाँग मार्गे चेरापुंजीला आलो.चेरापुंजीला बघण्यासारखी प्रमुख दर्शनीय स्थळे म्हणजे येथील

(१) उंचीवरून कोसळणारा डेंथलीन वाटर फॉल, (२) वायसेडाँग वाटर फॉल, जो माझ्या मते मेघालयातील सर्वात सुंदर धबधबा ठरावा (३) मॉसमॉई केव्हज, (४) आरवा केव्हज, (४) सेव्हन सिस्टर्स वाटर फॉल ही आहेत, ज्यांना आम्ही भेट दिली व त्यांचे सौंदर्य मनाच्या कप्प्यात व मोबाईलच्या कॅमेऱ्यात साठवून घेतले, तसेच प्रवास करीत असतांना सभोवतालचा नयनरम्य निसर्ग पावलोपावली आपले विलोभनीय, मनोहारी दर्शन देत आपल्या सोबत सतत चालत असतो. चेरापुंजीची आवर्जून सांगण्यासारखी वैशिष्ट्ये म्हणजे आम्ही शाळेमधे असतांना भूगोलात अभ्यासल्याप्रमाणे चेरापुंजी हे जगातील सर्वात जास्त पर्जन्यमान असलेले ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे व दुसरे म्हणजे येथे सूर्योदय सकाळी लौकरच साडेचार ते पाच वाजता होतो व सूर्यास्तही लवकरच म्हणजे संध्याकाळी साडेचार ते पाच वाजता दरम्यान होतो व सहा वाजता रात्र होऊन रात्री आठ वाजता सर्व व्यवहार बंद होतात व हॉटेलमध्ये जेवणाची ऑर्डर आठच्या आधी दिली तरच रात्रीचे जेवण मिळते. तीसरे काहीसे गमतीदार मी अवलोकलेले वैशिष्ट्य म्हणजे येथे रस्त्यावर फिरणाऱ्या वा घरोघरी उभ्या असणाऱ्या चार चाकी वाहनांमध्ये बहुतांशी मारूतीच्या ८०० कार वा आल्टो कार दिसतात, म्हणजे की दिसणाऱ्या १० गाड्यांपैकी ८ गाड्या या मारूती ८०० किंवा आल्टो असतात व हे पाहून मलाही जरा कौतुक वाटले व अभिमानही वाटला कारण माझ्याकडेही १८ वर्ष जुनी मारूती ८०० कार आहे व अजूनही ती नवीन सारखीच चालते. असो,जे दिसल ते सहज सांगावस वाटलं. चेरापुंजी येथे पाण्याची खूपच मुबलकता आहे व बऱ्याच ठिकाणी डोंगरावरील नैसर्गिक पाण्याच्या साठ्यांमधून पाईपलाईन टाकून वापरासाठी पाणी घेतले गेल्याने दिवस रात्र नळांमधुन उच्च दाबात पाणी वहात असलेले आम्हाला तेथे आढळले. येथील लोक फार शांत, संयमी, मृदुभाषी,



अगत्यशील व आपल्या रूढी, परंपरा, संस्कृती जपणारे तसेच आपल्या सभोवतालच्या निसर्गावर प्रेम करणारे आहेत. चेरापुंजी येथूनच आम्ही भारत व बांगला देशची सीमा असलेल्या व पर्यटकांचे प्रमुख आकर्षण असलेल्या डावकी येथे जाऊन सुप्रसिद्ध 'उम्नॉट' नदीच्या नितळ स्वच्छ पाण्यात नौकानयनाचा आनंद घेतला. या नदीत बोटींग करीत असताना खरोखरच नदीचा तळ अगदी स्पष्टपणे आपल्याला दिसतो एवढे पाणी स्वच्छ आहे, व हा अनुभव व आनंद शब्दातीत आहे जो प्रत्यक्ष घेतल्या शिवाय त्याचा रोमांच आपल्याला जाणवू शकत नाही, तसेच या नदीच्या एका बाजूला आमचे भारतीय लोक बोटींग करतात व दुसऱ्या बाजूला बांगलादेशचे लोक बोटींग करतांना दिसतात व मध्ये केवळ छोटीशी दगडांची पार सीमारेषेच्या रूपात घातलेली आहे, येथील स्थानिक विक्रेते या बाजूकडून त्या बाजूला व त्या बाजूचे या बाजूला बिनदिक्कतपणे जात येत असतात व आपणही पलीकडील बांगलादेश च्या नागरीकांसोबत संवाद साधू शकतो, हा ही एक आगळा अनुभव येथे आपल्याला घ्यायला मिळतो.

येथूनच पुढे आशिया खंडातील सर्वात स्वच्छ गाव म्हणून लौकिक असलेले "मॉवलीनाँग" येथे भेट दिली. येथील गावकऱ्यांचे स्वच्छता प्रेम व परीश्रम पाहून खऱ्या अर्थाने 'स्वच्छ भारत' अभियानाचे हेच खरे दुत आहेत ही खात्री पटते व आपल्यालाही स्वच्छतेची 'याची देही याची डोळी' प्रेरणा मॉवलीनाँग येथील भेटीतून मिळते, येथूनच काही अंतरावर असलेल्या झाडांच्या मुळांनी आपसात एकमेकांशी जुळून नदीवर नैसर्गिक पणे तयार केलेल्या "रूट ब्रीज" या नैसर्गिक पुलाला भेट दिली, निसर्गाची ही कलाकृती मन प्रसन्न करून गेली व निसर्ग हाच सर्वात मोठा चमत्कारी कलाकार व गुरू आहे ही भावना दृढ करून गेली.

(२) शिलाँग:- चेरापुंजी येथे तीन दिवस घालवल्या नंतर आम्ही मेघालय राज्याची राजधानी असलेल्या शिलाँगला आलो. शिलाँग हे थंड व आल्हाददायक हवामानाचे, निसर्ग सुंदर रमणीय ठिकाण असून इशान्येकडील एक महत्त्वाचे शहर आहे शिलाँग पिक वरून त्याचे शिलाँग हे नाव पडले असून १८७४ पासून एकीकृत आसामची राजधानी असलेले हे शहर १९७२ मध्ये नव निर्मित मेघालय राज्याची राजधानी बनले. (१९७३ पर्यंत आसामची राजधानीही शिलाँगला होती त्यानंतर आसामची राजधानी गुवाहाटी जवळील दिसपूर येथे स्थानांतरित झाली).

शिलाँग येथील प्रेक्षणीय स्थळे, म्हणजे (१) एलिफंट धबधबा (२) वार्डस लेक (३) शिलाँग पिक व्ह्यू पॉईंट (४) लाईटलम ग्रँड कॅनियन (५) उमियाम लेक यांना आम्ही भेट दिली व काही काळ थांबुन फोटो काढण्याचा आनंद घेतला. तसेच शिलाँग येथील 'पोलीस बाजार' हे मार्केट, पर्यटकांसाठी सर्व प्रकारचे कपडे व स्थानिक उत्पादनांच्या व कलात्मक वस्तुंच्या खरेदी साठी एक मोठी आनंददायी पर्वणीच आहे. तसेच शिलाँग येथील डॉन बॉस्को म्युझियमही पर्यटकांसाठी प्रमुख आकर्षणाचे एक केंद्र आहे.

(३) काझीरंगा राष्ट्रीय अभयारण्य:-शिलाँग वरून गुवाहाटी मार्गे आम्ही भारतात व विदेशातही गेंड्यांसाठी सुप्रसिद्ध असलेल्या "काझीरंगा राष्ट्रीय अभयारकाझीरंगा राष्ट्रीय अभयारण्यण्य" येथे आलो, रात्री मुक्काम करून दुसऱ्या दिवशी सकाळी काझीरंगा अभयारण्याची जीपने सफारी केली ज्यात आम्हाला पाच ते सहा गेंड्यांनी मोकळे पणाने आपले दर्शन दिले व सफारीचे सार्थक केले. त्यानंतर आम्ही काझीरंगा येथे "ऑर्चिड पार्क" ला भेट दिली व तेथील आसामच्या संगीत वाद्य दालन, हस्तकला व कलाकुसरीच्या दालनांना भेट देऊन तेथे सुरू असलेल्या सांस्कृतिक महोत्सवातील आसामच्या स्थानिक नृत्य, कला व गायनाचा आनंद घेतला व रस्त्याने निसर्ग सौंदयार्चा आनंद घेत गुवाहाटीला आलो.

(४) गुवाहाटी:- येथील कामाख्या देवीचे मंदीर प्रसिद्ध आहे व येथे येणा०या पर्यटकांसाठी भेट देण्यासाठी हे एक महत्त्वाचे व आवडीचे धार्मिक स्थळ आहे व गुवाहाटी येथे भेट देणारे पर्यटक श्रद्धेने आवर्जून या मंदिरात कामाख्या देवीचे दर्शन घेऊन धार्मिक समाधान व पुण्य आपल्या पदरात पाडून घेतात, तसेच गुवाहाटी येथे ब्रम्हपुत्रा नदीच्या पात्रात असलेले " उमानंद" मंदिर हे आणखी एक धार्मिक पर्यटन आकर्षण आहे, तसेच आसाम राज्य प्राणी संग्रहालय व तारांगण यासारखीही पर्यटकांना भेट देण्यासाठी ठिकाणे गुवाहाटी येथे आहेत, ज्यांना भेट देऊन पर्यटक आसाम व मेघालय पर्यटनाची सांगता करतात. आणि याच प्रकारे आम्ही सुद्धा आसाम व मेघालय प्रवासाच्या सुखदायी, आनंददायी, प्रसन्नदायी आठवणी सोबतीला घेऊन व मनाच्या कोंदणात कायमस्वरूपी साठवून घेऊन, बंगलोर वाटे विमानाने नागपूरला परत आलो व एका अविस्मरणीय प्रवासाची सांगता केली

नागपूर
मो. ९०२२८५९६७०







सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी व समस्त नागरिकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

स्थापना | बिना सहकार नही उद्धार | वर्ष २००४

नागपूर विभाग शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित चंद्रपूर,रजि नं. ११८

कार्यक्षेत्र : नागपूर व अमरावती विभाग

सभासद संख्या - ७९१८
सभासद कर्ज - ५,४३,३९,३०,२०८.१३/-
गुंतवणूक - २,२७,८७,२७,०४०.०७/-
दि ३१/०३/२०२६ चा ताळेबंद रु. ८,०२,०४,५७,३४३.०९/-
दि ३१/०३/२०२६ चा नफा - ६,५२,६९,७०१.५२/-

भागभांडवल - ५०,४४,४५,०२५/-
ठेवी - ६,९०,३६,७५,३९७.०५/-
निधी - २६,०१,२३,६१०.५२/-
लाभांष -१०%
ऑडिट वर्ग सतत - "अ "

* संस्थेच्या एकूण शाखा - १७
* संस्थेची स्वतंत्र इमारत - चंद्रपूर, नागपूर, हिंगणघाट, गडचिरोली, गडचांदूर

* मुख्यशाखा - चंद्रपूर * उपशाखा - चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली, गडचांदुर, वरोरा, ब्रम्हपुरी, नागेपल्ली, हिंगणघाट, वर्धा, तळेगाव (श्यामपंत), भंडारा, आष्टी, गोंदिया, उमरेड, कोहमारा, वरुड

"विश्वासाने गुंतवणूक करावी अशी व कर्जदार सभासद मयत झाल्यास 100 टक्के कर्जमाफ करणारी महाराष्ट्रातील एकमेव कर्मचारी सहकारी पतसंस्था"

साधारण कर्ज ५०.00 लक्ष
मध्यम मुदती कर्ज - ५.00 लक्ष
आकस्मिक कर्ज - ८० हजार

साधारण, मध्यम मुदती कर्ज, आकस्मिक कर्ज व्याजदर, द.सा.द.शे.

११%



१) सर्व प्रकारच्या कर्जाची महत्तम मर्यादा ५० लक्ष राहील.
२) वेतनाच्या प्रमाणात कर्ज वितरण करण्यात येतील.

ठेवीवरील व्याजदर द.सा.द.शे.

१) मासिक आवर्त ठेव -१ ते ५ वर्ष ९%
२) मुदत ठेव- १ ते ५ वर्ष ९%
३) मासिक आय योजना -रु. १,००,०००/- गुंतवा द.सा.द.शे.८.४०% दराने दरमहा मिळवा रु ७००/- व्याज मिळवा.
४) भाग्यलक्ष्मी आवर्त ठेव - दरमहा रु १०००/- च्या आवर्त ठेवी गुंतवणुकीच्या ७५ महिन्यानंतर रु १,००,०००/- मिळेल.
५) दामदुप्पट योजना - ९६ महिन्यानंतर दामदुप्पट (८ वर्ष)



श्री. सुरेंद्र अडबाले
अध्यक्ष तथा गटनेता, मनपा, चंद्रपूर



श्री. सुनिल शेरकी
उपाध्यक्ष



श्री. दिनकर अडबाले
मा. सचिव



श्री. शरद डांगे
खजिनदार

आमदार श्री. सुधाकर अडबाले

(महाराष्ट्र विधान परिषद)
संस्थापक अध्यक्ष तथा तज्ञ संचालक
नागपूर विभाग शि.शि.क.स. पतसंस्था, चंद्रपूर

संचालक : श्री. ज्ञानेश्वर सोनकुसरे, श्री. मनिष कन्नमवार, श्री. विनोद रणदिवे, श्री. किशोर पाचभाई, श्री. नितीन जिवतोडे, सौ. शिला ताजणे, श्रीमती चारुशिला जोगी, श्री. सचिन मोहितकर, श्री. श्रीकांत पोडे, श्री. प्रकाश अडबाले (कार्यलक्षी संचालक)

लेख



एक कॉफीचा कप

'फक्त दहा मिनिटं बसू,' असं म्हणत सुरुवात व्हायची आणि दोन तास कधी गेले कळायचेही नाही. त्या कॉफीच्या कपात कॉफीपेक्षा मैत्री जास्त असायची. कधी एखाद्या मित्राने मनातलं दु:ख सांगितलं आहे तेही कॉफीच्या टेबलावरच. समोर दोन कप मध्ये शांतता आणि मनात साचलेल्या असंख्य गोष्टी. काही वेळा शब्दांची गरज नसते.. समोरचा माणूस फक्त ऐकतोय एवढंच पुरेसं असतं. कॉफी थंड होत जाते पण मनातला भार हलका होत जातो.

- संगीता कुलकर्णी

सकाळची वेळ... खिडकीतून येणाऱ्या कोवळ्या उन्हाने खोलीच्या एका कोपऱ्यात हळूच आपले अस्तित्व जाणवून दिले होते. बाहेर रस्त्यावरची लगबग सुरू झाली होती. कुठेतरी दूधवाल्याची सायकलची घंटी वाजत होती, एखादी बस धुराचा लोट मागे सोडत पुढे जात होती तर शेजारच्या घरातून रेडिओवर जुन्या गाण्याचे सूर ऐकू येत होते पण माझ्या हातातला कॉफीचा कप या सगळ्या गोंगाटापासून मला अलगद दूर नेत होता. कॉफीचा एक कप म्हणजे माझ्यासाठी केवळ गरम पेय नाही. तो दिवसाच्या सुरुवातीचा एक छोटासा विराम आहे. स्वत:शी बोलण्याची संधी आहे. कधी तो थकलेल्या मनाला आधार देतो तर कधी एखाद्या जुन्या आठवणीची दारं उघडतो. कॉफी तयार करण्याचीसुद्धा एक गंमत असते. पाणी उकळायला ठेवायचे कॉफीचा सुगंध हळूहळू स्वयंपाकघरात पसरू लागतो. तो सुगंध नाकातून मनात जातो आणि क्षणार्धात आळस कुठेतरी पळून जातो. दूध आणि कॉफी एकत्र येतात आणि कपात तयार होणारा तपकिरी रंग जणू सकाळच्या आकाशावर उमटलेला एखादा रंगच वाटतो. साखर किती घालायची हे प्रत्येकाच्या आवडीचे. कुणाला गोड कॉफी आवडते कुणाला कडवट पण आयुष्यही असेच नाही का? काही क्षण गोड, काही कडू तर काही अगदी बेचव.

कॉफीचा कप हातात घेतला की मला माझ्या आजीची आठवण येते. आजीला कॉफी विशेष आवडत नसे. तिच्या मते सकाळची सुरुवात चहानेच झाली पाहिजे. एकदा मी तिला हट्टाने कॉफी करून दिली. तिने कप हातात घेतला एक घोट घेतला आणि माझ्याकडे बघून म्हणाली, 'कडू आहे, पण वाईट नाही.' त्या एका वाक्यात मला आयुष्याचा मोठा अर्थ सापडला. कडूपणा म्हणजे नेहमी वाईटपणा नसतो. काही कडू अनुभव आपल्याला अधिक शहाणे करून जातात. कॉफीचा कप कधी कधी मित्रही असतो. कॉलेजच्या दिवसांत कॅन्टीनमधला कॉफीचा कप म्हणजे आमच्या मैत्रीचा साक्षीदार होता. परीक्षा जवळ आली की पुस्तकं उघडून आम्ही अभ्यास करण्यापेक्षा कॉफीचे कप घेऊन गप्पा मारत बसायचो. 'फक्त दहा मिनिटं बसू,' असं म्हणत सुरुवात व्हायची आणि दोन तास कधी गेले कळायचेही नाही. त्या कॉफीच्या कपात कॉफीपेक्षा मैत्री जास्त असायची. कधी एखाद्या मित्राने मनातलं दु:ख सांगितलं आहे तेही कॉफीच्या टेबलावरच. समोर दोन कप मध्ये शांतता आणि मनात साचलेल्या असंख्य गोष्टी. काही वेळा शब्दांची गरज नसते.. समोरचा माणूस फक्त ऐकतोय एवढंच पुरेसं असतं. कॉफी थंड होत जाते पण मनातला भार हलका होत जातो.

एकदा पावसाळ्यात मी एका कॅफेत बसली होती. बाहेर मुसळधार पाऊस पडत होता काचेवर पाण्याचे थेंब धावत होते. रस्त्यावरची माणसं छत्र्या सांभाळत पळत होती. माझ्यासमोर कॉफीचा कप होता आणि हातात एक पुस्तक. त्या क्षणी वेळ जणू थांबला होता. जगाला कुठेतरी जायची घाई होती मला मात्र कुठेही जायचे नव्हते. त्या कॉफीच्या एका कपाने मला थांबण्याचे सुख शिकवले. आजच्या धावपळीच्या आयुष्यात 'थांबणे' ही सुद्धा एक कला झाली आहे. आपण सतत कुठेतरी पोहोचण्याच्या प्रयत्नात असतो... सकाळी उठल्यापासून मोबाइल, काम, संदेश, फोन, बैठका, जबाबदाऱ्या दिवस कधी संपतो कळत नाही पण कॉफीचा कप हातात घेतला की काही क्षण आपण स्वत:साठी राखून ठेवू शकतो त्या काही मिनिटांत ना कोणाची अपेक्षा असते.. ना कोणाचे उत्तर द्यायचे असते. फक्त आपण आणि आपला कॉफीचा कप. कॉफीचा कप आठवणींची पेटीसुद्धा आहे. एखाद्या जुन्या कॅफेत गेल्यावर अचानक एखाद्या व्यक्तीची आठवण येते. एखादा विशिष्ट सुगंध आपल्याला अनेक वर्षे मागे घेऊन जातो. एखाद्या कपाचा आकार, त्यावरची नक्षी, खिडकी बाहेरचे दृश्य सगळं काही मनात जपून राहिलेलं असतं.

कधी कधी तर कॉफी हा प्रेमाचाही दूत असतो. पहिल्यांदा भेटताना समोर ठेवलेले दोन कप, लाजत-लाजत झालेल्या गप्पा. नकळत वाढलेले हसू आणि संपलेली कॉफी कप रिकामा झालेला असतो पण संवाद मात्र मनात भरलेला असतो. प्रेमात शब्दांपेक्षा छोट्या छोट्या कृती महत्त्वाच्या असतात. 'तुला कॉफी कशी आवडते?' हा प्रश्नसुद्धा कधी कधी 'तुला मी समजून घ्यायचा प्रयत्न करतोय,' असा अर्थ सांगून जातो.

माझ्या टेबलावर ठेवलेला कॉफीचा कप आता अर्धा रिकामा झाला आहे. कॉफीचा वाफाळता सुगंध कमी झाला आहे. बाहेरचा दिवस अधिक उजळला आहे रस्त्यावरची गर्दी वाढली आहे काही वेळापूर्वी निवांत असलेली सकाळ आता कामाच्या गडबडीत बदलली आहे पण या एका कपाने मला काही क्षण दिले विचारांचे, आठवणींचे, शांततेचे.कदाचित म्हणूनच मला कॉफी आवडते.

कॉफीचा कप लहान असतो पण त्यात मावणारे जग फार मोठे असते. त्यात कधी मैत्री असते.. कधी प्रेम असते. कधी एकटेपण असते. कधी आठवणी असतात तर कधी स्वत:शी केलेला संवाद असतो. त्याच्या कडवटपणातही एक गोडवा असतो आणि उष्णतेतही एक शांतता असते. आयुष्याच्या प्रवासात आपल्याला मोठमोठ्या आनंदाच्या क्षणांची अपेक्षा असते पण खरा आनंद अनेकदा अशाच छोट्या गोष्टींत लपलेला असतो. पावसातली खिडकी आवडते पुस्तक, शांत सकाळ आणि हातातला एक गरम कॉफीचा कप. कप शेवटी रिकामा होतो.

कॉफी संपते. पण त्या काही क्षणांत आपण जगलेला अनुभव मात्र मनात राहतो. आणि म्हणूनच उद्या सकाळी पुन्हा एकदा कॉफीचा कप हातात घेईन. खिडकीजवळ बसेन... जगाला त्याच्या वेगाने धावू देईन आणि काही क्षण स्वत:साठी जगत राहीन कारण कधी कधी आयुष्य समजून घेण्यासाठी मोठ्या तत्त्वज्ञानाची गरज नसते फक्त एक कॉफीचा कप पुरतो.

ठाणे
मो. ९८७०४५१०२०



कथा

कोमेजलेली फुलं

पसरलेल्या अंधारातच झटझट पावले उचलत महादु गावकुसाबाहेरच्या घराकडे निघाला होता. दोन दिवसापासुन पावसाने बºयापैकी जोर धरला होता. वादळवाराही लगाम सुटलेल्या वारूसारखा बेफाम उधळला होता. पावसाच्या पाण्याने चिंब भिजलेल्या महादुला मात्र त्या पाऊसपाण्याची तमा नव्हती. उलट पावसाने जोर धरला कि त्याचा धंदा जोमाने सुरु होई. गावात मोजून बाराच नावाड्यांची घरं. महादु त्यातलाच एक. नाव चालवणं तसं तर बेभरवशाचा धंदा.

- अमेय अ जाधव



बारोंडा नदीच्या उजवीकडे असलेल्या सुपीक प्रदेशात वसलेलं निचोळे गाव अंधाराच्या गडद सावलीत झोपी जाण्याची तयारी करत होते. प्रत्येकाच्या घरी मिणमिणत असलेले रॉकेलचे दिवे हळुहळू विझत चालले होते. गावात वीज आलेली असली तरी लोडशेडिंगच्या बडग्याखाली तिचं अस्तित्व कधी जाणवलंच नव्हतं. त्यामुळे रात्री रॉकेलच्याच दिव्यांचा आधार असे. त्यात रस्त्यावर बसवलेल्या दिव्याच्या खांबांवरील दिवे गावातील टारगट पोरांनी वारंवार उडवून नेल्याने वैतागलेल्या वीजमंडळाने त्यात पुन्हा दिवे बसवलेच नव्हते. त्यामुळे एकदा का रात्री सर्वांच्या घरचे दिवे मालवले गेले कि गावात अंधाराचं साम्राज्य सुरू व्हायचं. गावची लोकसंख्या तशी कमीच. इनमीन शे-दिडशे घरं. त्यामुळे लांबच्या लांब पसरलेल्या त्या पट्ट्यात प्रत्येकाची घरंही बऱ्यापैकी अंतरावर होती.

पसरलेल्या अंधारातच झटझट पावले उचलत महादु गावकुसाबाहेरच्या घराकडे निघाला होता. दोन दिवसापासुन पावसाने बऱ्यापैकी जोर धरला होता. वादळवाराही लगाम सुटलेल्या वारूसारखा बेफाम उधळला होता. पावसाच्या पाण्याने चिंब भिजलेल्या महादुला मात्र त्या पाऊसपाण्याची तमा नव्हती. उलट पावसाने जोर धरला कि त्याचा धंदा जोमाने सुरू होई. गावात मोजून बाराच नावाड्यांची घरं. महादु त्यातलाच एक. नाव चालवणं तसं तर बेभरवशाचा धंदा. बोलायला गेलं तर हंगामी धंदा. पावसाळ्यात धंद्याला तेजी असायची पण उन्हाळ्यात मात्र धंदा काहीसा बसायचा. बाजारहाट, दवाखाना, शाळा, सगळं काही नदीपल्याडच्या तालुक्याच्या गावीच असल्याने गावकऱ्यांचे रोजचंच नदीपल्याड येणं-जाणं असे.

उन्हाळ्यात नदीची पातळी कमी असताना बहूतेक गावकरी सहसा गुडघाभर पाण्यातून चालतच नदीपल्याड जात. त्यामुळे उन्हाळ्यात नावाड्यांना फारसे उत्पन्न मिळत नसे. याउलट पावसाळ्यात नदी दुथडी भरून वाहत असता गावकऱ्यांकडे नावेतून जाण्याव्यतिरिक्त इतर कुठला मार्गच नसे. त्यावेळी मात्र अव्वाच्या सव्वा भाव वाढवून नावाडीगण आपल्या इतर दिवसांतील मिळकतीची कमी भरून काढत असत. अशावेळी गावातील मंडळी मात्र भारी कुरबुर करीत. कधीकधी भावावरून एखादा जास्तीच कुरबुर करू लागला कि सारे नावाडी एकजात त्यावर बहिष्कार टाकत. नाव रिकामी असुनही कोणी त्याला पलीकडे घेऊन जात नसे आणि मग काठावर वाट बघुन थकलेला तो गावकरी जेव्हा ठरला भाव देण्याचे मान्य करी तेव्हा,

''मोठा आलेला भाव कमी करायला! अरे एवढ्या पाण्यात पाय टाकला असता तर धोतरात पाणी शिरल्यावर कासोटा सुटुन धोतर वाहून गेलं असत कि!''

म्हणत त्याची मस्करी करत त्याला पल्याड नेले जात असे. कधीकधी नावाडी आणि एखाद्या गावकऱ्यांचा वाद बराच विकोपाला गेला कि मग संध्याकाळी गावात कज्जा बसे. गावातील मरीआईच्या मंदिरासमोरच्या मोकळ्या जागेत सारे गावकरी भांडण सोडवण्यासाठी एकत्र जमत. नावाड्यांच्या वाढिव दराचा त्रास सगळ्यांनाच होत असला तरी त्यांच्याविरूद्ध साक्ष देण्याची हिंम्मत मात्र कोणी करत नसे. त्यांच्याविरूद्ध साक्ष दिली तर पावसाच्या या दिवसात नदी पार कोण करवून नेणार? आणि तसंही केवळ पावसाचे चार-पाच महिनेच त्यांचा जोर आहे, बाकीच्या दिवसात ते सुतासारखे सरळ असणार याची जाणीव असल्याने इतर गावकरी अशा कज्जांमध्ये गप्पच

राहणेच पसंद करीत. नदीवर पुल बांधण्यासाठी गावकऱ्यांकडून सरकारी इमारतीत आवेदनाची बरीच कागदं गेली होती. पण एकदा आत गेलेल्या कागदांचं पुढे काय होई ते कळतच नसे. नदीवर पुल होईस्तोवर तरी नदी चालत वा नावेतूनच ओलांडणे गावकऱ्यांना भाग होते. नदीवर पुल होत नाही म्हणुन सारा गाव त्रस्त असला तरी गावातील महादुसारखे नावाडी मात्र खुश होते. खरं तर सुरवातीझसुरवातीला नावाड्यांनी पुलबांधणीला बराच विरोध केला होता. नदीवर पुल झाला तर आपला धंदा बुडेल हे त्यांना पक्के ठाऊक होते. पण त्यांची संख्या कमी असल्यामुळे त्यांचा विरोध सहजच डावलला गेला. असं असलं तरी पुल होवू नये म्हणुन त्यांचे अंतर्गत बरेच प्रयत्न सुरू होते. त्यांच्या म्होरक्याच्या सरकारी इमारतीत असलेल्या ओळखींचा फायदा उचलून ते नदीवर पुल होऊ देत नाहीत अशी हलकीशी कुजबुजही गावकझ्ययांमध्ये होती. कारण काहीही असले तरी नदीवर पुल मात्र काही बांधला गेला नव्हता.

पावसाने केलेल्या चिखलात पाय माखवत महादू गावकुसाबाहेरच्या घरापाशी आला. घर म्हणजे चार बाजूंनी उभ्या असलेल्या लाल विटांच्या भिंती आणि वर उतरणीचे कौलारू छप्पर. घराभोवतालून काट्याकुट्यांनी केलेलं कुंपण. समोरच्या बाजूस असलेल्या खिडकीतून घरात जळत असलेल्या दिव्याचा थरथरणारा प्रकाश दिसत होता. त्या थरथरणाऱ्या प्रकाशातच आत असणाऱ्या माणसांची हालचाल लक्षात येत होती. सोबतीला कुणाचा तरी वेदनेने विव्हळण्याचा आवाज घरातून फुटत होता. लांबवरूनच खिडकीशी नजर खेळवत महादू घरात सुरू असलेल्या गोष्टींचा अंदाज करत पुढे सरकू लागला. घराच्या आडोशाला काळं कुत्रं गारठून बसलेलं. महादूला बघताच अंगात जोर चढून ते जोरजोराने भुंकू लागलं. महादू कुंपणापाशीच थांबला.



''काशीमाय.... ए काशीमाय.....''

महादूचा आवाज ऐकून एका सत्तरीच्या जवळपास असलेल्या म्हातारीने दार उघडलं. हातातील रॉकेलचा दिवा पुढे करत तिने समोरच्या अंधारात नजर खुपसली. महादूला कुंपणापाशी उभे पाहून म्हातारीच्या चेहऱ्यावर हायसे उमटले.

''महादू आलास? ये, ये. बबन्या आरं महादू आलाय बग.''

घरात वळून तिने काहीशा उत्साहातच आपल्या नातवाला पुकारले. लगबगीने बबन्या दारात आला. कपाळावर डरडरून भरून राहिलेला घाम आपल्या हाताने पुसत त्याने कुंपणाजवळ थांबलेल्या महादुकडे बघितले आणि तो धावतच त्याच्यापाशी गेला.

''म्हाद्या बरं झालं बिगीनं आलास. आरं तारवं लोटाया लागेल पान्यात.'' धपापलेल्या सुरात बबन्या बोलला.

''या वख्ताला?'', महादूने गोंधळून विचारले.

''आरं, रखमाचे दिस भरत आलेत. पोट धरून इवळाया लागलीय. डाकटरापाशी गेलं पाहिजे.''

''परं असं रातच्याला, त्ये बी इतक्या पावसात? पाऊस सरल्यावर सकाळच्याला जाऊ कि!''

''आरं तितका दम निगला असता, तं अस घाईत बोलावणं धाडतु व्हय? अन् पावसाचं काय घेऊन बसलायस दोन दिस झालं, असाच उलथलाय. कुटं दम घेतलाय त्यानं. ऐकतोयस न्हवं, कशी गुरासारखी वरडतेया.''

आतुन बबन्याच्या बायकोच्या जोरजोराने ओरडण्याचा आवाज पावसाच्या धबधबाटातही स्पष्ट ऐकु येत होता. उघड्या दारातुन येणाऱ्या त्या आवाजाच्या रोखाने बघत महादु काही वेळ गप्प बसला.

''बबन्या, पानी वाढलंय नदीचं. अशा पान्यात तारवं टिकनार नाय. नगं आता निघायला.''

''म्हाद्या आरे नाय मनु नकोस. हवं तर दुपटीनं भाव घे.'' विनवणी करत बबन्याने म्हटले.

आभाळात खडकन् चमकून गेलेल्या वीजेच्या झगमगाटात महादूचे दुप्पट भावाच्या लोभाने लखलखलेले डोळे सहज लपून गेले. जास्तीच्या पैशांची सुटलेली हाव महादूच्या विवेकशक्तीवर भारी पडली होती. बबन्याच्या बोलण्यास होकार देत महादूने त्याला काठावर पोचण्यास सांगितले आणि आपली छोटीशी नाव पाण्यात लोटून तयार ठेवण्यासाठी महादू माघारी निघाला.

पावसाच्या पाण्याने भरून आलेल्या काळ्याभोर मेघांनी चंद्राला झाकून ठेवल्याने आजचा अंधार काहीसा अजुनच काळोखा होता. मध्येच चमकून गेलेल्या वीजेच्या प्रकाशात चिखलाने बरबटलेली वाट दिसे. रोजची पायाखालची वाट असल्याने महादूस फारसे सायास करावे लागत नव्हते. वाटेच्या दोन्ही बाजूस उगवलेल्या गवत काड्यांच्या दाटीतून बेडकांचे डराव डराव सुरू होते आणि त्यांना टक्कर देण्याच्या ईर्षेनेच जणू कि काय रातकिडे आपल्या पुर्ण ताकदीनीशी किर्रऽऽ किर्रऽऽ करत होते. महादू पटापट चालत नदीकाठावर आला. बारोंडा नदीचे पाणी बरेच खवळलेले होते. वरच्या बाजूने रोंरावत येणारा पाण्याचा लोंढा तुफानी वेगाने खालच्या दिशेस वाहवत जात होता. पावसाच्या कोसळधारांमध्ये मिसळलेला नदीच्या पाण्याचा खळखळाट अतिशय भेसूर ऐकू येत होता. निसर्गाच्या त्या प्रपाताकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करून महादू काठावरील वाळूत उपडी करून ठेवलेल्या आपल्या नावेकडे निघाला. वाळू पाण्याने ओली होऊन तिचा गाळ झाला होता. गाळात रूतणारे पाय मोठ्या कष्टाने ओढत महादू आपल्या नावेपाशी आला. नाव सुलटी करून कसेबसे खेचतच महादू तिला काठावर घेऊन आला. काठावर बबन्या आणि बबन्याचा बाप पाठीवर इरल्या घेऊन उभे होते. दोघांच्या हातात वेदनेने विव्हळणारी बबन्याची बायको होती. त्यांच्यासोबत बबन्याने गुरांना चरायला घेऊन जाण्यासाठी ठेवलेला बारकेलासा पोरगा एका हातात मोडलेली छत्री आणि एका हातात कंदील घेऊन उभा होता.

महादू नाव खेचून काठावर घेऊन आला तसे त्या तिघांनी मिळून बबन्याच्या जडावलेल्या बायकोस नावेत बसवले. त्या पोराने आपली छत्री आता तिच्यावर धरली होती. बबन्यानेही आपल्या पाठीवरचे इरले तिच्या पाठी टाकले आणि तो तिला धीर देत तिच्या शेजारी बसला. इतक्यात लख्खकन् वीज चमकून गेली. पाठोपाठ भांड्यावर भांडे आपटून मोठ्याने आवाज व्हावा तसा ढगांच्या गडगडाटाचा आवाज आसमंतात घुमला. क्षणासाठी फाकलेल्या वीजेच्या त्या प्रकाशात नदीचे खवळलेले तांबुस मातकट पाणी महादूच्या नजरेस पडले. नदीचा प्रवाह प्रचंड वेगाने वाहत होता आणि आपल्या पाण्याच्या तडाख्यात जे सापडेल ते वाहवत घेऊन निघाला होता. महादू आता मनातून चरकला.

''बबन्या, जीवाबरंबर खेळायला नगं. लई जोर हाय पाण्याला. आपलं तारवं वाहून नेईल.''

खळाळत्या पाण्याच्या पात्राकडे बघत महादू म्हणाला.

''म्हाद्या आता नगं इचार करूस. इतका बी जोर नाय पान्याला. त्ये बग तितं समोर तर जायचं हाय.''

''माझं ऐक बबन्या, धाडस नगं करायला.''

''म्हाद्या, तु तारवं लोट तर खरं पान्यात. तु बरबरं काडशील मग पान्यातन् तारवं पुढं. हवं तर पायलीभर तांदुळ बी घे जादा.''

बबन्याच्या आग्रहापुढे महादूचा नाईलाज झाला. बबन्याचा बापाबरोबर जोर लावत त्याने नाव पाण्यात काढली मात्र आणि पाण्याच्या प्रवाहाने नावेला खालच्या बाजूस ढकलण्यास सुरूवात केली. नाव पाण्यात काढून आपण बरीच मोठी चुक केली आहे हे एव्हाना महादूच्या लक्षात आले. प्रवाहाच्या तडाख्यांनी डोलू लागलेल्या नावेला महादू जीव लावून मागे ओढू लागला. पण नाव मागे येण्याऐवजी महादू आणि बबन्याचा बापच नावेसोबत पाण्यात ओढले जाऊ लागले होते. तेव्हाच आलेल्या पाण्याच्या प्रचंड लोंढ्याने नावेसकट सारे पाण्यात ओढले गेले. नाव पाण्याच्या प्रवाहासोबत खालच्या दिशेने वाहू लागली होती. मध्येच पाण्याच्या प्रचंड प्रवाहाचा तडाखा बसून नाव एखाद्या खेळण्यासारखी हिंदकोळे खात डोलत होती.



नावेत अडकलेले सारे आता घाबरले होते. घाबरून त्यांचा आरडाओरडा सुरू झाला होता. महादू आणि बबन्याचा बाप नावेला अजूनही धरून नाव अडवण्याचा प्रयत्न करत होते. पण येणारा पाण्याचा प्रत्येक लोंढा त्यांचे प्रयत्न उडवून लावत होता. दोघांच्याही नाकातोंडात बरेच पाणी गेल्याने ते थकले होते आणि बबन्याच्या बापाने हार मानली. पाण्याच्या प्रवाहाच्या तडाख्यात नावेला धरलेले त्याचे हात सुटले आणि तो प्रवाहात पुढे वाहत निघून गेला. बापाला वाहून गेलेले बघून बबन्याने हंबरडा फोडला. पण तो काहीच करू शकत नव्हता. शोकाकुल झालेला बबन्या पाळीपाळीने एकदा आपल्या बायकोकडे आणि एकदा महादूकडे बघत होता. गुरांवर जाणारे ते लहान पोर भितीने थरथर कापू लागले होते. महादू बराच वेळपर्यंत नाव धरून तिला अडवण्याचा प्रयत्न करत होता. पण अखेर हे आपल्या कह्यातले काम नाही आणि आता जर आपण नाव सोडली नाही तर नावेसोबत आपणही वाहवत जाऊ हे त्याच्या लक्षात आले. नावेवरील तिघांच्या भेदरलेल्या चेहऱ्यांकडे त्याची नजर गेली आणि तो गलबलून गेला. त्याला नीटसा निर्णय घेता येईना. पण आपल्या जीवापुढे इतर सर्व काही शुन्य मोलाचे असते हेच खरे. वाऱ्याच्या वेगाने धावणारे ते पाणी नावेला जसे अजुनच आत खेचू लागले तसे महादूने नावेवरचा आपला हात सोडला. त्या तिघांना आपल्या नशीबावर सोडून महादू आडवेतिडवे हात मारत काठाकडे निघाला. महादूने हात सोडताच नाव वेगाने प्रवाहासोबत हिंदकोळे खात वाहवत निघाली.

महादू कसेबसे हात मारून काठावर आला. उरफाट्या श्वास घेत तो काठावर निपचित पडून राहिला. बऱ्याच वेळाने तो जेव्हा उठला तेव्हा पाण्यात नावेचा कुठलाच पत्ता नव्हता. दुसऱ्या दिवशी गावात बोभाटा झाला. सकाळपासूनच बारोंडाच्या उताराकडील भागात महादूच्या नावेवरील माणसांचा शोध सुरू झाला. सात-आठ मैलांवर खाली महादूची मोडलेली नाव सापडली. पण त्यावरील माणसांचा काही पत्ता लागेना. दोन-तीन दिवसांनंतर त्यांचे मृतदेह सापडल्याची खबर आली. नाव सापडल्या जागेपासून पुढे चार-पाच मैलांपर्यंत प्रेतं वाहून गेली होती. सडलेल्या, फुगलेल्या अवस्थेतल्या त्या चारही मृतदेहांचा भयंकर दुर्गंध आसपासच्या परिसरात पसरला होता. त्यामुळे मिळाल्या ठिकाणीच त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तेराव्या दिवशी बबन्याच्या घरी शोकसभा भरली. गावच्या प्रथेप्रमाणे सारेजण मृतात्म्यांस शांती मिळावी म्हणून

त्यांच्या तसबिरींवर चढवण्यासाठी काही-बाही भेटवस्तु घेऊन आले होते. महादूने आपल्या घरामागच्या आबोलीची फुलं आणली होती. बबन्याच्या म्हातारीचं सांत्वन करत तसबिरींवर भेटवस्तु चढवून प्रत्येकजण तिथून निघत होता. महादूनेही येऊन तसबिरींवर फुलं चढवली. म्हातारीच्या दुर्मुखलेल्या चेहऱ्याकडे बघताच त्याच्या काळजात चर्र झाले. रडून-रडून तीचे डोळे लाल झाले होते. नैराश्याने तीचा चेहरा काळवंडला होता. एखाद्या जीवंत प्रेताप्रमाणे ती तिथे बसून होती. तीला पाहताच अपराधीपणाची डागणी महादूच्या मनाला जाळू लागली. म्हातारीला काही बोलण्याची त्याची हिंमतच झाली नाही.

संध्याकाळी जो महादू तिथून परतला तो काहीसा वेडावल्यासारखाच.

''पुल बांधायचा हाय, पुल बांधायचा हाय.''

असं अस्पष्टच स्वत:शी काहीतरी बडबडू लागला होता. घरवाल्यांनी सांगुनही तो गप्प होईना. जागेपणी तेच आणि झोपेतही तेच बडबडायचा. घरवाले घाबरले. काय रायचं त्यांना कळेना. त्यांनी समजावून पाहिले. भुताची बाधा असेल असे वाटून मांत्रिकाकडेही नेण्यात आले. पण काहीच फरक पडला नाही. उलट दिवसेंदिवस महादूचे वेड वाढतच चालले होते. आता तर तो मोठमोठाले दगड घेऊन येऊन नदीपात्रामध्ये फेकत बसायचा. कधी सिमेंट वाळूचे कालवलेले मिश्रण तो त्या पात्रातील दगडांना लिंपत बसे. कोणी कारण विचारले तर एकच पालुपद रटत बसायचा.

''पुल बांधायचा हाय, पुल बांधायचा हाय. ते भेदरलेले चेहरे मला झोपून देत नाहीत. पुन्हा कोनी वाहून नाय गेलं पाहिजे. पुल बांधायाच पाहिजे.''

गावकऱ्यांनी पुष्कळ समजावलं. पण महादूचे वेड कमी होईना. कधी कधी तर वेगाने वाहत्या पात्रातही तो भलीमोठी दगडी घेऊन उतरत असे आणि एके दिवशी नदीच्या प्रवाहास अडवण्याचे साहस करणाऱ्या महादूसही नदीच्या त्या पाण्याने वाहवून नेले. आज महादुच्या जाण्याला वर्ष उलटलं. पण महादूच्या जाण्यानंतरही गावात काही विशेष बदल झालेला नाही. नदीवर अजूनही पुल बनलेला नाही. सरकारी इमारतीत कागदाची रद्दी जातच आहे. पावसात रौद्ररूप धारण करणारी बारोंडा नदी आजही तशीच खळाळून वाहते आहे. आपल्या प्रवाहात आडवे येणाऱ्या अनेकांचे बळी घेत आहे. होध् नाही म्हणायला नदीकाठी एक आबोलीचं झाड उगवलं आहे. वर्षभर झाडावर रक्तवर्णी आबोली फुललेली दिसते, फक्त आषाढातले पावसाचे दिवस सोडून आणि या दिवसात जरी फुलं लगडली तरी ती लगेच कोमेजून जातात. गाववाले म्हणतात, त्या झाडात महादूचा आत्मा आहेआणि आषाढच्या त्या पावसाळी दिवसात त्याचा आत्मा बबन्या अन् त्याच्या कुटुंबाच्या आठवणीने कोमेजुन जातो.

वसई, जि. पालघर
मो. ८४५९०२२०११

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

दीपोत्सवाच्या प्रकाशाने जीवनात
सुख, समृद्धी आणि आरोग्य नांदो;
प्रत्येक स्वप्नाला नवी दिशा आणि
प्रत्येक घरात आनंदाचा उजेड लाभो.





मोहन गोपाळराव मते

आमदार : दक्षिण नागपूर

अध्यक्ष : माध्यम लोकसेवा प्रतिष्ठान

mohanmatebjp
mohanmateofficial
mohanmatebjp

लेख

महाभारतातील सूड आणि क्षमा शास्त्र

मित्र हो....महाभारत या आपल्या राष्ट्रीय ग्रंथाबाबत असं म्हटलं जातं की, जे इथे आहे, ते आपल्याला जगात कुठेही सापडेल, जे येथे नाही, ते आपल्याला जगात कुठेही सापडणार नाही. म्हणजेच महाभारतातील प्रत्येक व्यक्तीरेखा मानवी जीवनाशी किती एकरूप झाली आहे हे कळते. भीष्म, द्रोणाचार्य, धर्म, द्रोपदी, कृष्ण, अर्जुन, कर्ण, दुर्योधन यासारख्या महाभारतातील अनेक व्यक्तिरेखांनी सर्व भारतीय जीवनाला हजारो वर्षांपासून भारून टाकले आहे. महाभारत हे एक व्यापक समाजशास्त्र आहे. महाभारत आपल्याला या जगात परमेश्वरा शिवाय कोणीही निर्दोष नाही हे सांगताना याच जगात संपूर्ण दोषपूर्ण असे काहीही नाही हेही सांगते. त्याचप्रमाणे मानवी जीवन हे केवळ काव्या-पांढऱ्या तंतूचा पट नाही तर विविध स्वभाव रंगांनी रंगलेले विलक्षण वस्त्र आहे.

- प्रा. प्रशांत पुंडलिक शिरुडे



महर्षी वेद व्यासांनी जगातील विराट संसाराचे चित्र अत्यंत अलिप्त होऊन आपल्या समोर मांडले. या त्यांच्या अलिप्त व उदात्त ग्रंथन कौशल्यामुळे महाभारत ग्रंथ म्हणजे एक सोन्याची प्रचंड खाण बनला आहे. संशोधन करून आपण त्यातील भरपूर सोने लुटून घ्यावे.

मित्र हो, महाभारताचा अभ्यास करताना माझ्या या अल्पमतीला महाभारत हा 'एक सुडाचा प्रवास आहे,' उमगलं ..... असं उमगलेलं अन् उमजलेलं तुमच्या समवेत संवाद रूपात मांडावे असे वाटले म्हणून हा प्रयत्न. या माझ्या चर्चेचा उद्देश महाभारताची कथा सांगणे हा नाही, त्या कथेचा एखादा अंश सांगणे नाही, ग्रंथातील पात्र परिचय देणे नाही, एखादी घटना किंवा एखाद्या घटनेची कथा विशेष सांगणे हा ही नाही. एखाद्या व्यक्तीने आपल्याबद्दल चूक केली व त्या चुकीची शिक्षा जर आपल्याला आयुष्यभर यातनायुक्त भोगावी लागणार असेल तर त्या व्यक्तीला आपण कधीच माफ करू शकत नाही. मग ती व्यक्ती कोणीही असो, कितीही सामर्थ्यवान असो, आपण मनातून त्याला कधीच माफ करू शकत नाही. हया एकाच प्रकारच्या गोष्टी भोवती महाभारतची कथा फिरतांना आपल्याला दिसते. असे वाटते. त्यालाच आपण सुड घेणे असे म्हणतो.

महर्षी वेद व्यास रचित महाभारत ग्रंथात आपल्याला हा अनुभव पुन्हा पुन्हा येतो. जनसामान्यांना माहित असलेल्या महाभारतातील सर्वात पहिला सुड घेण्यासाठी प्रतिज्ञा करणारी



व्यक्ती म्हणजे अंबा..... जेव्हा भीष्म शंतनू पुत्र व हस्तीनापुर नरेश विचित्रविर्च्यासाठी काशी राजाच्या तिन्ही मुलींना आंबा, अंबिका,अंबालिका यांना स्वयंवरातून घेऊन जातो. तेव्हा भीष्माच्या भीतीपोटी न बोललेली आंबा आधीपासून शाल्व राजाच्या प्रेमात असते. जेव्हा आंबा राजमाता सत्यवतीला आपल्या प्रेमाबद्दल सांगते. तेव्हा तिला शाल्व राजा कडे पाठविण्याची व्यवस्था केली जाते. पण भीष्म तिला स्वयंवरातून घेऊन गेला म्हणून शाल्व राजा तिचा स्वीकार करीत नाही. तेव्हा ती पुन्हा हस्तीनापुरच्या दरबारात येते. भीष्माला तिचा पत्नी म्हणून स्वीकार करण्यास सांगते. पण भीष्म आजन्म अविवाहित राहण्यास प्रतिज्ञाबद्ध असल्याचे सांगत तिचा स्वीकार करत नाही. तेव्हा ती भयंकर संतापते व भर दरबारात "भीष्म वधाला मीच कारण बनेल त्यासाठी मला कितीही जन्म घ्यावे लागले तरी चालेल." अशी प्रतिज्ञा करते पुढे ती होत्रवान यांच्याशी जे तिचे नाना असतात. त्यांच्या सल्ल्यानुसार ती परशुरामापर्यंत पोहोचते. पण काहीच उपयोग न झाल्याने घोर तपश्चर्या करते. त्यातून तिचा पुढचा जन्म अर्धे शरीर नारी व अर्धे शरीर मत्स्य देशाच्या कन्येच्या रूपात होतो. पण हे साध्य नसल्याने पुन्हा घोर तपश्चर्येला सुरुवात करते. तेव्हा महादेव प्रसन्न होतात व भीष्म वधाला कारणीभूत होण्याचा वर देतात. यातून तिचा जन्म द्रुपद राजाचा मुलगा म्हणून तिच्याच राखेतून शिखंडीच्या रूपात नवा जन्म घेतो. त्याचाच आधार घेत श्रीकृष्णाच्या सल्ल्यानुसार अर्जुन महाभारत युद्धात शिखंडीला पुढे करून पितामह भीष्मांवर बाणांचा वर्षाव करतो. कारण युद्धात कोणत्याही नारीवर शस्त्र न चालवण्याची प्रतिज्ञा पितामह भीष्मांनी केलेली असते. हे भगवान श्रीकृष्णांना माहीत असते.

महाभारतातील दुसरी सूड कथा शकुनीच्या रूपात सापडते. समाजात आपल्याला शकुनीसारखी अनेक माणसे दिसतात. आयुष्यात झालेल्या एखाद्या घटनेमुळे त्यांच्या आयुष्याला असे काही वळण लागते की ते सतत त्याचाच पिच्छा पुरवतात. त्यासाठी सतत संधीची वाट पाहतात व संधी मिळताच तुटून पडतात. त्यांच संपूर्ण आयुष्य त्या घटनेचा, अपमानाचा पाठपुरावा करण्यात जाते. बऱ्याच वेळी ही माणसे अतिशय हुशार असूनही काहीही करू शकत नाही. कारण आयुष्यभर सूड-सूड एवढेच राहते. महाभारताचे युद्ध ज्या व्यक्तीमुळे घडले त्यातील एक व्यक्ती शकुनी.

गांधारीच्या लग्नाच्या आधीचा शकुनी फार वेगळा, पण भीष्माचार्यांच्या सामथ्यार्मुळे तो आपल्या बहिणीचा विवाह अंध धृतराष्ट्राशी करून द्यायला तयार होतो. पण मनातली अढी तशीच राहते. आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत ती तशीच राहते. महाभारतातील भीमाला लहानपणी विष देण्याचा प्रयोग असो, वारणावतातील लाक्षागृह प्रकरण, द्युत प्रकरण, इत्यादीं सारखे कुटील डाव सतत दुर्योधन व धृतराष्ट्राला त्यांच्या ओल्या जखमेवर मीठ चोळत राहिल्याने शेवटी त्याचे पर्यावसान वंशाच्या नाशात होते. कुठेतरी शकुनिने मनातून ही गांधारीच्या लग्नावेळी प्रतिज्ञा केली व त्या प्रतिज्ञेला त्याच्या राज परिवारातूनही समर्थन होते. त्यातूनच संपूर्ण कौरव कुळाचा नाश होतो.

असेच एक महाभारतातील पात्र धृतराष्ट्र. जन्मापासून आपण अंध असल्याचे वैशम्य त्यामुळेच वयाने मोठा असूनही विदुराच्या राजधर्मा विषयीच्या तत्त्वज्ञानामुळे राजा म्हणून मिळणारा अधिकार गमावतो. तेव्हा त्याच्या मनात स्वत:विषयी व इतर सर्वांविषयी एक प्रकारची घृणा व तिरस्कार उत्पन्न होतो. प्रत्यक्षात तो कोणाला दाखवत नाही पण नंतर गांधारी व शकुनी यांच्या बरोबरच्या अनेक संवादात याचा आपल्याला प्रत्यय येतो. आपल्यानंतर आपल्याच ज्येष्ठ मुलाला ही सत्ता मिळावी ही मनोमन इच्छा स्वत: तो बाळगून असतो. आपल्यातील अंधत्वाचा दोष आपल्या मुलांमध्ये दुर्योधनापेक्षा युधिष्ठिर हा वयाने व गुणवत्तेने उजवा असल्याचे त्याच्या लक्षात आल्यावर त्याने सातत्याने युधिष्ठिर व इतर पांडवांना वेगळी वागणूक देण्याचा प्रयत्न केला. पण पितामह भीष्म व विदूर यांच्यापुढे तो काहीही करू शकत नाही. ही मुले मोठी झाल्यावर युवराज बनविण्यावरून झालेल्या राजकारणात लाक्षागृह प्रकरण, पांडवांना बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवासात पाठविण्याच्या कामात त्याची मूकसंमतीच असते. झालेल्या सर्व चुका, गोष्टी तो पूर्ववत करू शकत होता. पण पुत्र प्रेमाने तो ख०या अर्थाने अंध झाला होता. युद्ध थांबविण्याच्या अनेक संधी त्याला होत्या पण स्वत:च्या मनातील संपूर्ण राज्याची इच्छा त्याने व्यवस्थितपणे दुर्योधनाच्या मनात उतरवली. त्याची पत्नी गांधारी त्याला अनेक वेळा समजवण्याचा प्रयत्न करते पण तो मनातून ऐकत नाही. विदुराबद्दल तर त्याच्या मनात प्रचंड राग असतो पण तो विदुराच्या तत्वज्ञानामुळे फिका पडतो. एक राजा म्हणून तो लाक्षागृह प्रकरण, द्युत किडा व द्रौपदी वस्त्रहरण थांबवू शकला असता, पण तसे तो करत नाही. युद्ध चालू असताना सुद्धा अनेक वेळा संधी असते पण काहीतरी चमत्कार होईल व शेवटपर्यंत आपल्याला विजय मिळेल. या एका आशेवर तो राहतो व संपूर्ण स्वत:च्या कुटुंबाचा विनाश ओढवून घेतो.

भीम प्रतिज्ञा- इंद्रप्रस्थमध्ये द्रौपदीकडून झालेल्या "अंधे का पुत्र अंधा" या अपमानजनक वक्तव्याने सूडाणे पेटलेला दुर्योधन, द्युत क्रीडेमध्ये युधिष्ठिराकडून द्रौपदी जिंकतो. तेव्हा तो दुश:सनाला तिला दरबारात फरफटत आणल्याचा आदेश देतो. तेथे आणल्यानंतर तिचे वस्त्रहरण करण्याचा आदेश देतो. तिला आपल्या मांडीवर बसवण्यास सांगतो. त्याप्रसंगी रागाने लाल झालेला भीम दुश:सनाचा हात तोडण्याची व त्याच्या छातीचे रक्त पिण्याची प्रतिज्ञा करतो. तर दुर्योधनाची मांडी फोडण्याची प्रतिज्ञा करतो. त्या प्रतिज्ञेनुसार महाभारत युद्धात तो दुश:सनाचा हात तोडतो व त्याची छाती फोडून त्याचे रक्त पितो. त्या रक्ताने द्रोपदीचे केस धुतो. तर शेवटी युद्धात दुर्योधनाची मांडी फोडतो, आपली प्रतिज्ञा पूर्ण करतो. व द्रौपदीच्या अपमानाचा सूड घेतो.

पुढची अर्जुन प्रतिज्ञा-महाभारत युद्धात द्रोणाचार्यांच्या चक्रव्यूहामध्ये अभिमन्यू अडकतो व त्याला त्यातून बाहेर कसे यावे ते माहीत नसल्याने अनेक प्रमुख कौरव महारथी एकत्र येऊन त्याची हत्या करतात. त्या युद्धात अर्जुन दुसरीकडे सुशर्माशी युद्धात गुंतलेला असतो. तर इतर पांडव महारथींना जयद्रथ अडवून ठेवतो. त्यामुळे अभिमन्यूला कोणाचीही मदत मिळत नाही. त्याची हत्या होते. त्याप्रसंगी क्रोधाने लाल होत अर्जुन दुसऱ्या दिवशी सूर्यास्तापूर्वी जयद्रथाचा वध करण्याची व तसे न झाल्यास स्वत: अग्नि समाधी घेण्याची प्रतिज्ञा करतो. दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत जयद्रथ

दृष्टीस पडत नाही म्हणून निराश होतो. तेव्हा श्रीकृष्ण काही काळ सूर्याला जायला सांगतो. सूर्यास्त झाला असे समजून जेव्हा जयद्रथ आनंदात सर्वांच्या पुढे येतो. तेव्हा श्रीकृष्ण पुन्हा सूर्याला प्रकट होण्यास सांगतो. तिथे सूर्यही असतो व समोरच जयद्रथ असतो. हे श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतो. अर्जुनाच्या एकाच बाणाने जयद्रथाचे शीर साधना करत असलेल्या त्याच्या वडिलांच्या हुतशेत्राच्या मांडीवर पडते. त्यांच्या मांडीवरून ते खाली पडल्याने हुतशेत्राच्या ही शिराचे त्यांनीच जयद्रथला दिलेल्या वरदानयुक्त शापानुसार तुकडे तुकडे होतात.

द्रोपदी प्रतिज्ञा - महाभारत ग्रंथात द्रोपदी वस्त्रहरण प्रकरणानंतर द्रौपदी स्वत:चे केस मोकळे सोडते व ते दुश:सनाच्या छातीच्या रक्ताने केस धुण्याची व दुर्योधनाच्या वधानंतरच केस बांधण्याची प्रतिज्ञा करते. महाभारताच्या युद्धात भीम तिच्या या दोन्ही प्रतिज्ञा पूर्ण करतो. अजून एक प्रतिज्ञा ती अज्ञात वासात असताना विराट नगरात राज दरबारातून किचका कडून तिचा अपमान होतो तेव्हा किचकाच्या बहिणीसमोर म्हणजे विराट राजाच्या पत्नीसमोर उद्याचा सूर्य किचक बघू शकणार नाही, अशी प्रतिज्ञा करते. त्यानुसार रंगमहालात त्याच रात्री भीम किचकाचा वध करतो.

द्रोण व द्रुपद यांच्याही सुड कथा. महाभारताच्या या सुडकथेत गुरु द्रोणाचार्य व राजा द्रुपद यांचे ही सुड लक्षात राहतात. द्रोणाचार्य हा भारद्वाज पुत्र म्हणजे ब्राह्मण असतो. द्रुपद हा राजपुत्र असतो. दोघीही एकाच गुरुकडे शिकलेले असतात. अध्ययनाचे कार्य सुरू असताना, दोघे चांगले मित्र असतात. द्रुपदाने द्रोणाचार्यांना आपले अर्धे राज्य देण्याचे वचन दिलेले असते. पुढे शिक्षण पूर्ण झाल्यावर जेव्हा दोघे आपापल्या घरी पोहोचतात. त्यानंतर दृपद राजा होतो पण द्रोण आर्थिकदृष्ट्या गरीब असतो. पुढे द्रोणाचार्य यांची आर्थिक स्थिती खूपच बिघडते इतकी की त्याचं लहान बाळ (अश्वस्थामा) याला पिण्यासाठी ते दूधही देऊ शकत नसतात. त्यांची पत्नी कृपी त्याला पाण्यात पीठ मिसळून दूध म्हणून देत असते. तेव्हा त्यांना आपला मित्र द्रुपदाने दिलेला शब्द आठवतो व त्यानुसार ते द्रुपद राजाकडे जातात. तेव्हा राजा त्यांना मित्र म्हणून दिलेला शब्द पाळण्यास नकार देतो. अपमानित करतो. पण ब्राह्मण म्हणून म्हणजे एक याचक म्हणून मागितले तर नक्कीच हवे ते देईल असे सांगतो. त्याचा द्रोणाचार्यांना राग येतो. तेव्हा द्रुपद राजाने केलेल्या अपमानाचा बदला घेण्यासाठी कौरव-पांडवांचे शिक्षण संपल्यानंतर द्रुपदाकडे आधी कौरवांना पाठवतो. ते पराभूत होतात व नंतर पांडवांना पाठवतो. पांडव द्रुपदाला पकडून द्रोणाचार्यांसमोर आणतात. तेव्हा द्रोणाचार्य द्रुपदाला त्याने केलेल्या अपमानाची जाणीव व आठवण करून देतात. मित्रत्वाला जागत पराभूत झालेल्या द्रुपदाला जिवंत सोडून देतात. त्याच्या जिंकलेल्या राज्यांपैकी अर्धे राज्य त्याला परत करतात. कारण द्रुपदाचा पराभव झाल्याने सर्व राज्य द्रोणाचार्यांचे झालेले असते. पण द्रुपदालाही आता हा अपमान वाटू लागतो. तो द्रोणांचा बदला घेण्यासाठी एक यज्ञ करतो. त्या यज्ञातून दृष्टधुम्न व द्रौपदी हे बाहेर येतात. यातील दृष्टधुम्न हा महाभारताच्या युद्धात पांडवांचा सेनापती असतो व तो युद्धात द्रोणाचार्यांनी शस्त्र खाली ठेवल्यावर त्यांचा वध करतो. कुठेतरी या ठिकाणी असेही वाटून जाते की द्रोणांचा वध करण्यासाठी द्रौपदीने महायुद्धाची पार्श्वभूमी तयार केली व त्यात दृष्टधुम्न ने द्रोणाचार्यांचा वध केला. तर शिखंडी ने भीष्माचार्यांचा वध करण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली. हे तिघेही द्रुपदाची आपत्ये असतात. भगवान परशुरामांनी भीष्माचार्य, द्रोणाचार्य, कर्ण यांना विद्या दिली. योगायोग असा आहे, हे तिघेही महाभारत युद्धात धारातीर्थी पडतात. यातून महाभारत युद्धाचा खरा खलनायक कोण? हा एक प्रश्न मनात आल्याशिवाय राहत नाही.

जन हो, या माझ्या चर्चेचा उद्देश महाभारत ग्रंथातील सुडकथा सांगणे हा नाही. महाभारत आपली धरोहर आहे. महाभारताच्या या कथेने भारतीयच नव्हे तर जागतिक जनमानसावर एक प्रभाव सोडला आहे. जीवनाच्या सर्वच अंगांना या कथेने नुसताच स्पर्श केला नाही तर, त्या संदर्भात ज्ञानाचे अमृत पाजले आहे. सुड एक अशी मानवी भावना आहे की ती स्वत: सहीत संपूर्ण कुळाचा व मानवी धर्माचा प्रचंड मोठा नाश करते. जनहो चुका प्रत्येकाकडूनच होतात. काही स्वत:कडून तर काही दुसऱ्यांकडून, पण म्हणून सूड हा त्यावर उपाय नसतो. आपण स्वत: केलेली चूक जशी त्यावर पांघरून घालून विसरण्याचा प्रयत्न करतो. तसेच दुसऱ्याच्या चुकीबद्दल आपली भूमिका नसते. जन हो, या महाभारत ग्रंथात अनेक ठिकाणी स्वत: धर्मराज युधिष्टिर क्षमेचे महत्त्व सांगतो. तर याच ग्रंथात ज्या श्रीकृष्णाला भारतीय जनमानसांनी ईश्वरत्व बहाल केले, ते श्रीकृष्ण सुद्धा मानवी जीवनात क्षमा करणे ही फार महत्वाची गोष्ट असल्याचे नमूद करतात. तरीही हा ग्रंथ सुडकथा ठरण्यास ज्या अनेक गोष्टी कारणीभूत ठरतात त्याची चर्चा आज आपण या लेखात केली. दया, क्षमा, शांती आणि प्रेम या मानवाच्या मूलभूत भावना असून त्याशिवाय कोणताही मनुष्य आपले जीवन जगूच शकत नाही. महाभारताच्या युद्धानंतर





स्वत: युधिष्ठिराला जिंकलेले राज्य नकोसे वाटते. आपण केलेल्या या चुकीचे प्रायश्चित्त घेण्यासाठी तो तपश्चर्येसाठी वनात जाण्याचा विचार करतो. शेवटी श्रीकृष्णाच्या शिष्टाईने शांततेसाठी राजसूय यज्ञ करण्याचा निर्धार करून सर्व भारतीय राज्यांमध्ये शांतता, एकता, मैत्री व प्रेमाचा संदेश देण्याचा निर्णय घेतला जातो व सर्वांना सन्मानाने एकत्र आणण्यासाठी भीम व अर्जुन हस्तीनापुरातून बाहेर पडतात.

हाच काहीसा अनुभव भारताच्या इतिहासातील कलिंगाच्या युद्धाने दिसतो. त्यात सम्राट अशोक कलिंगचे युद्ध तर जिंकतो पण युद्धात झालेल्या विनाशाने त्याचे हृदय परिवर्तन होते व शांतीची शिकवण देणाऱ्या बौद्ध धर्माचा स्वीकार करत तो जगभर शांततेसाठी बौद्ध धर्माचा प्रचार व प्रसार करण्याचा निर्धार करतो.आज भारतीय जनमानस सम्राट अशोकाकडे क्रूरकर्मा म्हणून न पाहता शांतीचे प्रतीक म्हणून पाहताना दिसते. अगदी आधुनिक कालखंडात आपले राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या जीवनावर दया,क्षमा, शांती, प्रेम या तत्त्वज्ञानाचा फार मोठा प्रभाव दिसून येतो. तर भारताचे परराष्ट्र धोरण हे याच विचारांचा संदेश जगाला देत असताना आपल्याला दिसते. जन हो क्षमा सर्वात मोठा धर्म आहे, क्षमा हेच सर्वात मोठे सत्य आहे, क्षमा हीच दया आहे, क्षमा हीच तपश्चर्या आहे, क्षमेतच सर्व तीर्थक्षेत्रांचे निवास आहे, क्षमा सर्वात मोठा यज्ञ आहे, क्षमा हेच सर्व समस्यांचे समाधान आहे. कारण सूड, बदला, संताप यामुळे कधीही कोणतीही समस्या कधीच सूटत नाही. सर्व समस्यांचे समाधान क्षमा हेच आहे. महाभारतानंतर ही गेली ९०० वर्षाची संत परंपरा आपल्याला हेच सांगते. संत तुकाराम म्हणतात...

क्षमाशस्त्र जया नराचिया हाती,
दुष्ट तया प्रति काय करी,
तृण नाही तेथे पडिला दवाग्नि,
जाय तो विझोनि आपसया,
तुका म्हणे क्षमा सर्वांचे स्वहित,
धरा अखंडीत सुखरूप

क्षमाशील माणसांच्या शांत वृत्तीमुळे दृष्ट लोकांच्या मनातील क्रोध किंवा वैर भावना सुद्धा निवळून जाईल. म्हणून मित्रहो अंतकरण सदैव क्षमाशील असू द्या. आजच्या उगवत्या पिढीमधील सुडाचे थैमान पाहता, मानवी जमातीच्या मनातील विषवल्ली फोफावत आहे. हे जाणवल्याने माझ्यातील शिक्षक अंतर्मुख होतो. म्हणूनच राष्ट्रनिर्मितीचा एक शिलेदार म्हणून विचार मंथनातून क्षमाशीलता हे चिरंतन मूल्य रूजविण्यासाठी हा अल्प प्रयास. माझ्या शोधक नजरेतून मांडलेला महाभारता बद्दलचा हा विचार आपण योग्य अयोग्यतेच्या निकषावर तोलून घ्यावा हेच मागणे. यात जे तुम्हाला योग्य वाटेल ते स्वीकारावे जर काही अयोग्य किंवा चुकीचे वाटेल ते सोडून द्यावे. अंतिमत: हे प्रशांत शिरूडे उवाच आहे. संपूर्ण मानव जातीचे नाही.

डोंबिवली, जि. ठाणे
मो. ९९६७८१७८७६

कथा

एका अबोल्याचे महाभारत...

पाकिटाने माझ्या त्या खिश्याला नि मला कधिच सोडून जाणे पसंत केले होते. डेबिट क्रेडिट कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसंन,आणि हजार बारशे रुपये या सर्वांची झणझणीत फोडणी मला बसली होती. मी त्या बसमधून उतरुन जवळच असलेल्या पोलिस स्टेशनाकडे त्या मुसळधार पावसातही धाव घेतली. पोलिस स्टेशन या पावसाने जरा जास्तच सुस्तावलेले वाटले. गुन्हेगारी जगतावर या पावसाने सावट्च आल्यासारखे वाटले,फक्त माझा ज्याने खिसा कापला तो सोडून. एका अडलिच्या खर्जातल्या आवाजानेच माझी तंद्री भंग पावली...

- नंदकुमार इंदिरा पंडित वडेर



बऱ्याच महिन्याने अबोला पाहुणा आमच्याकडे आला होता. यापूर्वी दोन दिवसाच्यावर कधीही त्याने मुक्काम केलेला मला आठवत नव्हता. पण या वेळेला ती मुदत संपून गेली तरी पाहुणा काही जायाचं नावं घेत नव्हता. बायकोच्या माहेरच्या जवळच्याच नात्यातले लग्नाचे निमित्त होते. नुकत्याच शाळा सुरु झाल्या होत्या. पाउस कधी नव्हे तो मुसळ्धार लागला होता. सुट्ट्या मिळणे नेहमी प्रमाणे अवघडच होते.अनेक कारणांची मालिका होती.त्यामुळे नेहमीप्रमाणे मी पहिल्यांदा नकार घंटा वाजविली.बायकोने तिच्या पध्द्तीने एक दोन दिवसात नकाराचा होकारात परिवर्तन करण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरल्यावर तिने तो अबोला पाहुण्यास पाचारण केले. मला या दिवसात खुपच बरे वाटते. कारण माझ्या सर्व गोष्टी मला न बोलता अगदी वेळेवरच मिळत असतात. ती जरी शब्दाने बोलत नसली तरी इतर माध्यमातून मिळेल तसा आपला रुसवा फुगवा आरोह अवरोह आवर्तनातून व्यक्त करुन कोंडीव्दारे आपली मागणी पुर्ण करण्याचा एनकेन प्रकारे प्रयत्न करुन पाहात होती.पण प्रश्न काही मार्गी लागला नव्हता.

ऑफिसला जाण्यासाठी मी स्कुटर काढली. पण तिने सुध्दा आज बायकोलाच जाहिर पाठिंबा देण्याचे ठरवले होते. उशिर होऊ लागला. पाऊस देखिल मी सुध्दा मागे राहणार नाही या पवित्र्यातच उभा राहिला. सगळेच अबोलपणे तीव्र निषेधाचे अनुयायी बनले. रिक्षाशिवाय पर्याय दिसत नव्हता. शे-दिडशेची चांगली फोडणी बसणार होती. मी दिलेल्या नकाराची किंमत मोजणे सुरु झाले होते. कसेबसे ऑफिस गाठले.दुपारच्या लंच टाईमला. आधीच तो अबोला नि त्यात आजच्या या गोष्टींची भर याने जेवणाची इच्छाच गेली. घास घश्याखालून उतरायला तयार नव्हताच.बळे बळे दोन घास ढकलले. संध्याकाळी समेटाचे बोलणे करावे आणी अबोला पाहुण्याला निरोप द्यावा असे मनी ठरवले.

ऑफिस सुटले. पाऊस मी म्हणत होता. आता रिक्षासुध्दा वाकुल्या दाखवू लागल्या. बसने घर गाठण्यासाठी बस स्टॉपवर आलो. एखाद्या जत्रेचे स्वरुप होते त्या स्टॉपला. येणारी बस मला पकडून दाखव म्हणतच झर्रर्रकन निघून जात होती. काही आशावादी पळा पळा कोण पुढे पळे तो करुन पळतीच्या मागे धावत होते. नंतर एक रिकामी बस आली. माणसांच्या गराड्यातच ती हरवून गेली. त्या धुमश्चक्रीत मी त्या बसमध्ये कसा चढलो हे माझ मलाच कळलं नाही. बसायलाही जागा मिळाली. तिकिट काढण्यासाठी पॅण्ट्च्या खिशात हात घातला अन् पाकिटाने माझ्या त्या खिश्याला नि मला कधिच सोडून जाणे पसंत केले होते. डेबिट क्रेडिट कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसंन्स, आणि हजार बारशे रुपये या सर्वांची झणझणीत फोडणी मला बसली होती. मी त्या बसमधून उतरुन जवळच असलेल्या पोलिस स्टेशनाकडे त्या मुसळधार पावसातही धाव घेतली. पोलिस स्टेशन या पावसाने जरा जास्तच सुस्तावलेले वाटले. गुन्हेगारी जगतावर या पावसाने सावट्च आल्यासारखे वाटले, फक्त माझा ज्याने खिसा कापला तो सोडून. एका अडलिच्या खर्जातल्या आवाजानेच माझी तंद्री भंग पावली...

''काय पाहिजे व्हूतं?''

'पाकिट मारल्याची तक्रार द्यायची होती.'

'ड्युप्लिकेट अर्ज लिव्हुन हाणला काय?'

'नाही....'

'काय, नाही! अहो जंटलमन दिसताय तुम्ही! साधा तक्रारीचा अर्ज द्येवा लागतो हे बी कळंना का काय? पहिल्यांदाच येताय वाटंत फोलिस स्तेशनात! त्यो समोरच्या टेबलावरचा पांढरा पेपार घ्या आणि तक्रारीची समधी हिस्टरी लिवुन्शान द्या...'

समोरच्या बाकड्यावर बसुन मी अर्ज लिहु लागलो.तिथेच शेजारी कुणी बाई बसल्या होत्या. अर्ज लिहिता लिहिता आमच्या दोघांची नजरा नजर झाली. खुपच रडवेलेला चेहरा तिचा दिसत होता. माझा अर्ज लिहुन झाला आणि तो त्या अडलिच्या टेबलावर दिला. अड्लिने तो अर्ज एकदा उभा आडवा करुन वाचला. मग त्याच्या रजिस्टरात तो नोंदवत असताना त्याने मान वर करुन त्या समोरच्या बाईला विचारु लागला

'मॅडम! तुमी लेखी अर्ज देताय नव्ह? म्हणजे लगोलग बुकात रजिस्ट्री करुन मोठ्या सायबाकडे ठेवतो. मग सायेब तुम्हाला बोलवित्यात. आनि मगच पकड वारंट निघंल. तवा येळ जास्त न खाता अर्ज द्याचा बघा. माझी ड्युटी संपत आलिया म्हणुनशान सांगतो.नाहि तर लैई योळ लागल बघा..'

माझ्या अर्जाची नोंद करुन मला नोंदणी नंबर दिला. घरी परतेपर्यंत खुप उशिर होऊन गेला होता. पावसात भिजून गेल्यामुळे दुपारचा तो समेटाचा विचार आता थिजून गेला होता. घरातला अबोला अजुनही चिकटून होता. आमची रात्रीची जेवणं आट्पली.सारेच लवकर झोपी गेलो.

मध्यरात्रीच्या एक दिडच्या सुमारास दारावर थापा पडल्याचा, बेल कर्कश वाजल्याचा ''नि मि. कर्णिक. मि. कर्णिक दार उघडा'' असा वॉचमनचा आवाज आणी एक दोघांचे अनोळखी आवाज ऐकु आले. एव्हढ्या रात्री माझ्या नावानं कोण आणि कशाकरिता बोलावताय हे कळेनास होतं.

जरा भित भितच दार उघडलं.पाहतो तो वॉचमन सहित एक पोलिस इंस्पेक्टर दोन हवालदार, एक लेडी हवालदार एव्हढा ताफा उभा होता.

''मि. कर्णिक आपणच का? आपल्या नावानं अरेस्ट वॉरंट घेउन आम्ही आलो आहोत. आताच तुम्हाला आमच्या बरोबर चौकीत याव लागेल....''

'अरेस्ट वॉरंट निघण्या एव्हढा मी कोणता भयंकर गुन्हा केलेला आहे ते मला कळेल काय?'

'तुमच्या बायकोनेच येउन तक्रार दिली आहे कि तिचा मानसिक आणि शारिरीक छळ केल्याबद्द्ल हे अरेस्ट वॉरंट आहे...'

मी चक्रावुनच गेलो. बायको या थरापर्यंत जाईल अशी अपेक्षा नव्हतीच. मी तिच्याकडे पाहिले नि म्हटले,

'तू तक्रार केलीस? कमाल आहे तुझी.अग थोडा तरी आपल्या घराचा विचार करायचा होतास!'

'अहो! मी तक्रार पोलिसात दिली नाही.आज दिवभर घरातच आहे. हवं तर शपथ घेते कि मी असलं काही एक केललं नाही.चला मी पण तुमच्या बरोबर पोलिस स्टेशनमधे येते. पाहुया काय प्रकार आहे तो?'

'या कोण?' फौजदाराने विचारले.

'अहो मी यांची बायको आहे.आणि मी तर असलं काही केललंच नाही. तुमचा नावात काही तरी घोळ झालेला दिसतोय.आम्ही साधं सुध्दा भांडत बसत नाही.आणि इथं तर...'

'मग पोलिस स्टेशन ध्ये बसून आहेत त्या कोण? काय कर्णिक खरा प्रकार काय आहे? तुम्हाला काय सांगायचं ते मोठ्या सायेबा समोरच सांगा. म्हणजे खऱ्या खोट्याची शहानिशा करता येईल.' फौजदाराने माझी उलट तपासणी घेताना म्हटले.

आता बायकोने माझ्याकडे संशयित नजरेने पाहिले.

'म्हणजे मला सोडून अजुन बाहेर कायतरी भानगड आहे म्हणायची यांची. मला मेली खुळीला कधिच असं ते कळंल नाही.आमचं हे ध्यान त्यातलं नाही हे समजुन चालेले होते ते खोटं ठरलं म्हणायंच.'

इतके तिच्या मनातले भाव मला तिच्या त्या चेह०यावर दिसले...

मी लगेच,

'चल फारच शहाणी आली आहेस! नको त्या शंका आता काढत बसू नकोस.आधी तू काय गोंधळ घालुन ठेवला आहेस तो निस्तारयाला हवा.मग माझा संशय घे!...'

आम्ही दोघं पोलिसस्टेशनमध्ये आल्यावर एका बाकड्यावर बसायला सांगितल. त्यावेळी तिथे तक्रार करण्याऱ्या बाई वगैरे कुणीच दिसत नव्हतं. रात्रीचे अडीच वाजुन गेले होते. अलीकडे चौकशीत कळले की, मोठे साहेब बाहेर कुठे राउंडवर गेले आहेत. त्यांच्याशिवाय तुमच्या केसला कोणीही हात लावणार नाही. मी मनात म्हटले आजची रात्र बहुतेक इथेच काढावी

लागणार. जीव अगदी मेटाकुटीला आला होता त्या तसल्या वातावरणात. मधुन मधुन मी दिसेल त्या साहेबाला आणि त्या अडलिला सारख सांगायचा प्रयत्न करुन पाहत होतो,

'अहो साहेब! तुमचा काहितरी घोटाळा झालेला दिसतोय. माझ्या बायकोने तसली काही तक्रार नोंदवलेली नाही.आम्ही घरंदाज आहोत हो!आणि तुम्हाला सांगतो या लग्नाच्या बायको खेरिज माझी दुसरी कोणी बायको वगैरे पण नाही हो!एक वेळ आमच्या बोलण्यावर विश्वास ठेवा आणि कृपाकरुन आमची सुटका करा....'

अशी बरीच मनधरणी मी नि बायकोने करुन पाहिली. पण त्या पोलिसी डोक्याने काहीच ऐकलेच नाही. उलट आम्हालाच चांगले डाफरले,

'ओ जटंलमन! कायएक बोलायच काम नाही इथं. इथं येणारा प्रत्येक जन असाच सुर लावत असतो. आम्हाला ते सर्व ठावं असतंय. गपगुमान बाकड्यावर बसा म्हटलं नव्हं तवा बसायचं. जवा मोठं सायेब बोलिवित्याल तवाच इतंन उठायचं बरंका? एक घरची असताना दुसरीची उठाठेव करायची काय गरज व्हती? आता लपुन छपुन केल्यालं असं बाहेर पडल्याबिगर राहत नस्तयं.तवा ग्वाड वाटलंय नव्हं मगं निस्तारा कि आता! पोलिसी इंगा बघितलासा कि समंध कसं पोपटावानी बोलाल तवा? एकच हाय का आणी तीन चार जणी हायती सांगशिला की!...'

सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. बरं एखाद्या मित्राला मदतीला ये म्हणावं तर या अपरात्री त्रास देउन प्रश्न सुटेल असा भरवंसा वाटंत नव्हता.आता मोठा साहेब केव्हा उगवेल याची वाट बघण्याशिवाय पर्यायच नव्हता.

चारच्या सुमारास त्या तिथे एक जीप आली. त्यातून दोनतीन साहेब,चार हवालदार कुणाएका इसमाची गचांडी धरुनच पोलिसस्टेशनात आले. ते येताच क्षणी सर्व पोलिसवर्ग सॅल्युट ठोकुन खडा उभा राहुन गेला. यावरून तेच मोठे साहेब असावेत याचा मी अंदाज बांधला. म्हणजे आपली लवकर सुटका होईल अशी आशा वाटून गेली. तशी मी मनातल्या मनात देवाची प्रार्थनाही केली.

बायकोने तोवर बसल्या बसल्या असंख्य देवदेवतांना नवस साकड घालणे सुरू ठेवलेच होते मोठ्या साहेबानी तो पकडून आणलेल्या इसमाला आपल्या केबिनमध्येच घेउन गेले. सोबत ते चौघेही हवालदार होते. कुठल्यातरी बारमध्ये जोरदार राडा झाला होता आणि त्यात हा इसम हाती सापडला होता. त्याची झडती घेण्याचं काम सायेबाने सुरु केलं होतं. तो ईसम सांगत होता.

'साहेब! मी खरच सांगतो, त्या बार मधल्या राड्याशी माझा काही एक संबंध नाही. खरं तर हा इलाका माझा नाही. पण गेले चार दिवस माझे फारच बेकार गेले. हाथ कि सफाईत काहीच मिळालं नाही. उपाशी राहिल्याने आज घरी बायकोने भांडून भुस्कट पाडले. मीही चिडलेलो होतो मग हातघाईवर येत तिच्या पाठीवर गुद्दे घालुन चांगलेच बुकलुन काढले. आनि तसेच तिला ''तू चालती हो'' म्हनून घराबाहेर काढले.सकाळ पासून पाउस पडत होता. मी पण रागा रागाने घर सोडून वाट फुटेल तिकडे चालत राहिलो. पाउस थांबायला तयार नव्हता. माझा इलाका सोडून दुसऱ्याच्या इलाक्यात शिरलो होतो. एका बस स्टॉपवर खुपच गर्दी दिसली. मला संधी चालून आली होती. आणि सायेब मी दोन खिसे साफ केले. एकात मला चारशे मिळाले आणि दुसऱ्यात तर घबाडच मिळाले. मी तसाच शेजारच्या बारमध्ये शिरलो मनमुराद ढोसणे हा एकच प्रोग्रॅम ठेवला आणि मला कळलेच नाही तो कशाबद्दल राडा चालला आहे जाम चढली होती म्हणून मी तसाच पडून राहिलो आणि तुम्ही मला पकडले....'

साहेबाने त्याचे बोलणे ऐकल्यावर त्याचे ते दुसरे पाकिट टेबलावर ठेउन घेतले. उघडून पाहिले तर त्यात डेबिट क्रेडिट कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसंन आणि हजार बारशे रुपये. ते तसेच ठेवुन त्या साहेबाने आम्हा दोघाना आत बोलावले आणि विचारले,

'बोला मि.कर्णिक तुमच्या बायकोनेच येउन तक्रार दिली आहे कि, तिचा मानसिक आणि शारिरीक छळ करता आहात ते खर आहे का? '

मी साहेबाला गयावया करत म्हटलं कि,

''अहो साहेब! तुमचा काहितरी घोटाळा झालेला दिसतोय. माझ्या बायकोने तसली काहीच तक्रार नोंदवलेली नाही.आम्ही घरंदाज आहोत हो!आणि तुम्हाला सांगतो या लग्नाच्या बायको खेरिज माझी दुसरी कोणी बायको वगैरे पण नाही हो! एक वेळ आमच्या बोलण्यावर विश्वास ठेवा आणि कृपाकरुन आमची सुटका करा....''

माझ्या बायकोने सुध्दा तिच्या पध्दतीने तशीच री ओढत म्हटले,

'अहो मी यांची बायको आहे! मी तक्रार पोलिसात दिली नाही.आज दिवभर मी घरातच आहे. तुमचा नावात काही तरी घोळ झालेला दिसतोय. आम्ही साधं सुध्दा भांडत नाही.आणि इथ तर...'

आता मोठा साहेब थोडासा चक्रावला. त्याने ते तक्रार बुक मागवले नि स्व;ताच मोठ्याने वाचण्यास सुरुवात केली.;

'डेबिट क्रेडिट कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसंन, आणि हजार बारशे रुपये असलेले पाकिट... तक्रार श्री कर्णिक, तर संध्याकाळी पाचला घरात असताना मारले. तक्रार सौ. कर्णिक... अशीच तक्रार केलीत ना तुम्ही सौ.कर्णिक आता बोला?...'

हे सारं बघुन नेमका काय घोटाळा झालेला आहे, तो माझ्या पुर्णपणे लक्षात आला. मला ते सगळ्च्या सगळं आठवंल. आणि हेच मी त्या साहेबाला सांगत असताना माझं लक्ष त्यांच्या टेबलवर पसरुन ठेवलेल्या त्या....डेबिट क्रेडिट कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसंन्स आणि हजार बारशे रुपये असलेले पाकिटातील माझ्या वस्तू मला दिसल्या. मी साहेबाना सांगितल कि या सगळ्या वस्तु माझ्याच दिसतायेत. साहेबाने वस्तूची नोंदणी खातरजमा करुन मला देता येतील असे सांगितले. पण मुळातच दिलेली ती मानसिक आणि शारिरीक छळ करत असल्याची तक्रारीची तड कशी लावणार? या विचारात असताना शेजारच्या लेडिज वेटिंग रुममध्ये असलेल्या त्या बाईना बोलविण्यात आले आणि त्याना विचारले कि,

'बाई तुमची तक्रार तुमच्या या नव०या बद्दलच होती ना?'

'हा माझा नवरा नाही. माझा नवरा तो तिकडे तुम्ही पकडून आणलेला पाकिट्मार आहे ना तो आहे...'

त्या साध्वीने खुलासा केला.आता तर साहेब जास्तच चक्रावला. केसचा नेमका गुंता का आणि कुठे झाला हे अजुनही त्याला कळेना..

मग मीच त्याना सांगितले,'तुमच्या त्या अड्लिच्या शॉर्ट्कट लिहिण्याच्या पध्दतीने दोन तक्रारींचा घोटाळा झाला आहे. माझी एकट्याचीच लेखी तक्रार होती. आणि त्याचे त्याने दोन वेगळे भाग केले.डेबिट क्रेडिट कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसंन आणि हजार बारशे रुपये असलेले पाकिट.आणि संध्याकाळी पाचला मारले. तक्रार कर्णिक. त्या बाईनी सांगून देखील लेखी तक्रारच दिली नाही. कारण तिला लिहिता येत नव्हते. तिची लेखी तक्रार मिळेल या आशेवर त्या अडलिने तशी नोंद केलेली दिसते..'

साहेब जाम खुश झाला. त्याने आम्हाला झालेल्या नाहक मनस्तापाबद्दल दिलगीरी व्यक्त केली. चहा बिस्किटे देउन स्व:ता गाडी घेउन घरी पोहचवायला आला आणि जाता जाता पुन्हा तुम्हाला कधी गरज पडलीच तर मला सांगा मी सदैव असेन तुमच्या मदतीला. सांगुन निघून गेला.

सकाळचे सहा वाजुन गेले होते. घरात येउन बघतो तर त्या अबोला पाहुण्याने आपले चंबुगबाळे आवरुन बाहेर पडताना दिसला. आम्हा दोघांचे डोळे खुपच पेंगुळले होते. दोघांनी अंथरुणावर पाठ टेकली नि निद्रादेवीने आम्हा दोघांना कुशीत घेतले!

सांगली
मो. ९९२०९७८४७०


सर्वांना
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा
विशाल कोरके
विधानसभा अध्यक्ष (संघटक)
शिवसेना दक्षिण नागपूर
धम्मा (तेजराज) सोनटक्के
शहर उपप्रमुख
शिवसेना


दिवाळीच्या
सर्वांना
हार्दिक शुभेच्छा.
शुभेच्छुक -
धनराज विठ्ठलराव हरडे,
संस्थापक - मानव चेतना जनविकास सेवा संस्था, नागपूर.
संचालक - हरडे असोसिएट, म्हाळगी नगर, नागपूर


VED SURAKSHA
Security System
सर्वांना
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा!
VIGIL ELECTROMECH DEVICES
76, Income Tax Colony, Pratap Nagar
Nagpur - 440022
Manufacturers & Dealers
Electronic Security Systems
Fire Systems
Access Control & Time Attendance
Metal Detector
Token Indicators
CCTV Surveillance Systems
आपल्या सुरक्षित उद्याच्या साठी... आमची तंत्रज्ञानाची बांधिलकी...!
Residential Security
Commercial Security
Industrial Security
Institutional Security
Sales & Service
Tushar Ghormade
B.E. D.B.M. M.B.A
Mob : 9881240803
9881245496, 9529168255
Email.ID :
vedsurakshangp@gmail.com


आपल्या प्रवासाला आरामदायी मुकामाची साथ...
HOTEL MAI VILLA
सर्वांना
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा..!
AC / Non AC Room Available
स्वच्छ व सुरक्षित निवास व्यवस्था
सुविधाजनक पार्किंग
प्रवासी व कुटुंबियांसाठी उत्तम मुकामाची सोय
Hotel Mai ViLLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

लेख

मराठी संतकवयित्रींच्या अभंगांतील माणूस, विवेक आणि समतेचा शोध

जात्यावरून विश्वाकडे

संतपरंपरेच्या सावलीत उभ्या असलेल्या मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई यांच्याकडे आपण अनेकदा 'महिला संत' या एका चौकटीतून पाहतो. त्यांची स्वतंत्र साहित्यिक ओळख, त्यांचे सामाजिक भान, त्यांच्या अनुभवातून आलेली प्रश्नवृत्ती आणि स्त्री म्हणून त्यांनी अनुभवलेले जगणे यांचा पुरेसा विचार होत नाही.? या संतकवयित्रींच्या अभंगांकडे बारकाईने पाहिले तर लक्षात येते की त्यांची भक्ती ही केवळ देवापर्यंत पोहोचण्याची वाट नाही. ती स्वत:चा आवाज शोधण्याची वाट आहे.

- रविराज सोनार



'स्त्री म्हणून जन्मले म्हणून कमी नाही, जात म्हणून जन्मलो म्हणून हीन नाही आणि देह नैसर्गिक आहे म्हणून अपवित्र नाही' मध्ययुगीन महाराष्ट्रातील संतकवयित्रींच्या अभंगांमधून उमटणारा हा मूलस्वर आजच्या मानवतावादी, विवेकनिष्ठ आणि समताधिष्ठित समाजालाही अस्वस्थ करणारे प्रश्न विचारतो. मराठी संतपरंपरेचा विचार केला की आपल्या डोळ्यांसमोर ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, चोखामेळा अशी पुरुष संतांची प्रदीर्घ रांग उभी राहते. पण या संतपरंपरेच्या सावलीत उभ्या असलेल्या मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई यांच्याकडे आपण अनेकदा 'महिला संत' या एका चौकटीतून पाहतो. त्यांची स्वतंत्र साहित्यिक ओळख, त्यांचे सामाजिक भान, त्यांच्या अनुभवातून आलेली प्रश्नवृत्ती आणि स्त्री म्हणून त्यांनी अनुभवलेले जगणे यांचा पुरेसा विचार होत नाही.? या संतकवयित्रींच्या अभंगांकडे बारकाईने पाहिले तर लक्षात येते की त्यांची भक्ती ही केवळ देवापर्यंत पोहोचण्याची वाट नाही. ती स्वत:चा आवाज शोधण्याची वाट आहे.

जात्याच्या घरघराटातून जनाबाई बोलतात.

देहाच्या तथाकथित विटाळाला सोयराबाई प्रश्न विचारतात.? जातं आणि लौकिकाच्या बेड्या घेऊन कान्होपात्रा विठ्ठलाच्या दारात उभी राहते आणि मुक्ताबाई आध्यात्मिक अधिकाराच्या पुरुषी मक्तेदारीलाच आव्हान देतात. म्हणूनच या संतकवयित्रींच्या अभंगांचे वाचन म्हणजे केवळ भक्तिसाहित्याचे वाचन नाही; ते स्त्री-अनुभव, जातिव्यवस्था, श्रम, देह, आत्मसन्मान, समता आणि माणूसपणाच्या शोधाचे वाचन आहे.

1. मुक्ताई : ज्ञानाला लिंग नसते

मुक्ताबाईंचे व्यक्तिमत्त्व संतपरंपरेतील विलक्षण घटना आहे. वयाने लहान असलेल्या या स्त्रीकडे ज्ञानाचा अधिकार आहे, आध्यात्मिक चिंतनाचा अधिकार आहे आणि पुरुष साधकाला प्रश्न विचारण्याचे धैर्य आहे. चांगदेवाशी झालेल्या संवादात मुक्ताईंचे व्यक्तिमत्त्व विशेष ठळक होते. त्यांच्या ताटीच्या अभंगांमध्ये अंतर्मुखता, वैराग्य, जीवनविषयक चिंतन आणि भावनिक तीव्रता दिसते. मराठी अभ्याससाहित्यात मुक्ताबाईंच्या चांगदेवाशी संवादाचे आणि त्यांच्या तात्त्विक अधिकाराचे स्वतंत्र महत्त्व नोंदवले आहे.

मुक्ताबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांत महत्त्वाचा पैलू म्हणजे- ज्ञान कोणाच्या बापाची मक्तेदारी नाही. मध्ययुगीन समाजात स्त्रीचे ज्ञान प्रामुख्याने घर, संसार आणि रूढ कर्तव्यांच्या चौकटीत मोजले जात असताना मुक्ताई आध्यात्मिक आणि तात्त्विक चर्चेच्या केंद्रस्थानी येतात. आज आपण याला 'जेंडर इक्वॅलिटी' म्हणतो. मुक्ताईंच्या काळात ही भाषा नव्हती; पण ज्ञानाच्या अधिकाराला लिंग नसते, ही कृती त्यांच्या जीवनातून प्रत्यक्ष दिसते. हीच गोष्ट आधुनिक विवेकाची पहिली पायरी आहे, 'हे मला का मानावे?' असा प्रश्न विचारण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे.

2. जनाबाई : जात्यातून स्त्रीचा आवाज

जनाबाई म्हणजे मराठी संतसाहित्यातील सर्वांत जिवंत स्त्रीस्वरांपैकी एक. त्या दासी होत्या. औपचारिक शिक्षण नव्हते. पण त्यांच्याकडे अनुभव होता. आणि त्या अनुभवाला शब्द देण्याचे विलक्षण सामर्थ्य होते. जनाबाईंच्या अभंगांमध्ये दळण, कांडण, झाडलोट, सडा-सारवण, घरकाम अशी रोजच्या श्रमांची असंख्य रूपे येतात. त्यांच्या अभंगवाणीचे अनुभवविश्व, भाषा आणि प्रतिमा जनजीवनाशी घट्ट जोडलेली असल्याचे मराठी साहित्यविषयक अभ्यासात नमूद केले आहे. जनाबाईंच्या कवितेचे वैशिष्ट्य म्हणजे त्या घरकामाला काव्याचा विषय बनवतात. ज्या कामाला समाजाने 'बाईचे काम' म्हणून गृहीत धरले, त्याला जनाई शब्द देते. आणखी पुढे त्या स्त्रीच्या अस्तित्वाकडेही नव्या नजरेने पाहतात,

'स्त्री जन्म म्हणवू न व्हावे उदास ।
साधुसंतां ऐसे केले मज॥'

या ओळींचा आशय केवळ भक्तीचा आनंद नाही. त्यात स्त्रीजन्माबद्दलचा आत्मविश्वास आहे. स्त्री म्हणून जन्माला आले म्हणजे जीवन कमी झाले, ही मानसिकता जनाबाई स्वीकारत नाहीत. त्यांच्या अभंगांत स्त्री-पुरुष विषमतेला नकार देणारी मानवी समतेची आकांक्षा दिसते, अशी नोंद संशोधनपर लेखनातही आढळते. म्हणून जनाबाईंची कविता आजच्या भाषेत वाचताना एक मोठा प्रश्न समोर येतो; घरकाम कोणाचे? स्त्रीचे? की घरात राहणाऱ्या प्रत्येकाचे? जनाबाईंच्या जात्याची घरघर आजच्या घरातील मिक्सरच्या आवाजात बदलली आहे; पण प्रश्न अजूनही तिथेच आहे. श्रमाला लिंग असते का? जनाबाईंच्या कवितेचा आधुनिक अर्थ इथेच सुरू होतो.

3. सोयराबाई : 'विटाळ' या शब्दाचीच चिकित्सा

महिला संतांच्या संदर्भात स्त्रीचा विटाळ हा मुद्दा नसेल तर लेख अपुरा राहतो. कारण सोयराबाईंचा प्रसिद्ध अभंग केवळ भक्ती-अभंग नाही. तो देह, जन्म, स्त्रीत्व, जात आणि शुद्ध-अशुद्धतेच्या सामाजिक कल्पनांची चिकित्सा करणारा अत्यंत धाडसी प्रश्न आहे. सोयराबाई म्हणतात,

'देहासी विटाळ म्हणती सकळ । आत्मा तो निर्मळ शुद्धबुद्ध॥'
आणि पुढे प्रश्न विचारतात- देहींचा विटाळ देहींच जन्मला।
सोवळा तो झाला कवण धर्म॥'



हा प्रश्न आजही अंगावर येतो. स्त्रीच्या मासिक पाळीला 'विटाळ' म्हणायचे; पण त्याच स्त्रीच्या गर्भातून जन्मलेल्या प्रत्येक माणसाला मात्र पवित्र मानायचे, या विसंगतीवर सोयराबाई बोट ठेवतात. त्यांचा पुढचा प्रश्न तर आणखी मूलभूत आहे 'विटाळावांचोनी उत्पत्तीचे स्थाने कोण देह निर्माण नाही जगीं॥' इथे सोयराबाई केवळ धार्मिक समजुतीला विरोध करत नाहीत; त्या जैविक वास्तवाकडे बोट दाखवतात. मानवी जन्म हा देहातूनच होतो. स्त्रीच्या शरीरातील नैसर्गिक प्रक्रियांना अपवित्र म्हणायचे आणि त्याच प्रक्रियेतून जन्मलेल्या देहाला पवित्र म्हणायचे या विरोधाभासाची चिकित्सा त्या करतात. या अभंगात स्त्रीच्या प्रजननाशी संबंधित जैविकतेला समाजाने दिलेल्या 'विटाळ' या सांस्कृतिक अर्थाचे भेदक विश्लेषण असल्याचे अभ्यासकांनीही अधोरेखित केले आहे. इथेच आधुनिक विज्ञाननिष्ठतेशी संवाद सुरू होतो.? सोयराबाई आधुनिक अर्थाने विज्ञानवादी नव्हत्या, असा दावा करणे इतिहासाशी अन्याय होईल. पण त्या नैसर्गिक देहप्रक्रियेला अंधश्रद्धेने

दिलेला अर्थ प्रश्नांकित करतात. हा विवेकाचा अंकुर आहे. आज विज्ञान सांगते की मासिक पाळी ही स्त्रीच्या शरीरातील नैसर्गिक जैविक प्रक्रिया आहे. सातशे वर्षांपूर्वी सोयराबाई विचारतात, 'विटाळावाचून उत्पत्तीचे स्थान कोणते?' इतिहास वेगळा आहे. भाषा वेगळी आहे. संदर्भ वेगळा आहे. पण प्रश्नाच्या मुळाशी असलेली चिकित्सक वृत्ती विलक्षण ठळक आहे.

4. सोयराबाईंचा 'विटाळ' फक्त स्त्रीचा नाही

सोयराबाईंच्या या अभंगाचे आणखी एक मोठे वैशिष्ट्य आहे. त्या स्वत: अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या समाजातून येतात. म्हणून 'विटाळ' हा शब्द त्यांच्या जीवनात दोन पातळ्यांवर येतो. स्त्रीच्या देहाचा विटाळ आणि जातीनुसार माणसाचा विटाळ. एका बाजूला स्त्रीच्या शरीराला अपवित्र म्हणणारी व्यवस्था आणि दुसऱ्या बाजूला महार म्हणून स्वत:च्या सावलीलाही अपवित्र मानणारी व्यवस्था. म्हणून त्यांचा प्रश्न अधिक व्यापक होतो. अपवित्र कोण? देह की समाजाची दृष्टी? सोयराबाईंच्या अभंगांत देहाच्या विटाळावरील कर्मठ कल्पनांवर कठोर टीका असल्याचे मराठी विश्वकोशही नमूद करतो आणि त्यांच्या दुसºया अभंगातील ओळी-

'अवघा रंग एक झाला।
रंगी रंगला श्रीरंग॥'

या ओळींमध्ये 'मी-तू' भेद विरघळण्याची कल्पना येते. ही केवळ आध्यात्मिक अद्वैताची गोष्ट म्हणून वाचण्यापेक्षा. माणसामाणसांतील भेदांच्या पलीकडे जाण्याची आकांक्षा म्हणूनही वाचता येते.

5. कान्होपात्रा : देह, जात आणि आत्मसन्मान

कान्होपात्रेला विसरून महिला संतांचा अभ्यास पूर्ण होऊच शकत नाही. मंगळवेढ्यातील सामाजिक-सांस्कृतिक वातावरणातून आलेली कान्होपात्रा गणिकेच्या घरात जन्मली. तिच्या जीवनावर लौकिक, जात आणि व्यवसायाच्या चौकटी होत्या. पण तिच्या अभंगांतून त्या चौकटींशी झगडणारा एक स्त्रीस्वर ऐकू येतो. त्या म्हणतात,

'पतित तूं पावना।
म्हणविसी नारायणा॥



आणि लगेच देवाच्या स्वत:च्या दाव्यालाच प्रश्न विचारतात,

'तरी सांभाळी वचन। ब्रीद वागविसी जाण॥
पुढे- याती शुद्ध नाही भाव।
दुष्ट आचरण स्वभाव ॥'

ही आत्मनिंदा म्हणून वाचायची का? नाही, कान्होपात्रेचा आवाज तिच्या काळातील सामाजिक भाषेतून बोलतो. समाजाने तिला पतित, अशुद्ध, यातीहीन ठरवले आहे. ती त्या शब्दांना स्वत:च्या अस्तित्वाची अंतिम व्याख्या होऊ देत नाही. उलट देवाच्या 'पतितपावन' या बिरुदालाच ती जबाबदार धरते. आणखी एका अभंगात ती थेट विचारते,

'पतित पावन म्हणविसी आधी।
तरी का उपाधि भक्तांमागे॥'

हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. जर देव सर्वांचा असेल, तर काही लोकांना त्याच्या दारात जाण्यासाठी अधिक अडथळे का? कान्होपात्रेच्या अभंगांत जात आणि सामाजिक उपेक्षेचे दु:ख व्यक्त होते, असे शिवाजी विद्यापीठाच्या अभ्याससाहित्यातही नमूद आहे. पण तिच्या कवितेचा प्रश्न केवळ जातीपुरता मर्यादित नाही. तो स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्वाचा प्रश्न आहे. ज्या समाजाला स्त्रीच्या देहावर, व्यवसायावर आणि जीवनावर अधिकार गाजवायचा आहे, त्या समाजासमोर कान्होपात्रा स्वत:च्या अस्तित्वासाठी उभी राहते. म्हणून कान्होपात्रा ही केवळ भक्त स्त्री नाही. ती स्वत:च्या आयुष्याची मालकी मागणारी स्त्री आहे.

6. 'देह' : सोयराबाई-कान्होपात्रा संवाद

सोयराबाईंच्या कवितेत देहाला समाज 'विटाळ' म्हणतो. कान्होपात्रेच्या जीवनात समाज तिच्या देहावर आणि लौकिकावर अधिकार सांगतो. दोघींच्या अनुभवांमध्ये अंतर आहे; पण प्रश्न समान आहे तो स्त्रीच्या देहाचा अर्थ स्त्री स्वत: ठरवणार की समाज? सोयराबाई म्हणतात,

'देहाचा विटाळ देहींच निर्धारी।'

कान्होपात्रा आपल्या देहाचे समर्पण करताना प्रत्यक्षात एका वेगळ्या संकटातून जात आहे. तिच्या अभंगातील 'देह समर्पण' ही भाषा तिच्या काळाच्या भक्तिपरंपरेतून आलेली आहे; तिचे सरळ आधुनिक 'बॉडी ऑटोनोमी'मध्ये रूपांतर करणे योग्य नाही. पण तिच्या जीवनकथेत स्वत:ला समाजाच्या वस्तूप्रमाणे न मानण्याचा संघर्ष नक्कीच दिसतो. यामुळे या दोन संतकवयित्री एकत्र वाचल्या तर स्त्रीच्या देहाभोवती उभ्या केलेल्या सामाजिक नियंत्रणाची अनेक रूपे दिसतात.

7. स्त्री-पुरुष समानता : घोषणा नव्हे, अनुभव

आज आपण 'स्त्री-पुरुष समानता' हा शब्द सहज वापरतो. पण मध्ययुगीन स्त्रीच्या जगण्याची कल्पना केली तर हा शब्द किती मोठा होता हे लक्षात येते. जनाबाई श्रमाच्या क्षेत्रात पुरुषसत्तेला प्रश्न विचारतात. मुक्ताबाई ज्ञानाच्या क्षेत्रात स्त्रीला अधिकार देतात. सोयराबाई स्त्रीच्या देहावर लादलेल्या शुद्ध-अशुद्धतेच्या संकल्पनांना प्रश्न विचारतात. कान्होपात्रा सामाजिक प्रतिष्ठेच्या आणि देहाच्या प्रश्नावर उभी राहते. बहिणाबाई स्वत:च्या अंतर्मनाला शब्द देतात. या सगळ्या आवाजांतून एक गोष्ट स्पष्ट होते, ते म्हणजे स्त्री ही केवळ कोणाची मुलगी, पत्नी, दासी किंवा भक्त नाही; ती स्वत:च्या अनुभवाची साक्षीदार आणि अर्थनिर्माती आहे. हीच स्त्री-पुरुष समानतेची मूलभूत जाणीव आहे.

8. पुरुष आणि महिला संत : संघर्ष नव्हे, संवाद

महिला संतांचा गौरव करण्यासाठी पुरुष संतांना कमी लेखण्याची गरज नाही. उलट मराठी संतपरंपरेचे मोठेपणच असे आहे की तिच्यात वेगवेगळे सामाजिक अनुभव एकमेकांना भिडतात. चोखामेळा जातिव्यवस्थेच्या वेदनेला शब्द देतात. सोयराबाई त्याच अनुभवाला स्त्रीच्या देहाच्या प्रश्नाशी जोडतात. नामदेवांच्या घरातील जनाबाई दासी असूनही स्वतंत्र संतस्वर निर्माण करतात. ज्ञानेश्वरांच्या भावविश्वाच्या जवळ मुक्ताबाई स्वत:चा तात्त्विक अधिकार सिद्ध करतात. म्हणजे संतपरंपरेतील स्त्रीस्वर हा पुरुष

संतांचा विरोधक म्हणूनच पाहायचा नाही. तो परंपरेच्या आतून परंपरेला प्रश्न विचारणारा आवाज आहे. आणि यामुळेच तो अधिक महत्त्वाचा ठरतो.

9. विज्ञाननिष्ठतेकडे जाणारा पूल

इथे पुन्हा एक महत्त्वाची स्पष्टता आवश्यक आहे. मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई किंवा कान्होपात्रा यांना आजच्या अर्थाने विज्ञानवादी म्हणणे अयोग्य ठरेल. त्या धार्मिक-सांस्कृतिक विश्वात जगल्या. पण विज्ञाननिष्ठ समाजाला केवळ विज्ञानाची माहिती पुरत नाही; त्याला प्रश्न विचारणारी वृत्तीही लागते. सोयराबाई विचारतात- 'विटाळावाचून उत्पत्तीचे स्थान कोणते?' जनाबाई अनुभवाला आणि श्रमाला शब्द देतात. कान्होपात्रा सामाजिक लेबलाच्या सत्यतेलाच प्रश्न विचारतात. मुक्ताबाई ज्ञानाच्या अधिकाराला लिंगाची अट मानत नाहीत. या सर्वांतून एक विवेकशील पद्धत दिसते- परंपरेने सांगितले म्हणून स्वीकारू नका; अनुभव, माणूस आणि सत्य यांच्या कसोटीवर त्याकडे पाहा. हीच आधुनिक विज्ञाननिष्ठ वृत्तीची सामाजिक बाजू आहे.

10. आजच्या काळात या अभंगांचे महत्त्व

आज मुलीच्या मासिक पाळीला अजूनही लाजेचा विषय बनवले जाते. आजही घरकामाचे असमान ओझे स्त्रीच्या खांद्यावर आहे. आजही जात माणसाच्या सामाजिक प्रतिष्ठेवर परिणाम करते. आजही स्त्रीच्या कपड्यांवर, शरीरावर, प्रेमावर आणि निर्णयांवर समाज निर्णय देतो. आजही 'ही बाई अशी आहे' या एका वाक्यात तिचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व बंदिस्त करण्याचा प्रयत्न होतो. मग सातशे वर्षांपूर्वीचे हे अभंग आज का वाचायचे? कारण प्रश्न जुने असले तरी अन्यायाची काही रूपे अजूनही नवी झालेली नाहीत. सोयराबाईंचा 'विटाळ' आज मासिक पाळीच्या वैज्ञानिक समजुतीसमोर उभा करता येतो. जनाबाईंचे श्रम आज घरकामाच्या समान वाटणीशी जोडता येतात. कान्होपात्रेचा आत्मसंघर्ष आज स्त्रीच्या स्वायत्ततेशी संवाद साधतो. मुक्ताबाईंचा ज्ञानाधिकार आज मुलीच्या शिक्षणाच्या हक्काशी जोडता येतो.

11. संतवाङ्मयाचे अंधश्रद्धामुक्त वाचन

संतांच्या साहित्याचा आधुनिक उपयोग करायचा असेल तर त्यांच्या चमत्कारांच्या कथा सांगण्यातच समाधान मानून चालणार नाही. त्यांच्या शब्दांतील माणूस शोधावा लागेल. चमत्कारांवर विश्वास ठेवणे हा वैयक्तिक श्रद्धेचा विषय असू शकतो; पण सामाजिक जीवनात माणसाच्या प्रतिष्ठेला, वैज्ञानिक दृष्टिकोनाला आणि विवेकाला महत्त्व देणे आवश्यक आहे. संतवाङ्मयाला संग्रहालयात ठेवण्यापेक्षा ते चिकित्सकपणे वाचणे गरजेचे आहे. सोयराबाईंच्या अभंगातील प्रश्न आपण विज्ञानाच्या भाषेत पुढे नेऊ शकतो. जनाबाईंच्या श्रमाला आपण समतेच्या भाषेत पुढे नेऊ शकतो. कान्होपात्रेच्या वेदनेला आपण स्त्रीच्या स्वायत्ततेच्या भाषेत समजून घेऊ शकतो. मुक्ताबाईंच्या ज्ञानाला आपण शिक्षणाच्या सार्वत्रिक अधिकाराशी जोडू शकतो. हा संतांचा अपमान नाही. उलट त्यांच्या शब्दांना आजच्या जीवनात पुन्हा जिवंत करण्याचा मार्ग आहे.

12. शेवटचा प्रश्न : आपण संतांना वाचतो की त्यांच्याकडून शिकतो?

संतकवयित्रींच्या अभंगांमध्ये देव आहे; पण देवापेक्षा मोठा अनुभव आहे. त्यात भक्ती आहे; पण भक्तीपेक्षा मोठा माणूस आहे. त्यात अध्यात्म आहे; पण अध्यात्माच्या पलीकडे जाणारा आत्मसन्मान आहे. त्यात परंपरा आहे; पण परंपरेला प्रश्न विचारणारा विवेक आहे. आणि म्हणूनच जनाबाईच्या जात्यावरून निघणारा आवाज आज घरकामाच्या समान वाटणीपर्यंत यायला हवा. सोयराबाईंच्या 'विटाळा'च्या प्रश्नातून आज मासिक पाळीविषयी वैज्ञानिक आणि सन्मानजनक दृष्टिकोन निर्माण व्हायला हवा. कान्होपात्रेच्या वेदनेतून स्त्रीच्या देहावर आणि जीवनावर तिचाच अधिकार ही जाणीव दृढ व्हायला हवी.

मुक्ताबाईंच्या ज्ञानातून प्रत्येक मुलीला विचारण्याचा, शिकण्याचा आणि नेतृत्व करण्याचा अधिकार मिळायला हवा आणि या सगळ्यांच्या अभंगांतून एक साधा पण अत्यंत मोठा धडा घ्यायला हवा. माणसाला माणूस म्हणून स्वीकारणे हीच खरी समता. प्रश्न विचारण्याचे धैर्य हीच खरी विवेकशीलता. आणि ज्ञानाचा उपयोग माणसाच्या मुक्तीसाठी करणे हीच खरी मानवता. म्हणून मराठी संतकवयित्रींचा वारसा केवळ वारकरी दिंडीत चालत राहणारा नाही. तो शाळेच्या वर्गात हवा. तो विज्ञानाच्या प्रयोगशाळेत हवा. तो घराच्या स्वयंपाकघरात हवा. तो स्त्रीच्या स्वातंत्र्यात हवा. तो जातिभेदाच्या भिंतीवर प्रश्न बनून हवा. आणि सर्वांत महत्त्वाचे- तो आपल्या मनातल्या 'विटाळा'ला धुऊन काढण्यासाठी हवा. कारण शेवटी सोयराबाईंचा प्रश्न केवळ देहाचा नाही, 'सोवळा तो झाला कवण धर्म?' हा प्रश्न आजही आपल्याला विचारायचा आहे आणि त्याचे उत्तर कोणत्याही पोथीत नाही. ते आपल्या वर्तनात, विवेकात आणि माणुसकीत दिसले पाहिजे.

पुणे, मालेगाव
मो. ९३७२७२०१००



कथा

आत्ममुग्धता

- अनुराधा दिनेश वाडेकर



आज मी तुम्हाला एक सुंदर, पण तितकीच वेदनादायी प्रेमकथा सांगणार आहे. ही कथा ग्रीक-रोमन पौराणिक परंपरेतील आहे. रोमन कवी ओव्हिड यांनी त्यांच्या 'मेटॅमॉफोर्सेस' या ग्रंथात ती प्रभावीपणे मांडली आहे. ही कथा आहे, इको आणि नार्सिसस यांची. आपण अनेकदा 'नार्सिसिझम' हा शब्द ऐकतो. हा शब्द नार्सिससच्या नावावरून आणि त्याच्या स्वभावावरून तयार झाला आहे. नार्सिसिझम म्हणजे आत्ममुग्धता, स्वत:च्या रूपावर, गुणांवर किंवा प्रतिमेवर अतिरेकी मोहित होणं. फार वर्षांपूर्वी एका जंगलात एक निसर्गअप्सरा राहत होती. तिचं नाव होतं इको. ती खूप सुंदर आणि गोड बोलणारी होती. ती इतकी बोलकी होती की समोरच्याला सहज गप्पांत गुंतवून ठेवायची. एकदा देवांची राणी हेरा आपल्या पतीचा, म्हणजे देवांचा राजा ज्यूसचा शोध घेत जंगलात आली. तेव्हा इकोने हेराला मुद्दाम गप्पांत गुंतवून ठेवलं, जेणेकरून ज्यूसला इतर अप्सरांशी बोलण्यासाठी वेळ मिळावा. नंतर हेराच्या ही गोष्ट लक्षात आली. ती खूप रागावली आणि तिने इकोला शाप दिला,

'तू आता स्वत:हून काही बोलू शकणार नाहीस. दुसऱ्यांनी उच्चारलेले काही शब्दच तू परत म्हणू शकशील.'

दुसरीकडे आपल्या कथेचा नायक नार्सिसस. तो नदीदेव सेफिसस आणि अप्सरा लिरिओपी यांचा मुलगा होता. तो इतका देखणा होता की त्याला पाहणारा प्रत्येकजण त्याच्या प्रेमात पडायचा मग ती स्त्री असो वा पुरुष. नार्सिससच्या जन्मानंतर त्याच्या आईने भविष्यवेत्ता टायरेसिअस यांच्याकडून त्याचं भविष्य जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांनी सांगितलं,

'हा मुलगा दीर्घायुषी असेल; पण एक अट आहे जर त्याने स्वत:ला ओळखलं नाही तर.'

म्हणजेच, जर तो स्वत:च्या सौंदर्यावर मोहित झाला नाही तर. नार्सिसस खूप गर्विष्ठ आणि उर्मट होता. कोणी त्याच्यावर प्रेम व्यक्त केलं की तो त्यांचा अपमान करायचा. एके दिवशी तो जंगलात फिरत असताना इकोने त्याला पाहिलं आणि ती त्याच्या प्रेमात पडली. ती त्याच्या मागे फिरत राहिली; पण शापामुळे ती स्वत:हून काही बोलू शकत नव्हती. नार्सिससच्या लक्षात आलं की कोणीतरी त्याचा पाठलाग करत आहे.

नार्सिसस म्हणाला, 'कोणी आहे का इथे?'

इको म्हणाली, 'इथे'

तो म्हणाला, 'समोर ये!'

इको आनंदाने पुढे आली. तिला त्याला मिठी मारण्याचा मोह झाला. ती त्याच्या जवळ गेली; पण तो मागे सरकला.

तो म्हणाला, 'मी तुला माझ्या शरीराचा आनंद घेऊ देणार नाही.'

शापामुळे इकोने त्याच्या वाक्यातले काही शब्द आपोआप परत म्हटले,

'माझ्या शरीराचा आनंद घे'

क्षणभरात इको भानावर आली. आपल्या तोंडून हे काय निघून गेलं, याची तिला लाज वाटली. नार्सिससला तिच्या शापाबद्दल काहीही माहिती नव्हती. त्याने तिचा अपमान करून तिला नाकारलं. त्यानंतर इको दु:खाने जंगलात नाहीशी झाली. हळूहळू तिचं शरीर नष्ट झालं; पण तिचा आवाज मात्र राहिला. आजही आपण डोंगर दऱ्यांत आवाज दिला, तर जो परत येतो, तोच इको. इकोच्या मैत्रिणींना नार्सिससने केलेला तिचा अपमान आणि तिचं नाहीसं होणं सहन झालं नाही. त्या सूड आणि न्यायाची देवी नेमेसिसकडे गेल्या. नेमेसिसने नार्सिससला शिक्षा देण्याचं ठरवलं. एके दिवशी ती त्याला एका तलावाजवळ घेऊन गेली. तहान लागल्याने नार्सिसस पाणी पिण्यासाठी झुकला आणि पहिल्यांदाच त्याने स्वत:चं प्रतिबिंब पाहिलं. तो त्या सौंदर्यावर इतका मोहित झाला की त्याला वाटलं, ही दुसरीच कुणीतरी व्यक्ती आहे.

तो म्हणाला, 'तू कोण आहेस? मला तुझ्यासोबत राहायचं आहे'

पण प्रतिसाद काहीच नव्हता. प्रतिबिंब तरी कसा प्रतिसाद देणार? जसं इतर लोक त्याच्यावर प्रेम करत होते, तसंच आता तो स्वत:च्याच प्रतिबिंबावर प्रेम करू लागला.

आणि असं म्हणतात की शेवटी त्या प्रेमात, जय व्यक्तीवर आपण प्रेम करतो ती मिळत नाही,बोलत नाही या वेदनेत तो तिथेच मृत्यू पावला. ज्या ठिकाणी तो मरण पावला, तिथे एक सुंदर फूल उगवलं. त्याला नाव दिलं गेलं, 'नार्सिसस'.

ही कथा आपल्याला काय शिकवते?

एकीकडे इको आहे, जी प्रेमात स्वत:ला हरवते. दुस०याच्या आनंदात आनंद शोधताना स्वत:चं अस्तित्व गमावून बसते आणि दुसरीकडे नार्सिसस आहे, जो फक्त स्वत:वरच प्रेम करतो. पण माणूस म्हणून जन्माला आल्यावर प्रत्येकाला प्रेम, जिव्हाळा आणि सहवास हवा असतो. जे दुसऱ्यांवर प्रेम करू शकत नाहीत, ते शेवटी एकटे पडतात. आत्ममुग्धता माणसाला माणसा पासून दूर ठेवते. मानवी स्वभावाची ही दोन्ही टोकं अतिरेकाला गेली की घातक ठरतात. त्यामुळे आपल्याला सुवर्णमध्य साधता आला पाहिजे. प्रेम करताना स्वत:ला विसरून चालत नाही; तसंच एकट्याने स्वत:वर प्रेम करूनही भागत नाही.

पिंपरी चिंचवड.
मो. ९६५१६२९६५१

शिवसेना
हिंदुत्वाचा अभिमान
महाराष्ट्राचा स्वाभिमान

अंध:कारावर मात करून
प्रकाशाच्या नव्या पर्वाची सुरुवात...

सर्वांना
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा !

या दीपोत्सवाच्या मंगलमय पर्वावर
आपल्या आयुष्यात आनंद, आरोग्य,
सुख-समृद्धी, ऐक्य आणि प्रगतीची
अखंड दीपज्योत सदैव प्रज्वलित राहो,
ही सदिच्छा...!

प्रकाश उत्साहाचा,
नाते आपुलकीचे...
दिवाळी येवो, सुख-समृद्धीची !

• शुभेच्छुक -
राजाभाऊ रामद्वार
अध्यक्ष,
नागपूर वर्धा जिल्हा स्थानीय लोकाधिकार सेना-
शिवसेना

S.S. DEVELOPERS & REALTORS
उमरेड • UMRED

आपणास व आपल्या परिवारास
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा

ही दिवाळी
आपल्या जीवनात
सुख, समृद्धी, आरोग्य
आणि नवी उर्जा घेऊन येवो,
हीच सदिच्छा...!

Residential Plots | Clear Title | Loan Available | निवासी प्लॉट | क्लिअर टायटल | लोन उपलब्ध

संजय तळेकर
SANJAY TALEKAR
9860049567
9604177458

पारस वांदिले
PARAS WANDILE
9421705851
9422815422

महादेव नगर | MAHADEV NAGAR
प्लॉट बुकिंग सुरू आहे • PLOT BOOKING NOW OPEN

OFFICE LOCATIONS
• सच्चिदानंद कॉम्प्लेक्स, आशीर्वाद सभागृह, उमरेड
• डॉ. मेश्राम कॉम्प्लेक्स, बायपास चौक, उमरेड

PROJECT DETAILS
सर्वे नं. 243/1, 243/2, 244
बुधवारी पेठ, ग्रामीण रुग्णालय जवळ,
उमरेड जि. नागपूर

PRASHANT DECO HOUSE
THE SOFA MANUFACTURER

PRASHANT
DECO HOUSE
THE SOFA MANUFACTURER

Specialist In
SOFA CUSTOMIZED
& MANUFACTURING

Prop.: Prashant M. Dhawande
9975034626, 9545196000

COMPLETE HOME
Decor Solution
Quality • Comfort • Style
All Under One Roof

READYMADE CURTAIN & MANUFACTURER | BLINDS | WALLPAPERS | MATTRESSES | CARPETS

ADDRESS : 1,2 shop number 7,8 Chimurkar Complex,
Hudkeshwar road Nagpur - 440023.

MOBILE : 9975034626, 9545196000

कथा

क्रिकेटच्या खेळपट्टीवरील रंजक किस्से

फिल्डिंग, फटाके आणि फटकेबाजी

दिवाळीच्या दिवसांत घराघरांत फराळाच्या चकल्या-लाडूंचा घमघमाट असतो आणि बाहेर फटाक्यांची आतषबाजी. या वातावरणात गप्पांच्या कट्ट्यावर चहाच्या घोटासोबत क्रिकेटचा विषय निघाला नाही, तर ती मैफल अपूर्णच ठरते. क्रिकेट हा केवळ आकड्यांचा, विक्रमांचा किंवा शतकांचा खेळ नाही; तर मैदानात घडणाऱ्या अतरंगी, मजेशीर आणि खट्याळ क्षणांचा एक उत्सव आहे. दिवाळीच्या या प्रसन्न वातावरणात क्रिकेटच्या मैदानावर घडलेल्या अशाच काही खुमासदार आठवणींना उजाळा देऊया.

- डॉ.दत्ता विघावे





फारुख इंजिनियर :-

१९७० च्या दशकात वेस्ट इंडिजचे गोलंदाज म्हणजे फलंदाजांसाठी साक्षात कर्दनकाळ. अशाच एका सामन्यात भारताचे माजी सलामीवीर आणि मिश्कील स्वभावासाठी प्रसिद्ध असलेले फारुख इंजिनिअर फलंदाजी करत होते. समोरून तोफगोळ्यासारखा चेंडू टाकणारा गोलंदाज धावून येत होता. एका अत्यंत वेगवान चेंडूवर इंजिनिअर यांचा तोल गेला आणि ते खेळपट्टीवर धाडकन कोसळले. चेंडू थेट यष्टिरक्षकाच्या हातात गेला. वेस्ट इंडिजचे खेळाडू धावत जवळ आले; त्यांना वाटले फलंदाज गंभीर जखमी झाला. सगळे चिंतेने खाली वाकले, तेव्हा इंजिनिअर यांनी डोळे उघडले आणि हसत म्हणाले, "अरे काही नाही, चेंडू इतका वेगवान होता की तो नीट पाहण्यासाठी मी जरा जमिनीवर झोपलो होतो!" मैदानावर क्षणात तणावाचे रूपांतर हशाच्या फव्वाऱ्यात झाले.



चंदू बोर्डे :-

१९८० च्या दशकात मैदानावर तंत्रज्ञान नव्हते, पण खेळाडूंचे प्रसंगावधान जबरदस्त होते. एका स्थानिक सामन्यात चंदू बोर्डे यांच्याविरुद्ध गोलंदाज वारंवार अपील करत होते, पण पंच काही दाद देत नव्हते. अखेर वैतागून गोलंदाजाने पंचांना विचारले, "सर, हा पायचित का नाही?" त्यावर पंचांनी शांतपणे खिशातून चष्मा काढला, पुसला आणि म्हणाले, "बाळा, चेंडू खेळपट्टीवर टप्पा खाण्यापूर्वीच तू इतका जोरात ओरडलास की माझ्या कानाने चेंडूचा आवाज ऐकण्याची क्षमता गमावली!"



ग्लेन मॅकग्राथ आणि झिम्बाब्वे : -

खेळपट्टीवर फलंदाजाला भांबावून टाकण्यासाठी 'स्लेजिंग'चा वापर होतो, पण कधीकधी फलंदाज अशा उत्तराने परतफेड करतो की समोरचा निरुत्तर होतो. ऑस्ट्रेलियाचा दिग्गज ग्लेन मॅकग्राथ आणि झिम्बाब्वेचा एडो ब्रँडेस यांचा असाच एक प्रसंग. मॅकग्राथ सतत धारदार गोलंदाजी करूनही ब्रँडेसची विकेट मिळत नव्हती. चिडून मॅकग्राथने विचारले, "तू इतका जाड का आहेस रे?" ब्रँडेसने एका सेकंदाचाही विलंब न लावता उत्तर दिले, "कारण प्रत्येक वेळी जेव्हा मी तुझ्या घरी जातो, तेव्हा तुझी आई मला प्रेमाने बिस्किटे खायला घालते !" हे ऐकून खुद्द मॅकग्रालाही आपले हसू आवरता आले नाही.



रिचर्डस - सचिन : -

आपल्या लाडक्या सचिन तेंडुलकरचाही असाच एक हलकाफुलका किस्सा आहे. नव्वदच्या दशकात एका सामन्यात विवियन रिचर्ड्स सचिनला म्हणाले होते, "छोट्या, तू खूप सुंदर खेळतोस, पण कधीकधी चेंडू बॅटच्या मधोमध लागण्याऐवजी कडेला लागतो." सचिनने अत्यंत आदराने हसत मान डोलावली आणि पुढच्याच षटकात रिचर्ड्सच्या डोक्यावरून एक सुरेख षटकार ठोकला. खेळपट्टी ओलांडताना सचिन शांतपणे म्हणाला, "सर, हा मधोमध लागला होता ना?"



सुनील गावसकर आणि डाव्या हाताने फलंदाजी: -

१९८२-८३ च्या रणजी ट्रॉफी उपांत्य फेरीत मुंबईची कर्नाटकविरुद्ध अत्यंत बिकट अवस्था झाली होती. कर्नाटकचा फिरकीपटू रघुराम भट खेळपट्टीवर चेंडू प्रचंड फिरवत होता. अशा वेळी सुनील गावसकर चक्क डाव्या हाताने फलंदाजी (लेफ्ट हँडेड) करायला उतरले ! गावसकरांनी डाव्या हाताने खेळत संपूर्ण डाव अडवून धरला आणि सामना अनिर्णित राखत मुंबईला अंतिम फेरीत नेले. प्रेक्षक आणि प्रतिस्पर्धी खेळाडू फक्त आश्चर्याने पाहत राहिले.



मियांदाद आणि किरण मोरे यांचा 'उड्यांचा सामना':

१९९२ च्या विश्वचषकात भारत-पाकिस्तान सामन्यात यष्टिरक्षक किरण मोरे वारंवार जोरदार अपील करत होते. यामुळे वैतागलेल्या मियांदाद यांनी चेंडू टाकल्यानंतर अचानक फलंदाजी थांबवली, दोन्ही पायांनी बॅट हातात धरून मोरे यांच्याकडे पाहत बेडकासारख्या सलग तीन-चार मोठ्या उड्या मारल्या. क्रिकेटच्या इतिहासातील हा अत्यंत हास्यास्पद आणि प्रसिद्ध क्षण मानला जातो.

मार्क वॉ आणि डॅरेल कुलिनन यांची जुगलबंदी:

दक्षिण आफ्रिकेचा फलंदाज डॅरेल कुलिनन शेन वॉर्नविरुद्ध खेळताना नेहमीच चाचपडायचा. एका सामन्यात जेव्हा कुलिनन फलंदाजीला आला, तेव्हा स्लिपमध्ये उभ्या असलेल्या मार्क वॉने टोमणा मारला, "डॅरेल, मी गेल्या दोन वर्षांपासून तुला पुन्हा खेळपट्टीवर बाद होताना पाहण्याची वाट पाहत होतो !" कुलिननने लगेच पलटवार केला, "अरे वा, म्हणजे इतके दिवस तू फक्त तुज्या भावाच्या (स्टीव्ह वॉ) जीवावर संघात जागा टिकवून बसला होतास तर!"

विव्ह रिचर्ड्स आणि ग्रेग थॉमस: -

काउंटी क्रिकेटमध्ये तरुण वेगवान गोलंदाज ग्रेग थॉमसने व्हिव्ह रिचर्ड्सविरुद्ध सलग काही चेंडू बीट केले. जोशात येऊन थॉमस म्हणाला, "हा लाल रंगाचा, गोलाकार चेंडू आहे आणि त्याचे वजन साडेपाच औन्स आहे. तुला दिसत नसेल तर सांगतो!" पुढच्याच चेंडूवर रिचर्ड्सने स्टेडियमबाहेर गगनचुंबी षटकार मारला आणि थॉमसकडे पाहत शांतपणे म्हणाले, "थॉमस, तुला तो कसा दिसतो हे माहीत आहे, आता तो कुठे पडलाय ते शोधून आण!"









सचिन तेंडुलकर आणि अब्दुल कादिर:

-१९८९ मध्ये पाकिस्तानातील एका प्रदर्शनी सामन्यात १६ वर्षांचा सचिन खेळत होता. पाकिस्तानचा महान फिरकीपटू अब्दुल कादिर सचिनजवळ गेला आणि म्हणाला, "लहान मुलांवर (मुश्ताक अहमद) काय हात साफ करतोस? दम असेल तर मला मारून दाखव!" पुढच्याच षटकात सचिनने कादिरच्या एकाच षटकात तब्बल चार षटकार ठोकून ६, ०, ४, ६, ६, ६ अशा धावा कुटल्या. कादिर सामन्यांनंतर हसत म्हणाले, "पोरगा खरंच असामान्य आहे."

इंझमाम-उल-हक आणि धावबादची कला :

इंझमाम धावबाद होण्यासाठी जगप्रसिद्ध होता. एकदा एका धावेसाठी इंझमाम आणि वसीम अक्रम दोघेही धावले, पण गोंधळ इतका झाला की दोघेही एकाच बाजूच्या क्रीजमध्ये जाऊन उभे राहिले. पलीकडच्या बाजूला यष्टिरक्षकाने शांतपणे बेल्स उडवल्या. इंझमामने वसीम अक्रमकडे पाहिले आणि विचारले, "आता आपल्या दोघांपैकी नेमके बाद कोण झाले आहे?" मैदानावरील पंचांनाही हसू आवरले नाही.

एम. एस. धोनीचे स्टंप माईकमधून मार्गदर्शन :

महेंद्रसिंग धोनी यष्टीमागून फिरकीपटूंना ज्या सूचना द्यायचा, त्या स्टंप माईकमुळे जगजाहीर झाल्या. एकदा कुलदीप यादवला चेंडू कसा टाकावा हे समजत नव्हते. धोनीने मागून जोरात ओरडून सांगितले, "तुझ्या हिशोबाने तर टाकून झाले, आता जरा माज्या हिशोबाने चेंडू टाकशील का?" कुलदीपने ऐकले आणि पुढच्याच चेंडूवर भारताला विकेट मिळाली.

सौरव गांगुली आणि नाणेफेकीचा उशीर: -

२००१ च्या ऐतिहासिक भारत-ऑस्ट्रेलिया मालिकेत स्टीव्ह वॉला मानसिक धक्का देण्यासाठी गांगुलीने एक नामी शक्कल लढवली होती. प्रत्येक कसोटी सामन्यात नाणेफेकीच्या वेळी गांगुली मुद्दाम १०-१५ मिनिटे उशिरा पोहोचायचा. ऑस्ट्रेलियन कर्णधार वॉ मैदानावर ब्लेझर घालून उन्हात ताटकळत उभा राहायचा आणि गांगुलीच्या या कृत्यामुळे अक्षरशः चीडचीड करायचा. गांगुलीच्या या चालीने वॉची एकाग्रता पुरती बिघडवली होती.

रिकी पॉन्टिंग आणि स्टीव्ह बकनर यांचा निर्णय: -

पंच स्टीव्ह बकनर यांच्या अनेक चुकीच्या निर्णयांची नेहमी चर्चा व्हायची. एकदा एका सामन्यात चेंडू फलंदाजाच्या बॅटला न लागता पॅडला लागून खूप दूर गेला, तरीही बकनर यांनी बोट वर केले. फलंदाज रिकी पॉन्टिंग क्रीज सोडताना पंचांच्या जवळ गेला आणि म्हणाला, "स्टीव्ह, आज घरी जाताना चष्म्याच्या दुकानातून नक्की चक्कर मारून जा!"

डिक हॉवर्थ आणि इंग्लंडमधील धुके:

-इंग्लंडमध्ये एकदा काउंटी सामन्यादरम्यान अचानक मैदानावर इतके दाट धुके पसरले की फलंदाजाला गोलंदाज नीट दिसत नव्हता. गोलंदाज डिक हॉवर्थने धाव घेतली, चेंडू टाकण्याची ॲक्शन केली, पण चेंडू हातातच ठेवला. फलंदाजाने धुक्यामुळे चेंडू आला असे समजून जोरात बॅट फिरवली. यष्टिरक्षकाने पाठीमागून लगेच बेल्स उडवल्या आणि अपील केले. धुक्यामुळे पंचांनाही काही दिसले नाही आणि त्यांनी फलंदाजाला बाद दिले!

पुणे
मो. ९०९६३७२०८२

चंद्रपूरच्या इतिहासात पहिल्यांदा. एकाच महिन्यात २ गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड करणारी एकमेव शैक्षणिक संस्था

Somayya

GROUP OF INSTITUTIONS

सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा...

Somayya
INSTITUTE OF TECHNOLOGY

Approved by AICTE, DTE Mumbai & affiliated to DBATU University

B.Tech

- Aeronautical Engineering
- Data Science
- AIML
- EE
- CSE
- Mining Engineering

100% RESULT
CAMPUS PLACEMENT
Bus & Hostel Facility

Somayya
DIPLOMA IN ENGINEERING

Approved by AICTE, New Delhi, DTE Mumbai & affiliated to MSBTE, Mumbai

- Computer Science & Engineering
- Civil Engineering
- Mining & Mine Surveying
- Electrical Engineering
- Mechanical Engineering
- Electronics & Telecommunication
- Diploma in Medical Lab Technology (DMLT)

Somayya Ayurved Medical College & Hospital, Bhadrawati	Somayya Pharmacy College Chandrapur	Somayya Institute of Pharmacy Bhadrawati	Savitridevi College of Pharmacy Wani		
Become An Ayurveda Expert **BAMS** College Code 03291	B.Pharm BACHELOR IN PHARMACY D.Pharm DIPLOMA IN PHARMACY	B.Pharm BACHELOR IN PHARMACY D.Pharm DIPLOMA IN PHARMACY B.Sc. Nursing	B.Pharm BACHELOR IN PHARMACY D.Pharm DIPLOMA IN PHARMACY B.Sc. Nursing	Paramount Convent High School (CBSE & State Board) Chandrapur	Macaroon Students Academy (CBSE School) Wani
Shrikrushna Nagar, Sumthana Bhadrawati, Dist. Chandrapur	INSTITUTE CODE - 04691 PCI CODE - 7215				

Macaroon Jr. Science College, Chandrapur	Macaroon Students Academy (CBSE School) Chandrapur	Macaroon Students Academy (CBSE School) Bhadrawati	Somayya ITI, Wadgaon, Chandrapur	Paramount ITI, Babupeth, Chandrapur	Maa Bhawani ITI Bhadrawati	Macaroon ITI, Wani, Yavatmal

Corp. Office: Somayya Campus, Akashwani Road, Wadgaon Ward, Chandrapur 9800002715, 8686881000





कथा

घर विकताना न विकलेली खोली



अनिरुद्ध बराच वेळ त्या ज्योतीकडे पाहत राहिला. त्याला जाणवलं, आपण आयुष्यभर घर, जमीन, पैसा, दागिने यांना 'वारसा' म्हणत आलो. पण खरा वारसा तो असतो, जो आपल्यामागे बंद कपाटात पडून राहत नाही; तो दुसऱ्यांच्या आयुष्यात उजेड बनून पुढे जात राहतो. माधवरावांचं घर हेवटी विकलं गेलं नाही. पण समजा ते विकलं असतं, तरी फारसं काही बिघडलं नसतं. कारण त्या घरातील सर्वांत मौल्यवान खोली आता चार भिंतींच्या आत उरलीच नव्हती. ती संतोषच्या रुग्णालयात होती, शबानाच्या निर्णयांमध्ये होती, अश्विनीच्या वर्गात होती, त्या तेरा वर्षांच्या मुलीच्या उघडलेल्या पुस्तकात होती, ईशच्या मनात होती. आणि अठरा वर्षे स्वत:च्या वडिलांवर रुसून बसलेल्या एका मुलाच्या हृदयातही ती शेवटी उघडली होती.

- दिनेश सुरेश भदाणे

दिवाळीला अजून आठ दिवस बाकी होते. शहरातील प्रत्येक दुकान दिव्यांच्या माळांनी उजळून निघाले होते. रस्त्यांच्या कडेला आकाशकंदील लटकत होते. फराळाचा वास हवेत मिसळला होता आणि गृहसंकुलांच्या बाल्कनींमध्ये रंगीबेरंगी रोषणाईची लगबग सुरू झाली होती. पण 'श्रीराम सदन' नावाच्या त्या जुन्या वाड्यासमोर मात्र अंधार जरा जास्तच दाटून बसला होता. पस्तीस वर्षे जुनं घर. कौलारू छप्पर. अंगणात तुळशीवृंदावन. उजव्या बाजूला पारिजातकाचं झाड. मागच्या अंगणात विहीर. मधोमध मोठा दिवाणखाना आणि त्याला जोडून चार खोल्या. आणि पाचवी एक खोली, जिला गेली अठरा वर्षे कुलूप होतं.

'सर, बाकी सगळं क्लिअर आहे. फक्त त्या खोलीचं काय?' प्रॉपर्टी एजंट समीरने विचारलं.

अनिरुद्ध देशमुख काही क्षण उत्तरलाच नाही. त्याची नजर त्या बंद दरवाजावर स्थिरावली होती.

'ती खोली विक्रीत धरायची नाही.'

समीरला वाटलं तो विनोद करतो आहे. 'म्हणजे?'

'म्हणजे घर विकायचं आहे. पण ही खोली नाही.'

समीर हसला. 'सर, फ्लॅट नाही हा की एक रूम वेगळी ठेवता येईल. पूर्ण प्लॉट विकत आहेत आपण'

'माहिती आहे.'

'मग?'

अनिरुद्धने हलक्या आवाजात म्हटलं, 'त्या खोलीची किंमत कोणी देऊ शकणार नाही.'



1. परतीची पावलं

अनिरुद्ध पुण्यात एका मोठ्या आयटी कंपनीत वरिष्ठ पदावर होता. स्वत:चा फ्लॅट, महागडी कार, पत्नी मेघना आणि अमेरिकेत उच्चशिक्षणासाठी गेलेली मुलगी ईशा वरवर पाहता आयुष्य व्यवस्थित होतं. पण या जुन्या घराशी त्याचा संपर्क जवळजवळ तुटलाच होता. आई गेल्यानंतर तर पूर्णपणे. वडील आधीच गेले होते. आई एकटी इथे राहत होती. अनेकदा म्हणायची,

'अनिरुद्ध, घराला कुलूप लावू नकोस रे. घर बंद झालं की आठवणी दमछाकीनं मरतात.'

तो नेहमी उत्तर द्यायचा, 'आई, अशा जुन्या घरात राहून काय उपयोग? शहरात ये. आमच्याकडे रहा.'

पण ती आली नाही. ती म्हणायची,

'माणूस नुसत्या भिंतीत राहत नाही रे. काही भिंती माणसात राहतात.'

त्यावेळी अनिरुद्धला हे वाक्य फारच भावनिक वाटायचं. आता मात्र त्या घरात पाऊल ठेवताना प्रत्येक भिंत त्याच्याकडे काहीतरी सांगण्यासाठी पाहत असल्यासारखी वाटत होती. आईच्या मृत्यूला सहा महिने झाले होते. घर रिकामं पडलं होतं. मेघनाचं म्हणणं स्पष्ट होतं,

'ते घर विकून टाकूया. तिथे कोण राहणार आहे? मेंटेनन्स वेगळा. कर वेगळा. आणि उद्या अतिक्रमण वगैरे झालं तर?' तर्क बरोबर होता. अनिरुद्धने घर विकण्याचा निर्णय घेतला. खरेदीदारही मिळाला. पण अडचण होती ती पाचव्या खोलीची.

2. त्या कुलूपाची गोष्ट

अनिरुद्ध लहान असताना त्या खोलीत त्याचे वडील माधवराव बसायचे. माधवराव जिल्हा परिषद शाळेत शिक्षक होते. फार मोठा पगार नव्हता. पण गावात त्यांना प्रचंड मान होता. संध्याकाळी अनेक मुलं त्यांच्या घरी यायची कोणी गणितासाठी, कोणी

इंग्रजीसाठी, कोणी अर्ज लिहून घेण्यासाठी, तर कोणी फक्त मन मोकळं करण्यासाठी. त्या खोलीत कायम पाटी, खडू, जुनी पुस्तकं आणि मुलांच्या चपलांचा पसारा असायचा. अनिरुद्धला मात्र ते अजिबात आवडायचं नाही. तो अनेकदा म्हणायचा,

'बाबा, आपलं घर शाळा आहे का? सतत ही मुलं!'

माधवराव हसायचे, 'घरात मुलांचा आवाज असेल तर घर जिवंत राहतं.'

अनिरुद्ध शहरात शिकायला गेला. इंजिनिअर झाला. नोकरी लागली. त्याच काळात वडील निवृत्त झाले. पण खोलीत मुलं येणं बंद झालं नाही; उलट वाढलं. एका दिवशी अनिरुद्ध सुट्टीत घरी आला तेव्हा त्याला त्या खोलीत गावातील रिक्षाचालकाचा मुलगा पुस्तक वाचताना दिसला.

'बाबा, आता तरी हे बंद करा. निवृत्ती झाली तुमची.'

वडील म्हणाले, 'नोकरीतून निवृत्ती होते. उपयोगी असण्यातून नाही.' त्याच्या मनात चीड आली,

'तुम्हाला स्वत:च्या मुलासाठी वेळ नव्हता. पण गावच्या प्रत्येक मुलासाठी होता.'

पहिल्यांदाच वडिलांच्या चेहऱ्यावरचं हसू पुसलं. ते काही बोलले नाहीत. त्या रात्री दोघांमध्ये फार मोठं भांडण झालं. आणि दुसऱ्या दिवशी अनिरुद्ध पुण्याला निघून गेला. ती त्यांची होवटची नीट झालेली बातचीत होती. तीन महिन्यांनी माधवरावांना हृदयविकाराचा झटका आला. ते गेले. आईने ती खोली बंद केली. कुलूप लावलं. आणि अठरा वर्षे ते कुलूप उघडलं नाही.

3. 'किल्ली माझ्याकडे नाही'

घर विकायचं ठरवल्यानंतर अनिरुद्धने आईच्या कपाटातील सर्व किल्ल्या तपासल्या. पण त्या खोलीची किल्ली मिळाली नाही.

समीर म्हणाला, 'लॉक तोडून टाकूया.' अनिरुद्ध दचकला,

'नको.'

'का?' त्याच्याकडे उत्तर नव्हतं. खरं तर त्याला स्वत:लाच कळत नव्हतं एका निर्जीव कुलपाबद्दल एवढा संकोच का? त्या दिवशी सायंकाळी शेजारच्या सुधाताई भेटायला आल्या. वय जवळजवळ पंचाहत्तर. अनिरुद्धला पाहताच म्हणाल्या,

'घर विकतोयस म्हणे?'

'हो.' त्या काही काळ अंगणाकडे

पाहत राहिल्या. 'तुझी आई म्हणायची, अनिरुद्ध एक दिवस येईल आणि खोली उघडेल.'

अनिरुद्ध चमकला, 'तुम्हाला त्या खोलीबद्दल माहिती आहे?'

'थोडी.'

'किल्ली कुठे आहे?'

सुधाताईनी त्याच्याकडे पाहिलं, 'तुझ्याजवळ.'

'माझ्याजवळ? पण मी सगळ्या किल्ल्या तपासल्या.'

त्या हसल्या, 'सगळ्या कुलपांना लोखंडाची किल्ली लागत नाही.'

अनिरुद्धला अशा कोड्यात बोलण्याचा कंटाळा आला, 'कृपया स्पष्ट सांगा.'



सुधाताईनी हळू आवाजात विचारलं, 'तुझ्या बाबांनी होवटचं तुला काय म्हटलं होतं?'

त्याच्या मनात ती रात्र जिवंत झाली भांडण, चिडचिड, मोठा आवाज आणि घरातून निघताना वडिलांनी मागून म्हटलेलं एक वाक्य,

'कधी माझी बाजू समजून घ्यायची असेल, तर तुझ्या जुन्या अभ्यासाच्या टेबलाचा खालचा कप्पा बघ.'

अनिरुद्ध स्तब्ध झाला. अठरा वर्षांत त्याला ते वाक्य आठवलंच नव्हतं.

4. किल्ली

त्याची लहानपणीची खोली आता धुळीनं भरली होती. जुनं टेबल एका कोपऱ्यात होतं. खालचा कप्पा अडकला होता. त्याने जोर लावून तो उघडला. आत काही वह्या, जुने फोटो, एक तुटलेलं कंपास बॉक्स आणि तपकिरी कागदात गुंडाळलेलं छोटं पाकीट. त्यावर वडिलांच्या अक्षरात लिहिलं होत, 'अनिरुद्धसाठी जेव्हा तो ऐकायला तयार असेल तेव्हा.'

त्याच्या हातांना कंप सुटला. पाकिटात किल्ली होती आणि एक चिठ्ठी, तु'यासाठी वेळ नव्हता असं तुला वाटतं. कदाचित ती माझीच चूक असेल की मी तुला माझं प्रेम समजेल अज्ञा भाषेत दाखवू शकलो नाही. पण एक दिवस त्या खोलीत जा. तिथे तुला माझं उत्तर मिळेल.

- बाबा

अठरा वर्षांनी कुळूप उघडलं. दरवाजा चर्रकन आत सरकला. धुळीचा एक थर हवेत उडाला. अनिरुद्धने दिवा लावला आणि तो स्तब्ध झाला. ती खोली वर्ग नव्हती; ती एक छोटंसं ग्रंथालय होतं. चारही भिंतींवर कपाटं, शेकडो पुस्तकं, मध्यभागी सहा टेबलं आणि एक पाटी. त्या पाटीवर अजूनही खडूने लिहिलेलं होतं--

अनिरुद्धच्या छातीत काहीतरी तुटल्यासारखं झालं. पण खरी गोष्ट अजून बाकी होती.

5. फायली

कपाटाच्या शेवटच्या खणात अनेक फाइल्स होत्या. प्रत्येकावर एका विद्यार्थ्यांचं नाव संतोष कांबळे, शबाना शेख, राजू मोरे, अश्विनी गायकवाड, विजय पवार. अशा शेकडो फाइल्स. फाइलमध्ये गुणपत्रिका, प्रवेश अर्ज, फीच्या पावत्या. काही पावत्यांवर फी भरताना नाव होतं, माधवराव देशमुख. अनिरुद्धच्या डोळ्यांत पाणी आलं. एक फाइल मात्र वेगळी होती. त्यावर लिहिलं होत, 'अनिरुद्ध.' त्याने उघडली. पहिल्या पानावर त्याची शाळेची गुणपत्रिका, नंतर कॉलेजची प्रवेशपावती, इंजिनिअरिंग फी, हॉस्टेल फी, कोचिंग फी प्रत्येक पावती व्यवस्थित चिकटवलेली. शेवटी एक कागद, वडिलांची हस्ताक्षरं 'माझ्या मुलाची फी भरताना मला कधीच ओझं वाटलं नाही. पण त्याच्या फीइतकीच रक्कम प्रत्येक वर्षी किमान एका गरीब मुलासाठी बाजूला ठेवण्याचा मी नियम केला.

कारण माझा मुलगा मोठा व्हावा, ही इच्छा होतीच; पण त्याच्या उंचीमुळे दुसऱ्या मुलावर सावली पडू नये, ही त्याहून मोठी इच्छा होती.'

अनिरुद्ध खुर्चीत बसला. त्याला रडू आवरेना. इतकी वर्ष? तो मनात एकच कथा घेऊन जगला होता.

'बाबांना माझ्यापेक्षा इतरांची जास्त काळजी होती.' आज पहिल्यांदा त्याला जाणवलं बाबांनी इतरांवर प्रेम केलं म्हणून त्याच्यावरचं प्रेम कमी झालं नव्हतं. प्रेम हे वाटलं की कमी होणारं राशन



नव्हतं. ते दिव्यासारखं होतं. एका दिव्याने दुसरा दिवा पेटवला तरी पहिला दिवा विझत नाही.

6. आईचं गुपित

एका टेबलाच्या खणात आईच्या अक्षरातली डायरी होती. अनिरुद्धने वाचायला सुरुवात केली. वडिलांच्या मृत्यूनंतर आईने अभ्यासिका बंद का केली होती, याचं उत्तर त्यात होतं.

'आज माधव गेले. गावातली मुलं आली होती. सगळ्यांनी अभ्यासिका सुरू ठेवण्याची विनंती केली. पण मी कुलूप लावलं. कारण माधवांनी मृत्यूपूर्वी मला सांगितलं होतं 'ही खोली अनिरुद्धने स्वत: उघडावी. त्याला जबरदस्तीने माझे विचार देऊ नकोस. वारसा मालमत्तेचा देता येतो; मूल्यांचा वारसा स्वीकारावा लागतो.'

पुढची नोंद, 'आज अनिरुद्धने नवीन फ्लॅट घेतल्याचं सांगितलं. खूप आनंद झाला. त्याला या खोलीबद्दल सांगावंसं वाटलं. पण माधवांचे शब्द आठवले.'

आणखी एक, 'आज गावातील संतोष अमेरिकेतून आला. मोठा डॉक्टर झालाय. माधवांच्या फोटोसमोर बराच वेळ रडत होता.'

आणखी एक, शबाना आता जिल्हाधिकारी झाली. म्हणाली, 'माधव सर नसते तर दहावीनंतर माझं शिक्षण थांबलं असतं.''

अनिरुद्ध थबकला. त्याने फाइलमधली नावं पुन्हा पाहिली. ज्या मुलांकडे तो लहानपणी तुच्छतेने बघायचा, त्यापैकी अनेक आज डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, अधिकारी, उद्योजक झाले होते. डायरीच्या होवटच्या पानावर आईने लिहिलं होतं,

'अनिरुद्ध, जर तू हे वाचत असशील तर मी नसणार. घर विकायचं असेल तर विक. मला वाईट वाटणार नाही. घराच्या भिंती जपण्याची गरज नाही. पण या खोलीत सुरू झालेली गोष्ट बंद करू नकोस. तुझ्या बाबांनी तुला संपत्ती दिली नाही असं तुला वाटत असेल. प्रत्यक्षात त्यांनी तुला होकडो माणसं दिली आहेत.'

7. खरेदीदार

दुसऱ्या दिवशी खरेदीदार प्रकाश अग्रवाल आला. 'देशमुख साहेब, फायनल करूया? माझा प्लॅन तयार आहे. पूर्ण घर पाडून चार मजली कॉम्प्लेक्स करायचा.'

अनिरुद्धने विचारलं, 'ही अभ्यासिका?'

'सगळं पाडावं लागेल.'

'ही खोली ठेवता आली तर?'

अग्रवाल हसला, 'व्यवसायात भावना ठेवून चालत नाही.'

हे वाक्य अनिरुद्धला कुठेतरी खोलवर लागलं. कारण इतकी वर्ष तोही तेच मानत होता. मालमत्ता म्हणजे बाजारभाव, जुने घर म्हणजे खर्च, रिकामी जागा म्हणजे 'डेड इन्व्हेस्टमेंट'. आणि त्या सगळ्या गणितात माणूस कुठे बसतो, हा प्रश्न त्याने कधी विचारलाच नव्हता.



'माफ करा,' तो म्हणाला, 'हे घर मी विकत नाही.'

समीर चकित झाला. 'सर! जवळजवळ सगळं ठरलं आहे. इतकी मोठी ऑफर पुन्हा मिळेल याची खात्री नाही.'

अनिरुद्धने बंद पडलेल्या अभ्यासिकेकडे पाहिलं, 'मला त्याहून मोठी ऑफर मिळाली आहे.'

'कुणाची?'

अनिरुद्ध हसला, 'अठरा वर्षांपूर्वी माझ्या बाबांची.'

8. दिवाळीची सकाळ

यंदा देशमुखांच्या जुन्या घरात अनेक वर्षांनंतर दिवाळी साजरी झाली. अंगणात मोठी रांगोळी होती. तुळशीवृंदावनासमोर दिवे लागले होते. पारिजातकाच्या झाडाखाली मुलांचा गोंगाट होता. पाचव्या खोलीवर आता नवा फलक लागला होता

'कोणत्याही मुलाचं स्वप्न पैशाअभावी थांबू नये.'

गावातील अनेक जुने विद्यार्थी आले होते संतोष डॉक्टर म्हणून, शबाना जिल्हाधिकारी म्हणून, राजू एका मोठ्या कंपनीचा संचालक, अश्विनी महाविद्यालयात प्राध्यापक. प्रत्येकाकडे माधवरावांची एक आठवण होती; एक प्रसंग, एक पुस्तक, एक फी भरल्याची पावती, एक धीर देणारं वाक्य. संध्याकाळी अनिरुद्ध अभ्यासिकेत एकटाच बसला होता. समोर वडिलांचा फोटो. त्याने एक छोटासा दिवा लावला आणि हळू आवाजात म्हणाला,

'बाबा, तुमची बाजू समजायला मला अठरा वर्षे लागली.'

दारातून मेघना ऐकत होती. ती जवळ आली. 'तुम्ही खरंच हे घर ठेवणार आहात?'

'हो.' 'आणि अभ्यासिका?'

'ती आता घरापेक्षा मोठी करायची आहे.'

त्याने एक कागद तिच्या हातात दिला. त्यावर नव्या ट्रस्टचा आराखडा होता दरवर्षी आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, मोफत अभ्यासिका, स्पर्धा परीक्षांसाठी पुस्तकं, डिजिटल लर्निंग सेंटर, करिअर मार्गदर्शन आणि गावातील निवृत्त शिक्षकांच्या मदतीने मोफत शिकवणी.

मेघनाने विचारलं, 'एवढं सगळं अचानक?'

अनिरुद्ध काही क्षण शांत राहिला. 'अचानक नाही. अठरा वर्ष उशिरा.'

9. पहिली विद्यार्थिनी

कार्यक्रम संपत आला होता. तेवढ्यात दाराश्ली साधारण तेरा-चौदा वर्षांची मुलगी उभी राहिली. पायात झिजलेल्या चपला, हातात दोन जुनी पुस्तकं. ती संकोचून म्हणाली, 'सर... इथे फुकट अभ्यास करता येतो का?'

अनिरुद्धच्या डोळ्यांसमोर क्षणभर वडील उभे राहिले. त्याच खोलीत, त्याच दरवाजाजवळ. कदाचित अठरा-वीस वर्षांपूर्वी एखाद्या मुलाने हाच प्रश्न विचारला असेल.

'हो,' अनिरुद्ध म्हणाला.

"फी नाही? ''

''नाही,''

'किती वेळ बसू शकते?'

तो हसला, 'तुझं स्वप्न पूर्ण होईपर्यंत,'

ती आत आली. टेबलावर बसली. पुस्तक उघडलं. खोलीत पहिल्यांदा पुन्हा पान उलटल्याचा आवाज झाला. तो साधा आवाज नव्हता; तो एका अठरा वर्ष? थांबलेल्या घड्याळाची टिक- टिक पुन्हा सुरू झाल्यासारखा होता.

''न विकलेली खोली'' त्या रात्री गावभर दिवे लागले. आकाशात फटाके फुटत होते. अनिरुद्ध मात्र घराच्या ओसरीत शांत बसला होता. त्याच्या हातात वडिलांची जुनी चिट्ठी होती. तेवढ्यात ईशाचा अमेरिकेतून



व्हिडिओ कॉल आला.

'बाबा, आईने सांगितलं तुम्ही घर विकलं नाही?'

'नाही''

'का?'

अनिरुद्धने कॅमेरा अभ्यासिकेकडे वळवला. मुलं अभ्यास करत होती. 'त्या एका खोलीमुळे.'

ईशा हसली. 'एवढी खास आहे?'

अनिरुद्धने उत्तर दिलं, 'हो. कारण त्या खोलीत माझ्या बाबांनी पुस्तकं ठेवली नव्हती. त्यांनी भविष्य ठेवून दिलं होतं.'

ईशा काही क्षण शांत राहिली. मग म्हणाली, 'मी पुढच्या वर्षी भारतात आले की त्या लायब्ररीसाठी काही संगणक देईन.'

अनिरुद्धचा गळा दाटून आला. वारसा पुढच्या पिढीकडे गेला होता. जमीन न देता, सोने न देता, बँक बॅलन्स न देता... फक्त एक विचार देऊन. त्या रात्री झोपण्यापूर्वी अनिरुद्धने अभ्यासिकेचा दरवाजा बंद केला. पण कुलूप लावलं नाही.

दाराच्या बाजूला त्याने एक छोटी पाटी लावली, 'हा दरवाजा बंद दिसला, तरी गरजू विद्यार्थ्यांसाठी तो कायम उघडाच आहे.'

त्याने शेवटचा दिवा विझवण्यासाठी हात पुढे केला. मग थांबला. एक दिवा तसाच जळू दिला.

कारण त्याला अचानक बाबांचं एक वाक्य आठवलं,

'मुलाला दिवा देऊ नकोस; त्याला दुसरा दिवा पेटवता येईल इतका प्रकाश दे.'

अनिरुद्ध बराच वेळ त्या ज्योतीकडे पाहत राहिला. त्याला जाणवलं, आपण आयुष्यभर घर, जमीन, पैसा, दागिने यांना 'वारसा' म्हणत आलो. पण खरा वारसा तो असतो, जो आपल्यामागे बंद कपाटात पडून राहत नाही; तो दुसऱ्याच्या आयुष्यात उजेड बनून पुढे जात राहतो.

माधवरावांचं घर हेवटी विकलं गेलं नाही. पण समजा ते विकलं असतं, तरी फारसं काही बिघडलं नसतं. कारण त्या घरातील सर्वांत मौल्यवान खोली आता चार भिंतींच्या आत उरलीच नव्हती. ती संतोषच्या रुग्णालयात होती, शबानाच्या निर्णयांमध्ये होती, अश्विनीच्या वर्गात होती, त्या तेरा वर्षांच्या मुलीच्या उघडलेल्या पुस्तकात होती, ईशच्या मनात होती. आणि अठरा वर्षे स्वत:च्या वडिलांवर रुसून बसलेल्या एका मुलाच्या हृदयातही ती शेवटी उघडली होती.

म्हणूनच त्या घराच्या विक्रीच्या कागदावर अनिरुद्धने शेवटी एक वाक्य लिहून, 'फाइल बंद केली'

'काही खोल्या मालकीच्या नसतात; त्या जबाबदारीच्या असतात.'

बाहेर दिवाळीच्या पणत्या एकामागोमाग एक पेटत होत्या. आणि देशमुखांच्या घरातील तो एक जुना दिवा अठरा वर्षांच्या अंधाराचा हिशेब चुकता करत जजांतपणे जळत होता.

पुणे
मो. ९४२२१५३४३९

Sansui

M/s. Shri Sai Scale Company

SHARP INSTRUMENTS

MANUFACTURER & SUPPLIER

Manufacturer of All Types of Electronic Weighing Scales & Weighbridges

Automation



Contact:
9822473200

196, Shivangi Nagar, Hudkeshwar Road, Nagpur
sharpinstruments09@gmail.com
krsaldokar@gmail.com

कथा

वृद्धाश्रमातील आईवडिलांची आर्त हाक

शिक्षणासाठी पहिल्यांदा जेव्हा तो आपल्यापासून दूर गेला तेव्हा जगणं संपलं कि काय असं वाटलं होतं. अहो, कुठंय हो आपला दिनू?. आता तो कधीच माझ्या कुशीत झोपणार नाही का हो, आता तो मला लाडाने हट्ट करत कधीच असं म्हणनार नाही का, "ये आई मला खुप भूक लागलीये गं. गोड गोड साखर पोळी बनवना. ये आई अगं मला खुप थंडी वाजत आहे तुझ्या ऊबदार पदराखाली घेऊन झोपना. त्याला सर्दी-खोकला, ताप आला कि माझा पदरंच सोडायचा नाही.

-सौ. मनीषा सोन्नेकर/सोनकांबळे



सध्या घरात छोट्या छोट्या कारणांवरून वाद चालुच होते. दिनेश एका शब्दाने आईबाबांशी बोलत नव्हता. आई आठवड्याभरापासून बी. पी., डोके दु:खीचं दु:खणं अंगावरंच काढत होती. दिनेश त्याच्या ऑफिसच्या कामात इतका व्यस्त होता कि त्याला आईच्या बी. पी. च्या गोळ्या संपल्या आहेत हे सुद्धा लक्षात नव्हतं. दिनेशच्या बाबांना गुडघे दु:खीचा खुप त्रास होता. दोघांना आता हॉस्पिटलमध्ये नेणं खुप गरजेचं होतं. पण वेळ मात्र कुणाकडेच नव्हता. दिनेशची बायको दिप्ती. ती पण ऑफिसात कामाला होती. आईवडिलांकडे पाहायला, त्यांची तब्बेत विचारायला कुणाकडेच वेळ नव्हता. त्या दिवशी संध्याकाळी दिनेश ऑफिसमधून घरी आला.

आई सहज म्हणाली, "दिनू बाळा, अरे माझ्या बी. पी. च्या गोळ्या संपल्यायंत आणि तुझ्या बाबांचे गुडघेही फार दु:खतायंत रे जाऊन येऊयात का आपण हॉस्पिटलला"?.

दिनेश हातातली बॅग टेबलवर रागाने आदळली आणि आईला म्हणाला,

"आई अगं तुला कांही समजतं कि नाही. कि तू मुद्दाम वागतेस असं?. मी माझा संसार, मुलबाळ, माझं ऑफिस बघु कि तुम्हा दोघांनाच बघत बसू. तुम्ही दोघं जाऊन या ना दवाखान्यात. प्रत्येक वेळी मलाच सांगितलं पाहिजे असा कांही नियम काढलाय का तुम्ही दोघांनी?. खुप व्याप आहे गं मला माज्या कामाचा मला डिस्टर्ब करू नका. कृपया. आणि हो घरात जे कांही असेल ते खाऊन निवांत झोपी जा दोघंही. मी आणि दिप्ती बाहेर चाल्लोय जेवायला".

दिनेश रागात आईला बोलला आणि थोड्या वेळाने बाहेर निघून गेला. मी बोलत असलेल्या गोष्टींचं आईबाबांना वाईट वाटेल, त्यांचं मन दु:खावेल, त्यांच्या भावना दु:खावल्या जातील. याचा तिळमात्र विचार नव्हता दिनेशच्या डोक्यात. वेळेवर गोळ्या-औषधं न घेतल्याने दोघांच्या आजाराचा त्रास वाढू लागला होता. दिनेशचं बोलणं आईबाबांच्या जिव्हारी इतकं लागलं कि ते बोलणं ऐकूनंच दोघांच्या तब्बेतीवर अजून इतका परिणाम झाला. कांहीच न खातापीता दोघेही तसेच उपाशी पोटी निजले. पण एका घरात असून दिनेश एकदाही आईवडिलांना विचारलं नाही कि,

''आईबाबा तुमची तब्बेत कशी आहे? गोळ्या आहेत कि संपल्या?".

दिनेश त्याच्याच जगण्यात व्यस्त होता. त्या दिवशी संध्याकाळी दिप्ती ऑफिसमधून घरी आली. आणि लगेच तयार होऊन योगा क्लाससाठी निघाली. तेवढ्यात आई तिला म्हणाली,

"दिप्ती अगं माझं अंग फार दु:खतंय गं. चहा करुन देशील का?".

"अहो, स्वत: करुन प्याना. मी ही थकून आली आहे ना. बाहेरचं करा, घरी येऊन तुमची दु:खणी बघा कंटाळा आलाय मला फार".

दिप्ती रागात बाहेर निघून गेली. रात्री दिनेश घरी आल्यावर दिप्ती त्याला म्हणाली,

"दिनेश एकतर आपण दोघं वेगळं राहूया किंवा मग तू तूज्या आईवडिलांना तरी दुसरीकडे वेगळं ठेव. सगळं सांभाळणं माझ्या एकटीने नाही रे होणार".

दिप्तीच्या त्या प्रश्नावर दिनेशने एकच उत्तर दिलं. अगं, आपण का वेगळं राहायचं?. आईबाबांनाच वृद्धाश्रमात पाठवूयात ना. आणि तसंही आता वृद्धाश्रमात राहायचं त्यांचं वयंही झालं आहे. बाहेर हॉल मध्ये सोफ्यावर बाबा झोपले होते आणि खाली चटईवर आई झोपली होती. त्यांना ना चांगलं अंथरून, ना पांघरून, ना डोक्याला उशी.

दोघे तसेच निपचित पडून होते. दुसऱ्या दिवशी सकाळी आई जेवण घेण्यासाठी किचनमध्ये गेली असता किचनमध्ये सगळा पसारा अस्ताव्यस्त पडला होता. दिप्तीने केवळ स्वत:पुरताच स्वयंपाक केला होता. काहीही न म्हणता आईने ताटात मिर्ची-भाकरी घेतली आणि दोघेही जेवायला बसले. घास घेणार तेवढ्यात दिनेश आला. आणि मागचा पुढचा कोणताही विचार न करता,

"चला, आईबाबा सामान बांधायला घ्या". असं त्याने एका ओळीत सांगितलं.

तरी राहावेना म्हणून आईने दिनूला विचारलंच.

"दिनू अरे, काय झालं?. सामान वगैरे काय हे?". "आईबाबा, मी स्पष्टच सांगतो. तुम्हाला आता वृद्धाश्रमात राहायला जायचे आहे. कारण घरात जागा तर कमी पडतंच आहे, आणि तुम्हा दोघांच्या गोळ्या-औषधांचा खर्च मला झेपत नाहीये आता.

तेवढ्यात बाबा म्हणाले,

"अरे ये दिनू बाळा. खर्च वगैरे काय बोलतोयंस तू?. आम्ही तुझ्याशिवाय जगू शकणार नाही रे. तुलाच पाहायची सवय आहे आमच्या डोळ्यांना. दिनू, हवं असेल तर मी कुठेतरी वॉचमनची ड्युटी करतो. त्यातून आम्ही आमचा खर्च भागवू. तुला आम्ही कांहीही मागणार नाही. पण तुझ्यापासून आम्हाला वेगळं करु नकोस रे".

आईबाबांनी दिनूला अंत:करणातून खुप विनवणी केली. पण दिनू कांहीही ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हताच. आईबाबांनी सगळं सामान पॅक केलं. आई घराच्या भिंतींनवरून हात फिरवत खुप रडत होती. हुंदके देत दिनूला म्हणाली, "दिनू, अरे काय चुकलं आमचं?. ते तरी सांग".

दिनू रागाने आईला म्हणाला, "आई मला त्या विषयावर काहीच बोलायचं नाही. निघा तुम्ही".

दोघेही निघाले. रस्त्यावरून चालताना मागे सरलेलं त्यांचं आयुष्य, दिनूचं बालपण सगळं डोळ्यासमोर दिसत होतं. दोघेही रडत होते. दोघांच्या डोळ्यांमध्ये रुसलेले अश्रू होते. दोघे चालताना दमत होते, पाण्यासाठी गळा कोरडा झाला होता. पण "आईबाबा तुम्ही फार दमलात. हे घ्या पाणी". असं म्हणत त्यांना घोटभर पाणी पाजणारा दिनू आता त्यांच्या जवळ नव्हता. बघता बघता "वृद्धाश्रम" आलं. वृद्धाश्रम पाहताच आईच्या डोळ्यात आसवं आली. हातातील बॅग कधी खाली पडली कांही कळलंच नाही. बाबा रडत स्तब्ध उभे होते. वृद्धाश्रमात गेटच्या आत दोघेही पाऊल टाकताच दोघांच्या अश्रुंचा बांध फुटला. धायमोकलून दोघेही रडू लागले. वृद्धाश्रमातील ती पहिली रात्र गतकाळ आठवत, अश्रू ढाळण्यात गेली.

सकाळ झाली. बाबा उठून आईच्या जवळ जाऊन तिला उठवू लागले. पाहतायंत तर काय आईला खुप ताप होता.

"काय झालं गं वसू?". म्हणत बाबा रडू लागले. डॉक्टर आले. डॉक्टरांनी सांगितलं कि,

"अति विचारामुळे आणि मानसिक ताण घेतल्यामुळे ताप आलाय". थोड्या वेळाने दिनू आला. दिनूला पाहताच आईबाबांच्या चेहऱ्यावर आनंदाचं हसु उमललं. दिनूला मायेनं जवळ घेण्यासाठी आई उठली. तेवढ्यात अतिशय रागात दिनू म्हणाला, "आईबाबा, हे घ्या तुमचा फोटो विसरला होता तुम्ही. तोच द्यायला आलोय". फोटो देऊन दिनू निघून गेला. आईच्या जवळ बसून आईला विचारलंही नाही. "कि, काय झालं आई तुला"?. जाताना एकदाही मागे वळून बघितलं नाही. दिनूच्या पाठाकृतिकडे बघत आईबाबा रडत उभे होते.

दोघेही एकमेकांची समजूत काढत होते. थकलेल्या हातांनी एकमेकांच्या डोळ्यांतील अश्रू पुसत होते. हुंदका देत आई म्हणाली,

"अहो, आपला दिनू आपल्याला एक शब्दही बोलला नाही. त्याच्या तोंडून "आईबाबा" हे शब्द ऐकायला मन आणि कान खुप आतुर झालेत हो. तो बघा चाल्लाय आपला दिनू. कशी आहेस आई? असं मला विचारलंही नाही त्याने. अहो, मला अजूनही चांगलं आठवतंय आपला दिनू लहान असताना बाहेर खेळताना पडला कि रडत माझ्या पदराच्या कुशीत येऊन बसायचा. त्याच्या जखमेवर मायेनं फुंकर मारली कि मला घट्ट मिठी मारायचा. आणि रडत रडत ये आई मला साखर पोळी बनव, गूळ पोळी बनव म्हणून गोड हट्ट करायचा.''

अंघोळ घातली कि माझ्या पदरानेच अंग पुसायचा, शाळेला जाताना मी दिसेपर्यंत मला पाहून टाटा करायचा, तो शाळेला गेला कि घर खुप खाली खाली वाटायचं हो, कधी एकदा चार वाजतात अन माझा दिनू घरी

येतो असं व्हायचं मला. त्याची वाट पाहत मी अंगणातच उभी राहायचे. पण आता कुठे उभी राहू? दिनूने तर ते वाट पाहणारं अंगणही काढून घेतलं माझ्याकडून. तरी आपण आपल्या दिनूची वाट बघूया. तो शाळेतून आला कि पळत येऊन मला घट्ट मिठी मारायचा. माझ्या मांडीवर बसून जेवायचा, त्याला घास भरवताना मनी फार आनंद व्हायचा मला, वाटायचं कि माझा दिनू मोठा होऊच नये. रात्री लाईट गेली कि मला बिलगून माझ्या कुशीत झोपायचा.

शिक्षणासाठी पहिल्यांदा जेव्हा तो आपल्यापासून दूर गेला तेव्हा जगणं संपलं कि काय असं वाटलं होतं. अहो, कुठंय हो आपला दिनू?. आता तो कधीच माज्या कुशीत झोपणार नाही का हो, आता तो मला लाडाने हट्ट करत कधीच असं म्हणनार नाही का, "ये आई मला खुप भूक लागलीये गं. गोड गोड साखर पोळी बनवना. ये आई अगं मला खुप थंडी वाजत आहे तुझ्या ऊबदार पदराखाली घेऊन झोपना. त्याला सर्दी-खोकला, ताप आला कि माझा पदरंच सोडायचा नाही.

"ये आई तू माझ्याजवळंच बसून राहा'', असं म्हणायचा. त्याच्या डोक्यावरून हात फिरवत त्याला कुशीत घेऊन झोपले कि त्याला फार बरं वाटायचं. अहो, आपला दिनू चार लेकरांचा जरी बाप झाला ना तरी तो आपल्यासाठी चिमुकला दिनूच राहणार आहे. तो जगासाठी मोठा झाला असेल पण माझं आईपण अन् तुमचं बापपण त्याला आपल्यासाठी सदैव लहानच ठेवणार आहे. अहो, असं काय चुकलं आपलं कि आपल्या दिनूने आपल्याला घराबाहेर काढलं अन अनोळख्या वृद्धाश्रमात आणून सोडलं. आपण दोघं आकांताने रडताना कोणी कितीही जरी आपली समजूत काढली तरी मन मात्र दिनूशिवाय कुणाचीच हाक अन साद ऐकणार नाही. दिनूसोबत जगताना, त्याला डोळेभरून बघताना आयुष्य फार सुंदर होतं. मुलांसाठी चालताना आईवडिलांची पाऊलं कधीच थकत नाहीत. मग आईवडिलांच्या उतारवयात मुलं का थकतात हो?. माणसाजवळ कांही असो वा नसो. आईवडिलांचं असणं हेच खरं सुख: असतं.

आईवडिलांच्या असण्यातंच मुलांचं आयुष्य सुख:कर बनतं. जगातली सगळी नाती एकीकडे अन आईवडील एकीकडे. बाकी नाती जोपर्यंत पैसा जवळ आहे तोपर्यंतच टिकतात. पण आईवडील सदैव आपल्या मुलांजवळंच असतात. कुठलीही अपेक्षा न ठेवता. पण हे मात्र मुलांना का कळत नाही?. जगाच्या एवढ्या गर्दीत केवळ आईवडिलंच मायेनं विचारतात कि, कांही खाल्लंस का? कसा आहेस? काळजी घे. आईवडिलांशिवाय मुलांची काळजी करणारं कुणीच नसतं हो. आई आपल्या लेकराला नऊ महिने आधी ओळखते. पण मुलं मोठी झाली कि आईवडिलांचीच ओळख विसरतात. असं का बरं?. मुलं मोठी झाली कि, त्यांच्या मनातील आईवडिलांबद्दलचं प्रेम, जिव्हाळा, वात्सल्य, माया का कमी होते कुणास ठाऊक? मुलं आईवडिलांसोबत कितीही निर्दयीपणे वागली तरी आईवडील मुलांना आशिवार्दच देत असतात.

दिनूशिवाय एक क्षणही आईबाबांना नकोसा वाटत होता. दोन दिवसांनी आई बाबांना म्हणाली,

"अहो, एकदा दिनूला फोन लावुन द्या ना. मी बोलते त्याच्याशी. तरी बाबा म्हणाले, "वसु, अगं दिनू नाही बोलणार आपल्याशी. तू सावर स्वत:ला".

"नाही हो, तो आपल्या पोटचा गोळा आहे. आपल्याला का नाही बोलणार?. बाबांनी दिनूला फोन केला. "हॅलो, दिनू बाबा बोलतोय मी. अरे कांही खाल्लंस का. उपाशी पोटी ऑफिसला जाऊ नको. हॅलो दिनू बाळा, ऐकतोयंस का?. हे घे आईला बोल. आई रडत बोलत होती. "हॅलो, दिनू बाळा, कसा आहेस रे तुला बघावंसं वाटतंय रे दिनू. तुला बघण्यासाठी डोळे फार आसूसलेत रे. एकदा येऊन भेट रे दिनू. तुझ्या पाया पडते रे मी".

"आई, तुझं डोकं ठिकाण्यावर आहे का? अगं राहा ना तिथे दोघं आरामात. आता कशाची कमी आहे तुम्हाला? सगळं तर आहे ना तिथे. आणि काय काम आहे माझ्याकडे? मी ऑफिसमध्ये आहे आता. येईन संध्याकाळी. कृपया ठेव फोन आता".

दिनू फोनवर खुप रागाने बोलत होता. पण तरी आईबाबांना त्याचा मुळीच राग आला नाही. दिनू येणार म्हटल्यावर बाबांनी दिनूच्या आवडीची सोनपापडी आणली. तब्बेत ठिक नसतानाही आई स्वत: उठून दिनुसाठी साखर पोळी बनवली. दिवसभर दोघेही उपाशी पोटी दिनूची वाट बघत उन्हात बसले. सांजयेळ होत आली. दिनू आला. दिनूला बघताच आईबाबांचा आनंद गगनात मावेनासा झाला. दिनू आला आणि संतापात म्हणाला,

"तुम्ही दोघं मला सुखा:नं जगू देणार आहात कि नाही?. इथे कशाची कमी आहे? सगळं तर आहे ना. राहा ना दोघं निवांत".

आई आकांताने रडत दिनूच्या पायाजवळ पदर पसरून बसली. म्हणाली, "दिनू, अरे इथे तू नाहीयेस रे बाळा. तुझ्याशिवाय घास गोड लागत नाहीये रे. दिनू आम्हाला तुझा एकही रुपया नको. आम्ही तुला काहीही मागणार नाही. आम्ही दोघं घरात एका कोपऱ्यात पडून राहू. आमचा श्वास थांबेपर्यंत फक्त तुला डोळेभरून बघत राहुदेत रे. दिनू तुझी आवडती साखरपोळी केलीये रे. बस इथे तुला भरवते मी. दिनू तुझ्यापासून आम्हाला दूर करू नकोस रे बाळा. तुझ्या आठवणीतंच आमचा श्वास चालतो आहे रे. बाळा तुझ्या पायथ्याशी मी माझ्या मायेची ओंजळ ठेवते. त्या ओंजळीत तुझं प्रेम दे रे. घेऊन चल आम्हाला घरी. तू दिलेली मिर्ची-भाकरी हसत खाऊ आम्ही दोघं.

तुला दुसरं काही मागणार नाही. दिनू तुझ्यापुढे पदर पसरते रे मी. माझ्या पदरात भीक टाक. दिनू, आम्ही तुझ्याशिवाय जगू शकणार नाही रे. तुला बघत आम्हाला तुझ्याजवळंच राहुदेत. या थकलेल्या डोळ्यांना केवळ तुलाच पाहायचंय रे शेवटपर्यंत. तुझ्याशिवाय जगायचं म्हणजे आमच्या काळजाचा ठाव चुकेल रे दिनू. तुझी फार आठवण येतेय रे. आमचं मन खुप रडतंय रे तुझ्यासाठी. खुप आकांत होतोय रे काळजाचा. दिनू जग फार मोठं आहे बाळा. या जगाच्या गर्दीत आमच्याइतकं तुझ्यावर खरं प्रेम, माया कुणीही करणार नाही, तुला आमच्या छायेत सगळं भरभरून अन् फुकट मिळेल. प्रेम, माया, वात्सल्य. तू सगळ्या गोष्टी विकत घेऊ शकशील रे पण काळजी करणाऱ्या आईची माया तिचं वात्सल्य अन बापाची सावली पैशाने विकत घेऊ शकणार नाहीस.

आमच्या म्हातारपणाची काठी अन् आमच्या थरथरत्या हातांचा आधारं तूच आहेस. दिनू आम्हाला एकटं टाकू नकोस रे. आमच्या काळजाचा ठाव चुकण्याआधी तो तुझ्या ओंजळीत घे रे. आमच्या थकलेल्या डोळ्यात अश्रुंचे निखारे पेटवू नकोस बाळा. आईबाबा दिनूशी बोलत होते. पण दिनूचं लक्षच नव्हतं. आईबाबांच्या अश्रुंची किंमत दिनूला कळतंच नव्हती.

"आईबाबा मला तुमचं काहीही ऐकायचं नाही". दिनूने रागाने बॅग घेतली अन निघून गेला. आईबाबा त्याच्या मागे चालु लागले.

"दिनू, दिनू बाळा आम्हाला वृद्धाश्रमात ठेवू नकोस रे. आम्हाला तुझ्या पायथ्याशी मूठभर जागा दे रे आम्ही आनंदानं राहू.''

अशी आर्त हाक देऊ लागले पण दिनू ती हाक ऐकतंच नव्हता. दिनूने एकदाही मागे वळून त्यांना बघितलं नाही. आईबाबा डोळ्यात आसवं घेऊन आकांताने रडत दिनूला पाहत उभे होते. दिनूच्या आईबाबांच्या थकलेल्या डोळ्यांची, थरथरणाऱ्या हातांची, अधीर श्वासाची काळजातून एकच आर्त हाक होती. "दिनू, आम्हाला घरी घेऊन चल. वृद्धाश्रमात ठेवू नकोस रे बाळा".

देगलूर. जि. नांदेड.
मो. ९९६००२८८९९

कथा

गृ हि णी

- मुग्धा सुधीर टेंगशे

बरेच दिवसांनी भेटलेल्या मैत्रिणी गप्पात रंगवून गेल्या होत्या. पूर्वाला रुचिराने विचारले,

'सध्या काय करतेस गं? नोकरी वगैरे? तू तर सर्वात हुशार मैत्रीण माझी!'.

'नाही गं. थोडं नाराजीच्या स्वरात मी सध्या घरीच असते असे उत्तर मिळाले'.

पूर्वाची आजी बराच वेळ हे ऐकत होती ती मोठी अनुभवी स्त्री! पण पहा गृहिणी बद्दल ती काय बोलली!

''अगं गृहिणी होणं म्हणजे काही कमी काम नाही असं वाटतं का तुम्हाला? खरंच आहे. सगळ्या आघाड्या सांभाळून, न कुरकुरता घर चालवणारी गृहिणी काहीच काम करत नाही असं कसं म्हणता येईल? आजच्या मॅनेजमेंटच्या भाषेत बोलायचं तर 'अ हाऊस वाईफ इज अ गुड मॅनेजर! नोकरी करणाऱ्या, घर सांभाळणाऱ्यासर्व स्त्रियांना सलाम! नोकरी करणाऱ्यांना पगार,भत्ते,सुख सोयी मानसन्मान मिळतो. त्यांच्या वेळेचा, अभ्यासाचा, बुद्धीचा उपयोग होतो पण म्हणून गृहिणी, घर सांभाळणारी स्त्री काही कमी दर्जाची नाही पण तिच्या कलेचे,कष्टाचे, धडपडीचे, प्रयत्नांचे मोल केले जात नाही हे शल्य आहे!''



प्रत्येकाच्या घरातले हे एक जिवंत नाटक, जे दररोज घडते. पण एखादी दिवशी आई आजारी पडली तर त्या सकाळच्या चहा, आंघोळी, नाश्ता, जेवण, डबा, घराची स्वच्छता, देवपूजा, कपडे भांडी अशी कितीतरी कामे जागच्या जागी खोळंबतात आणि हिला काय कामे असतात? असे म्हणणारी मंडळी आई लवकर बरी होण्याची वाट बघतात! सकाळी धावपळ करत, स्वत:ची झोप लवकर संपून,नव्हे काही वेळा अर्धवट टाकून इतरांची सर्व कामे तत्परतेने तयार ठेवणारी गृहिणी काय काय कामे करते ते ती नसताना समजते. म्हणूनच काही वेळा 'अबसेन्स इज द प्रेझेंन्स' असतो.

नाश्ता मनासारखा नाही वाटला, चहा गरम नाही मिळाला, कपडे जागेवरच नाही सापडले, डबा वेळेत नाही मिळाला तर हक्काने रागावून, चिडून घेते ती गृहिणी! दिवसभर त्या रागाचा विचार करते हे माहित आहे का? ती घरातल्या सर्व मंडळींची आवड निवड, वृद्धांची बाळाची काळजी, पथ्य पाणी,औषधाच्या वेळा सांभाळते पण त्यात स्वत:कडे मात्र दुर्लक्ष करते! तिच्या आवडीनिवडी,वेळ, औषधे मागे पडतात कारण इतरांचे सांभाळताना वेळच नसतो तिच्याकडे! सकाळची धावपळ संपतो तोच दुपारचे मग संध्याकाळचे आणि रात्रीचे स्वयंपाक घर सतत चालू असते त्यामुळेच कुटुंबाला सुखी, समाधानी ठेवण्यासाठी अष्टप्रहर राबणारी गृहिणी काहीच करत नाही असे कसे म्हणता? गृहिणीला घरातली मंडळी जशी प्रत्येक कामासाठी गृहीत धरतात ना तसे येणारे पाहुणेमंडळी ही समजतात.

'वहिनी एवढं प्लीज करा हो दुपारी!'

ती वहिनी दुपारची झोप मोडून पाहुण्यांचे स्वागत सांभाळतेच आणि सांगितलेले कामही पूर्ण करते. घरातील छोटी मोठी काम, त्याचबरोबर बँक, एलआयसी, बिलभरण ही काम असतात. मुलांच्या प्रगतीकडे, अभ्यासाकडे, शाळेतील प्रोजेक्ट, मीटिंग, स्पर्धा, गॅदरिंग, सहल कितीतरी प्रांत तिच्याकडे निर्धारस्थपणे सोपवलेले असतात आणि तिथे आपले म्हणून सांभाळत असते. ही अष्टावधानी गृहिणी! आजकाल लहान मोठ्या मुलांच्या अपेक्षा आई-वडिलांकडूनच वाढल्या आहेत काळाची गरजच म्हणून या हवं तर? वेगवेगळ्या प्रांतातले निरनिराळे खमंग चवीचे पदार्थ,पेय, आधुनिक फॅशनचे कपडे, बूट हे सारे तयार ठेवावे लागते मग आहे त्या सीमित पगारात ही गृहिणी काटकसरीने जोडून रक्कम उभी करते म्हणजे सर्वांच्या समाधानाचा, हौसेचा विचार करते पण तिची हाऊस मोज? फार क्वचित विचारात घेतली जाते! गृहीत धरलेली गृहिणी असेच ना?

ताप असेल, सर्दी खोकला असेल, तरी इतर व्यक्ती औषध घेऊन झोप विश्रांती घेतात पण तिला मात्र घरातली कामे दिसत असतात आणि मग,थोडे बरे वाटले की ती का उठून कामे सुरू करते. संध्याकाळी मग,

'कशाला ग उठलीस? विश्रांती घ्यायची!' असं म्हटलं की झालं.

पण एवढे तरी आपल्याकडे लक्ष आहे या गोड समजूतीने ती पुन्हा टवटवीत राहते, तब्येत बरीच नसली तरी सुद्धा! घराच्या घट्ट रोवलेला खांब म्हणजे गृहिणी, जी सर्व काही नेटाने करते! तिला गृहीत धरणे चुकीचे वाटते कारण ती आहे म्हणून घराचे समाधान,आनंद, आहे. विविध पदार्थ, चवी, तयारी, स्वच्छता, पाहुणे आजारपण या सर्व आघाड्यांवर लढणारी रणरागिणी म्हणजे ही गृहिणी! काही वेळा तिला काही आराम द्यावा,कौतुक करावे तर तीही खुश राहील तिलाही असे वाटणार नाही की आपण फक्त गृह कर्तव्यांसाठीच आहोत.

आपणही या घराचा महत्त्वाचा घटक आहोत! ती करत असलेल्या प्रत्येक कामांचा सन्मान, घरातले तिचे महत्त्व आपल्या वागण्यातून दिसावे तो तर गृहिणीचा खरा महिला दिन होईल! एका दिवसाचे कौतुक वर्षभर पुरेल गृहिणीला कारण तिच्या अपेक्षा फार नाही! ती दररोज नव्याने उभी राहते नव्याने सज्ज होते अष्टावधानी, दहा हातांची तू तर रणरागिणी गृहिणी!

कोल्हापूर
मो. ८५३०७३४४०८

कथा

हिस्सा

मंदा देवाला हात जोडायची आणि म्हणायची "देवा माझ्या भाऊ वयनीचं हे गोकुळ असच भरभरून ठेव.. त्यायले कायी कमी नोको पडू देऊ" भाऊ वहिणीचं असं आदरातिथ्य पाहून ती समाधानाने काठोकाठ भरून जायची . मंदा साठी महादेवचं स्थळ आलं .. पाच एकर शेती , पाच सहा गाई म्हशी, दोनच भाऊ.. लहान भावाचं किराणा दुकान.. सगळं चांगलं आहे असं पाहून वडिलांनी मंदाचं लग्न उरकवलं होतं. सासरीही शेतीवाडी, दूधदुभतं, किराणा दुकान.. कशाची कमी नव्हती. दिराचं लग्न झालं.. त्याची बायकोही तिला मान द्यायची.

- सौ.विद्या निनावे



◆ मंदे लवकर लवकर उरकव नं.. आज तुहा हात काही चालून नाही राहिला वाटते.. उशीर होईल आटप लवकर "

"करून तं रायली काम.. जो वेळ लागाचा तोच लागल ना " मंदाने नवऱ्याला सुनवलं.

"करून राहिली.. पण कशी रमत गमत.. कोर्टात जाचं हाये ना.. मायबाई तो कोर्ट आपल्यासाठी थांबून राहील काय? "

"तुमाले त जास्तच घाई सुटली वाटते कोर्टात जाआची " ती फणकाऱ्याने बोलली .

"काय म्हणलं घाई सुटली.. अवं थो हक्क हाये आपला.. असा सोडून देशीन काय? " महादेव आता जरा नरमाईनं बोलला. आज खरच मंदाचा हात पाहिजे तसा चालत नव्हता जुन्या गोष्टी आठवून तिच्या पापण्या सतत ओल्या होत होत्या.. काम करता करताच तिने कितीदा पदर डोळ्याला लावला होता. लहानपणीच्या आठवणीने तिचं मन गहिवरून आलं.

"भातकं घेऊन मांगतलं अनं खाऊन काऊन नायी रायला रे?" मायनं मंगेशला विचारलं.

"खातो ना ते मंदी आल्यावर "

"मंदी बी बापासंग गेली हाय.. तिलेही काही घेऊन देईनच ना तुझा बाप.. तू आपलं खा ..ते आपलं खाईन " आजी नं सल्ला देल्ला.

"बरं खातो .."

आज आठवडी बाजाराचा दिवस.. त्यामुळे शेतात लावलेले दोडके, कारले, चवळीच्या शेंगा, कोहळा, लवकी घेऊन मंगेश मायसोबत बाजारात विकायला गेला होता. मंगेशचं गणित चांगलं पक्कं होतं.. भरभरा हिशोब करायचा त्यामुळे दर आठवडी बाजारात त्याची आई त्याला घेऊन जायची आणि बाजार संपल्यावर काहीतरी खाऊ घेऊन द्यायची. आजही तिने त्याला बटाटेवडे घेऊन दिले होते. पण मंदाला सोडून खाणं त्याला जीवावर यायचं, म्हणून तो तिची वाट पाहत थांबला होता.

"घे आली मंदि ..काय आणलं ओ त्या..? " मंदाच्या हातातील पुडका पाहून आजीनं विचारलं.

"काय घेऊन देऊ म्हणलं त तिनं राखी घेऊन मांगतली.." मंदाच्या बाबा ने भिंतीला पाठ टेकत सांगितले.

"हो राखी आहे वाटते सोमवारी.. मले यादच नोयती " मंदाच्या आईने चुलीतल्या काड्या ओढता ओढता सांगितले. बाजारातून आल्यावर ती स्वयंपाकाला लागली होती.

"भाऊ कुठं गेला? मले राखी दाखवाची हाये त्याले " मंदा खूप आनंदाने उड्या मारत म्हणाली.

"तो तिकडं गेला.. नाम्याच्या घराकडे गेला असन.. पाय कुठं गेला त.." आजीनं बोट दाखवत सांगितले. इतक्यात मंगेशच घरी आला .

"पाय तुझ्यासाठी राखी घेतली म्या.. आवडली का तुले सांग बरं? " त्याच्या हातावर राखी ठेवत मंदा त्याचा हात निरखून बघत होती.

" हो हे त एक नंबर हाये व मंदे! " मंगेश राखी बघून आनंदून गेला.

"हे घे.. कवाची तुह्यी वाट पाहून रायलो " मंगेशने खिशातली पुडी काढत मंदाच्या हातात ठेवली.

"काय व्हय हे? " मंदाचा बालसुलभ प्रश्न.

"आलू बोंडे होये.. तुले आवडते नं?" म्हणत मंगेशने एक आलुबोंडा मंदाला दिला आणि एक स्वत: घेतला.

"देवा या बहीण भावाचं पीरम असंच ठेव.. कधी त्यायची ताटातून नको होऊ देऊ" आजीने खाटल्यावरूनच देवाला हात जोडले.

मंगेश दहा वर्षाचा तर मंदा आठ वर्षाची.. दोघेही बहिण भाऊ एकमेकांना टाकून काही खात नसत. मंदाला शाळेत सरस्वती पूजनाला गोळ्या मिळाल्या कि ती घरी येऊन फ्रॉकच्या कोपऱ्यात गोळी धरून दोन तुकडे करायची आणि मंगेशला एक तुकडा द्यायची. दोघांचे एकमेकांवर निस्सीम प्रेम होते.

आज तो प्रसंग आठवून मंदाला गलबलून आलं आणि पुन्हा पापणकडा ओलावल्या.

"कायले तरी सरकार नं हा कायदा काढला असंन बहिण भावाच्या समान वाटणीचा! " ती रागातच पुटपुटली .

होय, आज तिच्या वडिलांच्या शेतामधला अर्धा हिस्सा तिला मिळणार होता. त्यासाठी तिच्या नवऱ्याने किती खटपट केली होती. तिला भावाकडून हिस्सा घेणे मान्य नव्हते पण नवऱ्यापुढे तिचं काहीच चाललं नाही. वडिलांच्या माघारी मंगेशने कष्टाने शेतमळा छान फुलवला होता. तीन एकरात ज्वारी,कापूस, भुईमूग, तुरीची लागवड करत होता तर एका एकरात भाजीपाला पिकवत होता. बरं चाललं होतं त्याचं. भाजीपाला गावातल्याच व्यापाऱ्यांना विकायचा त्यामुळे आठवडी बाजारात दुकान लावायची गरज पडत नव्हती. आणि शेतात लक्ष देता येत होतं. दर दिवाळीला तो मंदाला साडी घ्यायचा.. भाच्यांना कपडे घ्यायचा.. त्याची बायको कुरकुर करायची पण तो तिच्याकडे लक्ष देत नव्हता. आई वडिलांच्या माघारी भाऊ आपलं माहेरपण जपतो म्हणून मंदाही खूप खुश होती. भावजयही डाळ दाणा, नवाळीचा भाजीपाला, चने, तीळ, धने आवर्जून द्यायची.

मंदा देवाला हात जोडायची आणि म्हणायची "देवा माझ्या भाऊ वयनीचं हे गोकुळ असच भरभरून ठेव.. त्यायले कायी कमी नोको पडू देऊ" भाऊ वहिणीचं असं आदरातिथ्य पाहून ती समाधानाने काठोकाठ भरून जायची. मंदा साठी महादेवचं स्थळ आलं .. पाच एकर शेती , पाच सहा गाई म्हशी, दोनच भाऊ.. लहान भावाचं किराणा दुकान.. सगळं चांगलं आहे असं पाहून वडिलांनी मंदाचं लग्न उरकवलं होतं. सासरीही शेतीवाडी, दूधदुभतं, किराणा दुकान.. कशाची कमी नव्हती. दिराचं लग्न झालं.. त्याची बायकोही तिला मान द्यायची. सगळं छान सुरू होतं पण अचानक दिराला दारूचं व्यसन लागलं आणि त्यात हळूहळू त्याने किराणा दुकान गमावलं. भावा भावांची भांडण व्हायला लागली आणि एक दिवस त्याने "माया हिस्स्याचं वावर मले पायजे " म्हणून भावाच्या मागे तगादा लावला. त्याची बायकोही वाटणीसाठी भांडण करायला लागली. शेवटी अडीच एकर वावर अन् दोन गाई, दोन म्हशी त्याला महादेवनं दिल्या. आता ते दोघे वेगळे राहू लागले. महादेवकडे अडीच एकर वावर, दोन गाई, दोन म्हशी, एक कालवड एवढंच राहिलं होतं. धनधान्यांनं दूधदभत्यानं भरलेलं घर आता असं खाली झालेलं पाहून त्याला वाईट वाटत होतं. पोरं शिक्षण घेत होते. त्यांच्या भविष्याची चिंता त्याला सतावत होती.

"काहून काय चा विचार करून राहिले? " मंदाने विचारात गढलेल्या महादेवला विचारले.

"मंदे आपल्या पोटी दोन पोरं हाये.. त्यायच्या भविष्याची चिंता मले सतावून रायली.. अडीच एकरात ते काय खातीन अन् काय ठेवतीन सांग तूच?"

"तुमी कायले चिंता करता.. तो भगवंत आहे ना.. पायते सगळं.. चोच देल्ली तं घास बी तोच देते.. तुम्ही उबारी जीवाले घोर नोका लावून घेऊ"

"तसं नाही व मंदे.. पन चिंता तं वाटतेच नं.. याच्याही दोन वाटण्या केल्या त एकेकाले कितीक येईन.. एक सव्वा एकर!"

"शिकून रायले ना पोरं.. करतीन कायी कामधंदा"

"पण कायच्या भरोशावर.. मी काय मनतो.. तू आपल्या भावाले तूहा हिस्सा माग नं.. तसंही बापाच्या प्रॉपर्टीत पोरीले समान हिस्सा भेटते" महादेवनं सुतोवाच आपला विचार बोलून दाखवला.

"काहीही काय बोलून राहिले वं तुमी.. मी काही हिस्साबिस्सा मांगनार नाही सांगून ठेवतो.." मंदा नवऱ्यावर खवळून बोलली.

"अवं मायमाझे जराक पोरायचा इचार कर.. आपलं तं गेलं आयुष्य.. पन पोराचं कसं जाईन?" महादेव मंदाला समजुतीच्या सुरात बोलला.



त्या रात्री मंदाला झोपच लागली नाही. भावाला वाटणी मागायची. त्यासाठी तिचं मन तयार होत नव्हतं. महादेव तिला परोपरीने समजावत होता. कधी कधी तो वाटणीवरून मंदाशी वाद घालायचा. रोजची भांडणे, वाद, अबोला त्याचा आता मंदाला कंटाळा आला होता. इकडे आड तिकडे विहीर अशी तिची अवस्था झाली होती. शेवटी भावाकडे जाऊन त्याच्या कानावर ही गोष्ट घालावी म्हणून ती माहेरी जायला तयार झाली

"मंदे एकटीच आली का वं बाई.. जावईबापू दिसत नाही.. सगळं ठीक हाये नं?" मंगेशने मंदाला काळजीने प्रश्न केला.

"हा सगळं ठीक हाय ..त्यायनच पाठोलं मले" मंदाने भितभितच सांगितले.

"अव वने.. बाई आली हाय.. पाय धुवाले पाणी आण" मंगेशने वनिताला आवाज देऊन सांगितले. मंदाला एकटी आलेली पाहून वनितालाही जरा धक्काच बसला पण ती काहीही बोलली नाही. घरात जाऊन हात पाय धुण्यासाठी पाणी घेऊन आली.

"बाई हात पाय धुवा तुमी.. मी चहा मांडतो " वनिताने पाण्याचा गडवा मंदाच्या हातात दिला.

मंदाने गडव्यातील पाणी पायावर टाकले ..त्यातले थोडे पाणी चेहऱ्यावर मारले. आता तिला जरा ताजेतवाने वाटत होते. मंगेशने तोंड पुसायला टावेल दिला. तोपर्यंत वनिता चहा घेऊन बाहेर आली. तिघांनी चहा घेतला.

"बरं मंदे तू आराम कर.. मी वावराकडून येतो चक्कर मारून" असे म्हणून मंगेश शेतावर गेला.

वनिताने तिला खाट टाकून दिली. घरातून एक चादर आणून त्यावर टाकली.

"बाई आराम करा तुमी मी सयपाकाचं पायतो " असं म्हणून ती स्वयंपाक खोलीकडे गेली. मंदा प्रवासाने खरच थकली होती त्यामुळे तिचा पटकन डोळा लागला.

"बाई उठता का.. झाल पडली " वनिताने तिला आवाज दिला.

तशी ती उठून बसली. मंगेश खाट टाकून अंगणात बसला होता. त्याने शेतातून तिच्यासाठी काशी कोहळ, वांगे, कारले,तुरीच्या शेंगा आणल्या होत्या. ती आतमध्ये गेली. वनीताचा स्वयंपाक होतच आला होता. देवाजवळ देव्हाऱ्यात ती दिवा वात करत होती. मंदाने तोंडावरून पाणी घेतले आणि देवाला नमस्कार केला. बाजूलाच आई-बाबांच्या फोटोकडे पाहून नमस्कार केला आणि मनातल्या मनात त्यांची माफी मागितली. थोड्यावेळाने मंगेश ही आतमध्ये आला. गावातल्या, शेतातल्या, पिक पाण्याच्या गोष्टी करता करताच त्यांची जेवणं झाली. त्यादिवशी तिने काही वाटणीची गोष्ट काढलीच नाही. रात्री तिला झोपच येत नव्हती. वाटणीचा विषय कसा काढायचा म्हणून ती खूप अस्वस्थ होती. कधीतरी तिचा डोळा लागला. दुसऱ्या दिवशी चहापाणी झाल्यावर मंगेशनेच तिला विचारले,

"मंदे सगळं ठीक आहे ना बाई कालपासून पायतो तू काहीतरी लपवून रायली असं वाटून राहिलं.." मंगेशच्या अचानक आलेल्या प्रश्नाने ती भांबावली.

"अ..हो सगळं ठीक हाय"

"मंग जवाईबापू काहून नाही आले.. अन् त्यायनच पाठवलं म्हणत होती तू? "

"हो त्यायनच पाठोलं..

तिने आवंढा गिळतच सांगितले.

" काय झालं सांग मले.." मंगेशने तिला धीर दिला.

"भाऊ.. ते मले वावरातला हिस्सा मांग मनते" सांगताना तिचा कंठ भरून आला. दरवाज्याच्या कोपऱ्यात उभी राहून वनिता सगळं ऐकत होती.

"काय वावरात हिस्सा.. पण आम्ही काय खाऊ.. पोराचं शिक्षण हाय.. लगनयव हाये कायच्या भरोशावर कराचं आमी? " वनिता एका दमात सगळं बोलून गेली. मंगेश तर एकदम चूपच होऊन गेला. काय बोलावं त्याला कळेना. तो उठून तसाच बाहेर गेला. वनिता ही आतल्या खोलीकडे वळली. आज तिला माहेर परकं झाल्यासारखं वाटलं.. तिने आंघोळ केली आणि गावाला परत जाण्यासाठी आवराआवर सुरू केली. वनीताने स्वयंपाक केला होता. तिने ताट वाढून आणले पण मंदाच्या घशात आज घास जात नव्हता. ज्या भावाला सोडून आपण कधी काही खाल्लं नाही त्यालाच आज हिस्सा मागण्याची वेळ आली याचे तिला खूप वाईट वाटले. तिने कसेबसे दोन घास पोटात ढकलले. वनीताने तिच्यासाठी शेंगा, कोहळं , वांगे , कारले एका पिशवीत भरून ठेवले होते. तिला जाणवत होते की नवऱ्याच्या सांगण्यावरून ही हिस्सा मागत आहे.

"बाईचं जीवन हे असंच असते बाई.. नवरा म्हनन ते आयका लागते

आता काय करता?" वनिताच्या बोलण्याने मंदाला गहिवरून आले आणि ती तिच्या गळ्यात पडून ओक्साबोक्शी रडायला लागली. वनिताने तिला पाठीवरून हात फिरवून समजावले.

"भाऊ नाही आला का?"

"नाही आले.. कुठे गेले त माहित नाही बा.." मंदाने जड अंतकरणाने घराचा निरोप घेतला. पुन्हा या घरात यायला मिळेल की नाही या भावनेने तिचा कंठ दाटून येत होता. तिला बसस्टॅन्डपर्यंत सोडायला वनिता सोबत आली. शेवटी भावाची भेट झालीच नव्हती.

घरी आल्या आल्या महादेव ने प्रश्न केला,

"काय म्हने.. मानला का तुह्या भाऊ?"

"कायीच बोलला नाही.. भाहीर चालला गेला.." मंदाने भाबडेपणाने सांगितले.

"असा कसा बोलत नाही.. वकिलाकडूनच नोटीस पाठवतो त्याले.." महादेव रागाने लाल झाला होता. आता हा काय करणार म्हणून मंदाचे हात पाय थरथर कापत होते. दुसऱ्या दिवशी महादेवने तालुक्याला जाऊन वकिलाचा सल्ला घेतला. खूप खटपट करून त्याने वकिलाकडून मंगेशला कायदेशीर नोटीस पाठवली आणि शेतात समान हिस्सा मिळवण्यासाठी न्यायालयात दावा दाखल केला. आज त्याचीच कोर्टात सुनावणी होती. मंदा महादेव सोबत कोर्टात गेली. ती भिरभिरत्या नजरेने इकडे तिकडे मंगेश तिचा भाऊ कुठे दिसतो का बघत होती. थोड्या वेळाने मंगेश वनिता सोबत तिथे आला पण मंदाकडे न पाहताच समोर निघून गेला. थोड्या वेळाने त्यांची पेशी सुरू झाली. मंगेशने काहीही न बोलता मालमत्तेचे कागदपत्र कोर्टात सादर केले. हिंदू वारसा हक्क कायद्यानुसार मंदाला शेतात समान हिस्सा मिळाला.

"बाई तुम्ही हे चांगलं नाही केलं.. आमाले कोर्टकचेरी दाखवली व.. तुमच्या हिश्यासाठीच हे वकिलाकडे गेले होते.. तुमाले हिस्सा द्यायचा त्यायचाही विचार होता.. पोराच्या एडमिशनसाठी बाहेरगावी गेले.. त्याच्यानं जरा उशीर झाला होता. पण तुम्ही तं डायरेक्ट नोटीसल धाडली बाई.. एवढा भरोसा नाही होता का तुमचा भावावर?"

ते ऐकताच मंदाच्या डोळ्याला धारा लागल्या. ती माफी मागायला पुढे झाली पण तोपर्यंत मंगेश कोर्टातून निघून गेला होता. आज वारसा हक्काने तिला वडिलोपार्जित मालमत्तेत हिस्सा तर मिळाला होता पण राखीचा धागा कायमचा तुटला होता. ती अगतिकपणे पाठमो०या भावाकडे आणि लालसेपोटी अंध झालेल्या नवऱ्याकडे पाहात होती. आज ती हतबल झाली होती.

जड पावलांनी मंदा नवऱ्याबरोबर घराकडे परतली. डोळ्यातून आसवांचा पूर काही केल्या थांबायचं नाव घेत नव्हता. तिने डोळे पुसतच स्वैपाक केला. नवऱ्याला जेऊ घातलं पण तिच्या घशाखाली काही घास उतरला नाही. विचार करत करतच रात्री कधी डोळा लागला कळलेच नाही. इकडे मंगेशचीही स्थिती काही वेगळी नव्हती. कोर्टातून आल्यापासून तो भिंतीला टेकून शांत बसला होता. नवऱ्याच्या मनाची घालमेल वनिताने ओळखली.

"बायकायचं जीवन हे असच असते.. लग्न झाल्यावर नवऱ्याचं सारं आयका लागते.. तिले तिचं काही मत राहात नाही. मंदा बायीच्या मनात नसन तसं कायी पन भावजीचं आयका लागलं असन.." ताट वाढता वाढता वनिताने मंगेशला समजाविले.

"मले भुक नायी..तु जेऊन घे" म्हणतच तो बाहेर जाऊन झोपला.

दुसऱ्या दिवशी सकाळी मंदा गोठ्यात गाईला वैरण टाकत होती तेवढ्यात तिला आवाज आला.

"बाई हाय का घरात... कुठं गेल्या?" आवाज ऐकून मंदा धावतच गोठ्याबाहेर आली. बघते तर काय मंगेश आणि वनिता समोर उभे! त्यांना पाहून तिला आश्चर्याचा धक्काच बसला.

"तुमच्यावर राग धरून बसले पन त्यायचा जीव कायी मानत नायी होता..बहिन भावाचं नातं हाये बाई असं तोडल्यानं तुटते काय?"

वनिताचं बोलणं ऐकून मंदाच्या डोळ्याला पुन्हा धारा लागल्या पण यावेळी त्या आनंदाच्या होत्या. तिने वनिताला गच्च मिठी मारली. मंगेशने तिच्या डोक्यावरून हात फिरवीत "मले माफ कर मंदे.. मी चुकलोच.." असे म्हणताच तिच्या भावनांचा बांध सैरावैरा पळू लागला. त्या फुटलेल्या बांधाने मनातील सर्व राग, द्वेष, किल्मिषं वाहून नेले...कायमचे..!!

नागपूर
मो. ८७६६५८४०६१



कथा

तालेबंदचा बळी

शेवटी गौतमनं आपला निर्धार बोलून दाखवला." निशांत मी सायकलनं जायचं ठरवलं. तीनशे किलोमीटर माझ्यासाठी काही कठीण नाही. तीन दिवसांत मी आरामात पार करेल. थांबलो असतो पण, पुढं वाहनं कधी सुरू होतील याचा नेम नाही आणि बाबांची काळजी वाटते रे! आणि हो मी माझ्या ठेकेदारास फोन करून सांगेल, माझा पगार तू घेऊन घेशील. वाचलेल्या पैशांत किराया, दूधवाल्याचे पैसे देऊन देशील आणि वाचलेच तर सध्या तू ठेवून घेशील. आज तू जी मदत केली ना दोस्ता, ती मी कधीच विसरू शकणार नाही!!" गौतम एका दमात सारं बोलून गेला.

- लीलाधर रामेश्वर दवंडे



सायंकाळचे साडे सहा वाजले होते. गौतम आपली जनरल शिफ्ट करून कंपनीतून नुकताच घरी आला. फाटकाजवळ सायकल लावून घरमालकाशी रामराम घेत त्याने आपल्या खोलीचे दार उघडले. गौतमचं लग्न व्हायचंच, त्यामुळे सद्या तो आणि त्याच्याच कंपनीतील निशांत येथे किरायाने राहत होते. साधारण दोघांना दीड हजार द्यावे लागत होते. घरमालक तसा बरा होता. किरायासाठी फार त्रास द्यायचा नाही. दार उघडून लाईटची बटण दाबत नाही तर त्याचा मोबाईल वाजला. भोवरी गावाहून त्याच्या आईचा फोन होता.

"हं बोल आई, मी गौतम बोलतो. कशी आहेस? अन् कसा का फोन लावलास?" गौतमनं काळजीनं विचारलं.

काळजीचे भाव त्याच्या मुख मंडलावर ताणल्या गेले. कारण, दोन दिवसांपूर्वीच तो आईशी बोलला होता. आई तशी निदान आठवडाभरातून एकदाच फोन करायची. पण, आता तर दोनच दिवस झाले होते.

"कसा आहेस मा गौतम? आरे हिकडं टीव्हीवर काईन न काई दाखवत हाये. करुणा का कोणचा त रोग आला म्हणते बाप्पा!" एका दमात सारं बोलून घ्यावं, तशी मंगलाबाई बोलून गेली.

'"अगं जरा धीर धर! इकडं सर्व ठीक आहे. पाच सहा दिवसांनी पगार होणार आहे. सुट्ट्या काढून येतो आहे तिकडे. काही काळजी करू नकोस! अन् बाबा कसे आहेत? त्यायचा दम्याचा त्रास कमी झाला का नाही?" गौतमने हातातला जेवणाचा डबा तुटक्या लाकडी खुर्चीवर ठेवत, मोठ्या काळजीनं विचारलं.

"तुया बापाचं काई खरं न्हाई बापू! रातभर निजू देत न्हाई. अन् रोज रोज कोण नेईन बाप्पा दवाखान्यात? म्हणून तं फोन केलता म्या!" मंगलाबाईनं सुस्कारा सोडत म्हटलं.

"आई काळजी घे बाबांची, मी येतोच पाच सहा दिवसांनं अन् मोबाईल चालू ठेव, मी उद्या करीन!" असं म्हणून गौतमनं फोन कट केला. बापाची काळजी त्यांच्या मनात घर करून गेली. गेल्या तीन वर्षांपासून बाप सुखदेव दम्याने त्रस्त होता. एवढ्यात त्याला होणारा त्रास अधिकच वाढला होता. वय पण होत आलं होतं.

गौतमनं हातपाय धुतले. त्याचं मन कशातच लागत नव्हतं. कॅलेंडरवरील २५ मार्चवर त्यानं काहीतरी लिहिलं. रिमोटला ठोकठाक करून जरा टीव्ही लावली. ज्या वाहिनीवर बघावं त्यावर पंतप्रधानांचे राष्ट्राला संबोधन सुरू होते.

"कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशात आज रात्रीपासून लॉकडाऊन"

या आशयाची मुख्य ओळ सर्व वाहिन्यांवर सतत ये जा करत होती. गौतमच्या मनात धस्स झालं. तो तसाच टीव्ही बघत राहिला. सर्व प्रतिष्ठाने बंद, कंपन्या बंद, वाहने बंद, कुणीही घराबाहेर पडायचे नाही, अमूक अमूक जागी इतके प्रभावित रुग्ण सापडले... कॉरंटाईन... हात धुवा... तोंड झाकलेली माणसं, अशा बातम्या पटापट टीव्हीवर झळकत होत्या. बाहेर काळोख दाटत चालला होता आणि गौतमच्या मनात चिंतेचे ढग बरसू लागले. इतक्यात कुणीतरी दरवाजा ढकलल्याचा आवाज आला. गौतम भानावर आला. निशांत होता. गौतमनं भिंतीवरच्या जुनाट घड्याळाकडं पाहिलं, रात्रीचे साडेनऊ वाजत होते.

"अरे काय दोस्ता! तब्येत गी बरी आहे नं! नाही... साडे नऊ वाजत आले तरी तू असाच दिसलास बसून, म्हणून विचारले."

निशांतनं ओठावर उसणे हसू आणत विचारलं.

"नाही यार मला काहीच झालं नाही, थोडी बाबांची काळजी वाटते आहे. त्यांचा दम्याचा त्रास वाढला आहे. आईचा फोन आला होता. पगार पाणी भेटला असता तर आजच निघालो असतो गावाकडं. पण..."

त्यापुढे शब्द गौतमला सुचेनासे झाले. अवेळी दाटलेले डोळ्यातील ढग निशांतनं ओळखले.

"अरे हे काय दोस्ता! पगार नाही तर काय झालं? तुला जायचं आहे काय? मग पैशाची चिंता करू नकोस. हा दोस्त आहे नं तुझा! उद्या रात्रीपर्यंत जमवतो मी!" स्वत:च्या छातीला हात लावत एक हात गौतमच्या गळ्यात घालून निशांतनं शाश्वती दिली.

थोडा वेळ दोघांनाही काय बोलावं सुचत नव्हतं. दोघांनीही आंघोळ केली आणि मिळून स्वयंपाक केला. जन्मापासून चिकटलेली ती भूक लागली. जेवले... झोपले...दुसरा दिवस मात्र मोठा वाटू लागला. कधी रात्र होते यासाठी गौतमला बरीच वाट बघावी लागली. त्याने सुध्दा एक दोघांशी पैशासाठी बोलून बघितले. पण, महिन्याचे शेवटचे दिवस सर्वांनाच भारी जातात. मग निशांत कसे काय जमवेल? हा प्रश्न त्याला त्या लांबलेल्या दिवसभर सतावत राहिला. शिफ्ट संपली नि अन्य कुठे न जाता तो सरळ घरी आला. गार पाणी चेहऱ्यावर मारून डोळ्यांची मलीनता दूर करू लागला. अगदी अर्ध्या तासानं निशांत आला. गौतमच्या डोळ्यांतील भाव जाणून त्यानंच म्हटलं, "झाले यार तुझे काम, चिंता नको करुस!"

गौतमनं त्याला एक घट्ट मिठी मारली. सारं काही नि:शब्द होतं. पुन्हा दोघांनी मिळून स्टोव्हवर स्वयंपाक केला नि कसंबसं जेवण केलं. झोपण्यापूर्वी निशांतनं गौतमच्या हातात सात हजार रुपये ठेवून आवश्यक सामान बांधण्यास सांगितलं. प्रश्न होता जायचं कसं? साधनं तर बंद झाली...

शेवटी गौतमनं आपला निर्धार बोलून दाखवला." निशांत मी सायकलनं जायचं ठरवलं. तीनशे किलोमीटर माझ्यासाठी काही कठीण नाही. तीन दिवसांत मी आरामात पार करेल. थांबलो असतो पण, पुढं वाहनं कधी सुरू होतील याचा नेम नाही आणि बाबांची काळजी वाटते रे! आणि हो मी माझ्या ठेकेदारास फोन करून सांगेल, माझा पगार तू घेऊन घेशील. वाचलेल्या पैशांत किराया, दूधवाल्याचे पैसे देऊन देशील आणि वाचलेच तर सध्या तू ठेवून घेशील. आज तू जी मदत केली ना दोस्ता, ती मी कधीच विसरू शकणार नाही!!" गौतम एका दमात सारं बोलून गेला.

"हे काय यार गौतम, अरे आपण दोस्त आहोत. मी नाही कामी पडेल तुझ्या तर अर्थच काय आपल्या दोस्तीचा...!" पुढले शब्द निशांतच्या मुखातून बाहेर पडेना.

गौतमनं त्याची बॅग भरली. सायकलच्या चाकांत हवा भरली. तेल दिले. निजण्याचा प्रयत्नांत अधून मधून त्याच्या डोळ्यांची उघडझाप सुरूच होती. पहाटेचे तीन वाजले होते. अधूनमधून कुत्र्यांचं भेसूर भुंकणं सुरू होतं. गौतमनं आपली तयारी सुरू केली. बॅगमध्ये पाण्याची भली मोठी पाण्याची बॉटल आणि काल रात्रीला आणलेला ब्रेडचा पुडा, बिस्किटाचा पुडा ठेवला. रात्रीच्या उरलेल्या स्वयंपाकातून दोन घास कसे बसे खाल्ले. चहा घेतला. मोबाईल फुल चार्ज करुन घेतला. एकवार निशांतकडं बघितलं. निशांत बिनधास्त घोरत पडला होता. एक चिठ्ठी त्यानं निशांतच्या उशाला ठेवली. खोली समोरूनच दिसणाऱ्या देवळातील गणेशाला नमस्कार केला अन् आई वडील, गाव भेटीचं स्वप्न घेऊन सायकलवर स्वार होऊन तो पहाटे चारच्या सुमारास निघाला. समोरचे दिसावे म्हणून मोबाईलचा टॉर्च लावला. चार्जरसोबत घेतलेच होते.

एमआयडीसी अजून जागीच होती. सकाळची शिफ्ट असलेली मोजकी मंडळी चोरून लपून जात होती. पहाट होण्यापूर्वी गौतमनं एमआयडीसी सोडली. तो कधीचाच मुख्य रस्त्यानं लागला होता. निदान साताठ गावे त्याने सूर्य गगनमंडपी येण्याच्या पूर्वीच मागे सोडली होती. सकाळचे दहा वाजायला आले होते. खैरी गावाजवळील एका लहानशा टपरीवर त्यानं चहा घेतला. तेवढ्यात ग्राम पंचायतीची गाडी फिरली.

"सर्व दुकाने बंद करा. गाव सोडून कुणीही जावू नये आणि बाहेरून कुणी आल्यास त्याची ग्रामपंचायतकडे नोंद द्यावी. चौकात कुणीही बसू नये. सर्वांनी मास्क लावावे." हे ऐकताच गौतमनं चहावाल्याचे पैसे दिले



आणि आपली सायकल दमटवली. बाबाची काळजी, नोकरीची चिंता आणि आईची ममता उरात घेऊन सायकल चालवू चालवू पायांत जीव उरला नव्हता. सूर्य मावळतीला उतरला होता. कुठल्या गावात थांबण्या ऐवजी त्यानं महामार्गावर एका सुनसान असलेल्या मोडक्या घरात थांबणं पसंत केलं. हातापायावर घेण्यास सुद्धा पाणी नव्हतं. त्यानं जवळ असलं नसलं थोडं फार खाऊन पाण्याचे घोट घेतले. चक्रव्यूहात फसलेल्या त्याच्या त्या परिस्थितीवर सध्या काळ सुध्दा हसत होता. एकवेळ त्याच्या मनात येऊन गेलं, "साल एवढ्या दूरच्या चीनमंदून हा रोग आपल्या देशात आला, तो काही पैदलतं आला नसन! सरकार बी मोठ्यायले सोडून. गरीबालेच धरते. ईची बीन इमान बंद केले असते तं हे सारे लफडे झालेच नसते!"

याच विचारात असताना त्याच्यावर निद्रा माय केव्हा प्रसन्न झाली काही कळलंच नाही. सकाळी जाग आली तेव्हा सारं अंग जड वाटत होतं. शरीरात पाण्याची कमी जाणवत होती. अंगात त्राण नसल्यासारखं वाटत होतं. काल त्यानं १०० किमी च्या आसपासचा पल्ला निरा सायकलनं गाठला होता. बैठक बसू देत नव्हती. उरलेल्या पाण्यातून दोन घुट पाणी पिऊन गौतम पुन्हा पुढल्या प्रवासाला निघाव तोच सायकलच्या मागच्या चाकानं हवा सोडल्यासारखं वाटलं. आता पंक्चरचं दुकान कुठून शोधणार? डोक्यावर कुणी तरी घन आपटावा तसं झालं. पुढला दोनशे किमीचा रस्ता पार कसा करावा हा बिकट प्रश्न त्याला हादरवणारा होता. संकटं एकट्यानं येत नाहीत, हेच खरं. क्षणात वाटलं समोरच्या त्या रेल्वे रुळांवर जावून जीव द्यावा. पण अचानक काळोखाला भेदून एखाद्या किरणाने प्रकाशाचं रूप घ्यावं तसं त्याचं झालं.

"सायकल पंक्चर झाली म्हणून काय झालं! आपले पाय तर मोडले नाही ना!"

असा विचार करून त्यानं सायकल त्या मोडक्या घरातच ठेवली. आता सायकल सुध्दा ताळेबंद झाली होती. सोबत सामान घेतले तोच ज्या रुळांवर जीव द्यावा त्याला वाटत होतं, त्याच रुळावरून जाणारी सात आठ बाया माणसे त्याला दिसली. साऱ्यांचे कपडे आणि चेहरे मलीन झाले होते. त्याला आठवलं, आता तर रेल्वे सुध्दा बंद आहे. शिवाय या रुळानं गेल्यास पोलीस सुध्दा पकडणार नाहीत. त्याची पाऊले आता गावाच्या ओढीनं चालायला लागली. तो त्या जत्थ्याजवळ जाऊन पोहचला. क्षणासाठी ते सुध्दा दचकलेत. विचारपूस झाली तर कळले ते सुध्दा एमआयडीसीतून आले असून त्याच्याच गावाआधीच्या पेंढरीस चालले होते. गौतमला आता त्यांचा आणि त्यांना गौतमचा आधार मिळाला होता. त्यानं फोन काढला. त्यात अजून अर्धी बॅटरी वाचली होती. सोबत असलेल्या एकानं घशाला कोरड पडल्या गौतमला पाणी दिलं. गौतमनं त्यांना ब्रेड दिले. अनोळखी माणसांत माणुसकी पाझरली होती. आयुष्यात कधी असे सुध्दा दिवस येतील असं चुकूनही वाटलं नव्हतं. शहरात जाऊन मोठं व्हायचं त्याचं स्वप्न आता स्वप्नच राहिलं होतं. निदान चार एक तास चालल्यावर त्यांनी पायांना, पोटाला काही तरी विसावा दिला. रेल्वेच्या रुळांवर असलेल्या एका पाईप लाईन मधून पाझरणाऱ्या पाण्यातून त्यांनी हातपाय, चेहरे धुतले. बॉटल भरल्या. त्यांच्यापैकी एकानं तर रुळाशेजारी पडलेलं शिळं अन्न उचलून खाल्लं. गौतमच्या डोळ्यांनी हे सहन झालं नाही. अर्ध्या तासाच्या विश्रांती नंतर आता पुन्हा या बिऱ्हाडाची वारी सुरू होणार होती. सरकार म्हणे आपापसांत अंतर ठेवा. पण, इथं तर मनं जुळली होती. कधी ओळखीची नसलेली माणसं एकमेकांचा आधार झाली होती. त्यानं आईला फोन लावला. एकदा उचलला नाही म्हणून परत लावला. डोईवर संकट होते, तेव्हा वेळ कुठून कळणार? दुपारचे तीन वाजले होते. पलीकडून आवाज आला,

' हेलो! हेलो!",

पण बोलणं होत नव्हतं.

"आई मी गौतम बोलतो. मी निघालो आहे आई. उद्यापर्यंत पोहचतो. बाबा कसे आहेत?" गौतमनं विचारलं.

"तुया बापाचं काई खरं दिसत न्हाई बापू, तू लवकर ये! आन गाळ्या घोळ्या त बंद हाये, तू कायनं येत हाये?" मायच्या काळजीनं मंगलाबाईनं विचारलं.

" तू काही काळजी करू नकोस! माझ्यासोबत अल्याडच्या गावचे लोकं पण आहेत. बस्स! उद्या सांजवरी येतोच. आता ठेव. बॅटरी कमी आहे." असे म्हणून त्याने फोन कट केला.

त्याची पावले आता झपझप चालू लागली. सारे जण थकून गेले होते. पण, कुणी पाहिलं तर पंचाईत होईल म्हणून सारेच जमेल तसे उठ बस करीत चालले होते. 'मरता क्या नही करता' अशी वेळ सध्या त्यांच्यावर आली होती. दिवसभर चालून पायाची चाळणी झाली. पाय अंगार फेकत होते. तिकडे मावळती लाल झाली असली तरी इकडे रक्ताळल्या पायांचे चालणे थांबले नव्हते. पायांना तशी सवय झाली होती. अंधार पडला तसे सारेच थांबले. सारे काही नि:शब्द. गौतम पार थकला होता. एमआयडीसीत

लागण्यापूर्वी त्याने पोलीस भरतीसाठी प्रयत्न केले होते. तेव्हा अशी मेहनत तो घ्यायचा. पण, ते काही जमले नाही. आता दहा वर्षांचा काळ लोटला होता. सारी पावलं थकली होती. सारीच रुळावर विसावली. कुणालाच काही कळत नव्हतं. सारं काही दिशाहीन झालं होतं. ज्या रुळावरून कधी रेल्वे गाडीत बसून ते जायचे आज त्याच रुळांवर पायी चालतांना दु:खानं कळस गाठला होता. साऱ्यांनी काही वेळ विश्रांती घ्यायची म्हणून मूक संमती दिली. पोटात भुकेचा डोंब उसळला होता. चिंतेनं ग्रासल्या जीवांना कोरभर सुध्दा धकणारे नव्हते. तरी काहीतरी पोटात टाकायचं म्हणून सर्वांनी शिदोरी सोडल्या. पोळ्या कडक आल्या होत्या. भाजी कधीच विटली होती. ती फेकून देण्यातच धन्यता होती. गौतमनं बिस्कीट काढले. सर्वांना दोन दोन दिलेत. पाणावल्या डोळ्यांनी कसे बसे पोटात ढकलले. पाण्याचे तीन चार घोट घेतले. गार वारा सुटला होता. अंग जड व्हायला लागलं होतं. कोण कधी डुलकी मारत होते कुणालाच ठाऊक नव्हते. समोर काय होईल याची तमा नसली तरी गावाकडची ओढ डोळ्यांत जागी होती. कडक आल्या पोळ्या रुळावर तशाच पडून होत्या.

कुणाच्या हातात अर्धभरल्या पाण्याच्या बॉटल तशाच होत्या. अंगावरच्या कपड्यांनी कष्टाचा गंध पांघरला होता. रात्रीचे दहा वाजत आले होते. सारं काही शांत होतं. थकलेले देह निपचित आणि बेभान होऊन पडले होते. दुरून चकाकणारे दिवे मात्र जागणीला होते. साऱ्यांना निद्रादेवीनं गाढ पांघरूण घातलं होतं. जणू कुणाला कशाचेच भय नव्हते. किर्र काळोख्या रानातले भेसूर आवाज आता त्याला घाबरवणारे नव्हते. कुणाचे आवाज असावेत, कुत्र्यांचे की लांडग्यांचे ? आता याचं कुणाला काही एक देणं घेणं नव्हतं. गावासाठी धडपडणारी पावले काही क्षणासाठी विसावली होती की, कायमचीच...? कुणास ठाऊक? क्षणासाठी सारे काही थांबले होते. पण, काळ कुठे कोणासाठी थांबतो! कदाचित थकल्या पावलांची ही अखेरची नीज असावी. कुणी हालत होते ना डुलत होते. कष्टकऱ्यांच्या आयुष्यात ही नीज रोजच येत असली तरी आज मात्र तिचा शेवट असावा, असे वाटत होते. शांत असलेले वातावरण क्षणार्धात बदलले. दूर कुठून तरी रुळ हलल्याची जाणिव होत होती. पण, थकलेले शरीर उठणारे नव्हते. त्यांच्यात त्राणच उरला नव्हता. एकापाठोपाठ सात आठ आवाज आले.

अरे! हा तर मालगाडीचा आवाज होता... दिवसभर तर एकही गाडी गेली नाही अन् आता कशी काय आली? अरे, कुणीतरी जागवा त्यांना... कुणीतरी उठवा त्यांना...कुणीतरी मालगाडीची चाके थांबवा...त्या अंधाऱ्या रुळांवर आता कोण येणार?

ना चाके थांबली आणि नाही काळ. गावाची ओढ मनात घेऊन क्षणासाठी विसावा घेणाऱ्या कष्टकऱ्यांचा श्वास मात्र थांबला होता. क्षणार्धात चाकांचे रंग लाल झाले. ना किंकाळ्या फुटल्या ना मालगाडी थांबली. गाडी चालकानं भरपूर प्रयत्न केला, पण काळापुढं कुठं कुणाचं चालतं! बऱ्याच पुढं जाऊन चाकं थांबली. गाडीचा चालक, गार्ड उतरून जवळ आले. पण, सारेच कायमचे निजले होते. अंगावर लाल वस्त्रांची चादर घेऊन. रुळावरच्या पोळ्या लाल, माणसांचे देह लाल झाले होते आणि चालकाचा चेहरा मात्र काळवंडला होता. डोळ्यांत अश्रू होते आणि आपल्या हातून हे काय घडले, याचा दीर्घ पश्चाताप होता. गार्डच्या टॉर्चला सुध्दा ते करूण दृश्य आता बघवत नव्हते. कुणाचे धड, कुणाचे डोके तर कुणाचे हातपाय इतस्ततः विखुरलेले होते. कदाचित त्या दृश्याने काळालाही घाम फुटला असता. कुणीच हालचाल करीत नव्हते. चालकाच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते. गार्डने फोन लावले. चालक तर गर्भगळीत झाला होता. न केलेल्या खूनाचा त्याला पश्चाताप होत होता. रात्रीचे दोन वाजले होते. त्या मार्गावरील सर्व रेल्वे स्टेशनांना कळविण्यात आले होते. मागून एक धकल गाडी येत होती. त्यात काही रेल्वे पोलीस होते. मास्क लावलेल्या चेहऱ्यांनी सर्व कलेवरांना उचलून एकावर एक टाकण्यात आले. धकलगाडी चिंब लाल झाली. रुळावर सामान विखुरले होते. पाण्याच्या बॉटल, त्या पोळ्या, बिस्कीट सारं काही तसच पडून राहिलं. सर्वांनी घेतलेलं सर्व साहित्य मागे सोडलं होतं. फाटल्या खिशातून नोटा रुळावर सांडल्या होत्या. कदाचित काही उडाल्या सुध्दा असाव्यात. अनोळखी चालकाच्या डोळ्यांत सुध्दा अश्रू होते. संपूर्ण रात्र लाल झाली. रेल्वे पोलीस सुध्दा गहिवरले. त्यांच्या आयुष्यात घडलेली ही बहुदा पहिलीच घटना असावी.

दुसऱ्या दिवशी सर्व वर्तमानपत्रांत आणि सर्व वाहिन्यांवर हेडलाईन होती. वापसीच्या प्रवासातील आठ मजूरांना रेल्वेने चिरडले... हृदय हेलावून सोडणाऱ्या छिन्न विच्छिन्न फोटो आणि त्या बातम्या बघून कुणाचेही मन द्रवित होणारे होते. भोवरी आणि पेंढरीत त्या दिवशी कुणाचीही चूल पेटली नाही. सर्वसामान्यांना प्रतिबंध असला तरी मंत्र्यांचे दौरे झाले. रकमा जाहीर झाल्या. मंगलाबाई अजूनही मुलास फोन लावत होती. गेले काही दिवसांपासून तिने टीव्ही सुध्दा लावली नव्हती. गौतमच्या वडिलांचा दम्याचा त्रास कमी होत नव्हता आणि अशा अवस्थेत त्यांना कसं सांगावं की, तुमचा एकुलता एक मुलगा आता या जगात नाही. त्याला त्याच्या स्वप्नांसह परतीच्या मार्गावर असतांना रेल्वेने चिरडले... सारं काही भीषण होतं. कोरोनाच्या महामारीनं कित्येक घरांचा घास हिरावला होता. करणी कुणाची आणि भरणी कुणाला करावी लागत होती. विषाणूची लागण न होताही गौतम कोविड १९ चा बळी ठरला होता. मंगलाबाई अजूनही मुलाच्या प्रतीक्षेत होती... नेहमीसाठी...

कामठी, ज़ि नागपूर
मो. ८४१२८७७२२०



कथा

एक धागा दु:खाचा

- प्रा.धनाजी बुटेरे

अनघा आणि तिचा नवरा बऱ्याच दिवसांनी निवांत बसले होते. इकडच्या तिकडच्या गप्पा चालू होत्या. पण अनघाचे गप्पांमध्ये लक्ष नव्हते. कारण समोरच्या बाकावर बसलेली पाठमोरी व्यक्तीने तिचे चित्त चोरले होते. नवरा बरोबर असताना,अनघाला कुणीतरी बागेत तिच्यासमोर पाठमोरा बसलेला व्यक्ती परिचयाचा वाटला. आज ती नवऱ्यासोबत बऱ्याच वेळ गप्पा मारत भायखळ्याच्या राणीच्या बागेत बसली होती.पण तिचे लक्ष आपल्यासमोर बसलेल्या पाठमोऱ्या व्यक्तीकडे लागले होते. तिला नवऱ्याच्या गप्पांमध्ये बिलकुल इंटरेस्ट नव्हता.का कोणास ठाऊक? पण समोरची व्यक्ती आणि आपले काहीतरी नाते असल्यासारखे तिला वाटत होते. अखेर ती बऱ्याच वेळा नंतर नवऱ्यासोबत निघाली.

पण, लक्ष मात्र त्या बाकावर बसलेल्या पाठमोऱ्या व्यक्तीकडे होते. दोघे गप्पा मारत मारत भायखळ्याच्या राणीच्या बागेच्या प्रवेशद्वारातून बाहेर आले. तिच्या नवऱ्याला छत्रपती शिवाजी महाराज स्थानकात जायचे होते. आणि तिला खोपोलीला जायचे होते. दोघे कामानिमित्ताने मुंबईत आले होते. नवऱ्याला निरोप देऊन ती चालत भायखळा स्टेशन कडे निघाली. पण मन मात्र त्या बागेतील पाठमोऱ्या आकृतीकडे पिंगा घालत होते.नवरा गेल्यावर मात्र तिचे पाय जागच्या जागी थबकले. कोण असेल तो? थोडा वेळ विचार केला. आणि तिचे पाय पुन्हा माघारी फिरले. ती घाईघाईने पुन्हा राजमाता भोसले उद्यानात आली आणि जेथे ती आणि नवऱ्यासोबत बसली होती, तेथे निघाली. ती बरीच फिरून आली तरी अजून ती व्यक्ती तेथेच बसली होती. ती जाऊन त्या व्यक्तीच्या समोर उभे राहिली आणि तिला आश्चर्याचा धक्का बसला. तो व्यक्ती मात्र तिच्याकडे पाहतच राहिला. मग तिच्या समोर सारा इतिहास चित्रपटासारखा डोळ्यात उभा राहिला. ती त्याच्याकडे एकटक पाहत बघत राहिली. तो भांबावून गेला आणि तिला अस्पष्टशी साथ घातली."अऽनघा....?"

"...इकडे कशी?" त्याच्या त्या चिमुटभर शब्दाने तिचा संकोच फार मावळून गेला. ती त्याच्या जवळ गेली. त्याच्या डोळ्यात खूप खोल पाहिले आणि काहीतरी गहिरे दु:ख तिला त्याच्या डोळ्यात दिसले.ती भांबावून गेली.मग त्याला ती म्हणाली.



"किरण..?"

"इकडे कुठे?"....ये बसतेस का ?"

"किरण....कसे आहात?"

"जसं आहे तंसच चाललय. तुझं काय ?आणि हो...इकडे मुंबईला कशी काय?"

"इकडेच मुंबईत काम होते. त्यासाठी आले होते. म्हटले राणीची बाग बघू.....आणि तुम्ही दिसलात".

"मग तरी जवळ आलीस?"

"अहो, आयुष्याची दहा वर्षे घालवली तुमच्यासोबत"

"आणि दहा वर्ष कोर्टकचेरीत गेली"त्यांने हळूच चिमटा घेत तिला डिवचली.

"नका किरण... त्या जुन्या आठवणी नका काढू."

"का एवढ्या लवकर त्या आठवणीचा तिटकारा आला.मी तर त्याच आठवणीत जगतो अजून."

"कटू वाटायला लागल्या त्या आठवणी, जाऊ द्या हो, चुकले माझं."... बराच वेळ शांतता मग किरण ने तिला प्रश्न केला."ऐकलं होतं तू लग्न केलस?".

"हो एकटी बाई. किती दिवस एकटी रहाणार? किरण घटस्फोट झाल्यावर कळले. बाई खूप कमजोर असते. वेलीसारखी नाजूक असते. कुणाचा आधार नसला की उन्मळून पडते.तिला वर जायचं असेल तर... एका मजबूत खोडाचा आधार लागतो. भाऊ,आई, वडील,सारे औटघटकाचे सोबती असतात. पण हे शाहणपण पण फार उशिरा आले. तारुण्याच्या धुंदीत, अहेकाराच्या घमेंडी मधे अंधळी झाले होते. पण.. नवरा हेच अंतिम सुख असते. म्हणून पूनरलग्न केले. पण पहिले लग्न, पहिला चुडा, पहिले कुंकू, पहिली जोडवी, पहिले मंगळसूत्र,याची गोडी पुन्हा कधीच येत नसते. सध्या मी सेकंड हॅन्ड बायको आहे त्यांची. तो वरच्यावर हसला.

"बरं जाऊ दे तुम्ही का नाही केलं लग्न?" "तुला कसं माहित मी लग्न नाही केले?"

"दोन-तीन तास याच बाकावर एकटाच बसणारा माणूस सारे काही सांगून जातो. का नाही केले लग्न?"

"संशयखोर नवरा आहे मी. मग म्हटले दुसरी आली तर पुन्हा संशय आणि पुन्हा संशयखोर नवरा व्हायचो...मग पुन्हा कोर्टकचेरी.आता कोर्टकचेरी नाही पेलवणार या पायांना..... या कोर्टकचेरी सारे गमावून बसलो. आता आहे काय माझ्याकडे? काही ही नाही माझ्याकडे. आणि लग्न करून बायकोला काय देऊ? पोटगी पायी घर विकले.....बायको गेली.आणि दारू प्यायला लागलो.त्याने नोकरी गेली.नोकरी आणि दारूने सगळे जवळचे नातेवाईक दुरावले.....जाऊ दे.... कर्म माझे...भोगतोय मी दुसरा काय?"

"किरण एवढे पण कुणात गुंतायचं नाही.स्वतः उद्ध्वस्त व्हायचं नसतं."

" बरे मुले किती अनघा ?"

" एक मुलगी आहे."

"म्हणजे आयुष्यातील विस्कटलेली घडी पुन्हा बसवलीस तर....पण माझे सारे विस्कटलेलेच बघ.."

" किरण एक बोलू..?"

"बोला..?"

" साऱ्या चुका माझ्या असताना माझ्यावर राग नाही आला.?"

"जगली श्वापदांनी वेढलेल्या गायीला कशाचा राग? ती फक्त बचाव कसा करायचा ऐवढाच त्रोटक विचार करते. ती विवेचनत असते. मग कुणाकुणावर रागवायचे.भावाने घरातून हाकलून दिले. वकिलाने जास्त पैसे घेतले. बहिणीने माझ्या वाट्याची जमीन घेतली.आणि कोर्टाने माझा काही गुन्हा नसताना दोषी ठरवले."

"नका किरण त्या जुन्या आठवणीत जाऊ नका."

"अनघा.. आता नवरा संशय तर घेत नाही ना?" "नाही... आता एकदम मोकळी असते. खरं सांगू कुणी तरी टोकणारा रोखणारा हवाच. आता एकदम स्वतंत्र .कुठे जाईन ती दिशा माझी.ना कुणी रोखत ना टोकत... पण खरं सांगू ? माझे जीवन नुसते नीरस जीवन आहे.ते आता कळायला लागले.

"एक विचारू किरण...? मी इतकी प्रामाणिक असताना, तुम्ही माझ्यावर संशय का घ्यायचे?"

"तेच तर तुला कळले नाही.जो व्यक्ती आपल्या बायकोवर संशय घेतो. तिला टोकतो, अडवतो. बंधनात ठेवतो. ते फक्त एवढ्यासाठी. आपली आवडती व्यक्ती गमावू नये. दुसऱ्याच्या हातात जाऊ नये. आपण तिला गमवून बसतो की काय? ही भीती खात रहाते..... बस एवढाच प्रामाणिक हेतू होता माझा. एवढ्याचसाठी तुला टोकायचो. एवढाच हेतू होता. तुला बंधनात ठेवीत होतो. तुला अडवत होतो. तुला सतावत होतो. तुला रोखायचो. तुझ्यावर अति प्रेम होते.... बस बाकी काही नव्हते. पण त्या प्रेमाची प्रचंड मोठी शिक्षा मिळाली मला. ते प्रेम तुला समजू शकले नाही. त्याची शिक्षा मी भोगतोय."

"हे शब्द ऐकून तिला खूप आनंद वाटला. अशी जाऊन किरणला मिठी मारावी. त्याला मिठीत घेऊन माफी मागावी आणि पुन्हा किरण बरोबर संसार मांडावा. असे तिला वाटू लागले. पण ते वळण आता केव्हाच मागे सरले होते. तेथे वळता येणार नव्हते. तिने त्याला फक्त हात जोडले. त्याचे डोळे पाण्याने डबडबले. बराच वेळ शांतता पसरली. मग अनघा म्हणाली."इकडे कसे येणे केलेत ?"

"किरण पाच सहा वर्षे झाली मुंबई रोज पायदळी तुडवतो."

"का ?"

माहिती आहे का?" बस काही दिवसांचा पाहुणा आहे या जगातील मी."

"काय झाले किरण..?"

"काही नाही... मृत्यूचे निमंत्रण आले आहे." "मृत्यूचे....! "

"हो कॅन्सर झालाय मला."

" काय म्हणता किरण...?"

" हो एकदम खरे आहे."

"पण तुमच्या चेहऱ्यावरून तसे वाटत नाही."

ना डर,ना चिंता,ना भय, एकदम निर्मोही झालात तुम्ही."

"डरायला आहे कोण मागे?" सडाफटिंग

वडावरचा मुंजा मी."

"किरण.भीती नाही वाटत.?"

"मृत्यूला घाबरायचं कशाला?" मृत्यूची भीती नसतेच मुळी पुरुषाला. तो घाबरतो. आपल्या नंतर मुलांचे काय होईल? आपली पत्नी कशी जगेल? म्हणून तो घाबरतो. माझ्याकडे आहे काय घाबरायला.? उलट मृत्यू म्हणजे दोस्त. एका चुटकीत साऱ्या चिंता खत्म करणारा जादूगार."

तो बोलतच होता. तिचे डोळे पाण्याने डबडबले. तसा किरण कोणत्याही बंधनात न अडकल्यासारखा तिथून उठून जाऊ लागला. ना येतो, ना जातो,अ गदी निर्मोही झाला होता तो. अनघा त्याच्याकडे पाहत राहिली. त्याला अडवता येत नव्हते थांबवताही येत नव्हते. ती स्तब्ध झाली. स्तिमित झाली.

"एक धागा सुखाचा शंभर धागे दुःखाचे.जरतारी हे वस्त्र मानसा तुझीया आयुष्याचे."

तिच्या फोनची रिंग वाजली आणि ती भानावर आली. तिच्या नवऱ्याचा फोन होता. तिने फोन उचलला आणि तीही तिथून लगेच चालू लागली. दोघे एकच वाट चालत होते. पण दिशा मात्र दोघांच्या वेगवेगळ्या होत्या.

कल्याण, जि.ठाणे.
मो. ९४०४६०८८२६

कथा

चारचौघी

त्या रात्री त्यांनी एक योजना आखली. शाळा फक्त शाळा राहणार नव्हती. ती गाव आणि शहर यांना जोडणारे केंद्र बनणार होती. रेखाने शहरातील काही मित्रांची मदत घेतली. जुने संगणक मिळवले. सुनीताने आपल्या कार्यालयातील लोकांशी बोलून पुस्तकं आणि शैक्षणिक साहित्य मिळवलं. मंगलाने गावातील महिलांना एकत्र केलं. वैशालीने शाळेत मोफत अभ्यासवर्ग सुरु केला. हळूहळू शाळेत पुन्हा मुलांची गर्दी वाढू लागली.

- डॉ. सचिन चव्हाण



पहाटेच्या धुक्यातून गाव हळूहळू जागं होत होतं. कोंबड्याच्या आरवण्याने, मंदिरातल्या घंटेच्या नादाने आणि गोठ्यातल्या जनावरांच्या हंबरण्याने दिवसाची सुरुवात झाली होती. गावाच्या एका टोकाला असलेल्या जुन्या विहिरीजवळ चार मुली रोजप्रमाणे भेटल्या. वैशाली, मंगला, रेखा आणि सुनीता. गावात त्यांना सगळे प्रेमाने 'चारचौघी' म्हणायचे. चौघींचे स्वभाव वेगवेगळे होते. वैशाली शांत, समजूतदार आणि अभ्यासू. मंगला बोलघेवडी आणि धाडसी. रेखा सतत काहीतरी नवीन करण्याच्या विचारात असायची. आणि सुनीता सगळ्यांत हसतमुख, पण मनाच्या कोपऱ्यात असंख्य प्रश्न घेऊन जगणारी. त्यांची मैत्री शाळेपासूनची. शाळेच्या मातीच्या मैदानावर एकत्र खेळलेल्या खेळांपासून ती सुरू झाली होती आणि आता गावच्या पायवाटांवरून चालत चालत मोठी झाली होती. त्या दिवशी मात्र त्यांच्या गप्पांमध्ये नेहमीचा उत्साह नव्हता.

'ऐकलंत का?' रेखाने पाण्याचा हंडा खाली ठेवत विचारले.

'काय?' मंगला म्हणाली.

'शहरातून लोक आले होते काल. आपल्या गावाच्या नदीकाठी मोठं प्रकल्पाचं काम होणार म्हणे.'

वैशालीने तिच्याकडे पाहिले.

'कसला प्रकल्प?'

'नेमकं माहीत नाही. पण म्हणे इथे कारखाना, गोदामं आणि नवीन रस्ता होणार आहे.'

सुनीता काहीच बोलली नाही. तिने नदीकडे पाहिले. ती नदी म्हणजे त्यांच्या बालपणाची साक्ष होती. उन्हाळ्यात पाणी कमी झालं की त्या तिच्या वाळूत घरं बांधायच्या. पावसाळ्यात नदी दुथडी भरून वाहू लागली की आई ओरडायची,

'तिकडे जाऊ नका!'

पण नदी बदलणार होती आणि त्यांचं आयुष्यही. काही दिवसांत गावात शहराची चाहूल स्पष्ट जाणवू लागली. मोठमोठ्या गाड्या येऊ लागल्या. रस्त्याच्या कडेला मोजमाप करणारे लोक दिसू लागले. गावातील काही शेतकऱ्यांच्या जमिनी विकत घेण्याच्या चर्चा सुरू झाल्या. काहींना आशा वाटत होती.

'जमिनीला चांगला भाव मिळतोय. मुलांना शहरात शिकवता येईल.' तर काहींच्या डोळ्यांत काळजी होती.

'जमीन गेली तर उद्या काय करायचं?' गाव दोन विचारांत विभागलं. चारचौघी मात्र शांतपणे सगळं पाहत होत्या. एका संध्याकाळी त्या नेहमीच्या वडाच्या झाडाखाली बसल्या होत्या.

'आपण शहरात जाऊ या का?' रेखाने अचानक विचारले.

मंगला हसली.

'तू तर कधीपासून शहरात जायचं स्वप्न बघतेस!'

'हो. पण आता शहर आपल्याकडे येतंय.'

वैशालीने तिच्याकडे पाहिलं.

'शहर आलं म्हणून गाव हरवायला नको.'

'पण बदल थांबवता येत नाही,' रेखा म्हणाली.

सुनीता पहिल्यांदा बोलली.

'बदल थांबवायचा नसतो... पण बदलताना आपण कोण आहोत हे विसरायचंही नसतं.'

तिघी तिच्याकडे पाहू लागल्या.

सुनीता हसली.

'काय बघताय? मीही कधी कधी शहाण्यासारखं बोलते!'

चौघी मोठ्याने हसल्या. पण त्यांना माहीत नव्हतं, काही दिवसांत त्यांच्या आयुष्यात असा बदल येणार होता की त्या हसण्याची आठवणही त्यांना जपून ठेवावी लागणार होती. प्रकल्पाचं काम सुरू झालं. गावातला जुना कच्चा रस्ता डांबरी झाला. बस दिवसातून दोन वेळा येण्याऐवजी तासातून एकदा येऊ लागली. मोबाईल नेटवर्क सुधारलं. किराणा दुकानाच्या शेजारी नवीन मेडिकल आणि छोटंसं कॉफी सेंटर उघडलं. गावातल्या मुलांना शहरात जाण्यासाठी आता दोन तास लागत नव्हते. पण या बदलाची किंमतही होती. नदीकाठी असलेली काही झाडं तोडली गेली. शेतांचे तुकडे झाले. काही घरांच्या जागी नवीन इमारती उभ्या राहिल्या.

गावाचा चेहरा बदलत होता. रेखाला मात्र या बदलात संधी दिसत होती. तिने शहरात जाऊन संगणकाचा अभ्यासक्रम सुरू केला. मंगला गावातच महिलांसाठी बचतगट चालवू लागली. वैशालीने शिक्षिका होण्याचा निर्णय घेतला. सुनीता मात्र द्विधा मन:स्थितीत होती. तिच्या वडिलांची तब्येत ठीक नव्हती आणि घरची परिस्थितीही बेताची होती.

एके दिवशी तिला शहरात नोकरीची संधी मिळाली. पगार चांगला होता. पण त्यासाठी गाव सोडावं लागणार होतं. ती कागद हातात धरून बराच वेळ शांत बसली. रात्री चारचौघी पुन्हा वडाच्या झाडाखाली भेटल्या.

'जा,' वैशाली म्हणाली.

सुनीता तिच्याकडे पाहत राहिली.

'पण घर?'

'घरासाठीच तर जा. तू कमवशील, शिकशील, आणि एक दिवस घराला उभं करशील.'

मंगला म्हणाली, 'आणि आम्ही इथे आहोतच.'

रेखाने तिचा हात हातात घेतला.

'चारचौघींपैकी एक जरी दूर गेली तरी चौघी कमी होत नाहीत.'

सुनीताच्या डोळ्यांत पाणी आलं. त्या रात्री चार हात एकमेकांत घट्ट गुंफले गेले. सुनीता शहरात गेली. पहिल्यांदा शहराने तिला घाबरवलं. गाड्यांची गर्दी, उंच इमारती, धावपळ, सतत वाजणारे हॉर्न आणि कुणालाही कुणासाठी वेळ नसलेली माणसं. गावात प्रत्येकाला प्रत्येकाची खबर असायची. शहरात शेजारी कोण राहतो हेही अनेकदा माहीत नसायचं. तिने नोकरी सुरू केली. पहिल्या काही महिन्यांत तिला फार त्रास झाला. कामाचा ताण, घराची आठवण, वडिलांची काळजी, सगळं मनात साठत होतं. पण ती हारली नाही. दर रविवारी ती चौघींच्या गटावर संदेश पाठवायची.

'आज शहरात पहिल्यांदा स्वत:हून बस बदलली!'

'आज पगार मिळाला!'

'आज बाबांसाठी औषधं पाठवली.'

गावातल्या तिघी तिच्या प्रत्येक छोट्या यशावर आनंद व्यक्त करायच्या. त्यांचं नातं अंतराने कमी झालं नव्हतं. उलट अधिक घट्ट झालं होतं. दोन वर्षे निघून गेली. गावातला प्रकल्प पूर्ण झाला. नवीन रस्ता झाला. शहराशी जोडणारी बससेवा वाढली. काही लोकांच्या आयुष्यात पैसा आला. पण काही शेतकरी मजुरीवर आले. गावातल्या जुन्या तलावाजवळ बांधकाम सुरू झालं.

आणि एक दिवस बातमी आली, गावाची जुनी शाळा बंद होणार होती. विद्यार्थी कमी झाले होते. नवीन प्रकल्पामुळे अनेक कुटुंबं शहरात किंवा जवळच्या वसाहतीत गेली होती. शाळेची इमारत रिकामी पडणार होती. वैशालीच्या डोळ्यांत संताप आला.

'ही शाळा बंद झाली तर गावातलं बालपणच बंद होईल.'

मंगला म्हणाली, 'पण आपण काय करू शकतो?'

वैशालीने उत्तर दिलं,

'आपण चारचौघी आहोत ना?'

त्या रात्री त्यांनी एक योजना आखली. शाळा फक्त शाळा राहणार नव्हती. ती गाव आणि शहर यांना जोडणारे केंद्र बनणार होती. रेखाने शहरातील काही मित्रांची मदत घेतली. जुने संगणक मिळवले. सुनीताने आपल्या कार्यालयातील लोकांशी बोलून पुस्तकं आणि शैक्षणिक साहित्य मिळवलं. मंगलाने गावातील महिलांना एकत्र केलं. वैशालीने शाळेत मोफत अभ्यासवर्ग सुरू केला. हळूहळू शाळेत पुन्हा मुलांची गर्दी वाढू लागली.

गावातील मुलांना संगणक शिकता आला. शहरातील काही विद्यार्थी उन्हाळ्यात गावात येऊन कार्यशाळा घेऊ लागले. गावातील महिलांची उत्पादने शहरात विकली जाऊ लागली. गावाचा पारंपरिक स्वाद शहरापर्यंत पोहोचला. आणि शहरातील ज्ञान गावापर्यंत पोहोचलं. चारचौघींच्या प्रयत्नाने दोन जगांमध्ये एक पूल उभा राहिला. पण खरी परीक्षा अजून बाकी होती.

एके दिवशी सुनीताला शहरातून फोन आला.

'तुझ्या वडिलांची तब्येत अचानक बिघडली आहे.'

ती धावत गावाकडे निघाली. बस गावाच्या रस्त्यावर पोहोचली तेव्हा मुसळधार पाऊस सुरू झाला होता. रस्ता चिखलाने भरला होता. वीज बंद होती. गाव अंधारात बुडालं होतं. सुनीता धावत घराकडे गेली. दारात मंगला उभी होती.

'घाबरू नकोस. आम्ही आहोत.'

वैशाली डॉक्टरांना घेऊन आली होती. रेखाने शहरातील रुग्णालयाशी फोनवर संपर्क साधला होता. थोड्याच वेळात वडिलांना रुग्णालयात नेण्यात आलं. सुनीता रुग्णालयाच्या बाहेर बसली होती. तिच्या डोळ्यांसमोर गाव, शहर, नोकरी, पैसा, सगळं फिरत होतं.

ती हळूच म्हणाली,

'मी शहरात गेल्यावर मला वाटलं होतं की मी मोठी झाले. पण आज समजलं... माणूस मोठा शहराने होत नाही.'

मंगला तिच्या शेजारी बसली.

'मग कशाने होतो?'

सुनीताने तिच्याकडे पाहिलं.

'चारचौघींसारख्या माणसांमुळे.'

काही महिन्यांनी सुनीताचे वडील बरे झाले. पण त्या घटनेने चारही मैत्रिणींच्या मनात एक विचार कायमचा रुजला. गाव आणि शहर यांच्यात अंतर रस्त्यांचं नव्हतं. अंतर मनांचं होतं. ते कमी करता आलं तर विकासाला अर्थ होता. काही वर्षांनी गाव पूर्णपणे बदललं. जुना कच्चा रस्ता इतिहास झाला. मोठ्या इमारती उभ्या राहिल्या. मोबाईल टॉवर दिसू लागले. गावात इंटरनेट आलं. मुलं ऑनलाइन शिक्षण घेऊ लागली. पण वडाचं झाड अजूनही तिथेच होतं. त्याखाली चारचौघी पुन्हा एकदा बसल्या होत्या. आता त्यांच्या केसांत थोडं पांढरं आलं होतं. चेहऱ्यावर अनुभवाच्या रेषा होत्या. पण डोळ्यांतली मैत्री तशीच होती.

रेखाने हसत विचारलं,

'आपण खरंच एवढ्या मोठ्या झालो का?'

मंगला म्हणाली,

'नाही गं. आपण फक्त वयाने मोठ्या झालो.'

वैशालीने शाळेकडे पाहिलं.

'मोठं झालं ते आपलं गाव.'

सुनीता शांतपणे नदीकडे पाहत होती. नदी आता पूर्वीसारखी नव्हती. पण तिच्या काठावर काही नव्या झाडांची हिरवी पालवी दिसत होती. सुनीता उठली.

'चला.'

'कुठे?' तिघींनी एकाच वेळी विचारलं.

ती हसली.

'जिथून सुरुवात केली होती तिथे.'

चारही जणी नदीकाठी गेल्या. त्या जुन्या वाळूत त्यांना त्यांच्या बालपणाच्या पाऊलखुणा दिसल्या नाहीत. काळाने त्या पुसून टाकल्या होत्या. पण त्यांच्या आठवणी पुसल्या नव्हत्या. वैशालीने नदीच्या पाण्यात हात बुडवला.

'किती बदललं सगळं...'

मंगला म्हणाली,

'हो. पण काही गोष्टी बदलत नाहीत.'

'उदाहरणार्थ?' रेखाने विचारलं.

मंगला चौघींकडे पाहत म्हणाली,

'मैत्री.'

क्षणभर सगळ्या शांत झाल्या. मग सुनीताने हात पुढे केला. एकावर एक चार हात ठेवले गेले. त्या चार हातांत चार वेगवेगळ्या आयुष्यांचा प्रवास होता. गावाची माती होती. शहराची धावपळ होती. संघर्ष होता. स्वप्नं होती. आणि सगळ्यांत महत्त्वाचं एकमेकींसाठी उभं राहण्याचं वचन होतं. दूरवर शहराची दिव्यांची रांग चमकत होती. आणि त्यांच्या मागे गावातील छोट्या घरांच्या खिडक्यांतूनही दिवे लुकलुकत होते. दोन्ही जगं वेगळी होती. पण त्या रात्री त्या दिव्यांमध्ये काहीच अंतर उरलं नव्हतं. कारण चारचौघींनी एक गोष्ट सिद्ध केली होती, गावातून शहराकडे जाणारा रस्ता फक्त अंतर कमी करत नाही; योग्य माणसं सोबत असतील, तर तो दोन जगांना एकमेकांशी जोडतो. आणि त्या चार जणी पुन्हा वडाच्या झाडाकडे वळल्या.

जिथे कधीतरी त्यांनी पहिल्यांदा स्वप्न पाहिलं होतं

'आपण मोठं काहीतरी करू.'

त्या दिवशी त्यांना जाणवलं... स्वप्न मोठं असण्यापेक्षा, ते चार जणी मिळून पाहणं अधिक महत्त्वाचं होतं. म्हणूनच गावाने त्यांना नाव दिलं होतं, 'चारचौघी'

रामटेक जि.नागपूर
मो. ९१५८३९३२६०



कथा



बोलक्या स्क्रीन, अबोल बालपण

- शशिकांत मधुकर तोटे

◆ ध्याकाळचे सात वाजले होते. दुमालदारांच्या घरात शांतता नव्हती, तर प्रत्येक खोलीत वेगळा प्रकाश चमकत होता. तो मोबाईलच्या स्क्रीनचा होता आई रंजना किचनमध्ये भाजी चिरता चिरता रील्स बघत होती. बाबा सुरेश हॉलमध्ये लॅपटॉपवर ऑफिसचे काम आणि हातात मोबाईलवर क्रिकेट स्कोअर आणि त्यांचा ४ वर्षांचा एकुलता एक मुलगा - कैवल्य... तो बेडरूममध्ये जमिनीवर पडून होता,हातात बाबाचा जुना स्मार्टफोन. डोळे लाल,पण स्क्रीनवरून नजर हटत नव्हती.

"कैवल्य, बाळा जेवायला ये!" रंजनाने ओरडून सांगितले.

कैवल्यने ऐकलेच नाही. त्याच्या कानात अजूनही कार्टूनचा मोठा आवाज होता. पूर्वी कैवल्य असा नव्हता.तो आजीच्या गोष्टी ऐकायचा,अंगणात चिमण्यांमागे पळायचा.पण लॉकडाऊनपासून सगळं बदललं. त्याला शांत करण्यासाठी रंजनाने पहिल्यांदा त्याच्या हातात फोन दिला.

"एकच व्हिडिओ बघ, मग जेव,"

असं म्हणत. तो एक व्हिडिओ कधी दोन तासांचा झाला, कळलंच नाही. आता परिस्थिती अशी होती की कैवल्य जेवताना फोन, रडताना फोन, झोपताना फोन. फोन काढला की तो किंचाळायचा,वस्तू फेकायचा.त्याचा चष्म्याचा नंबर ४ वर्षात -१.५ झाला होता. डॉक्टर म्हणाले,

"याला स्क्रीन टाइमने अटेन्शन डिसऑर्डरची लक्षणं येत आहेत."

एक दिवस रंजनाची मैत्रीण घरी आली.तिने कैवल्यला हाक मारली,

"कैवल्य, कावळा कसा करतो?"

कैवल्यने साधी मानही वर केली नाही.तो फक्त स्क्रीनवर बोट फिरवत राहिला.

ती मैत्रीण हळूच रंजनाला म्हणाली,

"अगं,तो तुला बाबा-आई पण म्हणत नाही का नीट?

त्याच्या डोळ्यात बघ,

तो कुठे हरवलाय."

त्या रात्री रंजना खूप रडली.तिने सुरेश सांगितले,

"आपण आपल्या मुलाला आपल्याच हाताने आजारी केलंय."

रंजनाच्या बोलण्यान सुरेशही हादरला.त्याला आठवलं,कैवल्य पहिल्यांदा 'आई' म्हणाला तेव्हा त्यांनी त्याचं कौतुक करण्याऐवजी त्याचा व्हिडिओ काढून स्टेटसला टाकला होता. दुसऱ्या दिवशी त्यांनी एक कठोर निर्णय घेतला.

घरात 'नो स्क्रीन संडे' नाही, तर 'नो स्क्रीन रोज ७ ते ९'.

सुरुवातीचे तीन चार दिवस अवघड वाटत होते. कैवल्यने घर डोक्यावर घेतले.फोनसाठी तो जमिनीवर लोळला, रंजनाला चावला देखील. रंजनाचा हात फोन द्यायला वळायचा,पण सुरेशने तिला थांबवले. चौथ्या दिवशी सुरेश लवकर घरी आला. त्याने फोन कपाटात बंद केला आणि कैवल्य ला खांद्यावर घेतले.

"चल,आज आपण गच्चीवर जाऊया.!"

गच्चीवर अंधार होता.कैवल्य रडायचा थांबला. मंद वारा वाहत होता. आकाश चांदण्यांनी बहरलं होतं.

"बघ, ती चांदणी," सुरेश म्हणाला.

कैवल्यने पहिल्यांदा मोबाईलच्या स्क्रीनच्या बाहेरच्या प्रकाशाकडे बघितले.त्याचे छोटे डोळे चमकले.

"बाबा, चमचम!"

तो शब्द ऐकून सुरेशच्या डोळ्यात पाणी आले.दोन महिन्यांनंतर कैवल्यने स्क्रीनकडे न बघता, बाबाच्या डोळ्यात बघून बोलले होते. हळूहळू बदल झाला. रंजनाने पुन्हा चांदोबाच्या गोष्टीचं पुस्तक बाहेर काढलं. कैवल्य आता जेवताना गोष्ट ऐकायचा. त्याचा चिडचिडेपणा कमी झाला. तो पुन्हा अंगणात पळायला लागला. एक महिन्याने डॉक्टरांनी सांगितले,

''सुरेशराव कैवल्यात खूप सुधारणा आहे. त्याला तुमचा वेळ हवा होता, वायफाय नाही."

आजही दुमालदारांच्या च्या घरात स्मार्टफोन आहेत, पण आता ते चार्जिंगला असतात आणि कैवल्य अंगणात असतो. कारण रंजनाला कळलं होतं, लहान मुलांना स्मार्टफोन नको असतो, त्यांना स्मार्ट आई-बाबा हवे असतात. त्यांना तुमचा स्क्रीन टाइम नको, तुमचा हात हवा असतो, जो त्यांना गच्चीवर चांदण्या दाखवेल.

दारव्हा जि.यवतमाळ
मो. ९१३०८३५४५८

कथा

डोलस वाड

- सौ. हेमांगी बोंडे

आज आपल्याला राऊतांकडे जायचे आहे''. राऊतांकडे जायचे? नकळत माझ्या पोटात गोळा आला. हातापायांना कंप सुटला. गेले दोन दिवसांपासून आम्ही ठरवतोय की राऊतांकडे जाऊन आलं पाहिजे पण आम्ही दोघांनी ते नकळत पुढे ढकलले.

''का?'' राऊत आमचे परम मित्र! अशाप्रसंगी आम्ही धीर द्यायला हवा पण आम्हाला आमची मित्रकर्तव्ये समजत नव्हती का? नक्कीच...! पण धीर होत नव्हता. उगीचच बोचणी मनाला लागत होती..घडल्या गोष्टीला तसे पाहिले तर आम्ही कारण झालो होतो का?आम्हाला तरी कुठे माहीत होते असे काही होईल? पण ध्यानीमनी नसलेले घडले ते घडून गेले होते. त्यामुळे झाल्या गोष्टीला तोंड देणे भाग होते.

राऊत म्हणजे आमच्या घरात अतिशय मोकळेपणाने वावरणारी एक परिचित अन् जिव्हाळ्याची व्यक्ती! अगदी घरचीच झाली होती म्हणा ना! आमच्या घराचाच काय मनाचा कोपरा त्यांनी व्यापला होता...काही दिवसांपूर्वी..!

''हं!आता तसंच म्हणायला हवं!'', कारण दूध साखरेसारख्या आमच्या मैत्रीत आता मात्र खडा पडला होता. अर्थात त्याला कारणही तसेच होते. त्यांचा आमच्यवरच्या विश्वासाला तडा दिला गेला होता आमच्याकडूनचं...नकळतपणे...!

अर्थाअर्थी आमचा काही संबंध नव्हता तरी आलेल्या परिस्थिततीला कारण झालो होतो.पण हिम्मत करून त्यांच्याकडे जाणे भाग होते. रमेश आणि राऊत फक्त शेजारी नव्हते तर अगदी जिवाभावाचे मित्रा होते.एकाला ठेव लागली तर दुसऱ्याला वेदना व्हायची एव्हढे सख्य दोघांमध्ये होते. पणआज चार दिवस झाले होते तरीदेखील राऊतांकडे जाण्याची हिम्मत होत नव्हती. मी देवघरात जाऊन दिवा लावला आणि देवाला मनोभावे प्रार्थना



केली.

"देवा! हा गुंता सोडव."

कुंदा राऊत! ही राऊतांची एकुलती एक मुलगी.. ! गोड.. लोभस... आणि अगदी कुंदकळ्यांसारखी नाजूक...! तिच्या असण्याने आमचे भकास जीवन सुगंधित झाले होते. आमचा एकुलता एक मुलगा राघव जेव्हा अपघातात गेला तेव्हा जी पोकळी निर्माण झाली होती ती त्या पोरीने आपल्या मधाळ वागण्या बोलण्याने भरून काढली होती. आज अशी काही परिस्थिती येईल असे स्वप्नातही वाटले नव्हते.नोकरीच्या निमित्ताने दोन वर्षांपासून आमच्याकडे राहणाऱ्या आमचा पुतण्या, सुहासबरोबर ती पळून गेली होती.

गावाकडे राहणाऱ्या माझ्या दिराने आम्हाला विनंती केली होती,

"दादा वहिनी! तुमच्याकडे त्याला ठेवून घ्या आणि काहीतरी कामाला लावा."

त्याला आम्ही एका दुकानावर लावून दिलेही होते. पगार कमी होता. तरी ठीक होता. आम्हालाही सोबत हवी होती. कुंदा आणि सुहास चार दिवसापासून घरातून पळून गेले.कुठे गेले कोणालाच माहीत नव्हते. राऊतांकडे कोणत्या तोंडानं जायचं? परंतु मैत्रीला जागून जायलाचं हवे होते,पण हिम्मत होत नव्हती. शेवटी सगळी हिम्मत एकवटून त्यांच्या घरी जायचे ठरवले होतेआणि घरातले आवरून निघालो. ते शंभर मीटरवर असलेले घर जणू दोन कोस भासले.कसे स्वागत होईल? याची भीती तर वाटत होतीच! अगदी झालेही तसेचं!आम्हाला पाहता बरोबर शोभाताईंच्या तोंडाचा पट्टा असा काही सुचला की आम्हाला मेल्याहून मेल्यासारखे झाले. त्यांचे चिडून रडून झाल्यावर त्यांनी प्रश्न केला,

"आता का आलात?आमच्या जखमेवर मीठ चोळायला?"

"नाही हो! उलट झालं हे होण्यासाठी आम्हीही कारणीभूत आहोत यासाठी वाईट वाटतेय."

त्या थोडया सवरल्यावर विचारले,

"ताई! काही कळलंय का? कुठे आहेत ते?"

"नाही हो! हे रोज पोलीस स्टेशनमध्ये जाऊन चौकशी करत होते. पण काही पत्ता लागत नाहीय. काय करावे सुचत नाही. आज चार दिवस झाले मुलगी सापडत नाहीय."

"ताई! आम्ही पण सुहासच्या वडिलांना खोदून खोदून विचारले. पण त्यांनाही माहीत नाहीय. जे झालेय त्याच्यात ना आमचा दोष आहे ना त्याच्या वडिलांचा! आम्ही सर्वांनाही ऐकून मेल्याहून मेल्यासारखे झालेय. तेही तपास करत आहेत.आपण सर्व मिळून प्रयत्न करू या, निदान कुंदा सापडून सुरक्षित असेल."

आणि सारे जीवाचे रान करून कुंदा आणि सुहास यांना शोधायला लागले. शेवटी साऱ्यांच्या प्रयत्नांना यश येऊन ते लग्न करून महाबळेश्वर येथील लॉजवर राहत आहेत."

ते ऐकून जरा जीवात जीव आला. नेहमी अशा बातम्यांमध्ये काही बाही ऐकू यायचे. त्यामुळे तिच्या जीवाचे काही झाले असेल का? असे वाटून जीव कासावीस होत होता. ती सुरक्षित पाहून चिंता मिटली होती. पण सा०यांचा प्रश्न एकच"तुम्ही असे का केले?"

तेव्हा सुहास सांगू लागला,

"काका काकू! मला माफ करा.पण बाबा समजतात तास मी नाही हो!मला शेतीत काम करायला आवडते. पण बाबा म्हणायचे शेतीत काही राम नाही. शेतकऱ्याला कोणी मुलगी देत नाही.तू शहरात जाऊन काहीतरी कामधंदा कर."

"अरे पण आम्हाला तरी हे सांगायचे ना?आम्ही बाबांना समजावले असते." रमेश बोलला.

"तुम्ही बाबांना सांगून काही उपयोग झाला नसता. बाबांनी म्हटले असते शेतकऱ्याला कोणी मुलगी देत नाही त्यामुळे निदान लग्न होईपर्यंत थांब."

"आणि तू एकदम लग्न करून टाकलंस. आणि त्यासाठी आमच्या कुंदालाच पटवले? तीच तुला सापडली का?" म्हात्रे रागाने बोलले.

"बाबा! रागावू नका.आम्ही पूर्ण विचार करून निर्णय घेतला आहे. शेतकरी जगाचा पोशिंदा म्हणून आपण फक्त शब्दलांच्छन करीत असतो. जेव्हा लग्नच्या वेळ येते तेव्हा शेतकऱ्याच्या मुलाला अलगद बाजूला सारतात. हे वास्तव आहे. "कुंदा म्हणाली.

"अगं! पण हल्ली कोणतीच मुलगी शेतकऱ्याशी लग्न करायला तयार होत नाही. तू हे काय भलतंच केलंस. लाडात वाढलेली तू तुला शेतातील काम कसे झेपेल बेटा? "शोभाताई काकुळतीला येऊन बोलल्या.

"आई,अगं! इथे शहरात तरी तू बघत नाही का? कमी शिकलेल्या मुलांना नोकरी करण्यासाठी किती स्ट्रगल करावे लागते. नुसते ढोपरून घेतात आणि तरीही कधी जाईल याची टांगती तलवार असतेच मानेवर!"

"त्यापेक्षा नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढवले तर शेती वाईट नसते आई! आणि हल्ली आधुनिक तंत्रज्ञानाने खूप काही कष्टाची कामे हाताने करायची गरज नसते "कुंदा बोलली.

"माफ करा. पण कुंदाशी जेव्हा मी माझ्या माझ्या कल्पना सांगत होतो तेव्हा तिलाही ते पटले. बोलता बोलता मी तिला सांगितले की केवळ लग्न जमावे म्हणून माझ्या बाबांनी मला इकडे नोकरीला लावले आहे."

"नाहीतर आमच्याकडे नऊ एकर शेती आहे. एक मात्र की ती कोरडवाहू आहे. त्यामुळे फारसे उत्पन्न येत नाही. पण मी तिला ओलिताखाली आणून खूप काही नवीन प्रयोग करायचे ठरवले होते. पण बाबा या गोष्टीला तयारच नव्हते. ते नेहमी म्हणायचे शेतीचं काही खरं नसते. त्यांच्या दृष्टीने ते बरोबर होते कारण तेव्हा परिस्थिती तशीच होती. पण मी मात्र माझ्या विचारावर ठाम होतो. मला शेती करायची होती आणि करणार आहे."

"कुंदा समवयस्क असल्याने मी तिच्याशी या विषयावर बोलायचो. माझ्या कल्पना तिला आवडल्या आणि मी देखील!"सुहास म्हणाला.

एका दिवशी ती आपणहून म्हणाली ,"मी करेन तुझ्याशी लग्न!"

"अगं पण ! आजकाल कोणतीच मुलगी शेतकऱ्याशी लग्न करायला तयार नसते. तू विचार कर. एकतर तू एकटी लाडकी मुलगी आहेस. तुला खेड्यातील जीवन झेपणार नाही आणि तुझ्या आईवडीलांना ते अजिबात पटणार नाही."

"पण उलट तीच लग्नासाठी ठाम होती. तिला माहीत होते आपले आईबाबा यासाठी कधीच तयार होणार नाही. म्हणून आम्ही पळून जाऊन लग्न केले. प्लिज!आम्हाला चुकीचं समजू नका. आम्हाला सर्वजण आशीर्वाद द्या."सुहास काकुळतीला येऊन बोलला.

सुहासचे बोलणे ऐकून सारे ऐकून सारे दिग्मुढ झाले आणि झाले गेले गंगेला मिळाले आणि आल्या परिस्थितीला स्वीकारून त्यांनी उभयतांना आशीर्वाद दिला. आता एका जगाच्या पोशिंदयाचा संसार मार्गाला लागला होता...! साऱ्या जगाची भूक भागवण्यासाठी..!!

अशी डोळस वाट लग्नाळू मुलींनी निवडली तर कोणताच युवा शेतकरी बिनलग्नाचा राहणार नाही. नाही का?

बालेवाडी, पुणे
मो. ९९६०७९९६७२

लेख

कौतुकाची फुले

- प्रा. अर्चना अंबासकर



कौतुकाची फुले ही मनाला आनंद देणारी, आत्मविश्वास वाढवणारी आणि नात्यांना सुगंध देणारी असतात. जशी बागेत फुललेली रंगीबेरंगी फुले वातावरण प्रसन्न करतात, तशीच एखाद्या व्यक्तीच्या कामाचे, प्रयत्नांचे किंवा गुणांचे मनापासून केलेले कौतुक तिच्या मनात आनंदाचे रंग भरते. फुलांना सुगंध असतो, पण कौतुकाच्या फुलांना त्याहूनही सुंदर असा भावनेचा सुगंध असतो. कौतुक हा शब्दं दिसायला छोटासा पण त्याची ताकद मात्र फार मोठी असते. एखाद्याच्या कामासाठी उच्चारलेले दोन प्रेमळ शब्दं त्याच्या मनाला दिवसभराची ऊर्जा देऊ शकतात. कधी कधी तर त्या दोन शब्दांमुळे एखाद्याच्या आयुष्याला नवी दिशा मिळू शकते. आपण नेहमी मोठ्या यशाचेच कौतुक करतो. एखाद्याला पुरस्कार मिळाला, पदोन्नती झाली, पुस्तक प्रकाशित झाले, परीक्षा उत्तीर्ण झाली, मोठे काम केले की आपण सहज म्हणतो,

'अभिनंदन!' पण या मोठ्या यशामागे असलेल्या असंख्य छोट्या प्रयत्नांकडे मात्र आपले लक्ष जात नाही.

एखादी आई रोज पहाटे उठून घरातील प्रत्येकाची काळजी घेते. तिच्या कामाला कोणता पुरस्कार असतो? एखादा वडील कुटुंबासाठी आयुष्यभर कष्ट करतात. त्यांच्या त्यागाची कोणती पावती असते? एखादा शिक्षक विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी वर्गाच्या वेळेपलीकडेही मेहनत घेतो. एखादा विद्यार्थी अपयशानंतर पुन्हा उभा राहण्याचा प्रयत्न करतो. एखादी व्यक्ती आपल्या अडचणी बाजूला ठेवून दुसऱ्याला मदतीचा हात देते. या सगळ्यांसाठी कधीतरी फक्त एवढेच म्हणणे पुरेसे असते,

'तुम्ही खूप छान प्रयत्न करता आहात.'

'तुमच्या मेहनतीचे कौतुक वाटते.'

'तुमच्यामुळे हे शक्य झाले.'

इतकेसे शब्दंही मनाला किती मोठा आधार देतात!

कधी कधी एखाद्या छोट्या कामाचेही मनापासून केलेले कौतुक एखाद्याच्या आयुष्यात मोठा बदल घडवते. जणू एखाद्या कोमेजलेल्या रोपट्याला पाण्याचा थेंब मिळावा, तसे ते मन पुन्हा ताजेतवाने होते. थकलेल्या मनाला थोडी विश्रांती मिळते आणि निराश मनाला पुन्हा आशेचा किरण दिसतो.

कौतुक म्हणजे अहंकार वाढवणे नव्हे,

कौतुक म्हणजे आत्मविश्वास जागवणे.

खोटे कौतुक काही काळ आनंद देऊ शकते पण प्रामाणिक कौतुक मनात खोलवर उतरते. ज्याच्या शब्दांमध्ये आपुलकी असते, ज्याच्या नजरेत आदर असतो आणि ज्याच्या मनात मत्सर नसतो, त्याचे कौतुक मनाला खरे समाधान देते. कौतुक करताना तुलना करण्याचीही गरज नसते.

'तू अमुक व्यक्तीपेक्षा चांगले केलेस,' असे म्हणण्यापेक्षा,

'तू कालपेक्षा आज अधिक चांगले केलेस,' असे म्हणणे अधिक सुंदर आहे.

कारण प्रत्येक माणसाचा प्रवास वेगळा असतो. प्रत्येकाची सुरुवात वेगळी, परिस्थिती वेगळी आणि संघर्ष वेगळा असतो. म्हणून दुसऱ्याशी तुलना करण्यापेक्षा त्याच्या स्वत:च्या प्रयत्नांचे कौतुक करणे महत्त्वाचे. मानवी आयुष्यात परिश्रम असतात, धडपड असते, कधी अपयशही असते. यशाच्या टाळ्या सगळ्यांनाच ऐकू येतात; पण अपयशानंतर मनात निर्माण होणारी शांतता आणि अस्वस्थता फार कमी जणांना दिसते. अशा वेळी एखादा प्रेमळ शब्दं, प्रामाणिक कौतुक किंवा छोटासा सन्मान म्हणजे थकलेल्या मनावर अलगद ठेवलेले हातासारखे असतात.

'पुन्हा प्रयत्न कर. तू नक्की करू शकतोस.' या एका वाक्यात किती मोठी शक्ती दडलेली असते!

कधी एखादा विद्यार्थी एखाद्या विषयात मागे पडतो. त्याला ओरडणे सोपे असते पण त्याच्या छोट्याशा प्रगतीचे कौतुक करून त्याला पुढे

जाण्याची प्रेरणा देणे अधिक परिणामकारक असते. शिक्षकाचा एक प्रोत्साहनपर शब्दं विद्यार्थ्यांच्या मनात वर्षानुवर्षे जिवंत राहू शकतो.

पालकांनीही मुलांच्या गुणांबरोबर त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करायला हवे.

'तुला किती गुण मिळाले?' या प्रश्नाबरोबरच 'तू किती मेहनत घेतलीस?' हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. कारण गुणपत्रिकेतील आकडे काही काळ टिकतात पण कौतुकातून मिळालेला आत्मविश्वास आयुष्यभर साथ देऊ शकतो. कौतुकाचे हेच सौंदर्य नात्यांमध्येही दिसते. आपल्या जवळच्या व्यक्तींच्या चांगल्या गोष्टी आपण गृहीत धरतो. आई रोज स्वयंपाक करते, म्हणून ते तिचे कर्तव्यच आहे असे वाटते. जोडीदार घर आणि बाहेरची जबाबदारी सांभाळतो, म्हणून ते स्वाभाविक वाटते. मित्र नेहमी मदतीला धावून येतो, म्हणून त्याचे आभार मानण्याची गरज वाटत नाही. पण नात्यांमध्ये 'गृहीत' धरण्यापेक्षा 'कौतुक' करणे अधिक महत्त्वाचे आहे.

कधीतरी आईला म्हणा,

'आजचा स्वयंपाक खूप छान झाला.'

जोडीदाराला म्हणा,

'तुम्ही माझ्यासाठी जे करता, त्याची मला जाणीव आहे.'

मित्राला म्हणा,

'तुझी साथ माझ्यासाठी खूप महत्त्वाची आहे.'

या छोट्या वाक्यांमधून नात्यांना मोठा अर्थ मिळतो. कौतुकाची फुले फक्त इतरांच्या वाटेवरच उधळायची नसतात कधी कधी ती स्वत:च्या मनातही फुलवावी लागतात. आपण स्वत:च्या चुका मोजण्यात, स्वत:ला कमी लेखण्यात आणि इतरांशी तुलना करण्यात किती वेळ घालवतो! पण स्वत:ने पार केलेल्या वाटेकडे किती वेळा प्रेमाने पाहतो?

'मी हे करू शकले.'

'मी कठीण काळातून बाहेर आले.'

'मी पडले, पण पुन्हा उभी राहिले.'

स्वत:च्या प्रयत्नांची दखल घेणे ही आत्मप्रौढी नाही,ती आत्मस्वीकृती आहे. जी व्यक्ती स्वत:च्या मनाला कौतुकाची दोन फुले देऊ शकते, तीच दुसऱ्यांच्या वाटेवरही आनंदाने फुले उधळू शकते. आजच्या स्पर्धेच्या जगात दुसऱ्याचे यश पाहून आनंद व्यक्त करणेही एक मोठी मनाची श्रीमंती आहे. दुसऱ्याला पुढे जाताना पाहून मनापासून 'शाबास!' म्हणता येणे, दुसºयाच्या यशात आपलाही आनंद शोधता येणे, यातून मनाचा मोठेपणा दिसतो. कौतुक करणाऱ्या व्यक्तीचे काही कमी होत नाही. उलट तिच्या शब्दांमुळे दुसऱ्याचे मन समृद्ध होते. एक फूल दुसऱ्याला दिल्याने आपल्या बागेतली फुले कमी होत नाहीत, उलट सुगंध वाढतो.

कौतुकाचेही तसेच आहे. एक सुंदर शब्दं दिल्याने आपले शब्दं संपत नाहीत. एक प्रोत्साहन दिल्याने आपली किंमत कमी होत नाही. दुसऱ्याच्या यशाचे कौतुक केल्याने आपले यश लहान होत नाही. म्हणूनच आपल्या आजूबाजूच्या लोकांच्या गुणांना ओळखू या. त्यांच्या प्रयत्नांकडे पाहू या. त्यांच्या छोट्या विजयांचेही स्वागत करू या. त्यांच्या अपयशात त्यांना आधार देऊ या आणि त्यांच्या यशात मनापासून टाळ्या वाजवू या. कारण प्रत्येक मनाला कधी ना कधी कौतुकाची गरज असते. कुणाला शब्दांची, कुणाला नजरेची, कुणाला टाळ्यांची, तर कुणाला फक्त एवढ्याच विश्वासाची,

'तू जे करतो आहेस, ते महत्त्वाचे आहे.'

चला तर मग,शब्दं जपून वापरू या. टोचणारे शब्दं कमी करू या आणि उमेद देणारे शब्दं वाढवू या. तक्रारींपेक्षा प्रशंसा, दोषांपेक्षा गुण आणि निराशेपेक्षा प्रेरणा यांना आपल्या बोलण्यात स्थान देऊ या. आपल्या घरात, शाळेत, महाविद्यालयात, कार्यालयात, मित्रपरिवारात आणि समाजात, जिथे जिथे एखादा चांगला प्रयत्न दिसेल, तिथे कौतुकाची दोन फुले नक्की उधळू या. कदाचित आपल्याला ते दोन शब्द अगदी साधे वाटतील पण समोरच्या व्यक्तीसाठी ते आयुष्यभराची आठवण ठरू शकतात. कुणाच्या मनात आशेचा दिवा पेटवण्यासाठी मोठी संपत्ती लागत नाही. कुणाला उभे करण्यासाठी मोठे व्यासपीठ लागत नाही. कधी कधी फक्त दोन मनापासूनचे शब्दं पुरेसे असतात.

म्हणूनच,
कौतुकाची फुले उधळू या,
नात्यांना सुगंध देऊ या
थकलेल्या मनांना उमेद देऊ या,
आणि जगण्याला थोडे अधिक सुंदर करू या!
कारण ही फुले कधी कोमेजत नाहीत
ती मनात फुलतात,
आठवणीत दरवळतात
आणि आयुष्यभर सुगंध दे
कौतुकाची दोन फुले
कोणी अलगद दिली,
थकलेल्या मनामध्ये
नवी उमेद फुलली...
शब्द जरी छोटेसे,
भावना मोठी असते,
त्या गोड बोलांमध्ये
प्रेरणेची ज्योत वसते...
परिश्रमांच्या वाटेवर
जेव्हा साथ मिळते,
कौतुकाच्या फुलांनी
मनबाग खुलून निघते...
यशाच्या प्रत्येक क्षणी
टाळ्यांचा नाद व्हावा,
अपयशाच्या वळणावर
हात कुणाचा लाभावा...
दुसऱ्याच्या गुणांना
मनापासून दाद द्यावी,
कौतुकाच्या या फुलांनी
मनांची बाग फुलवावी...
शब्दं प्रतिक्रिया जपून
प्रेमाने व्यक्त करावी,
कौतुकाची ही फुले
जगभर उधळावी....
कारण एका कौतुकाच्या श
कुणाची पहाट उजाडते,
एका प्रेमळ दादेमुळे
नवी स्वप्ने पुन्हा फुलतात...
म्हणूनच
कौतुक करू या,
उमेद देऊ या,
आणि माणसामाणसांमध्ये
सुगंधाची नाती फुलवू या!



पुणे
मो. ९३०९५२५८५४

लेख

आधार

विवाहाच्या आदल्या दिवशीचे सीमांतपूजन अलौकीक सोहळा होता. आजी अजूनही त्या मंगलमय वातावरणातून बाहेर पडायला तयार नव्हती. लग्नाचे ठिकाण बुक करणे, घर आणि कार्यालय सजावटीचे नियोजन बाबा, भाऊ काका, नाना काका अशी मातब्बर मंडळींनी व्यवस्थित पार पाडली होती. परतीचा आहेर देण्यासाठी शकुंतला आजीनं तिच्या जरतारी लुगड्याच्या खास पिशव्या शिवून घेतल्या होत्या. शहरातील बरीचशी खरेदी ही शकुंतला आजीच्या मागणीनुसार बाबा आणि काका पूर्ण केली होती. वयाच्या ब्यानवव्या वर्षी सुद्धा लग्न कार्यात आजीचा सल्ला तिची धावपळ आमच्यासाठी अभिमानास्पद बाब होती.

- सुजित कदम



आई बाबा कुठे आहेत गं.."

सगळ्या घरात शोधलं.. पण कुठे दिसत नाहीत?". मी काळजीनं आईला विचारलं.

"अरे, संदीपा. हळद लागली. वाजंत्री वाजली. अक्षता पडल्या. दोनाचे चार झाले. नवी सून घरात आली. पण, घरातली कामाची भाऊ गर्दी काही संपता संपत नाही बघ." आई बोलत असताना आजी तिथं आली.

"अगं शारदे..भाऊ पण गायब आहे बघ..सकाळपासून..!"

"हो आत्याबाई.. दोघंही कालपासून हिशोब, देणी घेणी, पै पाहुणा,आला गेला याच्याच व्यवस्थेत गुंतलेले आहेत. आताही त्याच कामासाठी गेले असतील ...!" आईनं माहिती पुरवली.

"खरं आहे गं. मी पाहते आहेना तुमची सारी धावपळ. लग्नाची तयारी करण्यासाठी, सारं घर एकत्र आलं आणि भरुन पावले बघ..! "

आजी भरभरून बोलत होती.

''मी संदीप. माझ्या लग्नाच्या निमित्ताने आम्ही सर्व कुटुंबीय गावच्या घरी एकत्र आलो होतो.''

या गावी आमचं परंपरागत मोठ्ठं घर होतं. या घरात आजी एकटीच रहायची. लग्नाचे सर्व विधी, सजावट, भेटवस्तू, आमंत्रणे, कपडे यांची व्यवस्था, शालिनी संजू, शारदा, यांनी अगदी चोख पार पाडली होती..

"मुहुर्तापासून सारं घर गजबजलं होतं.. अरे..दीपा ..गेले आठ दिवस घर आनंदान न्हाऊन निघालं बघ..घराचा कोपरा न् कोपरा माझ्याशी बोलत होता बघ..!"

आजी माझ्याशी बोलत होती.

"आज्जी..अगं आता तरी संदीप म्हणून हाक मार. दीपा काय. बायको हसतेय बघ माझी..!"

"हसू देत हसली तर.. मला ही बघू देत की ती हसताना कशी दिसते ती..? आता आणखी काही दिवस करू देत मजा तुमच्या सोबत... तुम्ही काय कायम थोडीच माझ्या बरोबर इथेच राहणार आहात..?" त्यावर आजीचा स्वभाव माहित असूनही मी मुद्दाम मी म्हटलं "आजी..तूं तरी कुठे आमच्या बरोबर शहरात येणार आहेस. तू आणि हे घर.. एकरूप आहात.. एकटी कशी राहतेस या घरात त्या परमेश्वरालाच माहीत."

मी काळजी व्यक्त केली. आजीही काही कमी नव्हती. तिनं मुळ विषय टाळून इकडच्या तिकडच्या भरपूर गप्पा मारल्या. आज्जी बरोबर मनसोक्त गप्पा मारून झाल्या.

लग्नाच्या तयारीत आज्जीनेही काही कमी तयारी केली नव्हती. हळकुंड फोडताना तिनं केलेली चोख तयारी..जुनी परंपरागत जात्यावरची गाणी. यात तर आज्जीचा कोणी हात धरणारं नव्हतं. हळद लावणे, घाणा भरणे, ग्रहमक या साऱ्यात 'आजी म्हणेल ती पुर्व' असं विधान होतं. एकमेकांच्या सहकार्याने विवाहात खूप काही गोष्टी संपन्न झाल्या. लग्नाची इतर बारीक सारीक कामं, संजू आत्याची मुलगी निशा हिने उत्कृष्ट पार पाडली होती. आमच्या पेक्षा लहान असणाऱ्या या चिमुरडीने अंगावर जबाबदारी पडल्यावर अत्यंत सफाईने अनेक कामं बिनचूक पार पाडली की, आम्हाला, आप्तेष्टांना... तिला काही सांगावच लागलं नाही तिने आपल्या कार्यकुशलतेने साऱ्याची मनं जिंकून घेतली होती.

विवाहाच्या आदल्या दिवशीचे सीमांतपूजन अलौकीक सोहळा होता. आजी अजूनही त्या मंगलमय वातावरणातून बाहेर पडायला तयार नव्हती. लग्नाचे ठिकाण बुक करणे, घर आणि कार्यालय सजावटीचे नियोजन बाबा, भाऊ काका, नाना काका अशी मातब्बर मंडळींनी व्यवस्थित पार पाडली होती. परतीचा आहेर देण्यासाठी शकुंतला आजीनं तिच्या जरतारी लुगड्याच्या खास पिशव्या शिवून घेतल्या होत्या. शहरातील बरीचशी खरेदी ही शकुंतला आजीच्या मागणीनुसार बाबा आणि काका पूर्ण केली होती. वयाच्या ब्यानवव्या वर्षी सुद्धा लग्न कार्यात आजीचा सल्ला तिची धावपळ आमच्यासाठी अभिमानास्पद बाब होती.

"एखादी कथा, एखादी कविता, जशी माणसाला जगायला शिकवते ना तशी आमची आज्जी आमच्या सर्वांची उर्जा आहे, आज तिच्यामुळे गावचं घर माणसं जोडून ठेवण्यात यशस्वी ठरलं होतं".

कुणी फुले, फळे, दूध, दही, ताक, लोणी, तूप, खवा, खरवस, अंडी, नारळ, सुपाऱ्या मागायला यायचं. बाहेर पेक्षा निम्या किमतीनं परसबागेत फुलवलेलं आजी त्यांना विकायची. धार्मिक कार्यात तर सढळ हाताने दानधर्म हा आजीचा आवडता उपक्रम होता. आजोबांच्या माघारी एकटी गावाकडे, गावाकडच्या घरात राहून आजीनं ही भावकी जपली होती.

"विवाहाला उपस्थित राहताना, काळा पांढरा किंवा लाल रंगाचा पोशाख घालायचा नाही ही आजीची मुख्य अट सर्वांनी विनाशर्त मान्य केली होती".

"लग्न घरात सुकलेली फुले नसावीत, अशा गोष्टी लग्नाच्या घरात नकारात्मक ऊर्जा आणतातच पण वास्तुदोषाची समस्याही निर्माण करतात" हा तिचा आग्रह सर्वांनी पाळला होता.

लग्नपत्रीका, पाहुण्यांना आमंत्रणे, याद्या, कापड बस्ता, वराकडील खर्चाचे अंदाजपत्रक, वधु वर पोशाख, हळद, संगीत, मेहंदी यांत गेले महिनाभर संपूर्ण कुटुंब जातीने राबत होतं.

''मी नवरदेव. नवरा मुलगा.." म्हणून मला कुणी कामच करू देत नव्हतं

लग्नाच्या तयारीमध्ये, विवाह मेजवानीचा मुख्य मेन्यू, संवाद आश्वासन,नियोजन आणि जमाखर्चाचा ताळमेळ यांतही आजी सक्रीय होती.

"किती पाहुण्यांना बोलवायचे?,आहेर काय करायचे..?"

विवाह समारंभ, सत्यनारायण महापूजा. या सा०यांसाठी आजीचे अनुभव जमेस धरून नियोजन होत होते.

"व्यावसायिक छायाचित्रकार बोलवायचा की आयफोन पटू.. निशांत, प्रदीप" यांना जबाबदारी द्यायची यावरही बराच खल झाला होता."

मुख्य विधींसाठी आणि व्हिडिओ शुटींगसाठी व्यावसायिक फोटोग्राफर हवा" यावर एकमत झाले. अर्थात ही जबाबदारी त्या दोघांनी उचलली हे वेगळं सांगायला नको.

'मधुचंद्रावर किती खर्च करायचा..?' यात ही आजी मागे नव्हती...

या मुद्यावर अखिल माळवे कुटुंबीय गोलमेज परीषद आयोजीत करण्यात आली. कुठे जायचे हा निर्णय अजूनही घेतलेला नाहीये. पण "सहकुटुंब देवदर्शन" या मुद्द्यावर शिक्कामोर्तब केलं होतं आणि याचं सविस्तर नियोजन करण्यासाठीच मी बाबांना शोधत होतो.

पाहुण्यांना निमंत्रीत करताना,

'संबंधीत व्यक्ती आपल्या कुटुंबातील सदस्य आहे का?'

'गेल्या वर्षभरात मी या व्यक्तीशी बोललो आहे का?'

'कुणी चुकून राहिले आहे का?'

या विषयावर गहन परीसंवाद संपन्न झाले. शकुंतला आजीने ब०याच गोष्टी सोप्या करून ठेवल्या होत्या. ती एकटी गावात रहात असल्याने आप्तेष्टांचा गोतावळा आणि घरोबा तिनं पुरेपुर जपला होता.

"दादा बाबा आणि काका आले रे" श्रद्धानं आवाज दिला. तसा मी ओसरीवर आलो. बाबांनी भलेमोठे आईस्क्रीम चे फॅमिली पॅक आणले होते. फुलवाले, हारवाले, केटरर, डीजे किंवा लग्नाचा बँड, मंडपवाला, भटजी, हौशी कार्यकर्ते, बरीचशी देणी चुकती करून बाबा आणि काका येत होते.

"अहो बाबा..समक्ष जायची काय गरज होती..? मोबाईलवरून पेमेंट केले असते की..!" मी बाबांशी बोलत असताना आजी म्हणाली..

"वा रे..वा.. आला मोबाईल समशेर.. अरे बाबा हे शहर नाही. गाव आहे इथं अजूनही नारळ आणि टॉवेल टोपीचा मान केल्याशिवाय कार्य पुर्ण होत नाही." आजीनं पुस्ती जोडली.

आजीचं घरातल्या प्रत्येक व्यक्तिशी नातं जोडलेल होतं. आजी माळवे कुटुंबातील एक महत्त्वाची व्यक्ती होती. तिचा अनुभव आणि ज्ञान कुटुंबाला मार्गदर्शक असायचं. तीने आजोबांच्या माघारी, प्रेमाने आणि काळजीने कुटुंबाला एकत्र बांधून ठेवले होते.. कुटुंबातील सर्व सदस्यांना एकत्र आणणारी आणि त्यांच्यातील नातेसंबंध मजबूत करणारी आजी गावी मात्र एकटी रहायची.

"वहिनी जरा बाऊल आणि चमचे घेऊन या हो. इथे अंगणातच करूया आईस्क्रिम पार्टी" आईनं काकूला आवाज दिला. पण त्याच वेळी काय झालं कोण जाणे काकूचं उत्तर येण्याऐवजी, माजघरात कसलातरी आवाज झाला.. अन् पाठोपाठ "आई.. अगं काय होतयं तुला..?" बाबांचा काळजीनं रडवेला झालेला स्वर कानी आला. आजी माजघरात उभ्या उभ्या चक्कर येऊन कोसळली.

काय करावं काहीच सुचेनासे झालं. डोळ्यातून वाहणाऱ्या धारा काही सुचू देत नव्हत्या. आजीला पडवीत आणलं. घरगुती उपचार सुचेल तसे सुरू झाले. प्रसंगावधान राखून 'संजू आत्या' आणि 'नाना काकांनी' आजीला ताबडतोब तालुक्याच्या गावी हॉस्पीटलमधे एडमीट करण्याचा निर्णय घेतला. नव्वदी पार केलेल्या आजीला. सौम्य हृदयविकाराचा झटका येऊन गेल्याचं डॉक्टरांनी निदान केलं आणि काळजाचं पाणी पाणी झालं. वेळेवर एडमीट केल्याने पुढील धोका टळला.



आता आजीला एकटं ठेवायचं नाही?.. हा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. आजी विषयी प्रत्येकजण व्यक्त होत होता.

बाबा म्हणाले,"माझी आई माळवे कुटुंबांचा आधार आहे, आमचे सर्वस्व आहे. तिच्या, अस्तित्वात आमचे संस्कार लपले आहेत"

भाऊ काका म्हणाले, "आमचे जीवन जीने घडवीले ती रानजाई, शकुंतला आई आमची आई आहे".

"धारधार बोलणारी, शिस्तप्रिय आजी, अशी झोपून राहिलेली आम्हा नातवंडांना पहावीत नाही" मी प्रज्ञाला म्हणालो.

आजीच्या काळजीने सारा परीवार गोळा झाला होता. काळजाची माया असलेली आजी, सारं गणगोत घेऊन आराम करीत होती.

तिच्या हाताचे, झालेले मोरपीस, खोल गेलेले डोळे काळीज कासावीस करीत होते. आजी आमचे देवालय होती. आजीमुळे घर, आम्ही एकत्र होतो. तिच्यासाठी आराध्य ईश्वर धावून आला आणि आजी आठ दिवसांत ठणठणीत बरी झाली. पण हृदयविकाराचा झटका आल्याने काही बंधने आली.

आजी दवाखान्यातून घरी आल्यावर मी तिचं नेहमीच ठरलेलं वाक्य तिला ऐकवलं,

"काळजीत नको काळजात राहा" हे आजीचं वाक्य तिला मी तिलाच ऐकवलं तेव्हा ती म्हणाली,

"अरे माझं काळीज या घरात घरासमोरच्या आगंणात परसदारात गुतलंय. हे गावाकडचं घर माझ्यासाठी मंदीर आहे. आठवणींचा आरसा आहे. तुझे आजोबा गेल्यानंतर ही.. मी या घरात कधी एकटी नव्हतेच कारण तुज्या आजोबां नंतर या घराला माझाच आधार होता रे..!"

"हे घर आपल्या सवार्चं आहे, आणि आपण सारे या घराचे आहोत तुमच्या सर्वांचं बालपण या घरानं जवळून पाहीलंयं या घराच्या प्रत्येक कोपऱ्यात तुमच्या सर्वांच्या आठवणी आहेत आणि या घराने ही त्या तितक्याच आपलेपणाने जपून ठेवल्या आहेत आणि म्हणूनच या घराचं मन जपणे ही माझी जबाबदारी नाही तर आद्य कर्तव्य आहे"

तुम्ही सगळे जरी मला सोडून शहरात रहात असला तरी हे घर ही परसबाग हे घरासमोरचं आगंण माझ्याशी बोलत असतं. माझ्याकडे काळजीने पहात असतं आणि याला अशा परीस्थितीत एकटं कसं सोडायचं..? तूच सांग ..ज्यानं आधार दिला त्याला आपल्याच स्वार्थासाठी असं निराधार सोडून द्यायचं मला तरी पटत नाही आणि म्हणूनच पोरांनो तुमचा विरोध पत्करून मी एकटीच गावाकडे राहाते."

बोलता बोलता आजीनं माझ्या बायकोला प्रज्ञाला जवळ बोलावलं आणि म्हणाली, "पोरी अगदी तुझ्याच वयाची होते मी जेव्हा लग्न करून सासरी आले. तेव्हा या गावाकडच्या घरानंच मला जगायला शिकवलं. आपल्या माणसांत राहायला शिकवलं. घरातली पुरूष माणसं कामाला गेल्यावर या घरान मला अन् मी या घराला जीवापाड जपलं आहे. हे घर माझ्याशिवाय कसं राहील तूच सांग मी जगते ना ते या घराच्या आधारानेच. घरातला तो वास्तू पुरूष कधी एकटा पडायला नको. म्हणून मी रहते त्यांच्या सोबत... तोही मग आठवणींच्या आरश्यातून मला आधार देतो..!"

आजीचं घरावर असणारं प्रेम पाहिलं आणि आजपर्यंत आजी गावाकडे एकटं का रहायते याचं कोडं उलगडलं होतं. हे घर म्हणजे आजीचा आधार होतं आणि आजी म्हणजे या घराचा आधार होता आणि आधार असाच कायम ठेवण्यासाठी आजीला बरं वाटेपर्यत आई आणि बाबांनी आजीबरोबर गावाला राहायचं ठरवलं...! तिला आता एकटं सोडायचं नाही हा निर्णय हळव्या मनाला खूप मोठा आधार देऊन गेला.

पुणे
मो. ७२७६२८२६२६

कथा

वारस



- सौ.रेखा नामदेव दहातोंडे

अगं, चांगला आहे अजून तो शर्ट. कशाला फेकायचा? मी काय घरातच तर असतो."

सरांच ठरलेलं उत्तर ऐकायला आलं आणि अस्मीने कपाळाला हात लावला. गोष्ट आहे जाधव सरांची. सर हायस्कूल शाळेत गणिताचे शिक्षक तर पत्नी सरला प्राथमिक शिक्षिका. सुखी संसार दोघांचा. पदरी दोन मुली, मोठी सोनु आणि छोटि अस्मी. पदरी मुलगा नसल्याच शल्य दोघांच्याही मनात कायमचं बोचत होते. कारण तसेच होते म्हणा, सरला मॅडमला भाऊ नव्हता. वडीलांची परिस्थिती चांगली असूनही त्यांची होत असलेली ससेहोलपट ती अनुभवत होती. दोन्हीही मुली फार हुशार. पण सरांचा स्वभाव मात्र फार काटकसरी. स्वत:ची हौस तर सोडाच पण दैनंदिन गरजा भागविण्यातही त्यांची काटकसर असे. परिस्थितीवर मात करून स्वकष्टाने त्यांनी सारे मिळविले होते. घरच्या छोट्या बहिण, भावाच्या कुटुबांचा भार त्यांच्या खांद्यावर होताचं. स्वत:साठी कधी नवे कपडे, चपला लवकर त्यांनी घेतल्याच नाही. सरलालाही कधी मनमोकळेपणाने जगता आले नाही. मोठी सोनु दहावी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली. तिला डॉक्टर व्हायचे होते. खूप प्रयत्न केले, खूप समजावलं पण काही उपयोग झाला नाही. सरांनी तिचं काही ऐकल नाही आणि तीचा प्रवेश डी.एडला घेण्यात आला. मनातून नाराज असलेल्या सोनुने वडीलांच्या मर्जीखातर डी.एड चांगल्या गुणांनी उत्तीर्ण केले.

दिवसामागून दिवस चालले होते. छोटअजून नववीत शिकत होती. सोनुला चांगले मार्क्स असल्याने तिला नोकरी लवकर मिळाली. नोकरी निमित्त शेजारच्या जिल्ह्यात जावे लागले. अशातच एक उत्तम स्थळ आलं. मुलगा शिक्षक,घरची परिस्थिती चांगली. नकार द्यायचा प्रश्नच नव्हता. मोठ्या थाटामाटात लग्न पार पडले. तिचा सुखाचा संसार सुरू झाला. नोकरी निमित्ताने तिला एकटीला परजिल्ह्यात रहावे लागत होते. सुटीच्या दिवशी सासरी येत होती. धावपळ होती पण जिव्हाळा, प्रेम टिकून होते. छोट्या अस्मीला मात्र डॉक्टर करायचं असे सोनुने ठरवलं आणि वडीलांकडून तशी परवानगी घेतलीच.

तिचही शिक्षण सुरू झाले. सोनुला लवकर डोहाळे लागले आणि तीने एका मुलीला जन्म दिला. डीलिव्हरीत तिला खूप त्रास झाला. बाळावरही त्याचा अनिष्ट परिणाम झाला. प्रयत्नांची पराकाष्ठा करुन दोघींना वाचविण्यात आले. सर, मॅडम दोघेही आता सेवानिवृत्त झाले होते. आनंदात ,सुखात रहायचे त्यांनी ठरवले. एक डॉक्टर मुलगा पाहून अस्मीचेही लग्न पार पडले. मोकळा श्वास या दाम्पंत्याने घेतला.

मूल,घर, नोकरी अशी धावपळ सोनुची सुरूच होती. पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. ताप आल्याचे निमित्त झाले आणि मेंदूत ताप जाऊन अचानक सोनूला हे जग सोडून जावे लागले. तिची वर्षभराची श्रेया आईच्या प्रेमाला पारखी झाली.आईवडीलांवर दु:खांचा डोंगर कोसळला. त्यांच्या दु:खाला पारावर उरला नाही. पण त्यांच्यासमोर श्रेया होती. आपले अश्रू गिळून ते सावरले. त्या छोट्या जीवात ते आपली सोनु शोधत होते. मोठ्या जिकरीने ते तिचा सांभाळ करीत होते. त्यांच्या जगण्याचे एकमेव कारण श्रेयाच होते,पण मोठ्या ताईची उणीव मात्र कायमच मनात सलत होती. मधल्या काळात छोट्या अस्मीने एका गोंडस मुलाला जन्म दिला होता.

दिवस चालले होते परंतु सोनु गेल्यापासून सरांची तब्येत फारच खालावली होती. त्यातच छोट्या श्रेयाला तिच्या वडिलांनी हट्टाने आपल्या घरी नेले. सर पुरते हतबल झाले. ग्रासलेल्या मनाचा शरीरावर विपरीत परिणाम झाला. थोड्याच दिवसात ते सुद्धा देवाला प्रिय झाले.आभाळच फाटले पण आपल्या लेकीसाठी मॅडम खंबीर बनल्या. वरवर तरी त्या असेच भासवत होत्या. आपल्या नातवंडाची हौस पुरवित होत्या. आपल्या लेकीसाठी एकाकी आयुष्य जगत होत्या. वडीलांकडून मिळालेली प्रॉपर्टी, स्वत: कमावलेली प्रॉपर्टी मुबलक होती, पण ती खर्च करायची सवयच नव्हती. मोठे जावई सुद्धा मुलीला पुढे करुन हिस्सा मागायला तयार झाले. दिवस चालले होते आणि अचानक एक दिवशी मॅडम खूप आजारी पडल्या. त्यांना अतिदक्षता विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले. दोन तीन दिवस प्रयत्नांची पराकाष्ठा केली पण शेवटी त्यांची प्राणज्योत मालवली. संपत्ती असुनही काही कामी आली नाही. सगळं संपल. अस्मी पोरकी झाली. माहेरपणाला मुकली यालाच नियती म्हणावं काय!

पण शेवटी अस्मीने आई वडीलांच्या नावाने शाळेला मोठी देणगी देण्याचा आणि श्रेयाला लहानचे मोठे करण्याचा निर्धार मनाशी पक्का केला.

अहिल्यानगर
मो. ७७०९७३८४२४

कथा

विघ्नहर्ता

-सौ. अनघा कुळकर्णी

अरे मंदार लवकर आंघोळ कर केव्हाची आवाज देते आहे तुला'

मंदारची आई त्याला हाका मारत होती. रविवार असल्यामुळे मंदार दहा वाजले तरी अजून अंथरुणातच होता.

'अहो, जरा बघा ना, रविवार असला तरी त्याचे होमवर्क भरपूर आहे ते उरकायचे आहे. त्यामुळे आता त्याला उठवायलाच हवे'

मंदारच्या वडिलांनी मंदारला हलवून उठवले. 'मंदार आता तू बारा वर्षांचा झालास तू स्वतः सगळी तुझी कामे करायला हवीत अगदी उठण्यापासून.'

ब्रश वगैरे करून मंदार डायनिंग टेबलवर आला. मंदारच्या आईने त्याला दूध दिले आणि दूध संपल्यावर काम करता करता म्हणाली,

'अरे मंदार काल गणेश चतुर्थी होती म्हणून मी काही बोलले नाही पण आता आज तुला अभ्यास करायला हवा'

मंदारच्या चेहऱ्यावर काहीच हालचाल दिसली नाही म्हणून आई परत म्हणाली,

'अरे कळतंय का तुला, मी काय म्हणते ते, तुझी परीक्षा जवळ आली आहे'

अजूनही मंदारकडून काहीच रिस्पॉन्स आला नाही म्हणून आई अगदी जवळ येऊन त्याला म्हणाली,

'अरे मंदार काय झालं?'

मंदार एकदम दचकला आणि म्हणाला,

'कुठे काय काहीच झालं नाही'

'अरे मग एवढा वेळ मी बोलते आहे त्यावर तुझं काहीच उत्तर आलेलं



नाही'

'कधी?'

'अरे देवा! म्हणजे माझं सगळं बोलणं फुकट गेलं म्हणायचं. अहो ऐकता का, तुम्हीच सांभाळा आता या लेकाला. काहीतरी बिनसलंय याचं'

'काही नाही गं, सगळं लक्ष मोबाईल मध्ये असतं मग तेच विचार डोक्यात असतील म्हणून लक्ष नसेल त्याचं.'



'हो आणि शाळा संपल्यानंतर मोठ्या मुलांबरोबर हा 'दादा- दादा' करत फिरत असतो वर्गणी गोळा करायला आणि मग काल गणेश चतुर्थी होती ना तिकडे तर काय दिवसभर नाचत होता.'

'जाऊदे गं ती सगळी मुलं पण याला सांभाळून घेतात'

संध्याकाळी पण मंदारचे आई-बाबा त्याच्याशी बोलायचा प्रयत्न करत होते तेव्हा पण हा काही उत्तरे देत नव्हता नंतर त्यांच्या लक्षात आलं की दुरून बोललं की त्याला ऐकू येत नाहीये. अगदी जवळ जाऊन बोललो तरच त्याला समजतंय. दोघांनाही खूप काळजी वाटायला लागली.

'आपण लगेच दवाखान्यात घेऊन जाऊया, मंदारची आई म्हणाली,

'होहो लगेच जाऊया नाहीतर हा शाळेत काय करेल'

दवाखान्यात डॉक्टरांनी पण त्याला बरेच प्रश्न विचारले. काही प्रश्नांची उत्तरे त्याने दिली, काही वेळा त्याचा चेहरा निर्विकार असायचा. डॉक्टरांनी त्याचे कान तपासून एक्सरे पण काढायला सांगितला. एक्स-रे चा रिपोर्ट आल्यावर डॉक्टरांना जी शंका होती ती खरी ठरली. त्यांनी त्याला अचूक निदान होण्यासाठी एमआरआय करायला सांगितले. एम आर आय चा आणि एक्स-रे चा रिपोर्ट पाहून डॉक्टरांनी मंदारच्या आई-बाबांना सांगितले की मंदारच्या कानाच्या पडद्याला धक्का लागलेला आहे, त्यामुळे तो कमी ऐकतो तर त्याचे छोटेसे ऑपरेशन करावे लागेल त्यासाठी तुमची संमती लागेल.

'हे असे अचानक कसे काय झाले' मंदारच्या आई-वडिलांना प्रश्न पडला.

डॉक्टरांनी मंदारला विचारले, 'गणेश चतुर्थीच्या दिवशी तू जेव्हा बाहेर होतास तेव्हा आवाजाच्या अगदी जवळ होता का?'

मंदारचे होकारार्थी उत्तर होते त्यामुळे डॉक्टरांनी मंदारला आणि मंदारच्या आई वडिलांना सांगितले,

'अहो साधा फटाक्यांचा जेव्हा जोरात आवाज होतो तेव्हा आपण दचकतो म्हणजेच काय की, आपल्या कानांना एवढ्या मोठ्या आवाजाची सवय नसते आपल्या कानाची एका विशिष्ट म्हणजे जास्तीत जास्त पंचावन्न डेसिबलपर्यंत ऐकण्याची क्षमता असते त्यापेक्षा जर जास्त जोरात आणि जास्त वेळ कर्णकर्कश आवाज कानात गेला तर कानाच्या पडद्याला धोका संभवतो आणि असेच काहीसे मंदारच्या बाबतीत झालेले आहे'.

मंदारचे आईबाबा मंदारला घेऊन अतिशय तणावात घरी आले. ऑपरेशनच्या खर्चाचा ताळमेळ कसा बसवावा याचे मंदारच्या बाबांना दडपण होतेच, शिवाय डॉ.ना पूर्ण खात्री देता येत नव्हती की कानाची पूर्ण क्षमता पहिले सारखी होईलच. मंदार दोन दिवस कुठल्याच कार्यक्रमात आला नाही म्हणून मंडळाच्या सर्व सदस्यांनी एकमेकांजवळ चौकशी केली. मंडळात सर्वांचा मंदार खूप लाडका होता. सगळ्या मोठ्या मुलांच्या मागे 'दादा-दादा' करत त्यांच्याबरोबर फिरायचा. त्याला गणपतीची कामे करायला खूप आवडायची. मुळात गणपतीच आवडायचा. त्यामुळे मंदार आला नाही म्हणून सगळ्यांना चुकल्या चुकल्यासारखे वाटत होते. सर्वजण मिळून मंदारच्या घरी आले. घरी आल्यावर सगळ्यांना धक्काच बसला. असंही काही होऊ शकतं यावर विश्वासच नव्हता. सगळ्यांनी पुढच्या वर्षीपासून आवाजाची मर्यादा ठरवून घेतली आणि मंदारच्या आई-वडिलांना शक्य तेवढी मदत करण्याचे आश्वासन दिले.

गणपतीच्या मंडळाने सर्वांमध्ये एक ठोस निर्णय घेतला. त्यांनी सर्वांनी मिळून मंदारच्या ऑपरेशनची जी आगाऊ रक्कम भरायची होती ती दवाखान्यात जाऊन आधीच भरली त्यामुळे मंदारच्या आई-वडिलांचा भार खूप हलका झाला त्यांना मंडळाचे किती आभार मानावे समजेना. मंदारच्या आई-वडिलांनी मंदारची मानसिक तयारी ऑपरेशनसाठी करून घेतली.

'अरे, काही होणार नाही आपल्या मागे सर्वांचे आशीर्वाद आहेत आणि मुख्य म्हणजे तुझा बाप्पा तुझ्याबरोबर आहे त्यामुळे अजिबात काळजी करू नकोस आम्ही सर्वजण तुज्याबरोबर आहोत.'

मंडळातील सगळे सदस्य ऑपरेशनच्या दिवशी दवाखान्यात उपस्थित होते मंडळातील सर्व सदस्यांना अपराधी असल्यासारखे वाटत होते. मंदारचे एक तासाचे ऑपरेशन झाले. डॉक्टरांनी ओके म्हणून अंगठा वर केला. सर्वांना हायसे वाटले. दोन-तीन दिवसांनी डॉक्टरांनी कानाची आणि आवाजाची टेस्ट केली तर आता मंदारला व्यवस्थित ऐकू येत होते पण डॉक्टरांनी सांगितले की,

'थोडा जरी अजून उशीर झाला असता किंवा अजून थोडा वेळ तो त्या आवाजाच्या जवळ राहिला असता तर कदाचित त्याला बहिरेपणा आला असता. थोडक्यात तुम्ही सर्वजण वाचले आहात यापुढे सगळ्यांनी खूप खूप काळजी घेणे आवश्यक आहे विशेषत: लहान मुलांची आणि वृद्ध माणसांची सुद्धा'

मंदारच्या आई वडिलांनी आपल्यावरचे विघ्न टळले म्हणून विघ्नहर्ता गणपतीची खास पूजा केली. सर्वांना मंदारच्या हस्ते प्रसाद वाटला. मंडळाने ठरवले की, आपण आपल्या गावातील इतर मंडळांना सुद्धा आवाजाची मर्यादा एका विशिष्ट डेसिबलपर्यंत ठेवावी यासाठी आवाहन करुया. बालकांच्या सुरक्षिततेसाठी गणेश मंडळात जनजागृती करूया गणेशोत्सवाच्या उत्साहाबरोबरच सामाजिक बांधिलकीचा आदर्श जपूया, गणेश उत्सवाचा सांस्कृतिक वारसा जपूया.

वारजे, पुणे
मो. ९३२३४९१११३

कथा

न दिसणारी कामं

- छाया उंब्रजकर

घरात कामांची कमतरता नसते. काही कामांना आवाज असतो. कुकरच्या शिट्ट्या, भांड्यांची आदळापट, झाडूचा आवाज, कपडे धुण्याचा गडगडाट. काही कामांची खूण दिसते. आवरा-आवर, स्वयंपाक, बाजारातून आणलेल्या पिशव्या, भरलेली औषधांची पाकिटं. पण या सगळ्यांच्या मागे अशीही कितीतरी कामं असतात ज्यांना ना आवाज असतो, ना आकार, ना सुट्टी. ती म्हणजे सतत कुणाची तरी काळजी घेत राहण्याची कामं.

घरातल्या प्रत्येकाची माहिती कुणाला तरी असते. बाबांची औषधं कधी संपणार, मुलाची परीक्षा कधी आहे. सासूबाईंची तपासणी कोणत्या दिवशी आहे. मुलीला उद्या कोणता पोशाख हवा. भावाला फोन करून कागदपत्रांची आठवण करून द्यायची आहे. घरातलं धान्य कमी झालं आहे. गॅस बुक करायचा आहे. नातेवाइकांचा वाढदिवस जवळ आला आहे ही सगळी माहिती एका व्यक्तीच्या डोक्यात शांतपणे फिरत असते. कोणी तिला ती यादी लिहून दिलेली नसते. ती स्वत:च लक्षात ठेवते. स्वत:च पुढचा विचार करते. स्वत:च एखादी अडचण येण्याआधी तिची सोय करून ठेवते. घर सुरळीत चालतं. कारण कुणीतरी सतत जागं असतं. पण त्या जागेपणाला आपण 'काम' म्हणत नाही.

पूर्वी हे काम प्रामुख्याने घरातल्या स्त्रीच्या वाट्याला येत असे. आज परिस्थितीत काही बदल झाले आहेत. पुरुषही मुलांची जबाबदारी घेतात, वृद्ध आई वडिलांची काळजी घेतात, स्वयंपाक करतात, घर सांभाळतात. मुलंही आई बाबांच्या कामात हातभार लावतात. तरी एक गोष्ट मात्र अजूनही तितकीच खरी आहे. कुटुंबातील भावनिक जबाबदारी अनेकदा एखाद्या एकाच व्यक्तीच्या खांद्यावर नकळत जमा होत जाते. सगळ्यांच्या वेळा



लक्षात ठेवणारी व्यक्ती स्वत:ची वेळ मात्र विसरते. सगळ्यांच्या आवडी लक्षात ठेवणारी व्यक्ती स्वत:ला काय हवं आहे हे सांगायलाही कधी कधी विसरते. सगळ्यांच्या चेहऱ्यावरचा थकवा ओळखणाऱ्या व्यक्तीच्या चेहऱ्याकडे पाहण्याची फुरसत घरातल्या कुणाला नसते. हीच आजच्या कुटुंबाची एक न दिसणारी बाजू आहे.

आपण डिजिटल जगात आलो. मोबाईलने कितीतरी गोष्टी सोप्या केल्या. वाढदिवसांची आठवण करून देणारे संदेश येतात. औषधांची वेळ सांगणारे अनुप्रयोग आहेत. बँकेची देयकं आठवण करून देणाऱ्या सूचना आहेत. दिनदर्शिका आहे. घरबसल्या बाजार करता येतो. तंत्रज्ञानाने आपल्याला अनेक गोष्टी लक्षात ठेवायला मदत केली. पण एकमेकांना लक्षात ठेवण्याचं काम अजूनही माणसालाच करावं लागतं. मोबाईल सांगतो आज आईचा वाढदिवस आहे. पण आई दिवसभर किती वेळा एकटी बसली होती हे तो सांगत नाही. दिनदर्शिका सांगते. आज बाबांची तपासणी आहे.

पण दवाखान्यातून परतताना त्यांच्या चेहऱ्यावरची चिंता ती वाचत नाही. मुलाच्या परीक्षेची तारीख फोनमध्ये नोंदलेली असते. पण निकालाच्या आदल्या रात्री त्याच्या मनात किती भीती आहे हे कोणतीही सूचना सांगत नाही. आपण सोयी वाढवल्या. संवेदना मात्र अजूनही आपल्यालाच जपायच्या आहेत. कधी कधी घरातल्या व्यक्तीला पैशांची गरज नसते. मोठ्या मदतीचीही गरज नसते. फक्त कुणीतरी विचारावं असं वाटतं.

'तू ठीक आहेस ना?'

आणि गंमत अशी की हा प्रश्न विचारण्याची सवयही आपण गमावत चाललो आहोत. घरात सगळे एकत्र असतात. तरी प्रत्येकजण आपापल्या पडद्यामागे असतो. एका खोलीत चार माणसं बसलेली असतात. चार वेगवेगळे पडदे उजळलेले असतात. चार वेगवेगळ्या जगांमध्ये चार वेगवेगळी माणसं जगत असतात. पूर्वी घरात शांतता असेल तर कुणीतरी विचारायचं,

'काय झालं?'

आता शांतता म्हणजे प्रत्येकाच्या हातात मोबाईल आहे एवढाच अर्थ उरला आहे. पण प्रत्येक शांतता निवांतपणाची नसते. काही शांतता थकव्याची असते. काही मनात साचलेल्या शब्दांची. काही अपेक्षा न बोलता गिळून टाकण्याची. काही 'कुणाला सांगून उपयोग नाही' या भावनेची. ही शांतता ओळखणं हेही एक काम आहे. आणि हे काम कोणत्याही यंत्राला अजून जमलेलं नाही. कधीकधी घरातली व्यक्ती एखादं काम विसरते. दूध आणायचं राहून जातं. मुलाची वही आणायची राहते. वडिलांची औषधं वेळेवर येत नाहीत. एखाद्याचा वाढदिवस विसरला जातो. आणि लगेच प्रश्न येतो

'आज काय झालं? एवढंसुद्धा लक्षात राहिलं नाही?'

कदाचित चूक त्या एका दिवसाची नसते. कदाचित अनेक वर्षं सगळ्यांच्या गोष्टी लक्षात ठेवणाऱ्या मनाने पहिल्यांदाच थोडा विराम घेतलेला असतो. त्यावेळी 'काय झालं?' या प्रश्नापेक्षा एक वेगळं वाक्य अधिक महत्त्वाचं ठरतं.

'तू थकली असशील.' किंवा,

'आज राहू दे. हे मी करतो.'

या छोट्याशा वाक्यात मदतीपेक्षा अधिक काही असतं. त्यात समोरच्या माणसाला दिसण्याची जाणीव असते. कारण काळजी घेणाऱ्या माणसाला कायम काळजी घेतच राहता येत नाही. ज्याने सगळ्यांच्या भावना ओळखल्या, त्याच्या भावनाही कुणीतरी ओळखायला हव्यात. ज्याने घरासाठी आपली वेळ दिली, त्याला कधीतरी स्वत:साठी वेळ मिळायला हवा. ज्याने प्रत्येकाची आठवण ठेवली त्याची आठवण कुणीतरी ठेवायला हवी. कुटुंब म्हणजे केवळ एकाच छताखाली राहणारी माणसं नाहीत. कुटुंब म्हणजे कोणाच्या आवाजातील बदल जाणवणं. कोणाच्या नेहमीच्या वागण्यातला छोटासा फरक लक्षात येणं. 'काही नाही' या दोन शब्दांमागे दडलेलं बरंच काही ऐकू येणं. आज प्रत्येकाकडे कामं आहेत. जबाबदाऱ्या आहेत. स्वत:च्या चिंता आहेत. प्रत्येकाची धावपळ खरी आहे. त्यामुळे कुणाकडे दुर्लक्ष होतं, ते नेहमीच जाणीवपूर्वक होत नाही. कधी कधी आपण स्वत:च्या जगण्यात इतके गुंततो की अगदी जवळच्या माणसाचं जगणंही आपल्यापासून दूर जातं. म्हणूनच कदाचित आजच्या कुटुंबाला मोठ्या बदलांची नव्हे, तर छोट्या जाणिवांची गरज आहे.

आईने नेहमीच चहा केला म्हणून आज चहा तिनेच करावा असं नाही. बाबांनी प्रत्येक वेळी बिल भरलं म्हणून पुढचं बिलही त्यांनीच भरावं असं नाही. मुलगी सगळ्यांच्या वस्तू जागेवर ठेवते म्हणून तिचीच जबाबदारी असं नाही. जो नेहमी म्हणतो,

'मी करतो', त्यालाही कधीतरी कुणीतरी म्हणावं.

'आज तू बस.'

घर मोठं असण्यापेक्षा घरातल्या माणसांना एकमेकांसाठी जागा असणं अधिक महत्त्वाचं आहे. आणि ती जागा भिंतींमध्ये नसते. ती मनात असते. घर सुंदर ठेवण्यासाठी फक्त वस्तू जागच्या जागी ठेवाव्या लागत नाहीत. माणसांना त्यांच्या भावनांसह जपावं लागतं. कारण घरातली काही कामं हातांनी केली जातात. काही कामं डोकं करतं. पण काही कामं मन सतत करत असतं. त्या कामांना आवाज नसतो. त्यांची पावती मिळत नाही. त्यांचं कौतुकही होत नाही. तरी घराचा श्वास त्यांच्यावर चालत असतो. आणि कदाचित म्हणूनच, दिवसभर सगळ्यांची काळजी घेणाऱ्या माणसाला रात्री झोपण्याआधी एकच गोष्ट जाणवायला हवी. आज माझीही कुणीतरी काळजी घेतली.



सोलापूर
मो. ९४२३०६७९१६

कथा

उत्थान

- दीपावली राऊत

शिक्षणाच्या तेजाने तळपणारे जिवाचे रुबाबदार व्यक्तिमत्त्व अहंकारी डोळ्यांच्या बुजगावण्यांना मागे टाकीत रागद्वेषाच्या गल्लीबोळातून चालत घरी आले. वेदनेचे ढग डोळ्यात गच्च भरून तो यलम्माच्या समोर उभा राहिला.त्याचे लालबुंद मन पुन्हा एकदा त्याच प्रश्नाने पेटलेले होते... "आपल्या लक्तरलेल्या आयुष्याचा जन्मदाता कोण?"...त्याच्या वयाची अख्खी औरस जमात या प्रश्नाच्या उत्तरासाठी त्याच्यावर उलटून उठली होती. त्या जमातीच्या रक्तात भिनलेला सनातन विखार रोज त्याच्या मनावरच्या हिरव्या जखमांची खपली काढून त्याला रक्तबंबाळ करत होता. ज्या गावात त्याला देवळी म्हणून तिरस्काराच्या दावणीला बांधले गेले होते, त्याच गावातील शाळेत तो शिक्षक पदावर रुजू झाला होता. मात्र समाजपरिवर्तनाच्या काळातही भूतकाळाच्या पानांवर रुजलेले धर्माचे अमानुष संदर्भ अजूनही मिटले नव्हते.

शाळेत शिकवणाऱ्या आणि शिकणाऱ्यांना खानदान होते. घराणे होते. बापाचे नाव माहिती होते. पण त्याला मात्र ते नव्हते.अभिमानाने सांगता येईल अशी घरंदाज ओळख नव्हती. डफावर थाप पडावी,तसे त्याचे शब्द यलम्माच्या कानावर पडले.

"सांग अवदसे...! माझा बाप कोण आहे? कुठं आहे? कोणाच्या वासनेचं कातडं पांघरलं आहे मी?..."

ते शब्द यलम्माच्या काळजावर वस्त्र्याप्रमाणे फिरले. तीन



विटांच्या खबदाडात तिने काटक्या सरकवल्या आणि मृत्यूची वाट पाहणाऱ्या शरीराचा सांगाडा कसाबसा सावरत ती उठली. तिला कळून चुकले होते,धर्माच्या नावावर माणुसकीची शिकार करणाऱ्या या सनातन कत्तलखोरांना बाप दाखवायचा नाहीतर स्वत:चे श्राद्ध घालायचे या पावित्र्यात आज जिवा उभा आहे. तिने क्रुद्ध मुलाच्या मनाचा असा अंदाज घेतला आणि माणसांना देवत्व देऊन धर्माच्या तळाशी त्यांना विकलांग करून टाकणाऱ्या किळसवाण्या प्रथेचे अलंकार उतरवायला सुरुवात केली.

"जिवा...तू माया पोटी जन्माले यायले नवत होतं. ज्याच्या पायावर भरवसा ठेवून डोकं ठेवलं, त्याच्याच गाभाऱ्यात आमा देवदासींची अब्रू नागवली गेली...पोरा तुले बापाची ओळख लागत नाही. देवाची सेवा करताना पदरात पडलेल्या फुलाले ओळख लागते असं कोण सांगितलं?"

"अपमानकारक हास्याचा एक एक दगड भिरकावणाऱ्या आपल्या संस्कृतीनं,धर्मानं, समाजानं, दु:खानं,दैन्यानं,दारिद्यान!"

त्याच्या या विषाक्त उत्तराने यलम्माच्या मनाला कोरड पडली.जिवा आणि यलम्मा दोघेही वेदनेच्या कोपऱ्याला अंग आखडून बसले.मुलगा विचारीत असलेल्या बाभळीच्या काट्यासारखे प्रश्न ऐकण्याची आणि त्याला उत्तर देण्याची शक्ती तिच्या अंत:करणात नव्हती... धार्मिक विकृतीने दिलेल्या वासनेच्या डागण्यांचा हिशोब मांडण्याची शक्ती तिच्या अंत:करणात नव्हती. म्हणून अश्रूंनी भरलेले डोळे गच्च मिटून ती दु:खाने थरथरू लागली. पोराचे संतापाने, तिरस्काराने भरलेले मन असेच अपमानाच्या यातनांनी आक्रोशत राहीले, तर तो जीव देईल हा भयावह विचार समोर उभा राहताच यलम्मा समजुतीच्या सुरात म्हणाली,

"जिवा...धर्माच्या पावलाखाली दडपले गेलेले आपल्या जमातीचे श्वास गावाबाहेरच्या उकिरड्याचे वारसदार असतात. कोरभर भाकरी आणि घोटभर पाण्याच्या मोबदल्यात शरीराचं दान मागणारे सनातन दयावादी किती आले आणि किती गेले. आमच्यासारख्या अडाणी मुडद्याना धर्माच्या नावाखाली लैंगिक गुलाम करून शेवटी नाकारलं गेलं. वर्षातून एकदा येणाऱ्या माघी पुनवेला पुजली जाणारी देवाची पत्नी नंतर साऱ्या गावाची भोगदासी करण्यात आली. देवाच्या सेवेचा वसा देऊन, भक्तीच्या नावाखाली गावाने भोगलेल्या रांडेचं पोरं तू! अन् एवढीच तुझी ओळख हाय..."

आईचे शब्द ऐकून त्याचे डोळे अश्रूंनी भरून आले. माणसा माणसात संस्कृतीच्या, धर्माच्या, परंपरेच्या नावाखाली विषमता निर्माण करणाऱ्या उच्चभ्रू नरकाशी जुळलेली आपल्या अस्तित्वाची नाळ कापून काढावी आणि परमेश्वराच्या प्रेताला मुखाग्नी देऊन या सनातनी कर्मविपाकाला माती द्यावी या विचाराने त्याच्या मनाचा स्फोट झाला. त्याने पहिल्यांदा यलम्माच्या पायावर डोके ठेवले.

".... अम्मा मला क्षमा कर! विषाहूनही जहाल दु:ख जगून बेचिराख झालेल्या तुझ्या आयुष्यातील अंधार बघण्याचं धाडस मला आता होतं नाही."

मुलाच्या डोळ्यात आलेले पाणी आणि शब्दातील वात्सल्य पाहून, तिने आयुष्यात भोगलेल्या सर्व यातनांचा दाह आज शांत झाला होता. दास्यत्वाचे, अपमानाचे गिऱ्हाण आज सुटले होते. थरथरत्या हातांनी तिने जिवाला अंत:करणाशी कवटाळले आणि म्हणाली,

"जिवा...मायामुळ तू तोंड चुकवत जगू नकोस. गावकुसाबाहेर असलेल्या जुनाट सांडपाण्यात उगवण्यापेक्षा, पोरा! आमच्या जखमांच्या निरांजनात उत्थानाची वात लाव. आम्हा देवदासींची प्रत्येक रात्र धर्माच्या शामियान्यात वासनेशी संधान साधणाऱ्या मनूसैतानांच्या गुलामगिरीत गेली. कशाला हवाय तुझ्या अस्तित्वाला धर्मांध साजबाज... धर्माची श्रद्धेने वेठबिगारी करणाऱ्या या देहांना गुलामीतून मुक्त कर!ज्या दगडासमोरच आमच्या निरीला हात घातले गेले, त्याला तर आमच्या मुक्तीचे दु:खव्याकुळ टाहो ऐकू आले नाही...पण तू तरी ऐक! या ढोंगी नपुंसक समाजपुरुषाचा देवळी होऊन जिंदगी जळमटं करू नकोस. ज्या वस्तीवरून धर्माचे वारसदार सूर्याच्या उजेडात नाकाला रुमाल लावून जातात, त्या अस्पृश्य वस्त्यांच्या कौलारातून सूर्याचा थेंबथेंब गळू दे. या गुलाम, बेवारशी चेहऱ्यांना उजळ माथ्याने जगण्याचा अधिकार मिळवून देणारा सिध्दार्थ हो...आम्हा देवदासींची, भोगदासींची भिमाई हो पोरा!..."

यलम्माचे मूक हुंदके ऐकताना त्याचा कंठ दाटून आला. आजपर्यंत तो जन्मदात्या आईला तुच्छ लेखत होता.मात्र आज द्वेषाचे काटेरी कुंपण ओलांडले गेले होते. स्वत:चे दुष्काळी दु:ख बाजूला ठेवून तो दाटलेल्या स्वरात म्हणाला,

"अम्मा....कसला हा धर्म? कसली ही मानवी संस्कृती? धर्माच्या दैत्यांनी कथित देवांच्या नावाने स्वत:च्या वासनेची भूक भागवण्यासाठी सहज उपलब्ध होणारा स्त्रीचा देह मिळावा म्हणून निर्माण केलेली ही कसली प्रथा? आपल्या दासीची, पत्नीची अशी विटंबना होत आहे याची देवाला कधी लाज कशी वाटली नाही? बटबटीत पुरुषसत्ताक शोषणाची ओळख मला आता नको आहे. देवाधर्माचा आधार घेऊन स्त्रियांना आपल्या वासनेने उद्ध्वस्त करणारा पुरुषवाचक वारसा, बापाच्या नावाची ओळख मला नको आहे. मी देवदासीचा मुलगा आहे, हे अभिमानाने सांगत या अमानुष प्रथेच्या मणामणाच्या बेड्या तोडणार आणि अंधारात रुतलेल्या ध्येयआकांक्षांना आत्मउद्धाराच्या संजीवनीने जिवंत करणार..."

गांजलेल्या जन्मांना वासनेच्या नरकातून ओढून आणणारे जिवाचे शब्दस्वर यलम्मा देहाचे कान करून ऐकत होती.देवदासींच्या पिढ्यांच्या आत्यंतिक दु:खाला,वेदनेला पडलेल्या अस्तित्वाच्या प्रश्नांना आज पूर्णविराम मिळाला होता.

अमरावती
मो. ९१७५४४७८७६



काव्य रंग



चेक

मनापासून झटले सारे पटले नाही
उगा उडते पतंग माझे कटले नाही!

कधीच नव्हता आकाशावर हक्क माझा
या मातीलाच माझे म्हणणे पटले नाही!

रुतून आहे गाळात येथल्या पाय माझे
काळजाचे मौन अजूनही नटले नाही!

गर्दीत सारे घोटे शिक्के खपून गेले
खरा असूनही चेक माझा वटला नाही!

- सतीश देशमुख वेणीकोठेकर
अकोला
मो. ९४२३१२७२२९



हायकू

हसण्यासाठी
शोधावी एक जागा
जगणे जगा

आध्यात्मिकता
आत्म्याच्या गाभ्यातला
मंगल उमाळा

सर्वप्रथम
बनावे उपयोगी
नंतर योगी

कठीणकाळ
एकटेपणा देतो
नवे निर्मितो

ठेचाळलेला
अनुभवाचे सांगे
पाहून मागे

प्राणायम हे
प्राणशक्तीचे धन
अभिसरण

- प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त'
नागपूर
मो. ९४२१८०३४९८

भाषा प्रेमाची

भाषा नसते प्रेमाला
भावनांचा असे खेळ
सारे कळे न वदता
जमे जीवांचा जो मेळ

शब्दाविणा समजते
गुज मनीचे क्षणात
प्रेम म्हणती तयाला
भाव उमजे मनात

भाव असता उत्कट
नसे गरज बोलणे
माझे प्रेम तुज्यावरी
शब्दा शिवाय कळणे

आहे माध्यमे प्रेमाची
स्पर्श, संकेत, कटाक्ष
भाव दावी अंतरीचे
प्रेम भाषेत चाणाक्ष

होता असाच प्रेमाचा
स्पर्श कधी ओझरता
क्षणभर नकळत
शब्द न, ते पाझरता

अशी भावना प्रेमाची
निसर्गात भरलेली
पाखरांना कुठे बोली
तरी प्रीत झरलेली

- वैशाली वर्तक
अहमदाबाद
मो. ८१४१४२७४३०

काव्य रंग

छत्री

पावसाळ्या आठवते छत्री कुठे
शोधू पडे कोपऱ्याच्या अडगळी
छत्री झटकून साफसफाई केली
रंगीत छत्री घेऊ जोर पाऊसही

छत्री टोकं एकमेकांना समजून
आतले दोन जीव जवळ आले
खबरदारी घेई भिजवू नये ही
बाहेर पाऊस ती वरील भिजली

काळ्याछत्री वरून नाव नोंदणी
हरवून जाते छत्री समजत नाही
पाऊस आला आठवते ही छत्री
प्रश्न पडला जाऊ कशी भिजूनी

पावसाचे थेंब टपोरे अधिक
थैमान सुरू थांबतच नाही
बाजूला आडोसा घेऊन थांबले
रिमझिम पाऊस छत्री आधार

मुंबई पाऊस थैमान भारीच
पाऊस थांबत पडे रात्री दिवसही
पूर आला फजीती झाली हो
पदर डोक्यावर छत्री सावरून

छत्री बजेट परवडत नाही
महाग झाली छत्री चार घेई
भिजणं म्हणजे आजारी पडणं
छत्री घेऊन काम राहतील सुरू

- सौ. मंगल सुधीर आपटे
पुणे
मो. ९८९००८७५०८

'ऋतू हिवाळा'

उन्ह कोवळे
दवात गोठले
शुभ्र धुक्याचे
हे ऋतू आले

थंड गारवा
स्पर्श नवा
हिरव्या वसुला
साज नवा

फुलली बघा
पिवळी शेवंती
सोनचाफ्याने
सजली आरती

खट्टे - मिठ्ठे
बोर सुवासी
पिंगा घालती
रोज वाऱ्याशी

हिरवा तो
गोड हरभरा
रानशेतीचा
रान पसारा

संध्यासमयी
जळे शेकोटी
कुजबुज गप्पा
चाले हाकाटी

रजनी गडद
दुलई पांघरे
निज डोईत
अलगद उतरे

ऋतुरंग असा
मनास मोहवी
जगण्यास फुटे
नवी पालवी

- कविता अजय दाते
वर्धा
मो. ८६२३८०८४५५



गझल

मी मोल सांत्वनाचे आता कशास सांगू
कल्लोळ भावनांचे आता कशास सांगू

होता तुझा नि माझा गोतावळा निराळा
चुकले कुठे कुणाचे आता कशास सांगू

कोणास दोष देवू कोणास बोल लावू
ते भोग प्राक्तनाचे आता कशास सांगू

राखेतुनी परतलो जगणे पुन्हा जगाया
उपकार पावसाचे आता कशास सांगू

आहे सुखात सद्धा इतके मला पुरेसे
अंदाज मी उद्याचे आता कशास सांगू

- विकास गजापुरे
नागपूर
मो. ९२०९८१२१४८

काव्य रंग

सौख्य-वेदना

कष्ट होते फार त्याला फार होत्या यातना,
तो तरीही मोद ल्याला तीच होती साधना ॥ धृ॥

दु:ख कोणा होत नाही कष्ट होती ना, मना,
त्यामुळे नाही कुणाला त्रास वाटो जीवना.
दु:ख आहे संगतीला हीच 'त्या' ची योजना,
कष्ट होते फार॥१॥

भोगण्या आनंद मोठा मूल्य त्याचे जाण ना,
दु:ख नाही लाभता कैसी करावी तूलना.
दु:ख आहे त्यामुळे आहे खुशीची भावना,
कष्ट होते फार. ॥ २॥

ईश्वराची हीच लीला हीच त्याची कामना,
वेदना ही सौख्य आहे सौख्य आहे वेदना.
खेळ आहे जीवनाचा त्याच रंगी रंग ना,
कष्ट होते फार. ॥ ३॥

- धनाग्रज (मंदार आपटे)
अबुधाबी
मो. ९७१ ५६२६७११२९



ओंजळीतल चांदणं.....



ओंजळीतलं चांदणं
खुदकन हसलं
तुझं स्मितहास्याचं प्रतिबिंब
त्यात अलगद सामावलं

ओंजळीतल चांदणं
होतं सुंदर, मुग्ध
कधी होतं आपल्याच
अनोख्या विश्वात दंग

ओंजळीतल्या चांदण्याला
नव्हती सर कुणाची
आकाशातल्या चांदण्याशी
उगा स्पर्धा का करायची?

ओंजळीतल चांदणं
होतं लख्ख तेजाळलेलं
तुझ्या माझ्यातलं मैत्र
होतं नियतीने आखलेल.....

- सौ. आसावरी अभिजीत ऐनापुरे
मुंबई
मो. ९९३०६२०८९८



मी कुठे बंदीस्त झालो.....

मी कुठे बंदीस्त झालो
गझलेच्या शेरामध्ये
मी कधी अभंग आणि
व्यक्त होतो गीतांमध्ये....१
वेदनेच्या वृत्त, मात्रा
भोवती आहेत माझ्या
संघर्ष नाही संपलेला
मीच हसतो पोवाड्यामधे...२
आसवांचा हा घरोबा
आहे जुना जीवनाशी
फक्त कविता साथ देते
संगतीला दु:खामधे ...३
दंगलीचा खेळ त्यांचा
रोजचा व्यवसाय आता?
रोज जळती लोक येथे
त्या स्मशानी चितेमधे....४
हे पुढारी रोज आता
देत आहे या घोषणा
कृष्ण आता येत नाही
माणसांच्या संकटामधे....५

- विष्णू सोळंके
अमरावती
मो. ७०२०३००८२४

स्मृतीच्या पाऊलखुणा....

तुझी स्मृती
मनातले ओले ठसे
जिवंत जसे
भासतात

क्रूर किती
नियतीचा घोर खेळ
निसटली वेळ
श्वासांची

मौन रात्र
अश्रू मनात दाटले
क्षण थांबले
वेदनेत

एकांती आठवते
क्षण ते सुखाचे
अलौकिक आनंदाचे
सोबतीचे

तुझी चाहूल
स्वप्नी सदा येते
मन भरते
आनंदाने

वाटते जवळ
आहेस सदा अजून
बसते नटून
वारंवार

जपते स्मृतीत
प्रेम पाऊलखुणा तुझ्या
सदैव माझ्या
हृदयात

- सौ. सुधा सुधीर बेटगेरी
कर्नाटक
मो. ६३६२८४६४७०

हार

मी कधीही हार मानली नाही
'वेदना' ती भार मानली नाही

भोगले मी शाप ताप योगाने
'वासना' बेकार मानली नाही

वागलो शाबूत ताठ माथ्याने
'वंचना' आधार मानली नाही

बोललो जे साच त्यास प्राणाने
कोकिळेला घार मानली नाही

तारतम्यानेच जोखले त्याला
मी हिऱ्याला गार मानली नाही

ऐकले मी बोलणे बडेजावी
'भावना' भंगार मानली नाही

- एकनाथ गायकवाड
सिंधुदुर्ग
मो. ९४२११८२३३७





थेंब

थेंब थेंब पावसाचे
संचीत हे जीवनाचे
थेंब नाही हा नगण्य
थेंबात उर्जा अगण्य ॥१॥
थेंबे थेंबे तळे साचे
फलीत हे संस्काराचे
उन्हात थेंबात दिसे सप्तरंग
मनात उठती आनंद तरंग ॥२॥
थेंबात मोठे सामर्थ्य
थेंब पाण्याचा न व्यर्थ
शेतघामाचे थेंब बनवी जेवणा यथार्थ
पावसाच्या थेंबाने सृष्टीस जीवनाअर्थ ॥३॥
रक्तदानाचा थेंब दे संजीवन
अश्रू थेंब आनंद दु:ख दर्शन
थेंब तेलाचा करी कमी घर्षण
दारुचा थेंब सर्वनाशा कारण ॥४॥
थेंब तेलाचा पकडे ही आग
अमृताचा थेंब मृतास जाग
थेंब विषाचे जिवीतास बंध
अत्तराचे थेंब जिवाला सुगंध ॥५॥

- अरुण धर्माळे,
अमरावती
मो. ९४०३६२३२४८

काव्य रंग



रासक्रीडा

चला जाऊ वृंदावनी गौळणी
रासक्रीडा खेळू साऱ्याजणी ॥ धृ॥
मथुरेचा कृष्ण कन्हैया मुरारी
खोड्या काढी यमुना किनारी
श्रीरंगा मारू नको रे पिचकारी
वाजव तुझी मंजुळ बासरी ॥ १॥
असा कसा रे तूं यशोदेचा कान्हा
रंगवू नको रे कृष्णा पुन्हा पुन्हा
मुरलीवाला तूं खोडकर मनमोहन
नंदाचा नंदलाल लाडला नंदन ॥ २॥
गोकुळी खेळू या रासक्रीडा आज
गोप गोपीकींच्या खेळाला चढे साज
रंग रंगात येई मुरलीधर खास
नको रे कृष्णा आता कर बास ॥ ३॥

- श्रीमती नीला पाटणकर,
शिकागो
मो. +१-८४७-८४०-३२८६



धंदा झाला विद्येचा

विद्यार्थी नि पालक लाचार
शिक्षण क्षेत्रात भ्रष्टाचार
शिक्षणाचा मांडला बाजार
धनाढ्यांचा खुला व्यभिचार -१-
केली मेहनत गेली वाया
पेपरफुटी ने गोळा माया
कशी पसरली कृष्ण छाया
मोठे मासे बसले गिळाया -२-
विश्वास नाही परीक्षेवर
भलते घडे निवडीवर
प्रामाणिक अभ्यास तेवर
गुणवंत बोगस जोवर -३-
आत्महत्या मार्ग ना यावर
कीड लागली पोखरू घर
मिळावे शासन ते जबर
वेदना मनात खोलवर -४-

- बाबू फिलीप डिसोजा कुमठेकर
पुणे
मो.९८९०५६७४६८

हुंदका

घ्यावा कसा आता हा श्वास जरासा
हुंदक्यात निखळे आभास जरासा

तो क्षणही कसा थांबला तुजसवे
होतो रात्रीस मज हा भास जरासा

जीवनाचे रडगाणे गायिले सदा
दु:खाच्या क्षणालाही हास जरासा

माजवले तांडव विषाणूने जगती
मृत्यूचा अजून बाकीच हास जरासा

मुखवटा घालुनी काम तो करी
होता त्यात चेहरा खास जरासा

घामावर पिकवी कोरडी शेती
सैल सोड ना रे गळफास जरासा

मलाही दे देवा जन्म तो धान्याचा
व्हावा भुकेल्या तोंडी घास जरासा

- कमलेश तुकाराम सोनकुसळे
नागपूर
मो ७५८८६९१३७२



काव्य रंग

अस्तित्वाचे रक्तबंबाळ पापुद्रे



अंगणातली चिमणी म्हणाली
हॅलो...चिमनेराव ऐकलंत काय?
चिमनेराव म्हणाले काय गं...
ते बघा..ते बघा...
अस्तित्वाचे रक्तबंबाळ पापुद्रे
चिमणी आणि चिमणेरावांचा संवाद ऐकतच
मी वर्तमान पत्रात डोकावतो तर काय.?
हतबल मेंदू गटांगळ्या खात.. खात
तरंगत आहेत. भांडवलशाहीच्या फेसाळ समुद्रात...
ज्यांच्यातला 'मी' गळून पडलाच नाही
ते कशे मारणार आहेत फुंकर
हिरोशिमा-नागासाकीवर...
युगाच्या तपश्चर्येनंतर गळून पडतो 'मी...'
राजसत्ता+भांडवलशाही=हुकूमशाही
युद्ध +युद्ध=महायुद्ध
आग+आग=ज्वाळांचा भडका
थांबा...टायमर लावला आहे
रेड लाईट देतोय सिग्नल धोक्याचा
(१०,९,८,७,६,५,४,३,२,१,००)

टिकटिक.. टिकटिक.. टिकटिक...
आणि होतोय एक शक्तिशाली भयंकर स्फोट...
युक्रेन, रशिया, जपान, कोरिया,
अमेरिका, इस्रायल, इराण, इराक
चिंधळ्या..चिंधळ्या...उडून माणसं होताहेत बेचिराख
नभात उसळत आहेत ज्वाळांचे धूर...
आयुष्याचा बदललेला नूर...
मला हे नकोय..अजिबात नकोय
मला शांती हवी आहे.
मला अहिंसा हवी आहे.
मला करुणा हवी आहे.
मला अंगणातल्या चिमणा-चिमणीचं
शेणाचं-मेणाचं घरटं हवं आहे.
सखे..चल..
अगं आता तू आणि मी
निब्बाणाला करकचून आलिंगन देऊ
सब्ब अनिच्च म्हणणाऱ्या
अजिंठ्यातल्या विश्वकरुणामित्र बुद्धाला शरण जाऊ.
अजिंठ्यातल्या विश्वकरुणामित्र बुद्धाला शरण जाऊ.

- प्रा. राहुल दहिवले.
चंद्रपूर
मो.७७७६०८८९२८

आयुष्य

पाऊले तीच आहेत
रस्ते मात्र बदलत गेले
रक्ताळलीत ठेचाळणारी बोटे
अनुभव मात्र घडवत गेले

हात तेच आहेत
कष्ट मात्र बदलत गेले
वर्तमानाच्या वांझ शेतात राबताना
सुखद भविष्याचे मनोरे कोसळले

डोळे तेच आहेत
स्वप्ने मात्र बदलत गेली
वास्तवाशी दोन हात करताना
प्रेरणेचे बळ पेरत गेली

शब्द तेच आहेत झेन
अर्थ मात्र बदलत गेले
आयुष्याचे गीत लिहिताना
'अक्षर' ठेव ठेवून गेले

आत्मा तोच आहे
काया मात्र बदलत गेली
रोज रूप बदलून येणारी वादळे
'तगणे' 'अन्' जगणे' शिकवून गेली

(कवितासंग्रह : 'मनाच्या अंतऱाळातून')

- प्रशांत भास्कर वावगे
नागपूर
मो ८२७५२३२८७२

काव्य रंग



साहित्यप्रकार्ग कविता

कधी दु:ख रडते तर कधी सुख हसते,
इथे कर्माचं गीत प्रत्येकाला गावच लागते.
कुणाला काही न मागताही मिळते,
तर कुणाला खूप परीक्षा द्यावी लागते.
इथे जीवनाच्या हिशोबाची बेरीज वेगळी असते,
कारण प्रत्येकाची एक कहाणी असते.

ज्याच्या नशिबी जेवढे भोग लिहिले,
तो तेवढ आयुष्यभर भोगत असतो,
कुणाला चांगल्या कर्माची फळ मिळतात,
तर कुणाच्या वाटेला संघर्ष येतो.
आयुष्य प्रत्येकाचं वेगवेगळ्या वळणावर असते,
कारण इथे प्रत्येकाची एक कहाणी असते.

श्रीमंतीचा माज गरिबीत निसटतो,
गर्वाच घर क्षणात खालीही होतं.
कोणी कष्टाने वाटचाल करत असतो,
तर कुणाचा अहंकाराचा माज एक दिवस उतरतो.
वेळ ही कुणासाठीच एकसारखी नसते,
कारण इथे प्रत्येकाची एक कहाणी असते.

कधी चांगल्या शब्दांतून वाईट शब्दही निघतो,
तर कुणी आयुष्याचे सुंदर तराने गाऊन जातो.
कुणाचे जीवन फुलासारखं बहरत,
तर कुणाचं काट्यांवरून चालतं.
प्रत्येकाच्या वाटेवर वेगळ काहीतरी असते,
कारण इथे प्रत्येकाची एक कहाणी असते.

पैसे कमवायला निघालेला पैशामागे धावत राहतो,
समाधान मात्र कुठेतरी मागेच राहून जाते.
उपासतापास करून कोणी देवाला साकडं घालतं,
पण अन्नासाठी पोटाची खळगी करणारा भिकारी
काही श्रीमंत होत नसतो.
हे कुणालाच कधी कळत नसते,
कारण इथे प्रत्येकाची एक कहाणी असते.

कुणाचा विश्वास परिस्थितीने डळमळतो
तर कोणी संकटातही स्वत:वर विश्वास ठेवतो.
कोणी सुखात असतो तर कोणी दु:खात असतो,
कोणी हसत जगतो तर कोणी अश्रूंना लपवत असतो.
प्रत्येकाची वाट वेगळी प्रत्येकाचा प्रवास वेगळा,
प्रत्येकाचं नशीबही वेगळं असते.
कारण इथे प्रत्येकाची एक कहाणी असते.

कुणाच्या आयुष्यात सुखाचे क्षण येतात,
तर कुणाच्या वाट्याला दु:खाचे दिवस येतात.
कुणाला काही न मागताही सगळं मिळतं,
तर कुणाला मिळवण्यासाठी आयुष्यभर झगडाव
लागत.
म्हणून कोणाच्याही आयुष्याचा अंदाज घेऊ नये,
कारण बाहेरून दिसणारे जीवन आणि आतली कहानी
वेगळी असते.
होय,
इथे प्रत्येकाची एक कहाणी असते...!

- प्रतिक्षा अविनाश ठाकरे
नाशिक
मो. ९७६७५४४७९८

काव्य रंग

दुष्काळ

ओल मातीचं आटलं उन्ह सांडते वरून
माय शिवारा निघाली संगे सावली घेऊन

कोठे दडला पाऊस पदर घामाने भिजला
दक्ष पहाऱ्याचा वारा तोही दमून निजला

पिक भरात आलेले सारे पिवळे पडले
नाही मातीला ओलावा फुले कळीत सुकले

ओला घामाचा पदर माय डोळयांना पुसते
झाड सावलीत उभे उन्ह मातीला छळते

कसं जगावं जीवानं सार झालं डोईजड
गावकुसा बाहेरचा उभा उदासला वड

माझ्या गाव शिवाराची काळी काळसर माती
तेलाविना जळतात रोज पणतीत वाती

कसे पहावे डोळ्यांनी शेत सुकन चालले
झाड उन्हामध्ये उभे आणि पाखरं उडाले....

- अर्जुन मेश्राम
चंद्रपूर
मो. ९६०४०१३६६७



'वातीच्या व्यथेची'

कधी घरात दारात
दिवा जळे अंधारात
वात जळे अंतरात
सारे दिव्याला गातात॥ धृ॥
वात इवलीशी करे
अंधाराच्या वरी मात
अंधारल्या वाटेवर
हिच टाळते आघात॥ १॥
हिच टाळते आघात
पुढ्यातले घात-पात
हिच्यामुळेच टळते
आली गेली वाताहात॥ २॥
दिवा उभा दिमाखात
वातीचीच वाताहात
सारे पाहती दिव्यास
वाती जळूनी जातात॥ ३॥
वात विरते स्मृतीत
कोण पाहते अतित
कोण पाहते अतित
कोण गाते तिचे गीत॥ ४॥
तिची दिव्यावरी प्रित
प्रित मिळते मातीत
दुनियेच्या प्रगतीत
होते जीवन व्यतित॥ ५॥
कोण पाहे कसे गेले
तिचे जिवन व्यथेत
नाव राहते दिव्याचे
सदा जीवन कथेत॥ ६॥

- सौ.मंगला मधुकर रोकडे
जळगांव
मो. ९३७१९०२३०३

प्रवास कवितेचा... अंतरातून....

मनातून मनाला
मिळते साद जेव्हा....
प्रतिसादातून शब्द
गुंफतात काव्यात तेव्हा.....१

स्पंदनातून अंतर्मनाची
असते ती आर्त हाळ
शब्दफुलांनी भावनांत
ओवलेली भाव माळ.....२

प्रवास कवितेचा असतो
होत... असाच एकांतात....
सोबतीला सुख- दु:खाचे
अनुभवी शब्द लिखाणात.....३

झरझर जातात उमटत...
ओले भाव कागदावर
अंतरीचे अबोल बोल
संवेदना त्या साकार.....४

नयनांतले मौन स्तब्ध
नि:शब्द भाव अधरी... ,
होतात स्वच्छंद स्वैर
लिखाणात काव्यांतरी.....५

- मानसी जामसंडेकर
गोवा
मो. ८३९०९३२४८३

काव्य रंग



गणेशोत्सव

गणेशोत्सवाचा हरवला आहे उद्देश
याला आले आहे व्यावसायिक रूप
आनंद नाहीसा होऊन वाढले आहेत क्लेश
भक्तिभाव कमी आणि झाला आहे विद्रूप

चित्रपटाच्या गाण्यांच्या चालीवर
केले जाते गुणगान
गणेश मूर्तीसमोर केला जातो उत्तान नाच
कृत्रिम रंग वापरून रंगवले जातात कान
मोठ्या आवाजाने आबालवृद्धांना होतो जाच

नैसर्गिक रंग वापरून बनवावी मूर्ती
लेझीम ढोल वाजवून केले पाहिजे स्वागत
आरोग्यशिबीर आयोजनातून करावी इच्छा पूर्ती
परिसर स्वच्छ ठेवून राखली पाहिजे पत

गणेश मंडळांनी थांबवली पाहिजे तुलना
सामान्य जनतेकडून घ्यायला नको धन
थांबवली पाहिजे गणेशाची अवहेलना
गणेशोत्सव होईल मग आनंदाचा सण

- डॉ रोहित तळवलकर
पुणे
मो. ९८२१२११८६३

'अविष्कार'

नृत्य, डान्स जगातल्या,
वाटे प्रत्येकाला हवा,
शारिरीक, मानसिक,
स्वास्थ्याचाच मंत्र नवा,

जगालाच जोडणारा
आहे अनोखा प्रकार,
पडे मोहात माणूस,
असा नृत्य अविष्कार,

कोणताही समारंभ,
असो विसरून व्याप,
मनावर माणसाच्या,
सोडी नृत्य त्याची छाप,

नृत्य अन् रंगमंच,
नातं अतुट दोघांचं,
जसं एक कलाकार,
अन् त्याच्याच कलेचं,

कधी कधी समजता,
हावभाव मानवाचे,
दिसे कधी नृत्यातून,
अविष्कार देवतांचे,

- मंगेश शिवलाल बरई
नाशिक
मो. ९२७१५३९२१६

तू असताना मी

तू असताना मी
भिऊ कशाला
असलोय जरी एकटा
खचु कशाला

रोज असतो तू
माझ्या उशाला
झोपतोय मी बिनधास्त
या रात्रीला

कामात माझ्या
असते तुझी साथ
मग ते कार्य सफल
आनंदी साथ

असे सर्व नाती
फक्त कामापुरती
कार्यभाग होताच
फळण्यात स्फुर्ती

तू असताना स्वामी समर्था
मी भिऊ कशाला
तुझी साथ रोजच
असते कामाला

- शेषराव जाधव (शेष)
नांदेड
मो ९९२३०९४३३२



काव्य रंग

जगाचं काय? ते काहीही म्हणतील!

तू शांत राहिलास तर दुर्बल म्हणतील,
तू बोललास तर उद्धट म्हणतील;
तू वेगळा चाललास तर चुकलास म्हणतील,
सगळ्यांसारखा झालास तर हरवलास म्हणतील.

तू स्वप्न पाहिलीस तर वेडा म्हणतील,
तू झगडलास तर हट्टी म्हणतील;
तू थांबलास तर मागे पडलास म्हणतील,
तू पुढे गेलास तर जळतील.

तू हरलास तर हसतील,
तू जिंकलास तर नशिबवान म्हणतील;
तू प्रश्न विचारलास तर दोष देतील,
उत्तर दिलंस तर शांत बस म्हणतील.
काही केलंस तर 'हेच का?' म्हणतील,
काही केलं नाहीस तर 'काहीच नाही' म्हणतील;
तू उठलास तर खाली ओढतील,
तू बसलास तर पुढे निघून जातील.

म्हणून लक्षात ठेव,
जग बोलणारच आहे;
तू मात्र स्वत:साठी उभा राहा
कारण जगाचं काय?
ते काहीही म्हणतील!

- चैतन्य टाकळकर
ठाणे
मो. ८४५९२६८९६९



आनंद

मनी असता समाधान
नसते कशाचीही वाण
अशा आरसपानी मनात
आनंदाची उमले खाण... १

बनुनी फुलपाखरे छान
मध चाखावा अलगद
बागडावे हो जीवनात
मिळवावा क्षणात आनंद... २

बघावे नित्य सूर्योदयास
आनंदी रहावे मनातूनी
नि पहावा अस्ताचा दिनमणी
स्थितप्रज्ञ वृत्ती बाणवूनी... ३

कधी हार तर कधी जीत
अटळता सुख- दु:खाचीही
मानूनी सारे क्षणभराचे
तरंगावे आनंदाचे डोही... ४

आनंदमयी या वृक्षाला
प्रेमाने हलवावे सदा
दारी नित्य पडेल नवा
स्नेह चांदण्यांचा सडा... ५
स्नेह चांदण्यांचा सडा...

- मृणाल प्रभुणे
नाशिक
मो ९८६०६९३१२१

मुक्ताई

महाराष्ट्रातील कवयित्री संत,
वारकरी पंथ, मुक्ताबाई

अत्यंत प्रसिद्ध साहित्य अथांग,
ताटीचे अभंग, मुक्ताईच

निर्भयता ज्ञान भक्तीचा संदेश,
दिला उपदेश, मुक्ताईन

ज्ञानबोध ग्रंथ लक्षणे संतांची,
खरी संतत्वाची, सांगितली

विश्वाचा उद्धार केला मुक्ताईने,
अध्यात्मिकतेने, अनुग्रह

- मिनाक्षी शिलवंत,
पुणे
मो. ९७३०२५३२०८





दैनिक सिंहवाणी वृत्त

दीपरंग

वार्षिक राशि भविष्य

विजय मदनकर,
ज्योतीषशास्त्र तज्ज्ञ, नागपूर

मेष



प्रगतीच्या नव्या संधी, आत्मविश्वासाला बळ!

एकूण भविष्य : दिवाळी २०२६ ते दिवाळी २०२७ हा कालावधी मेष राशीच्या व्यक्तींसाठी नवनवीन संधींचा शोध घेण्याचा आणि स्वत:च्या क्षमतांना सिद्ध करण्याचा ठरू शकतो. मनातील महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची दिशा योग्य ठेवणे आवश्यक राहील. घाईघाईने निर्णय घेण्याऐवजी परिस्थितीचा सखोल विचार केल्यास प्रगतीचा मार्ग अधिक सुकर होऊ शकतो.

- **नोकरी व व्यवसाय :** नोकरी करणायांना नवीन जबाबदाया स्वीकारण्याची संधी मिळू शकते. कामातील सातत्य आणि वरिष्ठांशी योग्य संवाद यामुळे प्रगतीच्या शक्यता वाढतील. व्यवसाय करणाऱ्यांनी नवीन गुंतवणूक, भागीदारी किंवा विस्तार करताना सर्व बाजूंचा विचार करावा. स्पधेर्ला सामोरे जाताना आत्मविश्वासासोबत संयमही महत्त्वाचा ठरेल.

- **आर्थिक स्थिती :** उत्पन्न वाढविण्याच्या संधी शोधता येतील. मात्र, अनावश्यक खर्च आणि जोखमीच्या आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक राहील. बचतीला प्राधान्य दिल्यास भविष्यातील गरजांसाठी आर्थिक आधार मजबूत करता येईल.

- **कौटुंबिक व वैवाहिक जीवन :** कुटुंबातील व्यक्तींशी संवाद वाढविणे हिताचे ठरेल. स्वभावातील उतावळेपणा आणि रागावर नियंत्रण ठेवल्यास नात्यांमधील गैरसमज टाळता येतील. विवाहितांनी जोडीदाराच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न करावा. अविवाहितांसाठी नवीन ओळखी निर्माण होण्याची शक्यता.

- **आरोग्य :** कामाचा ताण, अनियमित झोप आणि धावपळीमुळे थकवा जाणवू शकतो. नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि पुरेशी विश्रांती याकडे लक्ष द्यावे. **विद्यार्थ्यांसाठी :** अभ्यासात सातत्य ठेवल्यास चांगली प्रगती साधता येईल. स्पर्धा परीक्षांची तयारी करणायांनी वेळेचे नियोजन करावे.

- **वर्षाचा संदेश :** वेगापेक्षा योग्य दिशा महत्त्वाची; संयमाने घेतलेला निर्णय यशाचा पाया ठरेल.

वृषभ



स्थैर्य, नियोजन आणि आर्थिक शिस्तीचा काळ!

एकूण भविष्य : वृषभ राशीच्या व्यक्तींसाठी आगामी वर्षात स्थिरता आणि दीर्घकालीन नियोजनाला महत्त्व प्राप्त होऊ शकते. आधी केलेल्या प्रयत्नांचे मूल्यमापन करून पुढील वाटचालीची दिशा निश्चित करण्यासाठी हा काळ उपयुक्त ठरेल. महत्त्वाच्या निर्णयांमध्ये व्यवहारज्ञानाचा उपयोग केल्यास अपेक्षित परिणाम साधण्यास मदत होईल.

- **नोकरी व व्यवसाय :** नोकरीत आपल्या कौशल्यांना अधिक वाव मिळविण्याची संधी मिळू शकते. नवीन तंत्रज्ञान किंवा व्यावसायिक प्रशिक्षण आत्मसात केल्यास भविष्यात फायदा होईल. व्यावसायिकांनी ग्राहकांशी विश्वासाचे संबंध निर्माण करण्यावर भर द्यावा. नवीन उपक्रम सुरू करताना बाजारपेठेचा अभ्यास आणि आर्थिक नियोजन आवश्यक राहील.

- **आर्थिक स्थिती :**बचत आणि संपत्तीचे योग्य नियोजन या वर्षातील महत्त्वाचे विषय ठरतील. घर, जमीन किंवा इतर मालमत्तेशी संबंधित निर्णय घेताना कागदपत्रांची तपासणी करावी. इतरांच्या सांगण्यावरून गुंतवणूक करणे टाळावे.

- **कौटुंबिक व वैवाहिक जीवन :** कुटुंबात स्थैर्य आणि परस्पर सहकार्य वाढविण्याची संधी मिळेल. घरातील ज्येष्ठ व्यक्तींच्या अनुभवाचा उपयोग होऊ शकतो. वैवाहिक जीवनात छोट्या गोष्टींवरून मतभेद होऊ नयेत यासाठी संवादाला प्राधान्य द्यावे.

- **आरोग्य :** नियमित दिनचर्या आणि संतुलित आहार यांचा फायदा होईल. शारीरिक हालचालींचा अभाव टाळावा. काही त्रास जाणवल्यास वैद्यकीय सल्ला घ्यावा.

- **विद्यार्थ्यांसाठी :** एकाग्रतेने अभ्यास केल्यास चांगले परिणाम मिळविण्यास मदत होईल. अभ्यासातील सातत्य आणि पुनरावृत्ती यांना महत्त्व द्यावे.

- **वर्षाचा संदेश :** आर्थिक शिस्त, संयम आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांतून स्थैर्य निर्माण होते.

मिथुन



संवादकौशल्यातून संधी, कल्पकतेतून प्रगती!

एकूण भविष्य : मिथुन राशीच्या व्यक्तींसाठी आगामी वर्ष ज्ञानवृद्धी, नवीन संपर्क आणि विविध क्षेत्रांतील संधींचा शोध घेण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. नवीन गोष्टी शिकण्याची इच्छा आणि संवादकौशल्य यांचा योग्य वापर केल्यास वैयक्तिक तसेच व्यावसायिक प्रगती साधता येईल. मात्र, एकाच वेळी अनेक कामे हाती घेतल्यामुळे लक्ष विचलित होणार नाही, याची काळजी घ्यावी.

- **नोकरी व व्यवसाय :** पत्रकारिता, लेखन, शिक्षण, विपणन, माहिती-तंत्रज्ञान आणि संवादाशी संबंधित क्षेत्रांत कार्यरत असणाऱ्यांना कौशल्य दाखविण्याच्या संधी मिळू शकतात. नवीन प्रकल्प स्वीकारताना स्वत:च्या क्षमतेचे योग्य मूल्यमापन करावे. व्यावसायिकांनी ग्राहकांच्या गरजा समजून घेऊन कामकाजात नावीन्य आणण्याचा प्रयत्न करावा.

- **आर्थिक स्थिती :** उत्पन्नाचे पर्यायी मार्ग शोधण्याची इच्छा वाढू शकते. मात्र, वारंवार बदलणाऱ्या योजनांमुळे आर्थिक अस्थिरता निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी. खर्चाची नोंद ठेवणे आणि बचतीचे उद्दिष्ट निश्चित करणे फायदेशीर ठरेल.

- **कौटुंबिक व वैवाहिक जीवन :**मोकळा संवाद नात्यांमध्ये जवळीक वाढवू शकतो. कुटुंबातील व्यक्तींच्या मतांचा आदर करावा. जोडीदारासोबत वेळ घालविण्यासाठी प्रयत्न करावेत. नवीन नातेसंबंध निर्माण करताना घाई करू नये.

- **आरोग्य :** मानसिक ताण आणि अनियमित दिनचर्येकडे दुर्लक्ष करू नये. नियमित चालणे, पुरेशी झोप आणि विश्रांती यांना प्राधान्य द्यावे.

- **विद्यार्थ्यांसाठी :** नवीन विषय शिकण्याची क्षमता आणि कल्पकता उपयोगी ठरू शकते. मात्र, मोबाईल आणि इतर मनोरंजनाच्या साधनांमुळे अभ्यासात व्यत्यय येणार नाही.

- **वर्षाचा संदेश :** नवीन कल्पनांना कृतीची जोड द्या; विखुरलेल्या प्रयत्नांना एकाच ध्येयाची दिशा द्या.

कर्क



भावनिक समतोलातून समाधान, नात्यांतून बळ!

एकूण भविष्य : कर्क राशीच्या व्यक्तींसाठी आगामी वर्ष कौटुंबिक जबाबदाऱ्या, भावनिक समतोल आणि वैयक्तिक प्रगती यांचा समन्वय साधण्याचे ठरू शकते. आपल्या जवळच्या व्यक्तींसाठी काही महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागू शकतात. भावना-व्यवहार यांच्यात संतुलन राखता येईल.

- **नोकरी व व्यवसाय :** कामाच्या ठिकाणी जबाबदा या वाढू शकतात. आपल्या कामाचे योग्य नियोजन आणि सहकाऱ्यांशी समन्वय राखणे महत्त्वाचे ठरेल. व्यवसायात ग्राहकांशी विश्वासाचे संबंध निर्माण करण्यावर भर द्यावा. कोणताही मोठा निर्णय घेताना केवळ भावनेच्या भरात पाऊल उचलू नये.

- **आर्थिक स्थिती :** घरगुती गरजा, कुटुंबातील जबाबदा या किंवा मालमत्तेशी संबंधित खर्च वाढू शकतात. त्यामुळे आधीपासून आर्थिक तरतूद करणे योग्य ठरेल. उत्पन्न आणि खर्च यांचा समतोल राखल्यास आर्थिक नियोजन अधिक प्रभावी होईल.

- **कौटुंबिक व वैवाहिक जीवन :** कुटुंबातील व्यक्तींना भावनिक आधार देण्याची संधी मिळेल. जुन्या गैरसमजांवर संवादातून तोडगा काढता येऊ शकतो. वैवाहिक जीवनात परस्पर विश्वास आणि समजूतदारपणा महत्त्वाचा ठरेल.

- **आरोग्य :** मानसिक शांतता आणि नियमित दिनचर्येकडे लक्ष द्यावे. कामाच्या व्यापात स्वत:च्या विश्रांतीकडे दुर्लक्ष करू नये. त्रास जाणवल्यास योग्य वैद्यकीय सल्ला घ्यावा.

- **विद्यार्थ्यांसाठी :** अभ्यास करताना भावनिक चढ-उतारांमुळे एकाग्रता कमी होणार नाही, याची काळजी घ्यावी. शिक्षक आणि पालकांचे मार्गदर्शन उपयोगी ठरू शकते.

- **वर्षाचा संदेश :** इतरांची काळजी घेताना स्वत:च्या स्वप्नांना आणि गरजांनाही महत्त्व द्या.

सिंह



नेतृत्वगुणांना संधी, कर्तृत्वाला नवी ओळख!

एकूण भविष्य : सिंह राशीच्या व्यक्तींसाठी आगामी वर्ष स्वत:ची क्षमता सिद्ध करण्यासाठी आणि नेतृत्वगुणांचा योग्य वापर करण्यासाठी अनुकूल ठरू शकते. सार्वजनिक जीवन, सामाजिक कार्य किंवा व्यवस्थापनाशी संबंधित क्षेत्रांत कार्यरत व्यक्तींना नवीन जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागू शकतात. मात्र, आत्मविश्वासासोबत नम्रता राखल्यास सहकाऱ्यांचे सहकार्य मिळविणे सोपे होईल.

- **नोकरी व व्यवसाय :** कामाच्या ठिकाणी आपल्या कल्पना मांडण्याची आणि नवीन जबाबदाऱ्या स्वीकारण्याची संधी मिळू शकते. वरिष्ठांशी संवाद साधताना कामातील गुणवत्ता आणि परिणाम यांना महत्त्व द्यावे. व्यावसायिकांनी प्रसिद्धीपेक्षा उत्पादन किंवा सेवेच्या गुणवत्तेवर भर द्यावा. भागीदारी करताना सर्व अटी स्पष्ट ठेवाव्यात.

- **आर्थिक स्थिती :** उत्पन्नवाढीसाठी प्रयत्न करता येतील. मात्र, प्रतिष्ठा किंवा दिखाव्यासाठी अनावश्यक खर्च वाढणार नाही, याची काळजी घ्यावी. मोठ्या आर्थिक व्यवहारांमध्ये तज्ज्ञांचा सल्ला घेणे उपयुक्त ठरू शकते.

- **कौटुंबिक व वैवाहिक जीवन :** कुटुंबातील महत्त्वाच्या निर्णयांत आपली भूमिका प्रभावी राहू शकते. मात्र, प्रत्येक निर्णय स्वत:च घेण्याऐवजी इतरांचे मत ऐकणे आवश्यक ठरेल. वैवाहिक जीवनात जोडीदाराच्या भावना समजून घेतल्यास नातेसंबंध अधिक दृढ होतील.

- **आरोग्य :** कामाच्या ताणाचे व्यवस्थापन करावे. व्यायाम, संतुलित आहार आणि पुरेशी झोप यांचा दिनचर्येत समावेश करावा.

- **विद्यार्थ्यांसाठी :** नेतृत्वगुण आणि स्पर्धात्मक वृत्ती यांचा अभ्यासात उपयोग होऊ शकतो. यश मिळविण्यासाठी सातत्य आणि शिस्त आवश्यक राहील.

- **वर्षाचा संदेश :** नेतृत्व म्हणजे केवळ पुढे जाणे नव्हे, तर इतरांनाही सोबत घेऊन पुढे जाणे.

कन्या



नियोजन, शिस्तबद्ध प्रयत्न आणि प्रगतीचा मार्ग!

एकूण भविष्य : कन्या राशीच्या व्यक्तींसाठी आगामी वर्ष नियोजन, कौशल्यविकास आणि कामातील अचूकता यांना महत्त्व देणारे ठरू शकते. प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी आणि भविष्यातील उद्दिष्टे निश्चित करण्यासाठी हा काळ उपयोगी ठरेल. प्रत्येक गोष्ट परिपूर्ण करण्याच्या प्रयत्नात निर्णय घेण्यास विलंब होणार नाही, याची काळजी घ्यावी.

- **नोकरी व व्यवसाय : कार्यालयीन कामकाज, लेखा, व्यवस्थापन, तांत्रिक क्षेत्र आणि विश्लेषणात्मक कामांत कार्यरत असणा यांना आपल्या कौशल्यांचा उपयोग करता येईल. कामातील चुका कमी करण्यासाठी पद्धतशीर नियोजन करावे. व्यावसायिकांनी खर्च, कर्मचारी व्यवस्थापन आणि ग्राहकसेवा यांचा नियमित आढावा घ्यावा.**

- **आर्थिक स्थिती : आर्थिक नियोजनासाठी हा काळ उपयुक्त ठरू शकतो. अनावश्यक खर्च कमी करून बचतीकडे लक्ष दिल्यास आर्थिक सुरक्षितता वाढवता येईल. गुंतवणुकीपूर्वी जोखीम आणि परतावा यांचा अभ्यास करावा.**

- **कौटुंबिक व वैवाहिक जीवन : कौटुंबिक व वैवाहिक जीवन : कुटुंबातील जबाबदा यांचे योग्य नियोजन केल्यास घरात समतोल राखता येईल. प्रत्येक बाबतीत दोष शोधण्याऐवजी सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा. जोडीदाराशी संवाद साधताना टीकेपेक्षा सहकार्याला प्राधान्य द्यावे.**

- **आरोग्य : कामाचा अतिरेक आणि सततची चिंता टाळण्याचा प्रयत्न करावा. व्यायाम आणि विश्रांती महत्त्वाची राहील.**

- **विद्यार्थ्यांसाठी :** अभ्यासाचे वेळापत्रक तयार करून त्यानुसार तयारी केल्यास फायदा होईल. नियमित सराव आणि पुनरावृत्तीमुळे आत्मविश्वास वाढू शकतो.

- **वर्षाचा संदेश :** नियोजनाला कृतीची जोड द्या; स्वत:कडून अवास्तव अपेक्षा ठेवण्याऐवजी सातत्य जपा.

तूळ



नात्यांत समतोल, निर्णयांत स्पष्टता!

एकूण भविष्य : तूळ राशीच्या व्यक्तींसाठी आगामी वर्ष नातेसंबंध, भागीदारी आणि वैयक्तिक उद्दिष्टे यांच्यात समतोल साधण्याचे ठरू शकते. सामाजिक संपर्क वाढविण्याची आणि नवीन लोकांशी जोडले जाण्याची संधी मिळू शकते. मात्र, सर्वांना खूश ठेवण्याच्या प्रयत्नात स्वत:च्या गरजांकडे दुर्लक्ष करू नये.

- **नोकरी व व्यवसाय :** संवादकौशल्य, सर्जनशीलता आणि सहकार्याची वृत्ती यांचा कामाच्या ठिकाणी फायदा होऊ शकतो. नवीन प्रकल्प किंवा भागीदारी स्वीकारताना जबाबदाऱ्या स्पष्ट करून घ्याव्यात. व्यवसायात ग्राहकांशी सौहार्दपूर्ण संबंध राखणे फायदेशीर ठरू शकते.

- **आर्थिक स्थिती :** उत्पन्न आणि खर्च यांचा समतोल राखणे महत्त्वाचे राहील. जीवनशैली, खरेदी किंवा सामाजिक कार्यक्रमांवरील खर्चाचे नियोजन करावे. आर्थिक निर्णय घेताना दीर्घकालीन परिणामांचा विचार करावा.

- **कौटुंबिक व वैवाहिक जीवन :** जोडीदाराशी समन्वय आणि परस्पर आदर यांना महत्त्व प्राप्त होईल. कुटुंबातील मतभेद मिटविण्यासाठी मध्यस्थीची भूमिका बजावावी लागू शकते. अविवाहित व्यक्तींना नवीन ओळखी होऊ शकतात; मात्र नात्याबाबत निर्णय घेताना घाई टाळावी.

- **आरोग्य :** दैनंदिन काम आणि विश्रांती यांचा समतोल राखावा. शारीरिक हालचाल, नियमित झोप आणि तणाव व्यवस्थापन याकडे लक्ष द्यावे.

- **विद्यार्थ्यांसाठी :** गटामध्ये अभ्यास करणे आणि शिक्षकांशी चर्चा करणे उपयोगी ठरू शकते. मात्र, इतरांच्या मतांवर पूर्णपणे अवलंबून राहण्याऐवजी स्वत:ची समज विकसित करावी.

- **वर्षाचा संदेश : समतोल राखणे महत्त्वाचे; पण योग्य वेळी ठाम निर्णय घेणेही तितकेच आवश्यक.**

वृश्चिक



जिद्द, चिकाटी, बदलांना सामोरे जाण्याचे बळ!

एकूण भविष्य : वृश्चिक राशीच्या व्यक्तींसाठी आगामी वर्ष आत्मपरीक्षण, जुनी उद्दिष्टे नव्याने तपासणे आणि महत्त्वाचे बदल स्वीकारणे यासाठी उपयुक्त ठरू शकते. कठीण परिस्थितीतून मार्ग काढण्याची क्षमता आणि चिकाटी यांचा उपयोग होईल. मनातील शंका किंवा संशयामुळे योग्य संधी गमावल्या जाणार नाहीत, याची काळजी घ्यावी.

- **नोकरी व व्यवसाय :** कामाच्या ठिकाणी नवीन कौशल्ये आत्मसात करण्याची गरज भासू शकते. जबाबदा या स्वीकारताना स्वत:च्या क्षमतेचे वास्तववादी मूल्यमापन करावे. व्यावसायिकांनी स्पर्धकांच्या हालचालींकडे लक्ष देतानाच स्वत:च्या कामातील गुणवत्ता सुधारावी. गोपनीय माहिती आणि करार याबाबत दक्षता घ्यावी.

- **आर्थिक स्थिती :** आर्थिक व्यवहारांमध्ये सावधगिरी आणि स्पष्टता आवश्यक राहील. अचानक उद्भवणा या खर्चांसाठी राखीव निधी ठेवावा. जोखमीच्या गुंतवणुकीत उतरण्यापूर्वी सखोल माहिती घ्यावी.

- **कौटुंबिक व वैवाहिक जीवन :** नात्यांमध्ये विश्वास आणि स्पष्ट संवाद महत्त्वाचा ठरेल. मनातील गोष्टी न बोलता ठेवण्याऐवजी योग्य वेळी व्यक्त कराव्यात. जुन्या वादांना पुन्हा उकरून काढण्याऐवजी त्यातून मार्ग काढण्यावर भर द्यावा.

- **आरोग्य :** तणाव कमी करण्यासाठी नियमित दिनचर्या आणि विश्रांती आवश्यक राहील. शारीरिक त्रासांकडे दुर्लक्ष न करता योग्य वैद्यकीय सल्ला घ्यावा.

- **विद्यार्थ्यांसाठी :** अभ्यासातील अडचणींवर चिकाटीने मात करता येईल. अवघड विषयांसाठी नियमित सराव आणि मार्गदर्शन घेणे उपयोगी ठरेल.

- **वर्षाचा संदेश :** बदलांना घाबरू नका; विचारपूर्वक केलेले परिवर्तन नव्या वाटा खुल्या करू शकते.

धनु



ज्ञानाचा विस्तार, ध्येयाकडे आत्मविश्वासाने वाटचाल!

एकूण भविष्य : धनु राशीच्या व्यक्तींसाठी आगामी वर्ष शिक्षण, प्रवास, नवीन अनुभव आणि वैयक्तिक विकासासाठी उपयुक्त ठरू शकते. मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ध्येय निश्चित करण्याची प्रेरणा मिळेल. मात्र, केवळ उत्साहावर अवलंबून न राहता प्रत्येक ध्येयासाठी ठोस कृती आराखडा तयार करणे आवश्यक ठरेल.

- **नोकरी व व्यवसाय :** नवीन क्षेत्रांत संधी शोधण्याची इच्छा वाढू शकते. प्रशिक्षण, उच्च शिक्षण किंवा कौशल्यविकासातून भविष्यातील प्रगतीचा मार्ग तयार करता येईल. व्यावसायिकांनी नवीन बाजारपेठेत प्रवेश करताना खर्च आणि संभाव्य मागणीचा अभ्यास करावा.

- **आर्थिक स्थिती :** उत्पन्न वाढविण्यासाठी नवीन मार्गांचा शोध घेता येईल. प्रवास, शिक्षण किंवा छंदांवर खर्च वाढू शकतो. त्यामुळे आर्थिक मर्यादा निश्चित करणे आणि बचतीला प्राधान्य देणे योग्य ठरेल.

- **कौटुंबिक व वैवाहिक जीवन :** कुटुंबासोबत आनंदाचे क्षण घालविण्याची संधी मिळू शकते. मतभेद झाल्यास समोरच्या व्यक्तीचा दृष्टिकोन समजून घेणे आवश्यक राहील. वैवाहिक जीवनात एकत्रित ध्येये निश्चित केल्यास परस्पर सहकार्य वाढू शकते.

- **आरोग्य :** प्रवास आणि कामाच्या धावपळीत विश्रांतीकडे दुर्लक्ष करू नये. नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि पुरेशी झोप यांचे महत्त्व लक्षात घ्यावे.

- **विद्यार्थ्यांसाठी :** उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा आणि नवीन कौशल्ये शिकण्यासाठी नियोजन करता येईल. अभ्यासातील सातत्य राखल्यास आत्मविश्वास वाढेल.

- **वर्षाचा संदेश :** ध्येय मोठे ठेवा; पण त्या ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी रोज एक पाऊल पुढे टाका.

मकर



मेहनतीला दिशा, जबाबदारीतून यशाचा पाया!

एकूण भविष्य : मकर राशीच्या व्यक्तींसाठी आगामी वर्ष शिस्त, संयम आणि दीर्घकालीन नियोजन यांना महत्त्व देणारे ठरू शकते. तात्पुरत्या यशापेक्षा स्थिर प्रगती साधण्याकडे कल राहील. कामातील सातत्य आणि जबाबदारीची जाणीव यांचा उपयोग करून भविष्यातील उद्दिष्टांसाठी भक्कम पाया तयार करता येईल.

- **नोकरी व व्यवसाय :** नोकरीत कामाचा व्याप वाढू शकतो. जबाबदा या पार पाडताना वेळेचे नियोजन आणि सहका यांशी समन्वय महत्त्वाचा ठरेल. व्यवसायात खर्चावर नियंत्रण ठेवणे, ग्राहकांचा विश्वास टिकविणे आणि दीर्घकालीन उद्दिष्टे निश्चित करणे आवश्यक राहील.

- **आर्थिक स्थिती :** आर्थिक सुरक्षिततेसाठी बचत आणि नियोजनावर भर द्यावा. कर्ज घेण्यापूर्वी परतफेडीची क्षमता तपासावी. मालमत्ता किंवा मोठ्या खरेदीसंबंधी निर्णय घेताना कागदपत्रे आणि अटी काळजीपूर्वक तपासाव्यात.

- **कौटुंबिक व वैवाहिक जीवन :** कामाच्या व्यापामुळे कुटुंबासाठी वेळ कमी पडू शकतो. त्यामुळे नातेसंबंध जपण्यासाठी जाणीवपूर्वक वेळ काढावा. जोडीदारासोबत आर्थिक आणि कौटुंबिक उद्दिष्टांबाबत चर्चा करावी. ज्येष्ठांच्या अनुभवाचा आदर करावा.

- **आरोग्य :** कामाचा अतिरेक टाळणे आवश्यक राहील. नियमित शारीरिक हालचाल, योग्य आहार आणि पुरेशी विश्रांती यांना प्राधान्य द्यावे.

- **विद्यार्थ्यांसाठी :** नियमित अभ्यास, नियोजन आणि पुनरावृत्ती यांचा फायदा होऊ शकतो. यश मिळविण्यासाठी इतरांशी तुलना करण्यापेक्षा स्वत:च्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करावे.

- **वर्षाचा संदेश : यशाचा शॉर्टकट शोधण्यापेक्षा सातत्यपूर्ण मेहनतीवर विश्वास ठेवा.**

कुंभ



नावीन्यपूर्ण विचार, नव्या संकल्पनांना संधी!

एकूण भविष्य : कुंभ राशीच्या व्यक्तींसाठी आगामी वर्ष नवीन विचार, सामाजिक संपर्क आणि नावीन्यपूर्ण उपक्रमांसाठी उपयुक्त ठरू शकते. पारंपरिक चौकटीबाहेर विचार करण्याची वृत्ती नवीन संधी शोधण्यास मदत करू शकते. मात्र, कोणतीही कल्पना प्रत्यक्षात आणताना तिची व्यवहार्यता आणि उपलब्ध साधनसंपत्ती तपासणे आवश्यक राहील.

- **नोकरी व व्यवसाय :** तंत्रज्ञान, संशोधन, सामाजिक उपक्रम आणि सर्जनशील क्षेत्रांत काम करणाऱ्यांना नवीन कल्पनांवर काम करण्याची संधी मिळू शकते. सहका यांशी समन्वय आणि स्पष्ट संवाद यांना महत्त्व द्यावे. व्यवसायात नवीन सेवा किंवा उत्पादन सुरू करण्यापूर्वी बाजारपेठेचा अभ्यास करावा.

- **आर्थिक स्थिती :** नवीन आर्थिक योजना आकर्षक वाटू शकतात; परंतु निर्णय घेण्यापूर्वी त्यांची विश्वासार्हता तपासावी. मित्रांच्या किंवा ओळखीच्या व्यक्तींच्या सांगण्यावरून मोठे आर्थिक व्यवहार करणे टाळावे. बचत आणि दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टे यांना प्राधान्य द्यावे.

- **कौटुंबिक व वैवाहिक जीवन :** स्वत:च्या विचारांना महत्त्व देताना कुटुंबातील इतरांच्या भावना समजून घेणे आवश्यक ठरेल. वैवाहिक जीवनात स्वातंत्र्य आणि जवळीक यांचा समतोल राखावा. सामाजिक कार्यात सहभागी होताना कुटुंबासाठीही वेळ राखून ठेवावा.

- **आरोग्य :** अनियमित दिनचर्या आणि विश्रांतीचा अभाव टाळावा. मानसिक शांततेसाठी छंद, व्यायाम आणि कुटुंबासोबत वेळ घालविणे उपयुक्त ठरू शकते.

- **विद्यार्थ्यांसाठी :** नवीन तंत्रज्ञान, संशोधन आणि प्रकल्पाधारित शिक्षणात रस वाढू शकतो. कल्पनांना प्रत्यक्ष कृतीची जोड दिल्यास चांगले परिणाम साधता येतील.

- **वर्षाचा संदेश : नावीन्याचा विचार करा; पण यशासाठी शिस्त, नियोजन आणि कृती यांची जोड द्या.**

मीन



कल्पकतेला नवी दिशा, संवेदनशीलतेतून सकारात्मकता!

एकूण भविष्य : मीन राशीच्या व्यक्तींसाठी आगामी वर्ष आत्मविकास, सर्जनशीलता आणि भावनिक समतोल यांना महत्त्व देणारे ठरू शकते. आपल्या आवडीच्या क्षेत्रात काहीतरी नवीन करण्याची प्रेरणा मिळू शकते. मात्र, कल्पनांच्या जगात रमण्यापेक्षा वास्तवातील परिस्थिती समजून घेऊन निर्णय घेणे आवश्यक राहील.

- **नोकरी व व्यवसाय :** कला, लेखन, शिक्षण, सेवा, सर्जनशीलता आणि लोकांशी संबंधित कामांत आपल्या गुणांचा उपयोग करता येईल. कामातील प्राधान्यक्रम निश्चित करणे आणि वेळेचे नियोजन करणे महत्त्वाचे ठरेल. व्यावसायिकांनी आर्थिक व्यवहारांमध्ये स्पष्टता ठेवावी आणि कोणताही करार समजून घेतल्याशिवाय स्वीकारू नये.

- **आर्थिक स्थिती :** आर्थिक बाबतीत भावनेच्या भरात निर्णय घेणे टाळावे. इतरांना मदत करताना स्वत:च्या आर्थिक मर्यादा लक्षात घ्याव्यात. बचतीची सवय आणि खचार्चे नियोजन भविष्यासाठी उपयुक्त ठरेल.

- **कौटुंबिक व वैवाहिक जीवन :** कुटुंबातील व्यक्तींना भावनिक आधार देण्याची संधी मिळू शकते. मात्र, इतरांच्या समस्या सोडविताना स्वत:च्या गरजांकडे दुर्लक्ष करू नये. जोडीदाराशी मनमोकळा संवाद साधल्यास नात्यातील जवळीक वाढविता येईल.

- **आरोग्य :** पुरेशी झोप, नियमित दिनचर्या आणि मानसिक शांतता यांना महत्त्व द्यावे. सततच्या चिंतेमुळे त्रास जाणवत असल्यास योग्य तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

- **विद्यार्थ्यांसाठी :** कल्पकता आणि संवेदनशीलता यांचा उपयोग अभ्यासात करता येईल. अभ्यासाचे निश्चित वेळापत्रक तयार करून त्यानुसार तयारी करावी.

- **वर्षाचा संदेश :** स्वप्ने पाहा, पण ती पूर्ण करण्यासाठी वास्तववादी नियोजन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न करा.





महाराष्ट्र शासन

वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर

वनार्टी

(महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाची स्वायत्त संस्था)

मोफत प्रशिक्षण



श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री



श्री. एकनाथ शिंदे
मा. उपमुख्यमंत्री



श्रीमती सुनेत्रा पवार
मा. उपमुख्यमंत्री



श्री. अतुल सावे
मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण,
अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभाग,
महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष – वनार्टी

मोफत अर्थसहाय्य

वनार्टीच्या प्रशिक्षण योजना

- संघ लोकसेवा आयोग (UPSC) परीक्षापूर्व प्रशिक्षण.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC – राजपत्रित) परीक्षापूर्व प्रशिक्षण.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC – गट ब व क) परीक्षापूर्व प्रशिक्षण.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC – अभियांत्रिकी सेवा) परीक्षापूर्व प्रशिक्षण.
- एम.बी.ए., कॅट, सी.एस.एम.टी. सेट परीक्षापूर्व प्रशिक्षण.
- IBPS Banking / LIC / AAO परीक्षापूर्व प्रशिक्षण.
- JEE / NEET / MHT-CET परीक्षापूर्व प्रशिक्षण.
- कर्मचारी निवड आयोग परीक्षापूर्व प्रशिक्षण.
- मिलिटरी / पोलीस परीक्षापूर्व प्रशिक्षण.
- TAIT परीक्षापूर्व प्रशिक्षण.
- कौशल्य विकास प्रशिक्षण.

अधिक माहितीसाठी संपर्क

वनार्टीचे इतर उपक्रम

- डिजिटल लायब्ररी व अभ्यासिका
- सेवादूत प्रकल्प
- मोफत मुलाखत मार्गदर्शन कार्यशाळा
- शेती व उद्योग प्रशिक्षण उपक्रम
- बाजारहाट ई कॉमर्स प्रकल्प

वनार्टीच्या अर्थसहाय्य योजना

- UPSC मुख्य परीक्षेकरिता अर्थसहाय्य.
- UPSC व्यक्तिमत्त्व चाचणी परीक्षेकरिता अर्थसहाय्य.
- MPSC राज्यसेवा मुख्य परीक्षेसाठी अर्थसहाय्य.
- MPSC राज्यसेवा व्यक्तिमत्त्व चाचणी अर्थसहाय्य.
- MPSC महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षा अर्थसहाय्य.
- MPSC महाराष्ट्र दुय्यम सेवा मुलाखत अर्थसहाय्य.

३०५, तिसरा माळा,
अ विंग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर,
सामाजिक न्याय भवन,
दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर
४४००२२

vanarti.info@gmail.com

+91 788 788 2026

www.vanarti.in



महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था(महाज्योती), नागपूर

(महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाची स्वायत्त संस्था)

महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

मोफत प्रशिक्षण



मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री



मा. ना. श्री. एकनाथ शिंदे
मा. उपमुख्यमंत्री



मा. ना. श्रीमती सुनेत्रा पवार
मा. उपमुख्यमंत्री



मा. ना. श्री. अतुल सावे
मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण,
अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभाग,
महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष – महाज्योती

मोफत अर्थसहाय्य

महाज्योतीच्या प्रशिक्षण योजना

- संघ लोकसेवा आयोग (UPSC) मार्फत घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) मार्फत घेण्यात येणाऱ्या राज्यसेवा, गट-ब व क आणि अभियांत्रिकी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण.
- UGC NET / CSIR / MH-SET परीक्षा पूर्व प्रशिक्षण.
- MBA CAT / CMAT-CET परीक्षा पूर्व प्रशिक्षण.
- कर्मचारी निवड आयोग परीक्षा पूर्व प्रशिक्षण.
- रेल्वे भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण.
- IBPS / Banking / LIC / AAO परीक्षा पूर्व प्रशिक्षण.
- पोलीस / सैनिक भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण.
- शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी परीक्षा पूर्व प्रशिक्षण.
- GRE / TOEFL / IELTS चे प्रशिक्षण.
- परदेशी भाषा प्रशिक्षण : जपानी, जर्मन, फ्रेंच, रशियन, चायनीज.

ज्ञानाची प्रकाशवाट

महाज्योतीच्या अर्थसहाय्य योजना

- UPSC मुख्य परीक्षेकरिता अर्थसहाय्य.
- UPSC व्यक्तिमत्त्व चाचणी परीक्षेकरिता अर्थसहाय्य.
- MPSC राज्यसेवा / इतर गट 'अ' मुख्य परीक्षेसाठी अर्थसहाय्य.
- MPSC राज्यसेवा / इतर गट 'अ' व्यक्तिमत्त्व चाचणी परीक्षेकरिता अर्थसहाय्य.
- MPSC महाराष्ट्र दुय्यम सेवा / इतर गट 'ब' मुख्य परीक्षेसाठी अर्थसहाय्य.
- MPSC महाराष्ट्र दुय्यम सेवा / इतर गट 'ब' व्यक्तिमत्त्व चाचणी अर्थसहाय्य.
- महात्मा ज्योतिबा फुले संशोधन (PhD) अधिछात्रवृत्ती योजना.

महाज्योतीचे इतर उपक्रम

- JEE / NEET / MHT-CET परीक्षा पूर्व प्रशिक्षण.
- व्यावसायिक वैमानिक प्रशिक्षण.
- कौशल्य विकास प्रशिक्षण.

महत्त्वाची सूचना

महाज्योतीच्या सर्व योजनांचा लाभ केवळ महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्गीय (OBC), विमुक्त जाती-भटक्या जमाती (VJ-NT) आणि विशेष मागासवर्ग (SBC) या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनाच घेता येईल. योजनांविषयी अधिक माहितीसाठी खालील दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा अथवा महाज्योतीच्या अधिकृत संकेतस्थळास भेट द्यावी.

खालील क्यूआर कोड स्कॅन करा, महाज्योतीच्या योजनांबद्दल अधिक माहिती मिळवा.

0712-2878120/21

www.mahajyoti.org.in

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, दुसरा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर ४४००२२

महाराष्ट्र शासन



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री



देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री



प्रगतीच्या उज्ज्वल प्रकाशात समृद्धी नांदो आपल्या महाराष्ट्रात!

शुभ दीपावली



माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन
www.mahasamvad.in | @MahaDGIPR | DGIPR, Govt of Maharashtra | /MaharashtraDGIPR

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री

सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री